# प्रथमवर्ष कला

# राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका-१

# राज्यशास्त्राची ओळख

# Revised Syllabus for
# F.Y.B.A. - Political Science
# INTRODUCTION TO POLITICS
# FYBA - PAPER I

## SECTION I

**Module 1 The study of Politics**

1.1 Definitions and nature and scope
(Note: The definition should reflect the changing understanding of politics)
1.2 Normative and Empirical Approaches
1.3 Feminist Approache

**Module 2 Society, State and Nation State**

2.1 The state and society
2.2 Nationalism and Nation State
2.3 The Civil society

**Module 3 Meaning and types of :**

3.1 Power and Authority
3.2 Legitimacy
3.3 Sovereignty

**Module 4 Select Concepts :**

4.1 Law : Definition, Nature, Scope and Types
4.2 Political Obligation
4.3 Resistance : Civil Disobedience, Revolution

## SECTION II

**Module 5 Basic Political Values**

5.1 Liberty
5.2 Equality
5.3 Justice - Procedural, Distributive

**Module 6 Rights**

6.1 Definition, Meaning and Nature
Types : Civil, Political, Socio, Economic
6.2 Contemporary Issues and Debates

**Module 7 Forms of Government**

7.1 Democratic and non-democratic forms of Government
7.2 Pre-requisties of Democracy
7.3 Democracy in India.

**Module 8 Ideologies**

8.1 Significance and classification
8.2 Communism
8.3 Gandhism
(w.e.f. from academic year 2011-12)

## List of References

1. Ball, Terence, ideals and ideologies : A Reader, Addison-Wesley, Bostan, 1995.
2. Ball, Terence and Dagger. Richard, Political Ideologies and the Democratic Ideal, fourth Edition, Longman, 2003.
3. Barry, Normal, An Introduction to Modern Political Theory, Macmillan, London, 1981.
4. Bird, Colin, An Introduction to Political Philosophy, Cambridge University Press, Cambridge, 2007.
5. Farrelly, Colin, An Introduction to Contemporary Political Theory, Sage, London, 2003.
6. Gaus, Gerald F., Political Concepts and Political Theories, Westview Press, Boulder, 2000.
7. Goodin, Robert E. and Klingemana, Hans-Dieter, A New Handbook of Political Science, Oxford University Press, Oxford 1998.
8. Greenstein, Fred I. and Pclsby, Nelson W, Handbook of Political Science, Addison Wesley Longman, Reading, 1975.
9. Hawkesworth Mary and Kogan, Maurice (Eds.), Encyclopedia of Government, Vols. I, II Oxford University Press, Oxford, 1992.
10. Held, David, Political Theory and the Modem State, Polity Press, Cambridge, 1989.
11. Heywood, Andrew, Political Ideologies : An Introduction Palgrave Macmillan, Basingstoke, 2003.
12. Heywood, A, Political Theory - An Introduction, Third Edition, Palgrave Macmillan, Basingstoke, 2003.
13. Hoffman, John and Graham, Paul, Introduction to Political Theory, Longman, Harlow, 2006.
14. Kaviraj, Sudipta and Khilnani, Sunil, Civil Society. History and Possibilities, Cambridge University Press, Cambridge, 2001.
15. Mackenzie, I., Political Concepts : A Reader and Guide, Edinburgh University Press, Edinburgh, 2005.
16. Marsh, David and Stoker, Gerry, Theory and Methods in Political Sciences, Macmillan, Houndmills, 1995.
17. Mohanty, M, Contemporary Indian Political Theory, Sanskrit, New Delhi, 2002.
18. Okin, S. M., Justice, Gender and the Family, Basic Books, New York, 1987.
19. Plant, R., Modern Political Thought Blackwell, Oxford, 1991, 20 Varma, S. P., Modern political Theory, Vikas, New Delhi, 1983. 21. Vincent, A., Modern Political Ideologies, Blackwell, Oxford, 1992
20. बकाणे छाया, 'प्रारंभिक राज्यशास्त्र' श्री विद्या प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

# १

## मोड्यूल १
# राज्यशास्त्राचा अर्थ, स्वरुप, व्याप्ती

**घटक रचना :**

१.० उद्दीष्ट
१.१ प्रस्तावना
१.२ राज्यशास्त्राची व्याख्या
१.३ राज्यशास्त्राचे स्वरूप
१.४ राज्यशास्त्राची व्याप्ती
१.५ राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व
१.६ दिर्घोत्तरीय प्रश्न

## १.० उद्दीष्ट

- राज्यशास्त्राचे बदलते अर्थ, स्वरुप, व्याप्ती समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

या प्रकरणात राज्यशास्त्राच्या व्याख्या आणि अर्थ समजणे या दृष्टीकोनातून विविध व्याख्या दिल्या आहेत. कारण राज्यशास्त्राची एकच स्पष्ट आणि निश्चित व्याख्या देणे कठीण आहे. राजकीय जीवनाच्या विविध बाजू लक्षात घेऊन; तर काही विचारवंतांनी राज्यशास्त्राच्या विशिष्ट बाजूला महत्त्व घेऊन राज्यशास्त्राच्या व्याख्या केल्या आहेत. राज्यशास्त्राच्या अभ्यासाची सुरवात इ.स. पूर्वी ग्रीक विचारवंतांनी केली आहे. त्यानंतर मध्ययुगीन, आधुनिक विचारवंतांनी राज्यशास्त्राच्या व्याख्या केल्या आहेत. यासर्व व्याख्यांवरून राज्यशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्ती समजणे सोपे जाते.

## १.२ राज्यशास्त्राची व्याख्या

### १) राज्यशास्त्राचा उगम (origin)

'पॉलीटिक्स' हा ग्रीक शब्द 'पोलीस' यापासून तयार झाला आहे. 'पोलीस' म्हणजे नगरराज्य. ग्रीक विचारवंतांच्या मते नगरराज्याशी संबंधीत सर्व कृती, घडामोडींचा अभ्यास

करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय. 'पोलीस' म्हणजेच 'नगरराज्य' यामध्ये अनेक गोष्टींचा समावेश होतो. प्राचीन काळी ग्रीक विचारवंत राज्य आणि शासन संस्था त्याचप्रमाणे राज्य आणि समाज यात भेद करीत नसत. सामाजिक जीवन आणि राजकीय जीवन तसेच व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन यातही भेद केला जात नसे, म्हणूनच ग्रीक विचारवंतांच्या मते राज्यशास्त्र म्हणजे मानव, समाज, राज्य, नैतिकता या सर्वांचाच अभ्यास करणारे शास्त्र आहे.

**२) 'राज्या'चा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र :**

राज्यशास्त्राच्या पारंपारिक व्याख्यांप्रमाणे राज्यशास्त्र राज्याचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. आर. जी. गेटेल, जे डब्ल्यू गार्नर ब्लइंटली आणि इतर अनेक विचारवंतांनी त्यांच्या व्याख्यांतून असेच मत व्यक्त केले आहे.

**आर. जी. गेटेल :** ''ज्या शास्त्राद्वारे भूतकालीन राज्य कसे होते, वर्तमानकालीन राज्य कसे आहे आणि भविष्यकालीन राज्य कसे असावे याची माहिती मिळते ते शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.''

**गार्नर :** या इंग्लिश विचारवंतांच्या मते ''ज्या शास्त्रात राज्याचा प्रारंभ व शेवट इत्यादींचा विचार होतो त्याला राज्यशास्त्र म्हणतात.''

**३) राज्यशास्त्र म्हणजे शासनसंस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र**

पॉल जेनेट, जॉर्ज कॅटलीन सर जॉन सीली या राजकीय विचारवंताच्या व्याख्या यावर भर देतात की राज्यशास्त्र म्हणजे शासनसंस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

**पॉल जेनेट :** राज्यशास्त्राची व्याख्या करतात की, ''राज्यशास्त्र समाजशास्त्राचा एक भाग आहे. ज्यामध्ये राज्य आणि शासनसंस्थेची तत्त्वे ह्यांचा अभ्यास करण्यात येतो.''

**जॉर्ज कॅटलीन :** यांच्या मते ''राजकीय क्षेत्रातील क्रियांचा आणि प्रक्रियांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.''

**सर जॉन सीली :** यांच्या मते ''ज्याप्रमाणे अर्थशास्त्रात संपत्तीचा, प्राणीशास्त्रामध्ये जीविताचा, बीजगणितात अंकांचा व भूमितीमध्ये स्थळ व उंचीचा विचार होतो; त्याचप्रमाणे राज्यशास्त्रात शासनाचा अभ्यास करण्यात येतो.''

ऑक्सफोर्ड इंग्लीश डिक्शनरी प्रमाणे राज्यशास्त्राची व्याख्या अशी केली आहे की, ''राज्यशास्त्र म्हणजे राज्य आणि शासनाच्या पद्धतींचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.''

**४) राष्ट्रीय संस्थांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र**

**ब्रीडल** यांनी असे मत व्यक्त केले की, ''राज्यशास्त्र राष्ट्रीय राजकीय संस्था, त्यांचा इतिहास, त्यांची वैचारिक तत्वे, त्या संस्थेचे कार्य, त्यांच्या कार्यावर प्रभाव पाडणारे घटक, त्या संस्थाचा देशाच्या एकूण जीवनावर प्रभाव पाडणारे घटक, त्या संस्थाचा देशाच्या एकूण जीवनावर प्रभाव, त्या संस्थांचा शेजारी राष्ट्रांशी संबंध या सर्व गोष्टींचा एकत्रित अभ्यास करणारे शास्त्र होय.''

**परंपरागत दृष्टीकोन :** वरील सर्व व्याख्या राज्यशास्त्राच्या परंपरागत व्याख्या आहेत. राज्यशास्त्राच्या औपचारिक (Formal), संस्थात्मक (Institutional) आणि सैद्धान्तिक (Theoritical) बाजू वर भर देणाऱ्या या व्याख्या आहेत. राज्य आणि शासनसंस्था केंद्रित या व्याख्या आहेत. राज्यशास्त्राची व्यावहारिक बाजू आणि वास्तविकता या व्याख्यांमध्ये दुर्लक्षित आहे. त्यामुळे आधुनिक विचारवंतांनी त्यांच्या व्याख्यांमधून राज्यशास्त्राची व्यावहारिक बाजू स्पष्ट केली आहे.

**५) राज्यशास्त्र म्हणजे सत्तेचा अभ्यास करणारे शास्त्र आहे**

**हॅराल्ड लॅसवेल** यांच्या मते सत्ता, सत्तेचे वाटप, सत्तेला आकार देणारे घटक इत्यादीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.

**रॉबर्ट ढाल** यांच्या मते ''राज्यशास्त्रामध्ये शक्ती, सत्ता, अधिसत्ता ह्यांचा अभ्यास होतो.''

अशा प्रकारे वरील विचारवंतांच्या मते सत्ता मिळविणे आणि मिळविलेली सत्ता टिकविणे याभोवतीच राजकीय कृती केंद्रित होतात. राजकारणामध्ये ''सत्ता'' ही मध्यवर्ती संकल्पना असते. सत्ता कुणाला मिळाली, कशी मिळाली, केव्हा आणि काय मिळाली याभोवतीच राजकारण फिरत असते.

**६) राज्यशास्त्र म्हणजे संघर्षाचा आणि ते संघर्ष सोडविण्याचा (conflict resolution) अभ्यास आहे**

''**नेचर ऑफ पॉलीटिक्स**'' या आपल्या पुस्तकात मिलरने संघर्ष आणि ते संघर्ष सोडविण्याचे साधन या राज्यशास्त्राच्या बाजूवर भर दिला आहे. राजकीय कृतींचा हेतू बदल घडवून आणणे किंवा बदलांना प्रतिकार करणे हा असतो. जेव्हा लोक वेगवेगळ्या गोष्टींसाठी संघर्ष करतात तेव्हा ते संघर्ष सोडविण्याचे साधन म्हणून राजकारणाचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळेच राज्यशास्त्रामध्ये राजकीय संघर्षाचा अभ्यास करण्यात येतो.

**७) राज्यशास्त्रात अनेक सत्ता घटकांचा व त्यांच्या संबंधाचा अभ्यास करण्यात येतो.**

एनसायक्लोपिडिया ऑफ सोशल सायन्सेसमध्ये असा उल्लेख आहे की, वर्तमानकालीन राज्यशास्त्रामध्ये सत्ता मिळविणे, सत्तेचे विभाजन करणे याचा अभ्यास असतोच; परंतु राजकीय संस्था आणि राजकारण पोकळीत काम करीत नाही. राजकीय संस्थांवर आणि राजकीय प्रक्रियांवर अनेक सामाजिक, आर्थिक घटकांचा प्रभाव होतो आणि त्यातून राजकारण घडत असते. म्हणूनच राज्यशास्त्रामध्ये राजकारण, राजकीय संस्था, राजकीय पद्धतीचा अभ्यास करीत असतांना त्यावर प्रभाव पाडणाऱ्या विविध घटकांचाही अभ्यास करावा लागतो.

**पॉवेलच्या** मतानुसार ''राजकीय व्यवस्था, राजकीय पद्धती आणि त्यावर प्रभाव पाडणारे विविध घटक यांचा अभ्यास राज्यशास्त्रामध्ये होतो.''त्यादृष्टीने राज्यशास्त्र म्हणजे सत्ता, अधिसत्ता, प्रभाव यांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

**निष्कर्ष :** वरील व्याख्यांवरून राज्यशास्त्र विषयाचे बदलते स्वरूप लक्षात येते. राज्यशास्त्राचा अर्थ सांगणारे मुख्यतः दोन दृष्टीकोन दिसून येतात. १) परंपरागत दृष्टीकोन, २) आधुनिक दृष्टीकोन. परंपरागत दृष्टीकोन राज्यशास्त्र म्हणजे राज्य, शासनसंस्था, राष्ट्रीय संस्था इत्यादींचा अभ्यास करणारे शास्त्र आहे असे सांगून राज्यशास्त्राचा औपचारिक आणि थिअरी (सैध्दान्तिक) भागांवर अधिक भर देतात. आधुनिक दृष्टीकोन राज्यशास्त्र म्हणजे सत्ता, अधिसत्ता, राजकीय प्रक्रिया, राजकीय घटकांवर प्रभाव पाडणाऱ्या शक्ति, संघर्ष इत्यादींचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र यावर भर देतात. राज्यशास्त्राची व्यावहारिक, वास्तविक बाजू ते दाखवितात.

**सारांश** :- राज्यशास्त्राचा अर्थ सारांशरुपाने खालील टेबल वरुन स्पष्ट होतो.

राज्यशास्त्राच्या व्याख्या आणि अर्थ

| १<br>परंपरागत व्याख्या<br>↓ | २<br>आधुनिक व्याख्या<br>↓ |
|---|---|
| १) उदय | १) सत्तेचा अभ्यास |
| २) ग्रीक विचारवंताच्या मते | २) राजकीय संघर्षाचा अभ्यास |
| ३) राज्याचा अभ्यास | ३) सत्ता अधिसत्ता प्रभाव यांचा अभ्यास |
| ४) शासनसंस्थेचा अभ्यास | या व्याख्या राजकीय प्रक्रिया, राजकीय घटना वास्तविक राजकारण या बाजूंवर भर देतात. |
| ५) राष्ट्रीय संस्थाचा अभ्यास<br>या व्याख्या औपचारिक, संस्थापक, सैध्दान्तिक बाजूवर भर देतात. | |

**निष्कर्ष:** राज्यशास्त्र म्हणजे राज्य, शासनसंस्था, सत्ता, अधिसत्ता, राजकीय प्रक्रिया, संघर्ष, राजकीय व्यवस्था व त्यावर प्रभाव पाडणारे घटक या सर्वांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

## १.३ राज्यशास्त्राचे स्वरूप (Nature)

**प्रस्तावना** - राज्यशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यामुळे विज्ञानशास्त्र उदा. फिजिक्स, केमेस्ट्री या शास्त्रांपेक्षा राज्यशास्त्राचे स्वरूप भिन्न आहे. राज्यशास्त्राचा उदय, उत्क्रांती, विकास यांचा अभ्यास करीत असतांना राज्यशास्त्राच्या स्वरूपाविषयीच्या विविध बाजू आणि मतप्रणाली लक्षात येतात. राज्यशास्त्राच्या व्याख्या आणि अर्थ लक्षात घेतांना हे स्पष्ट होते की, राज्यशास्त्र राजकीय संस्था, राजकीय प्रक्रिया, राजकीय घटकांचा पद्धतशीर व व्यवस्थीत अभ्यास करणारे शास्त्र आहे. त्याअर्थाने राज्यशास्त्र हे एक 'शास्त्र' (science) आहे. परंतु जेव्हा राज्यशास्त्राला आपण 'पॉलीटिक्स' असे म्हणतो तेव्हा याविषयाला 'शास्त्र' कितीप्रमाणात म्हणता येईल असा प्रश्न उद्‌भवतो. राज्यशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करतांना राजकीय विचारवंतांनी विविध मते व्यक्त केली आहेत. काही राज्यशास्त्रज्ञांच्या मते राज्यशास्त्र शास्त्र (science) आहे. काही विचारवंतांनी राज्यशास्त्र कला (Art) आहे असे म्हटले आहे. काही अभ्यासकांना राज्यशास्त्र म्हणजे राजकारण (Politics) आहे असे वाटते. तर काहींना राज्यशास्त्राचे

स्वरूप राजकीय सिद्धान्त आणि राजकीय तत्वज्ञानाप्रमाणे (Political theory and political philosophy) वाटते. राज्यशास्त्राच्या स्वरूपाविषयी असलेल्या या सर्व मतांचा सविस्तर अभ्यास खालीलप्रमाणे आहे.

### १) राज्यशास्त्र 'शास्त्र' आहे? (Is it a science):

राज्यशास्त्राचे स्वरूप विज्ञानशास्त्रासारखे आहे काय? असा प्रश्न नेहमीच उपस्थित करण्यात येतो. राज्यशास्त्रज्ञांमध्ये याविषयी एकमत नाही. काही विचारवंतांच्या मते राज्यशास्त्राचे स्वरूप शास्त्राप्रमाणेच आहे. तर उलट काही अभ्यासकांच्या मते राज्यशास्त्राचे स्वरूप शास्त्राप्रमाणे नाही.

**राज्यशास्त्र विज्ञानशास्त्राप्रमाणे नाही:**

मेटलँट, बर्क, गेटेल या राज्यशास्त्राज्ञांच्या मते राज्यशास्त्राचे स्वरूप विज्ञानशास्त्राप्रमाणे नाही. आपल्या मतांच्या समर्थनार्थ त्यांनी खालील मुद्दे दिले आहेत.

१) राज्यशास्त्राच्या व्याख्या, स्वरूप, अभ्यासपद्धती आणि राज्याचे सिद्धान्त या सर्वच बाबतीत राज्यशास्त्रज्ञांमध्ये एकमत नाही. राज्यशास्त्राच्या सिद्धांतामध्ये स्पष्टता, निश्चितता नाही. राज्याशास्त्राचे सिद्धान्त आणि तत्वे सर्व ठिकाणी सर्वकाळी एकाच प्रकारे उपयोगात आणता येतील असे नाही.

**२) राज्यशास्त्रातील नियम व तत्वे शाश्वत नाही** : विज्ञानशास्त्रामध्ये उदा. फिजिक्स, केमेस्ट्री, गणित या विषयांमध्ये निश्चित, शाश्वत निष्कर्ष काढता येतात. उदा. गणितात दोन अधिक दोन चारच होतात. फिजिक्समध्ये गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणे वर फेकलेली वस्तू नेहमीच खाली येते. म्हणजेच विज्ञान शास्त्राचे नियम निश्चित आणि शाश्वत असतात. त्याप्रमाणे राज्यशास्त्राचे सिद्धान्त व तत्त्वे शाश्वत व निश्चित नसतात. उदा. सांसदीय लोकशाही इंग्लड या देशात यशस्वी ठरली. म्हणून ही पद्धती भारतातही यशस्वी होईलच असे नाही. कारण प्रत्येक देशाच्या सामाजिक, आर्थिक घटकांचा त्या देशाच्या राजकीय संस्थावर प्रभाव पडतो. त्यातून त्या संस्थांना आकार येतो. प्रत्येक समाजाप्रमाणे, वेळेप्रमाणे, देशाप्रमाणे मानवी मूल्ये आणि दृष्टीकोन बदलणारी असतात. त्यामुळेच राज्यशास्त्रामध्ये निश्चित, काटेकोर, शास्वत सिद्धांत काढणे शक्य नाही.

**३) प्रयोगांचा अभाव :** विज्ञानशास्त्रांचे उदा. फिजिक्स, केमेस्ट्री इत्यादींचे प्रयोग प्रयोगशाळेत करता येतात. कारण या विषयांचा संबंध वस्तू (Non living objects) शी येतो. प्रयोगशाळेत प्रयोग करून वस्तुच्या बाबतीत निश्चित निष्कर्ष काढता येतात. याउलट राज्यशास्त्रामध्ये मानवी प्राणी (human beings) आणि मानवाने स्थापन केलेल्या संस्थांचा अभ्यास असतो. मानवीप्राणी त्याचा स्वभाव, मूल्ये, मते बदलणारी असतात. त्यामुळे राज्यशास्त्राचा मुख्य विषय 'मानवी प्राणी' हा प्रयोग करणाऱ्याच्या नियंत्रणात नसतो. मानवी वतर्णुकीबाबतीत प्रयोग करून काढलेला एखादा निष्कर्ष नंतरच्या प्रयोगामध्ये वेगळा असू शकतो. प्रयोगशाळेत विशिष्ट वातावरण तयार करून विज्ञानशास्त्राचा निष्कर्ष काढण्यात येतात तसे राज्यशास्त्रात प्रयोगशाळेत मानवी प्राण्यांवर प्रयोग करून निष्कर्ष काढता येत नाही.

**४) राज्यशास्त्र Subjective आणि Relative आहे :** राज्यशास्त्रामध्ये घटनांचा कार्यकारण संबंध सांगता येत नाही. विज्ञानशास्त्राप्रमाणे राज्यशास्त्रात एका विशिष्ट कारणांमुळे विशिष्ट परिणाम झाला असा निष्कर्ष काढता येत नाही. उदा. फ्रेंच राज्यक्रांती शासनाच्या दडपशाहीमुळेच झाली असा निष्कर्ष काढता येत नाही. कारण अनेक देशांमध्ये दडपशाही करणारे शासन असूनसुद्धा क्रांती होत नाही. त्यामुळे दडपशाही हे एकच कारण राज्यक्रांतीचे असते असा निष्कर्ष काढता येत नाही. राज्यशास्त्रातील निष्कर्ष अनेक संबंधीत घटकांवर अवलंबून असतात.

**५) राजकारणशास्त्र (statecraft) किंवा राज्य करण्याची कला शिकण्याचे शास्त्र:** राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासामुळे राज्य करण्याची कला अवगत होते किंवा व्यक्ती राजकारणी बनू शकते असे नाही. राजकारण शिकविणारे शास्त्र असे राज्यशास्त्राचे स्वरूप आहे असेही म्हणता येत नाही. राज्यशास्त्राचा अभ्यासक राजकारणी असतोच असे नाही.

अशाप्रकारे राज्यशास्त्राचे स्वरूप विज्ञानशास्त्राप्रमाणे नाही असे समर्थन वरील मुद्यांच्या आधारावर काही विचारवंतांनी केले आहे.

**राज्यशास्त्र शास्त्रच आहे**! [Politicalscience is a science] राज्यशास्त्राच्या स्वरूपाविषयी असे मत व्यक्त करणाऱ्या विचारकांनी आपल्या विधानाच्या समर्थनार्थ खालील मुद्दे दिले आहेत.

**१) राज्यशास्त्र सामाजिक शास्त्र आहे :** राज्यशास्त्र राज्य, शासन, राजकीय घटना, प्रक्रिया, सत्ता, राजकीय वर्तणूक इत्यादी विषयांचे पद्धतशीर ज्ञान देणारे शास्त्र आहे. राज्याशास्त्रामध्ये निरिक्षण, परिक्षण, अवलोकन, तुलना, संख्याशास्त्र, पाहणी, मुलाखती इत्यादी अभ्यासपद्धती द्वारे माहिती मिळविण्यात येते. एखाद्या विषयाची शास्त्रीय, सुव्यवस्थीत ज्ञान देणे म्हणजे शास्त्र होय, त्याअर्थाने राज्यशास्त्र शास्त्रच आहे. राज्यशास्त्र विज्ञानशास्त्र नाही तर; सामाजिक शास्त्र आहे.

**२) राज्यशास्त्रात प्रयोग करताच येत नाही असे नाही :** एखाद्या विषयाचे अवलोकन, निरिक्षण, परिक्षण, पाहणी करून माहिती मिळविणे. त्यानंतर त्या माहितीचे विश्लेषण करणे आणि त्यावरून एखादा निष्कर्ष काढणे याप्रकारे राज्यशास्त्रात प्रयोग करता येतात. अनेक राज्यशास्त्रज्ञांनी भूतकालीन अनुभव, वर्तमान परिस्थिती यांचा तुलनात्मक अभ्यास व विश्लेषण करून भविष्यातील राजकीय जीवनासंबंधीचे निष्कर्ष काढले आहेत. अशाप्रकारे रज्यशास्त्राचा अभ्यास ॲरिस्टॉटल या विचारवंताने करून राज्यशास्त्र विषयाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला आहे.

**३)** स्पष्ट, निश्चित, शाश्वत निष्कर्ष शक्य नसले तरी सर्वसाधारण निष्कर्ष राज्यशास्त्रात काढले जातात. उदाहणार्थ स्वतंत्र, निपक्षपाती न्यायालयीन व्यवस्था, स्वतंत्र वृत्तपत्रे लोकशाहीसाठी आवश्यक आहे. अशाप्रकारचे निष्कर्ष राज्यशास्त्रामध्ये सर्वकालीन आहे.

**४) राज्यशास्त्राच्या अभ्यासाने राजकारणातज्ञता येऊ शकते :** राज्य करणे, राजकारण करणे ही एक कला आहे. त्यासाठी विशिष्ट गुणांची आवश्यकता असते हे खरे; परंतु राज्यशास्त्राच्या अभ्यासाची जोड जर असेल तर राजकारणतज्ञांना येऊ शकते.

**५) राज्यशास्त्र विकसनशील शास्त्र आहे :** राज्यशास्त्र विज्ञानशास्त्राप्रमाणे वस्तुनिष्ठ शास्त्र नाही; मानवनिष्ठ शास्त्र आहे. मनुष्याच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास करून राजकीय घडामोडींचा अंदाज राज्यशास्त्रामध्ये घेता येतो. राजकीय घडामोडींचा अभ्यास करून परिणामांची सुसंगत नोंद राज्यशास्त्र ठेवीत असते. नवीन राजकीय घटनांचा अभ्यास करतांना या सुसंगत नोंदीचा उपयोग होतो. यातूनच राज्यशास्त्राचा विकास होतो. राज्यशास्त्र स्थिर शास्त्र नाही तर विकसनशील शास्त्र आहे.

**२) राज्यशास्त्राचे स्वरूप राजकीय तत्त्वज्ञानाप्रमाणे आहे? :**

प्राचीनकाळी राज्यशास्त्राला ‘तत्त्वज्ञान‘ या विषयाचा एक भाग समजण्यात येत असे. राज्यशास्त्र तत्त्वज्ञान विषयाची एक शाखा नाही तर एक स्वतंत्र विषय आहे असे मत प्रथम ॲरिस्टॉटल या विचारवंताने मांडले. राजकीय तत्वज्ञान राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा एक भाग आहे. कौटिल्य, प्लेटो, ॲरिस्टॉटल, हॉब्ज, महात्मा गांधी आणि इतर राजकीय विचारवंतांनी आदर्श राज्य कसे असावे, ते कसे आणावे, राज्याच्या आज्ञा का पाळाव्यात इत्यादी विषयी विचार मांडलेत. त्याचाच उल्लेख त्या त्या विचारवंतांचे राजकीय तत्वज्ञान असा त्याचा उल्लेख करण्यात येतो. राजकीय तत्त्वज्ञान राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा एक भाग आहे, संपूर्ण राज्यशास्त्र नव्हे. त्यामुळे राज्यशास्त्र म्हणजेच तत्वज्ञान असे समजणे चुकीचे आहे.

**३) राज्यशास्त्राचे स्वरूप राजकीय सिध्दान्ता प्रमाणे आहे काय ?**

राजकीय सिद्धान्ता (Political theory) चा अभ्यास राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासाचा एक भाग आहे. राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास केल्याशिवाय व्यावहारिक राजकारणाचा अभ्यास करता येत नाही. उदा. सांसदीय लोकशाही म्हणजे काय याचा सैद्धान्तिक अभ्यास केल्याशिवाय एखाद्या देशात सांसदीय लोकशाहीची कार्यवाही कशी होत आहे याचा अभ्यास होऊ शकत नाही. याचा अर्थ राजकीय सिद्धान्त म्हणजेच संपूर्ण राज्यशास्त्रविषय होऊ शकत नाही. राज्यशास्त्राचे स्वरूप व्यापक आहे.

**४) राज्यशास्त्र कला आहे?:**

राजकीय ज्ञान प्रत्यक्षात अंमलात आणणे ही एक कला आहे. चांगली राजकीय व सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी काय करावे याची माहिती राज्यशास्त्र विषयातून मिळते. राज्य करण्याची कला कशी अवगत करावी याचेही ज्ञान या विषयातून मिळते. आधुनिक राजकीय विचारवंत रॉर्बट ढाल यांच्या मते ‘राज्यशास्त्र’ ‘शास्त्र’ आणि ‘कला’ दोन्ही आहे.‘ उदा. राज्यशास्त्राचे विद्यार्थी अनुभव निरीक्षण पाहणी या आधारावर राजकीय सिद्धान्त पडताळून; त्याचे विश्लेषण करतात तेव्हा राज्यशास्त्राचे स्वरूप शास्त्राप्रमाणे असते; परंतु जेव्हा केलेले हे विश्लेषण राजकीय संस्थाच्या कार्यवाहीमध्ये अमलात आणण्यात येते तेव्हा राज्यशास्त्राचे स्वरूप कलेप्रमाणे असते.

### ५) राजकारण (Politics) की राज्यशास्त्र (Politicalscience) ?

राज्यशास्त्र या विषयाला 'पॉलिटिक्स' असे म्हणणे कितपत योग्य आहे. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राचा उल्लेख 'पॉलिटिक्स' असा केला होता. लस्की यांनी आपल्या पुस्तकाला 'ग्रामर ऑफ पॉलीटिक्स' असे नाव दिले होते. फ्रेडरिक पोलॅक या विचारवंतांने राज्यशास्त्राचे दोन भाग केले आहेत. १) सैद्धान्तिक राजकारण (Theoritical Politics) आणि २) व्यावहारिक राजकारण (Practical Politics) सैद्धान्तिक राजकारणमध्ये राज्याची उत्पत्ती आणि इतर अनेक सिद्धान्ताचा अभ्यास होतो. व्यावहारिक राजकारणामध्ये कूटनीती, शासनाची कार्यवाही, दैनंदिन राजकारण इत्यादीचा समावेश होतो. अलीकडे 'राजकारण' हा शब्द हितसंबंध, राजकीय डावपेच, धूर्तपणा, कूटनीती या अर्थाने वापरण्यात येतो. राजकारण करणे ही एक कृती आहे. प्रत्येक देशाच्या राजकीय नीतीचा तो एक भाग असतो. राजकीय नीती व धोरणाचा एक भाग म्हणून 'राजकारण' हा राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासाचा एक भाग आहे. त्यामुळे राज्यशास्त्र विषयालाच राजकारण असे म्हणणे चुकीचे आहे.

राज्यशास्त्रज्ञ आणि राजकारणी यातही फरक आहे. राज्यशास्त्रज्ञ राज्यशास्त्र या विषयाचा तज्ञ असतो. राजकारणी प्रत्यक्ष राजकारणात सहभागी असतो.

**सारांश :** राज्यशास्त्राचे स्वरूप विविध अंगी आहे. राज्यशासच्या शास्त्र, कला, तत्त्वज्ञान, सिद्धान्त, राजकारण या राज्यशास्त्राच्या स्वरूप दाखविणाऱ्या विविध बाजू आहेत. यासर्व बाजू एकमेकांशी संबंधीत आहे.




## १.४ राज्यशास्त्राची व्याप्ती

राज्यशास्त्राचे अभ्यासविषय म्हणजेच राज्यशास्त्राची व्याप्ती होय. राज्यशास्त्राच्या व्याख्या आणि स्वरूप याबाबतीत राजकीय विचारवंतांमध्ये एकमत नाही. युनेस्को हाऊस येथे सप्टेंबर १९४८ साली राजकीय विचारवंतांची एक कॉन्फरन्स घेण्यात आली होती. त्या कॉन्फरन्समध्ये राज्यशास्त्राच्या व्याप्तीमध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला.

## १) राजकीय सिद्धान्त आणि राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास :

प्राचीनकाळापासून ते आधुनिक काळापर्यंत राजकीय विचारवंतांनी सखोल अभ्यास करून, त्या त्या काळातील राजकीय समस्यांवर उपाय शोधणे यातून विविध राजकीय सिद्धान्त मांडले आहेत. उदा. प्लेटोने न्याय आणि आदर्श राज्य सिद्धान्त, हॉब्ज, लॉक, रुसो या विचारवंतांनी मांडलेले राज्याच्या उदयाचे सिद्धान्त, मार्क्सने मांडलेला साम्यवाद इत्यादी अनेक राजकीय सिद्धान्त काळाच्या ओघात उदयास आले. या सिद्धान्तामुळे राजशास्त्र विकसित झाले. राज्यशास्त्र विषयाचा पायाभूत आधार तयार झाला. राज्यशास्त्रातील या सिद्धान्ताच्या अभ्यासानंतर राज्यशास्त्रातील भविष्यकालीन निष्कर्ष काढता येतात. त्यामुळेच राजकीय सिद्धान्त आणि राजकीय तत्वज्ञान राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा एक महत्त्वाचा भाग ठरतो.

## २) राजकीय संस्थाचा अभ्यासः

राज्यशास्त्रामध्ये विविध प्रकारच्या राज्यघटना, शासनपद्धती, त्या त्या शासनपद्धतीचे गुणदोष उदा. लोकशाही, हुकुमशाही, अध्यक्षीय, सांसदीय शासनपद्धती इत्यादींचा अभ्यास करण्यात येतो. अशा अभ्यासामुळे आपल्या देशाच्या राजकीय संस्थामध्ये सुधारणा करता येतात. राज्यशास्त्राचा अभ्यास करतांना मूळ स्वरुपातील राजकीय संस्थाचा अभ्यास करणे आवश्यक असते.

## ३) राजकीय पक्ष आणि दबाव गटांचा अभ्यासः

राजकीय पक्षपद्धती, राजकीय पक्षांचे महत्त्व, कार्ये, भूमिका, दबावगट, हितसंबंधी गट यांचा राजकारणावर प्रभाव असतो. दबाव गट, हितसंबंधी गट, बिगर शासकीय संघटना (NGO’s) प्रत्यक्षपणे शासन कारभार करीत नाही; परंतु शासनाची धोरणे व नीतीवर अप्रत्यक्ष प्रभाव पाडतात. त्यांच्या प्रभावातून राजकारणाला आकार व वास्तववादी स्वरूप येते. म्हणूनच फक्त शासनाचा अभ्यास करून राज्यशास्त्राचा अभ्यास पूर्ण होत नाही तर शासनावर प्रभाव पाडणाऱ्या विविध राजकीय पक्ष, दबावगटांचा राज्यशास्त्राचया अभ्यासविषयात समावेश होतो.

## ४) आंतरराष्ट्रीय संबंधः

आंतरराष्ट्रीय संस्था, संघटना, धोरणे, देशादेशांचे एकमेकांशी संबंध याचाही समावेश राज्यशास्त्राच्या व्याप्तीमध्ये होतो. आज कोणतेही राष्ट्र एकटे राहू शकत नाही. प्रत्येक देशाची नीतीधोरणे आणि आंतरराष्ट्रीय धोरणे यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतो. आजच्या जागतिकरणाच्या युगात जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटनेचासुद्धा प्रत्येक देशावर परिणाम होतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंध राज्यशास्त्राचा महत्त्वपूर्ण अभ्यासविषयक ठरतो.

## ५) शासन आणि नागरी समाज (Civil Society) यांच्यातील संबंधाचा अभ्यासः

राज्यामध्ये नागरी समाज (सुसंस्कृत समाज) आणि शासनव्यवस्था यांचा समावेश होतो. नागरी समाज आणि शासन व्यवस्था दोन्हीचा राज्याच्या शासनावर वेगवेगळ्या पद्धतीद्वारे प्रभाव पडतो. नागरी समाजामध्ये नागरीक, बिगर शासकीय संघटना दबाव गट, विरोधी राजकीय पक्ष इत्यादींचा समावेश होतो. या नागरी समाजाचा शासकीय प्रक्रियांवर अप्रत्यक्ष प्रभाव पडतो, शासनाने विशिष्ट धोरणे करावीत म्हणून नागरी समाज त्यांच्यावर अप्रत्यक्षपणे दबाव आणतो. याउलट शासनाकडे सत्ता असल्यामुळे शासकीय प्रक्रियांवर त्यांचा प्रत्यक्ष प्रभाव असतो. म्हणूनच शासन आणि नागरी समाज यांच्यातील संबंध राज्यातील शासकीय प्रक्रिया

ठरविणारे महत्त्वाचे घटक आहेत. राज्याचे स्वरुप आणि शासकीय क्षमता समजून घेण्यासाठी राज्यशास्त्राचा अभ्यास करतांना शासन व नागरी समाज यांच्यातील संबंध समजणे आवश्यक ठरते.

**६) सत्ता, अधिसत्ता यांचा राजकीय कृती आणि राजकीय प्रक्रियांवर असलेला प्रभाव अभ्यास :**

राज्यशास्त्र वास्तविक आणि आदर्शवादी दोन्ही प्रकारचे आहे. आदर्शवादी दृष्टीकोनाप्रमाणे राज्यशास्त्रातील मूल्ये, आदर्श, नैतिकतत्त्वे, तत्वज्ञान इत्यादीचा अभ्यास राज्यशास्त्रामध्ये होतो. उदा. आदर्श राज्य कसे असावे, राज्याचे स्वरुप कसे असावे इत्यादी. याउलट वास्तववादी दृष्टीकोनानुसार राज्यशास्त्रामध्ये राजकीय कृती, राजकीय संस्था यांचे निरीक्षण करून विश्लेषण करण्यात येते. सत्ता, अधिसत्ता म्हणजे काय, त्यांचा एकमेकांवर प्रभाव, त्यांच्यातील संघर्ष, समाजातील सामाजिक आर्थिक घटक त्यांचा राजकारणावर प्रभाव, राजकीय संस्कृती, राजकीय सामाजिकरण यासर्व गोष्टींचा अभ्यास राज्यशास्त्रात होतो.

**७) राजकीय समाजीकरण, राजकीय सिद्धान्त, राजकीय संस्था यांचा अभ्यास :**

आधुनिक राज्यशास्त्रज्ञांच्या मते माणसाचे सामाजिक जीवन एक संपूर्ण आहे. माणसाच्या सामाजिक जीवनामध्ये होणाऱ्या प्रत्येक बदलाचे मानवाच्या राजकीय जीवनावर ही परिणाम होतात. राज्यातील सामाजिक, आर्थिक, मानसीक, सांस्कृतिक घटकांचा राज्यावर प्रभाव पडतोच. त्यामुळे राज्यशास्त्राचा अभ्यास करतांना फक्त राजकीय संस्थांचे विश्लेषण करून होत नाही तर; राजकीय संस्था आणि त्या संस्था ज्या सामाजिक आर्थिक वातावरणात कार्य करतात त्या सर्वांचा अभ्यास राज्यशास्त्रामध्ये होतो.

**८) राज्यशास्त्र प्रधानशास्त्र (Master-science) आहे :**

ॲरीस्टॉटलने राज्यशास्त्राला 'मास्टर सायन्स' म्हटले आहे. कारण राज्यशास्त्राचा मुख्य विषय राज्य आणि शासनसंस्था होय, राज्य व शासनसंस्थेने ठरविलेल्या, निर्माण केलेल्या वातावरणातच प्रत्येक व्यक्तीला आपले जीवन जगावे लागते. प्रत्येक व्यक्ति, संस्था, संघटना या सर्वांवर राज्याचे नियंत्रण असते. राज्याच्या कायद्यांतर्गतच प्रत्येकाला जीवन जगावे लागते आणि कार्य करावे लागते. कुणीही राज्य आणि राज्याच्या कायद्याशी माझे काय संबंध असे म्हणू शकत नाही. प्राचीन ग्रीक व्यक्तिचे राजकीय जीवन आणि व्यक्तिगत जीवन यात भेद करीत नसत. राज्यशास्त्र म्हणजे राज्य, समाज, व्यक्ति, नैतीकता यासर्वांचा एकत्रित अभ्यास करणारे शास्त्र आहे.

**९) राज्याशी संबंधित मानवी कृतींचा अभ्यास :**

राज्य ही एक मानवी संस्था आहे. मानवाला सुखी, सुसंस्कृत जीवन देण्यासाठी राज्य अस्तित्वात आले आहे. आज राज्याच्या आणि मानवाच्या प्रत्येक कृतीचा घनिष्ठ संबंध येतो. प्रत्येक व्यक्तिचा जन्मापासून मृत्यूपर्यंत राज्याशी संबंध येतो. त्यामुळे राज्याशी संबंधीत प्रत्येक मानवी कृतीचा राज्यशास्त्रामध्ये अभ्यास करण्यात येतो. उदा. लोकांचा राजकीय सहभाग, शासनाकडे बघण्याचा दृष्टीकोन इत्यादी.

### १०) लोकप्रशासनाचा अभ्यास :

शासनाच्या निर्णयांची आणि धोरणांशी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा आवश्यक असते. आधुनिक राज्ये लोककल्याणकारी राज्य असल्यामुळे प्रशासकीय यंत्रणेची जबाबदारी आणखीच वाढली आहे. प्रशासकीय यंत्रणा त्यांची कार्ये इत्यादीचाही अभ्यास राज्यशास्त्रामध्ये करण्यात येतो.

**सारांश:** राज्यशास्त्र विषयाची व्याप्ती दिवसेंदिवस बदलत्या परिस्थिती आणि काळाप्रमाणे वाढतच आहे.

**तक्ता – राज्यशास्त्राची व्याप्ती.**

**राज्यशास्त्राची व्याप्ती**

↓

१ → व्याप्तीचा अर्थ

२ → व्याप्ती

↓

१) राजकीय सिध्दान्ताचा अभ्यास
२) राजकीय संस्था
३) राजकीय पक्ष आणि दबावगट
४) आंतरराष्ट्रीय संबंध
५) शासन आणि नागरी समाज संबंध
६) सत्ता अधिसत्ता यांचा राजकीय प्रक्रियांवर प्रभाव
७) राजकीय सामाजिकरण
८) राज्यशास्त्र मास्टर सायन्स
९) सर्व मानवी कृती
१०) लोकप्रशासनाचा अभ्यास

## १.५ राज्यशास्त्राचे महत्व

मनुष्य सामाजिक प्राणी आहे. मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्ती आणि गुणांचा विकास समाजातच होतो. समाजामध्ये अनेक संस्थांचा समावेश होतो. उदा. कुटुंब, धर्मसंस्था, शैक्षणिकसंस्था, राज्यसंस्था. या सर्व संस्था मानवी विकासासाठी मदत करतात. समाजामध्ये शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने राज्यसंस्था अस्तित्वात आली. लोकंच्या गरजा पूर्ण करणे, त्यांना जीवन व संपत्ताची सुरक्षितता देणे राज्याचे कार्य आहे. त्याशिवाय मानवी व्यक्तिमत्व विकासाला पोषक परिस्थिती निर्माण करणे हेही राज्याचे उद्दीष्ट आहे. याचाच अर्थ असा की मनुष्यप्राणी राज्यापासून वेगळा राहू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती राज्याचा एक भाग आहे. त्यादृष्टीने प्रत्येक व्यक्तिला राज्याची माहिती असणे गरजेचे आहे. राज्यशास्त्र नागरिकांमध्ये जागरुकता आणण्याचे कार्य करते. लोकांना त्यांच्या हक्क व कर्तव्याची, स्वातंत्र्याची जाणीव करुन देते. अशातऱ्हेचे जागरुक नागरिक लोकशाही व्यवस्थेचे मुख्य खांब असतात. परिपक्व आणि जागरुक नागरिकच चांगले शासन देऊ शकतात. कोणत्याही राज्याचा

विकास त्या राज्याच्या नागरिकांवर अवलंबून असतो. चांगले नागरिक निर्माण करणे राज्यशास्त्र विषयाचे उद्दिष्ट आहे.राज्यशास्त्राला ॲरिस्टाटलने 'मास्टर सायन्स' म्हटले आहे. कारण राज्यातील सर्व संस्था,संघटना,व्यक्ती राज्याच्या नियंत्रणाखली कार्य करतात. आपण सर्व राज्याच्या कायद्याप्रमाणे वागत असतो.लोकांच्या सार्वजनिक जीवनसंबंधीचे सर्व निर्णय राज्य घेते. या निर्णयांवर शासनाचा प्रभाव असतो. शासकीय निर्णय संपूर्ण मानवी जीवनाला प्रभावित करतात.त्यादृष्टीने राज्य आणि शासनाचा अभ्यास करणे प्रत्येकाच्या हिताचे आहे.

## १.६ दिर्घोत्तरीय प्रश्न

१) राज्यशास्त्राची व्याख्या द्या आणि राज्यशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.

२) राज्यशास्त्राची व्याप्ती यावर सविस्तर लिहा.

३) राज्यशास्त्राचा अर्थ सांगून; राज्यशास्त्र शास्त्र की कला आहे ते लिहा.

४) राज्यशास्त्राचे महत्व सांगा.

❖❖❖❖

# २

# राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे दृष्टिकोन (II)

**घटक रचना :**

२.० उद्दीष्ट
२.१ प्रस्तावना
२.२ आदर्शवादी दृष्टीकोन
२.३ वास्तववादी दृष्टीकोन
२.४ स्त्रीवादी दृष्टीकोन
२.५ दिर्घोत्तरीय प्रश्न

## २.० उद्दिष्ट

- राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासपध्दती आणि दृष्टीकोन समजून घेणे.

## २.१ प्रस्तावना

राज्यशास्त्राचा अभ्यास विविध दृष्टीकोनातून, विविध मार्गांद्वारे करण्यात येतो. प्राचीन ग्रीक काळापासून राज्यशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात झाली आहे. ॲरीस्टॉटल या ग्रीक विचारवंताला 'राज्यशास्त्राचा जनक' म्हणतात. प्राचीन काळापासून साधारणपणे राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा दृष्टिकोन आदर्शवादी होता. या दृष्टीकोनातून राज्यशास्त्राचा अभ्यास झाला व त्याद्वारे राज्य आणि शासनासंबंधी अनेक सिद्धान्त मांडण्यात आले. प्राचीन काळापासून मानवाच्या राजकीय कृतींचा अभ्यास होत आहे. प्राचीन काळी भारतातही रामायण, महाभारत, मनुस्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथांमध्ये राजकीय विषयांवर विवेचन असल्याचे दिसून येते; परंतु साधारणपणे आदर्शवादी दृष्टीकोनातूनच हे विवेचन असल्याचे स्पष्ट होते. पहिल्या महायुद्धानंतर वर्तनवादी दृष्टीकोनातून राज्यशास्त्राचा अभ्यास होऊ लागला. राजकीय क्रिया, प्रक्रियांच्या अभ्यासावर भर देण्यात येऊ लागला. अशा प्रकारे आदर्शवादी पारंपारिक दृष्टीकोनाकडून आधुनिक वास्तववादी आणि वर्तनवादी दृष्टीकोनाकडे राज्यशास्त्राच्या अभ्यासाची वाटचाल आली. संस्थात्मक अभ्यासाकडून राजकीय प्रक्रिया, राजकीय घटना, सत्ता अधिसत्ता इत्यादी विषयांना राज्यशास्त्रांच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. त्यामुळेच राज्यशास्त्राचे स्वरूप, अभ्यासविषय आणि व्याप्ती यामध्ये आमूलाग्र बदल झाला. राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी आणि संशोधन करण्यासाठी नवीन दृष्टीकोनाचा आणि मार्गाचा अवलंब केल्यामुळे राज्यशास्त्राच्या व्याप्ती व स्वरूपामध्ये अमूलाग्र बदल झाला आहे. **दृष्टीकोनाचा अर्थ** :- राज्यशास्त्रप्रति दृष्टीकोन म्हणजे राज्यशास्त्राच्या संशोधन व अभ्यासाचे मार्ग किंवा पध्दती (method) होय. राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे मुख्य तीन दृष्टीकोन आहेत.

**१) आदर्शवादी दृष्टीकोन, २) वास्तववादी दृष्टीकोन, ३) स्त्रीवादी दृष्टीकोन.**

## २.२ आदर्शवादी दृष्टीकोन (Normative Approach) :

**प्रस्तावना** :- राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या, आदर्शवादी दृष्टीकोनाला पारंपारिक दृष्टिकोन म्हणतात. प्लोटो ते कार्लमार्क्स यांनी राज्यशास्त्रामध्ये जे विविध सिद्धान्त मांडले ते आदर्श राज्य, समता व न्यायावर आधारित राज्य स्थापन करणे यावर आधारलेले आहे. त्यांनी राज्य आणि शासनसंस्थांच्या अभ्यासावर अधिक भर दिला. विशिष्ट आदर्श आणि मूल्ये लक्षात घेऊनच त्यांनी राज्यशास्त्राचा अभ्यास केला होता. आदर्शवादी दृष्टीकोनाचे स्वरुप तत्वज्ञानात्मक, ऐतिहासिक, संस्थात्मक, औपचारिक आणि कायदेशीर आहे. या दृष्टीकोनाचा मुल्यांवर भर असतो. काय आहे यापेक्षा कसे असावे या दृष्टीकोनातून मुल्याना महत्व देऊन विचार मांडण्यात येतात.

**वैशिष्ट्ये:**

१) **आदर्शवादाला प्राधान्य :** न्याय, समता, स्वातंत्र्य इत्यादी आदर्श आणि मूल्यांना लक्षात घेऊन राजकीय विचारवंतांनी राज्यशा्त्राचा अभ्यास केला आहे. अस्तित्वात असलेल्या, आहे त्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भविष्यकालीन आदर्श व्यवस्था कशी आणता येईल यावर या दृष्टीकोनाचा भर असतो. उदा. प्लेटोची आदर्श राज्याची कल्पना, मार्क्सची साम्यवादी राज्याची कल्पना विशिष्ट मूल्ये आणि आदर्श मनात ठेऊन मांडलेले सिद्धान्त आहेत. यावरून असे दिसून येते की, आदर्शाला महत्त्व देणारा हा दृष्टीकोन आहे.

२) **नैतिक मूल्यांना महत्त्व :** समाज, राज्य, शासनव्यवस्था कोणत्या नैतिक तत्त्वांवर आधारलेली असावी याकडे अधिक लक्ष दिल्यामुळे हा दृष्टीकोन मूल्यप्रधान झाला आहे. उदा. चांगले, वाईट, योग्य, अयोग्य इत्यादी. आदर्श आणि चांगल्या राज्यासाठी काय चांगले असेत ते नैतिक दृष्टीकोनातून ठरविण्यात येते.

३) **औपचारिक, संस्थात्मक अभ्यासावर आणि वैधानिकतेवर भर :** राज्याची उत्पत्ती कशी झाली, राज्याचे प्रकार, राज्याची कार्ये, शासनाचे प्रकार, शासनाचे गुणदोष, राज्यघटना, कायदेनिर्मिती कशी होते. न्यायमंडळ कसे असावे अशा स्वरूपाच्या औपचारिक, सैद्धान्तिक, संस्थांना महत्त्व देणाऱ्या अभ्यासावरच या दृष्टीकोनाचा भर होता. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाला एक प्रकारे औपचारिक आणि वैधानिक स्वरूप आले. त्यामुळे राज्यातील वस्तुस्थिती याकडे दुर्लक्ष झाले.

४) **काल्पनिकतेवर भर :** कल्पनेप्रमाणे विशिष्ट गृहीत गोष्टी लक्षात घेऊन सिद्धान्त मांडण्यात येत असे. गृहीत तत्त्वांप्रमाणे चांगली व्यवस्था कशी आणावी याकडेच राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा अधिक रोख होता. उदा. राज्याचा उदय कसा झाला हे स्पष्ट करणारे सिध्दान्त काल्पनिक आहेत. त्या सिध्दातांना ऐतिहासिक आधार नाही.

५) **इतिहास आणि तत्वज्ञानाचे वर्चस्व :** ऐतिहासिक जीवन आणि ऐतिहासिक परिस्थितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढले जात. आणि त्यानुसार राजकीय तत्वज्ञानात्मक सिध्दान्त मांडले जात आसे. या दृष्टीकोनामुळे राजकीय विचारवंताचा कल सिध्दान्त मांडण्याकडे अधिक असे.

**आदर्शवादी दृष्टीकोनाचे मुल्यमापन :**

या दृष्टीकोनाचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत. या दृष्टीकोनानुसार राज्यशास्त्राचा अभ्यास झाल्यामुळे खालीलप्रकारचे दोष, त्रुटी निर्माण झाल्यात.

**दोष : १) ऐतिहासिक पुरावा नाही-** परंपरावादी आदर्शवादी दृष्टीकोनानुसार विविध विचारवंतांनी जे सिद्धान्त मांडले ते ऐतिहासिक पुराव्यानुसार पडताळून बघता येत नाही कारण बहुतेक सिद्धान्त कल्पनेवर आधारलेले आहेत.

**२) अतिसैद्धान्तिक-** हा दृष्टीकोन अतिसैद्धान्तिक असल्यामुळे अनेक प्रकारचे सिद्धान्त राज्यशास्त्रात विकसित झाले परंतु वास्तवता दुर्लक्षित झाली. आदर्श जग आणि वास्तविक जग अशी तफावत निर्माण झाली.

**३) मतभिन्नता-** गृहित तत्वाप्रमाणे राज्याशास्त्राचा अभ्यास झाल्यामुळे प्रत्येक विचारवंताच्या कल्पनेनुसार राजकीय सिद्धान्त, राज्यशास्त्राचे स्वरूप, राज्यशास्त्राच्या व्याख्या, राज्याचा उदय याविषयी विविध प्रकारच्या मतप्रणाली अस्तित्वात आल्या. राज्यशास्त्राचीसुद्धा एकच सार्वत्रिक अशी व्याख्या अस्तित्वात येऊ शकली नाही. अशा प्रकारे आदर्शवादी दृष्टीकोनावर टिका होत असली तरी या दृष्टीकोनाचे समर्थन करणाऱ्यांनी आदर्शवादी दृष्टीकोनाचे फायदे खालील प्रमाणे दिले आहेत.

**गुण :** **१)** या दृष्टीकोनामुळे राज्यशास्त्राचा पायाभूत अभ्यास झाला. उदा. विविध सिद्धान्त विकसित झाले. त्याचा फायदा वास्तववादी दृष्टीकोनातून अभ्यास करणाऱ्यांना झाला. वास्तववादी दृष्टीकोनानुसार राज्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना त्यामुळे मार्गदर्शन मिळाले. २) न्याय, नैतिकता इत्यादी चांगल्या मूल्यांनी पाठराखण करण्याविषयी आदर्शवादी दृष्टीकोन आठवण देतो. ३) राज्यशास्त्र विषयाला आधार प्राप्त झाला. पाया आणि आधारभुत सिध्दान्त विकसित झाल्यामुळे राज्यशास्त्र विषयाचा पाया रचला गेला.

**तक्ता :-**



## २.३ वास्तववादी दृष्टीकोन (Empirical Approach) :

**प्रस्तावना :** औद्योगिक क्रांती आणि त्यानंतर अस्तित्वात आलेले सामाजिक आणि आर्थिक प्रश्न कसे सोडवावे, त्यावर कोणते उपाय करावे याचा विचार राजकीय विचारवंतांना करावा लागला. वास्तविक जीवनातील राजकीय समस्यांवर उपाय शोधतांना विसाव्या शतकातील विचारवंतांना आदर्शवादी दृष्टीकोनातील त्रृटी लक्षात आल्या. आदर्शवादी दृष्टीकोनाला पूरक वास्तववादी दृष्टीकोन राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी उपयोगात आणल्या जाऊ लागला. १९४० नंतर वास्तववादी दृष्टीकोनाचाच राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी अधिक उपयोग होऊ लागला. ग्रॅहम वालास, आर्थर बेन्टले, चालर्स मेरियम हे वास्तववादी दृष्टीकोनाचे समर्थक आहेत. ग्रॅहम वालास यांनी 'ह्युमन नेचर इन पॉलीटिक्स' या आपल्या पुस्तकात राजकीय अभ्यासासाठी मानसशास्त्रीय बाजू आणि वास्तवतेवर अधिक भर द्यावा असा विचार मांडला. ऑर्थर बेन्टले यांनी राज्यशास्त्राच्या सामाजिक बाजूवर भर देण्याविषयीचा विचार मांडला. वास्तववादी **दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये** खालील आहेत.

**१) आधुनिक दृष्टीकोन :** वास्तववादी दृष्टीकोनाचा विकास प्रामुख्याने २० व्या शतकामध्ये झाला आहे. प्राचीन काळी या दृष्टीकोनानुसार राज्य शास्त्राचा अभ्यास काही विचारवंतांनी केल्याची उदाहरणे आहेत. उदा. ॲरिस्टाटलने १५८ देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून तुलनात्मक व विश्लेषण पद्धतीनुसार राज्याचे सिद्धान्त मांडले होते. मॅकॅव्हलीने (१४६९-१५२७) राजकारणाच्या प्रत्यक्ष अनुभवातून राज्याच्या कलेसंबंधीचे विचार 'प्रिन्स' या पुस्तकात मांडले. अशा प्रकारे काही विचारवंतांनी वास्तववादी दृष्टीकोनातून राज्यशास्त्राचा अभ्यास केला असल्याची उदाहरणे असली तरी; विसाव्या शतकामध्ये मात्र राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी वास्तववादी दृष्टीकोनाला प्राधान्य देण्यात आले. त्यादृष्टीने हा दृष्टीकोन आधुनिक आहे.

**२) शास्त्रीय पद्धतींवर भर :** राजकीय घटना, राजकीय कृती, प्रक्रिया इत्यादींचा अभ्यास करतांना शास्त्रीय पद्धतींवर अधिक भर देण्यात आला. उदा. पाहणी, निरिक्षण, परिक्षण, मुलाखती इत्यादीद्वारे माहिती मिळवून तुलनात्मक व विश्लेषणाद्वारे विशिष्ट निष्कर्ष काढण्यात येतात. उदा. 'मतदान प्रक्रिया' या राजकीय विषयाचा अभ्यास करतांना आदर्शवादी दृष्टीकोनवादी मतदान का करावे, कसे करावे यावर भर देतात; तर वास्तववादी प्रत्यक्षात पाहणी, मुलाखती घेऊन मतदान प्रक्रिया कशी घडते व घडली यावर भर देतात.

**३) मूल्यविरहीत किंवा मूल्यतटस्थता :** वास्तववादी दृष्टीकोन आदर्शमूल्ये, नैतीकमूल्ये, चांगले काय, वाईट काय याकडे फारसे लक्ष न देता वैचारिकता, वास्तवता इत्यादीला अधिक महत्त्व देतो. 'कसे असावे' यापेक्षा 'काय होते', 'कसे आहे' या वास्तविकतेला प्राधान्य देऊन एखाद्या राजकीय विषयाचा अभ्यास करण्यात येतो. वास्तववादी मूल्यतटस्थतेला महत्त्व देतात.

**४) आंतरविद्याशाखीय :** राजकीय समस्या किंवा राजकीय घटना याचा अभ्यास करतांना वास्तववादी समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, संख्याशास्त्र, गणितशास्त्र इत्यादी विषयांची मदत घेतात. कारण माणसाचे राजकीय वर्तन त्याच्या संपूर्ण वर्तनाचा एक भाग असतो. एखाद्या व्यक्तीचे किंवा समुहाचे राजकीय वर्तन असे का याचा अभ्यास करतांना त्या समुहाची सामाजिकता, आर्थिकता, मानसिकता याचाही अभ्यास करण्यात येतो. उदा. लोकांचे मतदानविषयक वर्तन याचा अभ्यास करतांना लोकांवर जात, धर्म, राजकीय पक्ष, आर्थिक समस्या या सर्व गोष्टींचा कसा प्रभाव पडतो याचाही अभ्यास करावा लागतो.

**५) राजकीय क्षेत्रातील अनौपचारिक गोष्टींनाही प्राधान्य:** या दृष्टीकोनाप्रमाणे राज्यशास्त्राचा अभ्यास करताना संस्थात्मक अभ्यासा बरोबरच त्या संस्था ज्या प्रभावाखाली कार्य करतात त्या घटकांचाही अभ्यास होऊ लागला. म्हणजेच औपचारिक अभ्यासाबरोबरच अनौपचारिक घटकांचा अभ्यास केल्याशिवाय राज्यशास्त्राचा अभ्यास होऊ शकत नाही हे लक्षात घेण्यात आले.

**६) वास्तवतेला प्राधान्य :** काल्पनिकता, गृहित तत्वे यापेक्षा प्रत्यक्ष वास्तव काय आहे यावर लक्ष केंद्रीत करण्यात येते. उदा. आदर्शवादी दृष्टीकोनानुसार ज्या राज्यात मृत्युदंड देण्यात येत नाही ते आदर्श राज्य समजण्यात येते. याउलट वास्तववादी दृष्टीकोनवादी सांख्यिकी माहिती पाहणीच्या आधारावर गोळा करून असा निष्कर्ष काढतील की, मृत्युदंड देण्यामुळे खुनासारखे गुन्हे कमी घडतात असे स्पष्ट करतील.

**७) वर्तनवादाला प्राधान्य :** वास्तववादी दृष्टीकोनाचाच एक भाग म्हणजे वर्तनवाद होय. वर्तनवाद म्हणजे माणसाच्या राजकीय वर्तणुकीचा अभ्यास करणे. राजकीय प्रक्रिया घडतांना त्या प्रक्रियेशी संबंधीत व्यक्तींची राजकीय वागणूक शास्त्रीय पद्धतीच्या मदतीने अभ्यास करणे यावर वर्तनवादाचा भर आहे. एखादी राजकीय घटना किंवा क्रिया अभ्यासतांना लायब्ररीत बसून अंदाजाने एखादा निष्कर्ष न काढता, पाहणी, पुरावा गोळा करून माहिती गोळा करणे, त्या माहितीचे विश्लेषण करणे. मिळालेली माहिती पडताळून बघणे. मूळ समस्या काय आहे त्याचा पडताळा घेणे आणि नंतर त्यावर उपाय सुचविणे इत्यादी प्रकारे वर्तनवादी दृष्टीकोनानुसार अभ्यास करण्यात येतो.

वास्तववादी दृष्टीकोन ‘वास्तविकता‘ प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन राज्यशास्त्राचा अभ्यास करणारा दृष्टीकोन आहे.

**मूल्यमापन:** वास्तववादी दृष्टीकोनावर टिका आणि या दृष्टीकोनाचे फायदे खालीलप्रमाणे दाखविण्यात येतात.

**टिका:** १) वास्तववादी दृष्टीकोनात मूल्यतटस्थता असते; परंतु पूर्णपणे मूल्यतटस्थता मानवी संस्कृतीच्या दृष्टीने योग्य नाही.

२) विसाव्या शतकातील राजकीय विचारवंत वास्तववादी दृष्टीकोनामुळे अतिशय प्रभावीत झाले होते. जास्तीत जास्त या दृष्टीकोनाचा उपयोग करून राजकीय समस्यांचा अभ्यास होऊ लागला परंतु जागतिक समस्यांवर उपाय शोधण्यास हा दृष्टीकोनसुद्धा अयशस्वी झाला आहे.

**फायदे :**

**१) राज्यशास्त्राची व्याप्ती वाढली :** या दृष्टीकोनानुसार अभ्यास केल्यानंतर राज्यशास्त्रात नविन संकल्पना विकसित झाल्यात. उदा. सत्ता, सत्तेवरील प्रभाव, राजकीय वर्तन, राजकीय संस्कृती इत्यादी त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाची व्याप्ती वाढली आहे.

**२) राज्यशास्त्र आणखी शास्त्रशुद्ध झाले :** वास्तववादी दृष्टीकोनानुसार विज्ञानशास्त्राप्रमाणे पाहणी, निरीक्षण, अवलोकन इत्यादी शास्त्रीय पद्धतीचा राजकीय समस्यांचा अभ्यास करतांना अवलंब होऊ लागला. अर्थात त्यामुळे विषयात आणखी शास्त्रीयता आली.

**३)** पारंपारिक आदर्शवादी दृष्टीकोनातील उणीवा या दृष्टीकोनानुसार भरून निघाल्या. संस्था आणि संस्थाचे प्रत्यक्ष कार्य दोन्हीचा अभ्यास होऊ लागला. उदा. आदर्शवादी दृष्टीकोनाप्रमाणे आदर्श लोकशाही कशी असावी याचा अभ्यास झाला तर वास्तववादी दृष्टीकोनानुसार भारतीय परिस्थितीमध्ये भारताला अध्यक्षीय लोकशाही योग्य की सांसदीय लोकशाही योग्य? भारतात किती टक्के लोक मतदान करतात. मतदान करतांना स्वतंत्रपणे करतात की एखाद्या घटकाच्या प्रभावाखाली करतात इत्यादीचा अभ्यास शोध घेऊन करणे राज्यशास्त्रात वास्तववादी दृष्टीकोनाप्रमाणे शक्य झाले आहे.

**तक्ता :- वास्तववादी दृष्टीकोन**




## २.४ स्त्रीवादी दृष्टीकोन (Feminist Approach) :

**प्रस्तावना** - राज्यशास्त्र या विषयाच्या अभ्यासामध्ये नविन विकसित झालेला दृष्टीकोन म्हणजे स्त्रीवादी दृष्टीकोन होय. स्त्रीयांचे हक्क याविषयीची वाढत असलेली जागृकता यातून हा दृष्टीकोन निर्माण झाला आहे.

**स्त्रीवादी दृष्टीकोनाचा विकास किंवा उत्क्रांती :**

एक राजकीय शक्ति (Force) किंवा एक राजकीय चळवळ म्हणून स्त्रीवादी दृष्टीकोन तीन टप्प्यामध्ये विकसित झाल्याचे दिसून येते.

१) १९ वे शतक आणि २० व्या शतकाच्या सुरवातीला स्त्रीयांचे मतदानविषयक हक्क याविषयीची चळवळ हा पहिला टप्पा होय.

२) दुसरा टप्पा म्हणजे स्त्रियांना सामाजिक आणि कायदेविषयक समानता द्यावी या स्वरूपातील होय. १९६० नंतर या टप्प्याची सुरवात झाली. उदा. कायद्याद्वारे लिंगभेद नष्ट करण्यात यावा. कामाच्या ठिकाणी स्त्रियांना समान संधी द्यावी इत्यादी.

३) लैंगिक शोषणाचा प्रश्न यासंबंधीत साधारणपणे १९९० नंतर या टप्प्याला सुरवात झाली.

अशा प्रकारे स्त्रीवादी दृष्टीकोन विकसित झाला असला तरी स्त्रीवादी दृष्टीकोनाच्या बाबतीत विविध मतप्रणाली दिसून येतात.

**स्त्रीवादी दृष्टीकोन संबंधीत विविध मतप्रणाली :**

१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या संकल्पनांना संपूर्ण जगात महत्त्व प्राप्त झाले. त्यातूनच स्त्री-पुरुष समानता, स्त्रीमुक्ती आणि स्त्रीशक्तिला चालणा देणे, स्त्रियांना समान हक्क देणे, या मुद्द्यांनाही महत्त्व आले. अर्थात याबाबतीत विविध मतप्रणाली अस्तित्वात आल्या. त्या मतप्रणाली (different schools of thought) खालीलप्रमाणे आहेत :-

१) उदारमतवादी स्त्रीवादी दृष्टीकोन
२) मार्क्सचा स्त्रीवादी दृष्टीकोन
३) समाजवाद्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन
४) जहाल विचारवाद्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन
५) सांस्कृतिक स्त्रीवाद
६) पर्यावरणवादी स्त्रीवाद

**१) उदारमतवादी स्त्रीवाद :**

राजकीय आणि कायदेविषयक सुधारणा करून स्त्री-पुरूष समता निर्माण करावी यावर उदारमतवादी भर देतात. उदा. कायद्यापुढे समानता. स्त्री आणि पुरुषांना समान कायदा लागू करणे.

**२) मार्क्सवादी स्त्रीवाद :**

मार्क्सवाद्यांच्या मते विशिष्ट प्रकारची सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्था हीच मुख्यतः स्त्रीयांवर अत्याचार, दडपशाही व शोषण करण्यास कारणीभूत असते. म्हणून ती व्यवस्थाच बदलणे गरजेचे असते असे मार्क्सवादी विचारकांचे मत आहे.

**३) समाजवादी स्त्रीवाद :**

समाजवाद्यांच्या मते स्त्रीयांवर होत असलेल्या सर्वप्रकारच्या अत्याचाराचे कारण आर्थिक घटक व आर्थिक व्यवस्था होय. उदा. समान कामासाठी स्त्रीपुरुषांना समान वेतन न देता स्त्रीयांना कमी वेतन देणे व त्यांचे शोषण करणे. तसेच कुटुंबापासूनच स्त्रीपुरुष असमानतेला सुरवात होते. म्हणून कौटुंबिक स्तरावर स्त्रीपुरुष समानता आधी आणावी.

**४) जहालवादी स्त्रीवाद :**

स्त्रीमुक्ती, स्त्रीशक्ती आणि स्त्रीयांचे स्वातंत्र्य याबाबतीत टोकाची भूमिका घेणारे म्हणजे जहाल स्त्रीवाद दृष्टीकोनवादी होय. स्त्री-पुरुष श्रेष्ठकनिष्ठता, पुरुषांची सर्वोच्चता आणि वर्चस्व इत्यादींला ते विरोध करतात. सर्वच आणि जीवनाच्या प्रत्येक बाबतीत स्त्री-पुरुष समानता असावी असा ते आग्रह धरतात.

**५) सांस्कृतिक स्त्रीवाद :**

सांस्कृतिक स्त्रीवादी असा विश्वास करतात की स्त्रिया प्रेमळ, कर्तव्यदक्ष असतात. जर स्त्रीयांकडे राजकीय सत्ता असली तर युद्ध वगैरेची भीती राहणार नाही. जगामध्ये सगळीकडे आनंद, प्रेम निर्माण होईल.

## ६) पर्यावरणवादी स्त्रीवाद :

सर्व प्राणीमात्रांप्रती आदर यावर पर्यावरणवादी स्त्रीवाद भर देतो. एकूणच स्त्रीवादाची उत्क्रांती आणि विकास याबाबतीत असलेले निरनिराळे विचारप्रवाह स्त्रीवादी दृष्टीकोनातून राजकीय सिद्धांत आणि क्रिया याकडे बघतात. स्त्रीवादी दृष्टीकोनाची मुख्य वैशिष्ट्ये खालील आहेत ते स्पष्ट होते.

**स्त्रीवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये :**

१) **स्त्रीमुक्ती आणि स्त्रीशक्तीवर भर देतात :** स्त्रियांचे स्वातंत्र, स्त्रियांना पुरुषांबरोबर समान हक्क व्यक्तिगत जीवनात आणि राजकीय जीवनातही असावी याकडे या दृष्टीकोनाचा कल आहे. स्त्रीयाची बंधने आणि शोषणापासून मुक्तता करणे; त्याचबरोबर स्त्रियांना शिक्षण देऊन स्त्रीशक्तीला चालना देणारे यावर भर देण्यात येतो.

२) **लिंगभेद सर्व समस्यांचे मूळकारण आहे असे मत :** स्त्रीवादी दृष्टीकोन असणारे राज्यविषयाचे प्रस्थापित सिद्धान्त नाकारतात. त्यांच्या मते या सिद्धान्ताप्रमाणे राजकीय जीवनात पुरुषी वर्चस्वाचे समर्थन केले आहे, स्त्रीयांना समान हक्क नाकारण्यात आले. उदा. सर्व प्रकारच्याच शासकीय संस्थांमध्ये पुरुषांचे प्रमाण जास्त असते आणि पुरुषांचेच वर्चस्व असते. स्थानीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सर्व स्तरांवरील निर्णय पुरुषी दृष्टीकोनातूनच घेतलेले असतात. राजकीय संबंधामध्येही पुरुष आणि स्त्री संबंधात पुरुषी वर्चस्वच असते. अशा प्रकारचा लिंगभेद असल्यामुळेच सर्व समस्या उद्‌भवतात असे स्त्रीवादी समजतात.

३) **पुरुषप्रधानतेवर टीका :** स्त्रीवादी दृष्टीकोन या गृहीत तत्वावर आधारलेला आहे की, शासन, शासकीय कायदे, शासनकर्ते, नोकरशाही, सनदीनोकर सर्वत्र पितृसत्ताक पद्धती दिसून येते. या सर्वच ठिकाणी असा समज दिसून येतो की स्त्रीयांपेक्षा पुरुष श्रेष्ठ असतात. स्त्रीवादी या पुरुषश्रेष्ठतेला, पुरुषप्रधानतेला विरोध करतात. अशा प्रकारची पुरुषश्रेष्ठता गृहीत धरणे म्हणजे स्त्रीयांवर अन्याय होय असे मत मांडतात.

४) **स्त्रीसमस्या सोडविण्यावर भर :** लिंगभेद नष्ट करण्याच्या दृष्टीने आणि स्त्रीयांविषयक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने स्त्रीवादी उपाय सुचवितात. स्त्रीशक्तिला चालना देण्याच्या दृष्टीने शासनाने काय करावे तेही सुचवितात.

५) **राज्यशास्त्राच्या इतर दृष्टीकोनांबरोबर स्त्रीवादी दृष्टीकोन जुळविणे यावर भर :** आदर्शवादी दृष्टीकोन, वास्तववादी दृष्टीकोन, सामाजिक व तुलनात्मक दृष्टीकोन इत्यादीबरोबर स्त्रीवादी दृष्टीकोन जोडण्यात यावा यावर भर देतात. उदा. स्त्रीवादी वास्तववादी दृष्टीकोन एकत्रीत करून स्त्रीयांचे मतदान वर्तन या अभ्यासावर भर देतो.

**स्त्रीवादी दृष्टीकोनाचे मूल्यमापन :** टिकाकारांच्या मते स्त्रीवादी दृष्टीकोनामध्ये खालील उणीवा आहेत.

१) स्त्रीवादी दृष्टीकोन गृहीत धरतो की, पुरुषच स्त्रीयांप्रती कनिष्ठता दाखवितात. स्त्रीयांवर अन्याय करतात; परंतु अनेकदा असे दिसून येते की, स्त्रीयाच स्त्रीयांच्या शत्रू असतात. उदा. सासूसून, नंणदभावजय नातेसंबंध.

२) सर्व स्त्रीविषयक समस्यांचे मूळ लिंगभेदच आहे असा दृष्टीकोन घेणे चुकीचे आहे. कारण अनेक समस्या स्त्री आणि पुरुष दोघांच्याही बाबतीत सारख्याच असतात.

**फायदे स्त्रीवादी दृष्टीकोनाचे :**

१) स्त्रीसमस्यांची काळजी करणारा दृष्टीकोन आहे. या दृष्टीकोनामुळे स्त्रीशक्तीला आणि स्त्रीमुक्तीला एक प्रकारे चालनाच मिळाली आहे.

२) राजकीय संशोधन आणि अभ्यास स्त्रीवाद्यांनी करून स्त्रीसमस्यांवर अनेक उपाय शोधले आहेत. उदा. स्त्रीयांचे दारिद्र, स्त्रीबाबतीतील गुन्हेगारी इत्यादी.

३) या दृष्टीकोनामुळे जागतिकस्तरावर स्त्रीयोगदान व स्त्रीसहभागाला चालना मिळाली. उदा. शांततासमित्या, सांस्कृतिक देवाणघेवाण, साक्षरता मोहिम इत्यादी बाबतीत स्त्रीसहभाग वाढला.

४) राजकीय क्षेत्रात, राजकीय परिभाषांमध्ये बदल करण्यात आला. स्त्री या घटकाकडे लक्ष देण्यात येऊ लागेल.

५) कौटुंबिक स्तरावर, व्यावसायिकस्तरावर, सार्वजनिक स्तरावर स्त्रीयांची भूमिका यामध्ये मोठेच परिवर्तन घेत आहे. अर्थात स्त्रीवादी दृष्टीकोनाचे यामध्ये फार मोठे योगदान आहे.

तक्ता

स्त्रीवादी दृष्टीकोन

- १ → उत्क्रांती
  - ३ स्तरावर
    - १) मतदान हक्क चळवळ
    - २) कायदेविषयक समता चळवळ
    - ३) लैंगिकतेची समस्या
- २ → विकास
  - विविध मतप्रणालींच्या स्वरुपात
    - १) उदारमतवादी
    - २) मार्क्सवादी
    - ३)समाजवादी
    - ४)जहालवादी
    - ५) सांस्कृतिकवादी
    - ६) पर्यावरणवादी
- ३ → वैशिष्टे
  - १) स्त्रीमुक्ती व स्त्रीशक्तीवर भर
  - २)लिंगविषयक समता
  - ३) पुरुषप्रधानतेवर टिका
  - ४) स्त्रीसमस्या सोडविणे यावर भर
  - ५) इतर दृष्टीकोनांशी मेळ
- ४ → मूल्यमापन
  - फायदे
  - तोटे

## २.५ दिर्घोत्तरीय प्रश्न

१) राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या आदशवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये सांगा ?

२) राज्यशास्त्राच्या वास्तववादी दृष्टीकोनाचे मूल्यांकन करा.

३) स्त्रीवादी दृष्टीकोनाची मुख्य वैशिष्ट्ये सांगा.

❖❖❖❖

# ३

# मोड्यूल २

# राज्य, समाज, नागरीसमाज

**घटक रचना :**

३.० उद्दीष्ट
३.१ प्रस्तावना
३.२ राज्याच्या व्याख्या व स्वरूप
३.३ राज्याचे घटक
३.४ राज्य आणि सरकार
३.५ समाज
३.६ दिर्घोत्तरीय प्रश्न

## ३.० उद्दिष्ट

समाज, राज्य, नागरी समाज या संकल्पनांचा अर्थ आणि स्वरुप समजून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

आज राज्य व्यवस्थेची व्याप्ती वाढली आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात राज्य यंत्रणेचे अस्तित्त्व आढळते. शासन यंत्रणा कधी प्रत्यक्षपणे तर कधी अप्रत्यक्षपणे आपल्या दैनंदिन आयुष्यात शिरलेली आहे. अशी स्थिती काही शतकांपूर्वी नव्हती. त्याकाळी राज्य व्यवस्थेच्या जबाबदाऱ्या अतिशय मर्यादित होत्या. त्या काळच्या राज्य व शासकीय यंत्रणेला १) कायदा आणि सुव्यवस्था आणि २) करवसुली अशा दोन जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत असत. त्या काळाच्या राज्याच्या मर्यादित जबाबदाऱ्या ते आजच्या राज्याच्या सर्वव्यापी जबाबदाऱ्या असा राज्य व्यवस्थेचा प्रवास आहे.

## ३.२ राज्याच्या व्याख्या आणि स्वरूप

राज्य म्हणजे काय? हे स्पष्ट करतांना अनेक अभ्यासकांनी राज्याच्या व्याख्या केल्या आहेत. **ॲरिस्टॉटल** यांनी राज्याची व्याख्या केली आहे. त्या व्याख्येनुसार "राज्य म्हणजे अनेक कुटुंब आणि खेड्यांचा समुच्चय होय. सुखी व चांगले जीवन व्यक्तीला देणे राज्याचे उद्दिष्ट असते."

काही अभ्यासकांच्या मते ॲरिस्टॉटलने केलेली राज्याची व्याख्या अचूक आहे. या व्याख्येमध्ये राज्य यंत्रणेच्या प्रधान हेतूला महत्त्व देण्यात आले आहे. ॲरिस्टॉटलची व्याख्या महत्त्वाची असली तरी आपल्याला इतर अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचाही अभ्यास करावयाचा आहे. काही महत्त्वाच्या व्याख्या खाली दिल्या आहेत.

१) **हॉलंड :** "राज्य म्हणजे राजकीयदृष्ट्या एकत्र आलेला व जमिनीच्या एका विशिष्ट तुकड्यावर राहणारा समाज."

२) **प्रा.विड्रो विल्सन :** "राज्य म्हणजे कायद्यासाठी संघटीत झालेला आणि विशिष्ट जमिनीच्या भूभागावर राहणारा समाज होय."

३) **डॉ. जे. डब्ल्यू. गार्नर :** "राज्य म्हणजे मोजता येईल असा मानवी समुह, जो एका निश्चित जमिनीवर कायम स्वरूपी वास्तव्य करतो, जो स्वतंत्र किंवा बऱ्याच अंशी स्वतंत्र आहे, ज्याच्यावर कोणतेही नियंत्रण नाही. जेथे सुसंघटीत सरकार आहे, ज्याचे त्या मानवी समुहातील लोक आज्ञा पाळतात, त्याला राज्य म्हणतात."

**प्रा. हेरॉल्ड लास्की :** "राज्य म्हणजे विशिष्ट जमिनीवर कायमी वस्ती करणारा समाज होय. ज्यात सरकार आणि जनता असे दोन भाग असतात. आणि शासन यंत्रणा इतर यंत्रणापेक्षा सर्वोच्च असते."

या दोन विस्तृत व्याख्यांचे विश्लेषण केल्यास राज्याचे चार घटक असल्याचे लक्षात येईल. १) लोकसंख्या, २) जमीन, ३) सरकार, ४) सार्वभौमत्व.

आज आपण जागतिकीकरणाच्या काळात वावरत आहोत. येथे आंतरराष्ट्रीय संबंध महत्त्वाचे असतात. यामुळेच आपल्याला फिलीमोर यांच्यासारख्या अभ्यासकाने दिलेल्या व्याख्येचा विचार करावा लागतो. फिलिमोर यांना व्याख्येत आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार केलेला आहे. फिलिमोर यांच्या मते, राज्य म्हणजे कायमचा जमिनीवर राहणारा मानवी समुह, जो काही समान कायदे, सवयी आणि परंपरांमुळे एकत्र राहत असतो. येथे एक व्यवस्थित संघटित केलेले सरकार असते, सार्वभौमत्त्व असते. हे राज्य त्या जमिनीवर राहणाऱ्या लोकांवर नियंत्रण ठेवते. ही राज्य व्यवस्था युद्ध करू शकते, त्याचप्रमाणे शांतता करार करू शकते, इतर देशांशी करार-मदार करू शकते.

फिलीमोर यांच्या व्याख्येत राज्य यंत्रणेचे आजचे व्यापक रूप व्यक्त झालेले आहे. आधीच्या व्याख्यात राजाच्या चार मूलभूत घटकांची चर्चा आहे. फिलीमोर यांनी यात 'आंतरराष्ट्रीय संबंध' या पाचव्या घटकाची भर घातली.

## ३.३ राज्याचे घटक

आधी उल्लेख केल्याप्रमाणे राज्य यंत्रणेचे चार मूलभूत घटक आहेत. ते म्हणजे १) लोकसंख्या, २) जमीन, ३) सरकार, ४) सार्वभौमत्व. यातील प्रत्येक घटक महत्त्वाचे आहे.

१) **लोकसंख्या :** लोकसंख्येशिवाय राज्याचा विचारसुद्धा करता येणे शक्य नाही. मात्र लोकसंख्या किती असावी, याची चर्चा शक्य आहे. उदाहरणार्थ भारताची लोकसंख्या गरजेपेक्षा खूप जास्त आहे, तर ऑरिस्टॉटलच्या काळापासून लोकसंख्या किती असावी

याबद्दल चर्चा / वाद सुरू आहेत. ॲरिस्टॉटलने 'योग्य प्रमाणात' लोकसंख्या असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. गरजेपेक्षा खूप जास्त नको, त्याचप्रमाणे गरजेपेक्षा खूप कमीसुद्धा नको. जास्त असल्यास सरकारच्या कामाच्या दर्जावर परिणाम होतो, खूप कमी असल्यास मनुष्यबळ कमी पडण्याचा धोका असतो. जास्त असावी की कमी असावी, असा वाद असला तरी लोकसंख्येशिवाय राज्य नाही, याबद्दल मात्र वाद नाही.

२) **जमीन :** ज्याप्रमाणे लोकसंख्येशिवाय राज्य यंत्रणेची आपण व्यवस्थाच करू शकत नाही, त्याचप्रमाणे जमीनीशिवायही राज्य अस्तित्वात येणे शक्य नाही. प्रत्येक राज्याला योग्य, स्पष्ट प्रकारे आखलेली जमीन गरजेची असते. अशा जमिनीवर राहणाऱ्या लोकांवर राज्याला हुकूमत गाजवता येते. सुस्पष्ट सीमारेषा असलेला देश असणे जशी कायद्याची गरज आहे, त्याचप्रमाणे नागरिकांच्या मानसिकतेची गरज आहे. या मानसिक गरजेतून देशप्रेम, मातृप्रेम वगैरे उद्‌भवतात.

राज्याच्या संदर्भात जमिनीचा, सीमांचा मुद्दा एवढा महत्त्वाचा आहे की, यावरून जगभर आजही वादविवाद होतात, प्रसंगी युद्धसुद्धा होतात. उदा. भारत आणि पाकिस्तान याच्यात काश्मीरचा वाद, भारत-चीन यांच्यातील वाद वगैरे. सुस्पष्ट सीमा असल्यामुळे राज्याच्या जमीनीवर, हवेतील जमीन खाली असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीवर हक्क प्रस्थापित होतो.

जमिनीशिवाय राज्याची कल्पना करणे जरी शक्य नसले तरी याला काही अपवाद आहेत. काही भटके, विमुक्त जमाती असतात ज्यांना स्वतःची जमीन नसते. मात्र 'जमीन' हा घटक वगळता इतर तीन घटक असतात. त्याचप्रमाणे ज्यू समाजाचे उदाहरण घेता येईल. १९४८ साली 'इस्त्रायल' स्थापन होईपर्यंत हा समाज जगभर पसरलेला होता. अर्थात हे अपवाद आहेत.

३) **सरकार :** सरकार म्हणजे शासनाचे जहाज चालविणारी, या जहाजाला दिशा देणारी यंत्रणा म्हणजे सरकार. सरकार नसल्यास शासन दिशाहिन होईल. सरकार कोणत्याही प्रकारचे असो (हुकूमशाही, एकपक्षीय, नोकरशाही इ.), सरकार पाहिजेच. थोडक्यात, सरकार म्हणजे शासनाची धोरणे प्रत्यक्षात अणणारी यंत्रणा होय. सरकार या यंत्रणेच्या माध्यमातून शासन स्वतःच्या आशा-आकांक्षा, स्वप्नं पूर्ण करत असते. यासाठी सरकार कायदे करत असते, कायदे मोडणाऱ्यांना शिक्षा करते.

४) **सार्वभौमत्त्व :** अभ्यासकांच्या मते सार्वभौमत्व राज्याचा आत्मा होय. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारताकडे लोकसंख्या, जमीन होती, सरकार होते पण सार्वभौमत्व नव्हते. हा मुद्दा लक्षात घेतला की राज्याच्या संदर्भात 'सार्वभौमत्त्व' या घटकाचे महत्त्व लक्षात येते.

सार्वभौमत्त्वाला दोन महत्त्वाच्या बाजू आहेत, १) अंतर्गत, सार्वभौमत्व, २) बाह्य सार्वभौमत्त्व. अंतर्गत सार्वभौमत्त्व म्हणजे देशांतर्गत बाबींमध्ये राज्याला अमर्याद अधिकार असतात. देशांत राहणारी लोक संघटना आणि इतर घटकांवर राज्याचे अधिकार असतात. बाह्य सार्वभौमत्वात असे मान्य झालेले असते की, अमुक देश बाह्य नियंत्रणांपासून मुक्त आहे, असे राज्य आंतरराष्ट्रीय करार-मदार करू शकते. काही अभ्याषकांच्या मते १९४५ साली स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघामुळे राज्याच्या बाह्य सार्वभौमत्वाला मर्यादा पडल्या आहेत. एवढेच नव्हे तर १९९३ साली सुरू झालेल्या जागतिकीकरणामुळे राज्याचे सार्वभौमत्व आणखी कमी झाले आहे.

आतापर्यंत आपण राज्याच्या चार मूलभूत घटकांची चर्चा केली आहे.

## ३.४ राज्य आणि सरकार

बरीच सुशिक्षित मंडळीसुद्धा ‘राज्य‘ आणि ‘सरकार‘ हे दोन शब्द समानार्थी असल्यासारखे वापरतात. राज्यशास्त्रात त्यांना भिन्न-भिन्न अर्थ आहेत. म्हणूनच आपल्याला त्यांचा अर्थ जाणून घ्यायचा आहे.

**सरकार :** आतापर्यंत आपल्या चर्चेत स्पष्ट झाले आहे की, राज्याच्या चार मूलभूत घटकांपैकी एक घटक म्हणजे सरकार. मात्र अभ्यासकांनी ‘सरकार‘ची वेगवेगळ्या प्रकारे व्याख्या केलेल्या आहेत. प्रा. गेटल यांच्या मते, सरकार म्हणजे अशी सर्व माणसे जी राज्याच्या धोरणाच्या अंमलबजावणीत गुंतले आहेत. थोडक्यात म्हणजे सरकार म्हणजे राज्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा. यात मुलकी, लष्करी, पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचा समावेश होतो.

राज्याची धोरणे प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारला मनुष्यबळ, भांडवल, तंत्रविज्ञान दिले जाते. याशिवाय समाजाने सरकारी हुकूम पाळले पाहिजे. याचप्रमाणे सरकारला देशातील आणि परदेशातील वेगवेगळ्या यंत्रणांशी करार-मदार करण्याचे अधिकार घ्यावे लागतात. यासर्वांना योग्य परामर्श, जे. डब्ल्यू. गार्नर यांनी घेतला आहे. ते म्हणतात, ‘सरकारला आर्थिक बळ, मनुष्यबळ दिले पाहिजे की, ज्यामुळे सरकारला राज्याच्या ध्येय-धोरणांची अंमलबजावणी करता आली पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारी हुकूमांचा आदर राखला पाहिजे, सरकारी हुकूम पाळले गेले पाहिजे. सरकारला कायदा आणि सुव्यवस्था राखता आली पाहिजे, आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी करता आली पाहिजे.‘

**राज्य** आणि **सरकार** यांच्यातील भेद

| **राज्य** | **सरकार** |
|---|---|
| १) राज्यात चार घटक असतात | १) सरकार म्हणजे राज्याची एजन्सी असते. |
| २) राज्य ही अमूर्त संकल्पना आहे | २) सरकारचे अस्तित्व ठसठशीत असते. |
| ३) राज्यासाठी जमिनीची नितांत गरज आहे | ३) जमिन नसूनही सरकार असू शकते. |
| ४) राज्य व्यवस्था कायम स्वरूपी असते. | ४) सरकार ही यंत्रणा तात्पुरती असते. |
| ५) राज्य ही यंत्रणा सर्व काळात आढळते. मात्र चार कायम स्वरूपी घटक असतात. | ५) सरकारचे प्रकार वेगवेगळे असू शकतात - लोकशाही, हुकूमशाही, राजेशाही इत्यादी |
| ६) राज्याच्या अखत्यारीत सर्व नागरिक येतात. मात्र सरकारी कर्मचाऱ्यांचाही समावेश असतो. | ६) सरकारमध्ये फक्त सरकारसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा समावेश असतो. |
| ७) व्यक्तीला राज्याच्या विरोधात अधिकार नसतात. | ७) व्यक्तीला सरकारच्या विरोधात अधिकार असतात. |

## ३.५ समाज

आतापर्यंत आपण ‘ राज्य ‘, ‘सरकार‘ वगैरेंची चर्चा केली. आता आपल्याला ‘समाज‘ ही संकल्पना समजून घ्यावयाची आहे. आज अभ्यासक असे मान्य करतात की, ‘समाज‘ ही संकल्पना बिगर मानवी सृष्टीसाठीसुद्धा वापरता येईल. मात्र मनुष्यांबद्दल ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. याचे कारण म्हणजे ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटलने म्हटल्याप्रमाणे ‘मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे.‘ समाज म्हणजे विविध नातेसंबंधांचे मोठे जाळे. अभ्यासक असेही दाखवून देतात की, एक माणूस स्वभावतः आणि गरज म्हणून समाजात राहतो, समाज निर्माण करतो. त्यामुळेच माणसामाणसातील संबंधांना अनेक आयाम असतात. या नातेसंबंधांत फक्त राजकीय संबंध येतात असे नव्हे तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संबंधसुद्धा येतात.

**समाजाचे स्वरूप:** एव्हाना स्पष्ट झाले असेल की, ‘ राज्य ‘, ‘सरकार‘ वगैरे संकल्पनांपेक्षा ‘समाज‘ ही संकल्पना जास्त व्यापक आहे. अर्थात मूठभर लोकं म्हणजे समाज नव्हे. त्याचप्रमाणे केवळ गर्दी म्हणजेसुद्धा समाज नव्हे. आज तर समाज ही संकल्पना अतिशय व्यापक आणि गुंतागुंतीची झाली आहे. आजच्या समाजात विविध मानवी समुह एकत्र येतात. समाज आता अतिशय महत्त्वाची संकल्पना झालेली आहे. आधुनिक काळातील माणसाला समाजाशिवाय स्वतःचे अस्तित्त्वच कल्पता येत नाही. माणसाच्या असंख्य गरजा, त्याची वेगवेगळी स्वप्ने केवळ समाज आहे म्हणून पूर्णत्वाला जाऊ शकतात. मात्र समाजात कायदे-कानून असतात, वेगवेगळ्या प्रकारचे नियम असतात. त्याप्रमाणे विविध प्रकारच्या संस्था असतात. या नियम, संस्थांद्वारे माणसा-माणसातील संबंध नियंत्रित केले जातात.

**संघटना :** संघटना म्हणजे माणसांनी एकत्र येऊन निर्माण केलेली यंत्रणा. येथे काही ठोस नियम असतात. मुख्य म्हणजे ही यंत्रणा / संघटना एखादे खास उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अस्तित्वात आलेली असते. संघटनेचे नियम सहसा लिखित रूपात असतात. आपण जर ‘संघटना‘ आणि ‘झूंड‘ (mob) यांची तुलना केल्यास ‘संघटना‘ म्हणजे काय हे समजून घेणे सोपे होते. झुंडीला काही नियम नसतात, कोणतेही उद्दिष्ट नसते. शिवाय तेथे संघटना नसते.

‘झुंड‘ आणि ‘संघटना‘ यांच्या तुलनेतून आपल्यासमोर संघटनेची चार मूलतत्वे येतात-

१) लोकांचा समुह, २) खास नियम, ३) खास हेतू, ४) सभासदांमध्ये असलेले सहकार्य.

आजच्या आपल्या समाजजीवनात आपल्याला अनेक प्रकारच्या संघटना आढळतात. सामाजिक संघटना, आर्थिक, सांस्कृतिक, क्रीडा, राजकीय संघटना असतात. यासर्व प्रकारच्या संघटना माणसांनी माणसासाठी बनवल्या असतात असे असले तरी ‘ राज्य ‘ ही सर्वोच्च संघटना आहे, हे विसरता कामा नये. राज्याला संघटनांची संघटना असेही म्हणतात. इतर संघटना मनुष्यनिर्मित आहेत. तर राज्य नैसर्गिक संघटना आहे, असेही मानण्यात येते.

**(Community) :** यात समाज जीवनाची अनेक अंग येतात. यात खेडे, शहर, प्रांत किंवा देशाचासुद्धा अंतर्भाव करता येतो. येथे माणसा-माणसातील संबंध बरेच मोकळे असतात. समान समाज जीवनातून समान गुणधर्म समोर येतात.

**या चर्चेतून दोन ठळक वैशिष्ट्ये दाखवता येतात-**

१) **जमीन/जागा :** समाजाला स्वतःची खास जमीन हवी असते. (उदा. एखादे खेडे, गाव, शहर इ.) सहसा असे आढळले की, समाज ज्या जमिनीवर राहत असतो, त्या जमिनीबद्दल समाजाच्या मनात भावनिक नाते निर्माण होते.

२) **समान सामाजिक वैशिष्ट्ये :** खेडे गावात राहणारा, समाज असतो की, एखाद्या शहरात राहणारा समाज असतो, आपल्याला त्या समाजातील लोकांत काही समान गुणधर्म, रितीरिवाज आढळतात. यात समान धार्मिक सण, विवाह पद्धती इत्यादींचा समावेश असतो. यामुळे समाजातील लोकांत एकीची भावना निर्माण होते.

आपल्याला बऱ्याचदा असेही आढळते की, समाज ही संकल्पना एखाद्या धार्मिक समुदायाबद्दलसुद्धा वापरतात. शिख समाज, हिंदू समाज. मात्र समाज शब्दाचा असा वापर अशास्त्रीय समजला जातो.

**संस्था :**

संस्था म्हणजे समाजातील घटकांचे एकमेकांशी असलेली सुव्यवस्थित संबंध. संस्थांच्या बाबतीत अशा नातेसंबंधांची दखल घेतली जाते, त्याला मान्यता देणे हे महत्त्वाचे असते. पण समाज काय किंवा संस्था काय, यात मानवी समुहांची चर्चा असते. 'समाज'या संकल्पनेत अनेक संघटना, अनेक गट मोडतात.

इतिहासाचा आढावा घेतल्यास असे आढळते की, प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरेच्या काळात समाज आणि शासन यांच्यात काही फरक नव्हता. त्याकाळी नगर-राज्य होती. ही नगर राज्ये आकाराने लहान आणि कमी लोकसंख्येची होती. प्लेटो-ॲरिस्टॉटप्रमाणेच आपल्याला जर्मन विचारवंत हेगेलचाही उल्लेख करावा लागेल. हेगेलने ' राज्य -समाज' अशी संकल्पना मांडली होती. आजच्या आधुनिक काळात राज्य आणि समाज वेगळे असल्याचे मान्य झालेले आहे.

हे वेगळेपण ' राज्य ' आणि 'समाज' यांच्या उपलब्ध असलेल्या व्याख्यांवरून स्पष्ट होते. राज्य म्हणजे असा मानवी समुह, जो मोजता येतो, जो कायम स्वरूपी एका जमिनीच्या तुकड्यावर राहतो, जो स्वतंत्र आहे किंवा जवळजवळ स्वतंत्र आहे, जेथे सुसंघटीन सरकार आहे आणि समाज अशा सरकारच्या आज्ञा पाळतो, तेथे राज्य असते.

आधी चर्चा केल्याप्रमाणे राज्याच्या व्याख्येचे विश्लेषण केल्यास आपल्याला १) लोकसंख्या २) जमीन, ३) सरकार, ४) सार्वभौमत्व, असे चार घटक राज्याचे सापडतात.

राज्याच्या व्याख्येप्रमाणेच आपण समाजाची व्याख्या समजून घेतली पाहिजे. समाज म्हणजे एका बाजूने अखिल मानवी समुह असू शकतो किंवा दुसऱ्या बाजूने एक छोटेसे खेडेसुद्धा असू शकते. येथे नातेसंबंधांचे मोठे जाळे असते. यात राजकीय संबंध, सामाजिक संबंध, आर्थिक संबंध इत्यादी असतात.

समाज आणि राज्य यांची चर्चा करतांना आधी समाज निर्माण झाला की आधी राज्य याचीही चर्चा करणे गरजेचे असते. अभ्यासाकांच्या मते आधी समाज निर्माण झाला आणि मग राज्य निर्माण झाले. राज्य व्यवस्था निर्माण होण्याच्या बराच आधी काही प्रमाणात सामाजिक

संघटना निर्माण झाल्या होत्या. मानवी इतिहासाच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर माणूस शिकारी अवस्थेत होतात. तेथे काही प्रमाणात सामाजिक संघटन होते, मात्र राज्य व्यवस्था नव्हती. शासन व्यवस्थेचा उदय आणि विकास पुढे होत गेला. यावरून असे सिद्ध होते की, आधी समाज निर्माण झाला मग राज्य व्यवस्था अस्तित्वात आली.

आधी समाज की आधी राज्य या वादापेक्षा जास्त महत्त्वाचा वाद म्हणजे दोघांचे कार्यक्षेत्र व त्याची व्याप्ती. एव्हाना स्पष्ट झालेले आहे की, राज्यापेक्षा समाजाचे कार्यक्षेत्र व त्याची व्याप्ती. राज्यापेक्षा समाजाचे कार्यक्षेत्र आणि व्याप्ती जास्त आहे. राज्याचा विचार केल्यास असे जाणवते की, शिस्त, कायदा आणि सुव्यवस्था टिकवणे, कर वसुली करणे, अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा सांभाळणे वगैरे कामासाठी राज्य निर्माण झाले आहे. मात्र समाजाची व्याप्ती यापेक्षा किती तरी जास्त आहे. समाजात अनेक प्रकारच्या संस्था निर्माण झालेल्या असतात, होत असतात. सामाजिक संस्था, आर्थिक संस्था, सांस्कृतिक संस्था वगैरे विविध प्रकारच्या संस्था समाजात असतात. या चर्चेतून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, राज्य एकाच हेतूने निर्माण झालेली यंत्रणा आहे, तर समाज निर्मितीमागे अनेक हेतू असतात. शिवाय समाजात वावरणाऱ्या अनेक संघटनांपैकी एक संघटना म्हणजे राज्य.

याप्रमाणेच आपण राज्य आणि समाज यांच्यातील नात्यांचा आणखी एक पैलू समजून घेतला पाहिजे. राज्याकडे बळ, शक्ती असते, जिचा वापर करून शासन नियम न पाळणाऱ्यांना शिक्षा करू शकते. शमाज मात्र अशाप्रकारे बळाचा वापर करू शकत नाही. समाजाला परंपरेचा वापर करावा लागतो, चर्चा, हृदय-परिवर्तन, रूढी, रितीरिवाज वापरावे लागतात. प्रसंगी समाज 'बहिष्कार' हे तंत्र वापरू शकते. शमाजात सहसा भर मत परिवर्तनावर असतो.

वर उल्लेख केलेल्या फरकाशिवाय आणखी महत्त्वाचा फरक आहे. हा म्हणजे जमिनीबद्दलचा. राज्याला सुस्पष्ट जमीन हवी असते, त्याशिवाय राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. समाज मात्र जमिनीशिवाय, स्पष्ट अशा सीमांशिवाय अस्तित्वावर येऊ शकतो. उदा. रेड क्रॉस सोसायटी यांच्या शाखा जगभर असतात.

राज्य आणि समाज यांच्यातील फरकांची चर्चा करतांना आपल्याला 'संरकार' या घटकांची दखल घ्यावी लागते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे 'सरकार' हा घटक राज्य यंत्रणेचा महत्त्वाचा घटक आहे, मात्र समाजाच्या उगम आणि विकासामध्ये सरकारची काही भूमिका नसते. इतिहासाचा दाखला घेतला तर आधी समाज निर्माण झाला आणि त्यानंतर राज्य अस्तित्वात आले.

## ३.५ दिर्घोत्तरीय प्रश्न

१) राज्य म्हणजे काय ? राज्याच्या आवश्यक घटकांची चर्चा करा.

२) समाज म्हणजे काय ते स्पष्ट करुन राज्य आणि समाज यातील भेद स्पष्ट करा.

३) टिपा लिहा.

१) राज्य आणि शासन यातील भेद.

❖❖❖❖

# ४

# राष्ट्र, राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रराज्य

**घटक रचना :**

४.० उद्दीष्ट
४.१ प्रस्तावना
४.२ राष्ट्र,राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रराज्य या संकल्पनाचा अर्थ
४.३ राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारे घटक
४.४ राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाच्या मार्गातील अडथळे
४.५ राज्य आणि राष्ट्र यातील भेद
४.६ राष्ट्र-राज्यांची उत्क्रांती
४.७ दिर्घोत्तरीय प्रश्न

## ४.० उद्दिष्ट

- राष्ट्र,राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रराज्य या संकल्पना समजून घेणे
- राष्ट्राच्या आणि राष्ट्रीयत्वाच्या घटकांचा अभ्यास करणे
- राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारे घटक समजून घेणे
- राज्य आणि राष्ट्र यातील भेद समजून घेणे
- राष्ट्र राज्याची उत्क्रांतीचा अभ्यास करणे.

## ४.१ प्रस्तावना

समाज, राज्य, राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रीयत्व या राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना आहेत. सर्वसमान्यपणे राज्य, राष्ट्र, समाज एकाच अर्थाने बोलतांना उल्लेख करण्यात येतो. परंतु राज्य आणि राष्ट्र या संकल्पनामध्ये भेद आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये आशिया खंडातील राज्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये प्रखरपणे निर्माण होऊन अनेक देश स्वतंत्र झाले आणि राष्ट्रराज्य उदयास आली. राष्ट्रराज्याची निर्मिती कशी झाली हे लक्षात घेतांना राष्ट्र, राष्ट्रवाद आणि राष्ट्रीयत्व या संकल्पनांचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.

## ४.२ राष्ट्र, राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रराज्य या संकल्पनांचा अर्थ

### राष्ट्र (Nation)

लॅटीन शब्द Natio यापासून Nation हा शब्द उदयाला आला आहे. Natio म्हणजे जन्म किंवा वंश होय. त्यामुळेच राष्ट्र म्हणजे समान वंशाचे लोक असे समजण्यात येते. समान वंश राष्ट्राचा एक महत्त्वाचा घटक आहे. काळाच्या ओघात शुद्ध वंश न राहता मिश्र वंशाचे लोक सर्वत्र आढळतात. बर्जेस हे विचारवंत राष्ट्राची व्याख्या करताना रक्तसंबंधावर भर देतात. विशिष्ट भूप्रदेशावर राहणारे समान वंशीय लोक म्हणजे राष्ट्र असे त्यांचे मत आहे. बार्करच्या मते "राष्ट्र म्हणजे निश्चित भूप्रदेशावर राहणारा लोकांचा एकत्रित समूह होय." रॅम्सेम्युर म्हणतात "राष्ट्र म्हणजे लोकांचा समूह की जो काही बंधनामुळे जोडलेला असतो, आणि जो दुसऱ्यांची गुलामगिरी सहन करू शकत नाही." गिलखिस्ट म्हणतात, "राष्ट्र राज्याच्या जवळची संकल्पना आहे. राज्य अधिक लोकांची एकता म्हणजे राष्ट्र होय. राष्ट्र राज्यापेक्षा व्यापक आहे."

### राष्ट्रवाद (Nationality)

राष्ट्रवाद आणि राष्ट्रीयत्व या दोन्ही संकल्पना राष्ट्र या कल्पनेशी संबंधित आहेत. या दोन्ही कल्पना एकाच अर्थाने वापरण्यात येत असल्या तरी दोन्हींत भेद आहे. राष्ट्रवाद (Nationality) म्हणजे लोकांचा असा समूह की ज्यांना समान सांस्कृतिक वारसा आहे आणि समान वंश आहे. त्यांची एकत्र राहण्याची इच्छा आहे. समान भविष्य, समान इच्छा आणि मानसिक, भावनिक एकतेने एकत्र आलेले आहेत. राष्ट्र राजकीय संघटन असते परंतु राष्ट्रवाद राजकीय दृष्टीने एकत्रित नसतो. राष्ट्रवादाचे ध्यैय्य राष्ट्र स्थापन करणे हे असते. थोडक्यात राष्ट्र निर्माण होण्यासाठी राष्ट्रवाद आवश्यक आहे. उदा. ब्रिटिश राजवटीखाली भारत असतांना भारतीय लोकांमध्ये राष्ट्रीयतेची भावना निर्माण होऊन राष्ट्रवाद अस्तित्वात आला होता.

राष्ट्रवादाने स्वातत्र्यांची मागणी केली, स्वातंत्र्यासाठी प्राण दिले आणि भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारत या राष्ट्रराज्याचा उदय झाला. निरनिराळ्या देशातील राष्ट्रवादाचे स्वरुप आणि प्रकार यात भिन्नता आढळते. उदा. भारत, अमेरिका, इंग्लड या देशातील राष्ट्रवाद उदारमतवादी आणि प्रागतिक स्वरुपाचा दिसून येतो. हिटलर आणि मुसोलिनीच्या कारकिर्दीतील जर्मनी आणि इटली येथील राष्ट्रवाद आक्रमक स्वरुपाचा होता.

### राष्ट्रीयत्व (Nationaliceue)

राष्ट्रवादासाठी राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये निर्माण होणे आवश्यक असते. राष्ट्रीयत्वाच्या भावनेशी राष्ट्रनिष्ठा आणि देशभक्ती (Patriotism) संबंधित आहे. राष्ट्रीयत्वाची भावना म्हणजे लोकांमध्ये असलेली एकतेची भावना जी निश्चित भूप्रदेशावर लोकांना एकत्रित ठेवण्याचे काम करते.

अल्फ्रेड डे ग्रॅझिया यांच्या मते राष्ट्रीयत्वात दोन गोष्टी समाविष्ट असतात. एक म्हणजे देशाविषयी प्रेम आणि दुसरे म्हणजे परकीयांविषयी संशय, राज्यात राहणाऱ्या लोकांना देशाच्या प्रति प्रेम वाटते कारण त्यांच्या मुल्यांची देवाणघेवाण होत असते. याउलट परकीयांविषयी एखाद्याला संशय वाटतो कारण मूल्य सारखीच नसतात.

राष्ट्रीयत्वाच्या भावनेने लोक एकत्र आले म्हणजे राष्ट्रवाद उदयाला येतो. राष्ट्रवादाच्या चळवळीतून स्वातंत्र्य आणि राज्याची स्थापना होते. थोडक्यात राष्ट्रीयत्वाची भावना मानसिक संकल्पना आहे.

राष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्राला बांधून ठेवणारे बंधन आहे. मानसशास्त्राच्या दृष्टीने राष्ट्रीयत्वाची भावना म्हणजे प्रथा, परंपरा, संस्था, सांस्कृतिक वारसा याविषयीचे प्रेम, राजकीय दृष्टीने राष्ट्रीयत्वा म्हणजे राष्ट्र निष्ठा होय. ज्या भोवती राष्ट्रराज्य असतात. आधुनिक काळात राष्ट्रीयत्व हा एक शक्तिशाली राजकीय घटक आहे. ज्या घटकामुळे आशिया आणि आफिक्रका खंडातील अनेक देश स्वतंत्र झाले.

**राष्ट्रीयत्वाची वैशिष्ट्ये**

१) राष्ट्रीयत्व एक भावना आहे- लोकांमध्ये असलेली एकतेची आणि प्रेमाची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व होय. राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये एकदा निर्माण झाली म्हणजे ‘राष्ट्र’ निर्माण करण्याची प्रेरणा त्यांना मिळते. स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकत्र येऊन लोकांनी स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरूद्ध लढा उभारला होता.

२) राष्ट्रीयत्वाच्या भावनेतून देशभक्तीपर कृती घडतात. उदा. देशासाठी प्राण द्यायला लोक तयार होतात. स्वतंत्र राज्याची मागणी करतात.

३) राष्ट्रीयत्वातूनच स्वयंनिर्णयची भावना लोकांमध्ये निर्माण होते.

४) राष्ट्रीयत्वातून एकता निर्माण होते. उदा. भारतात विविध वंशाचे, धर्माचे, भाषेचे लोक एकत्र राहतात परंतु या सर्व लोकांमध्ये एक राष्ट्रीयत्वाची भावना असल्यामुळे भारतात ‘विविधतेतून एकता’ निर्माण झाला आहे. जपान या देशामध्ये वंश भाषा या सर्व दृष्टीने एकता असल्यामुळे जपान मजबूत राष्ट्र आहे. कारण समान घटकांमुळे लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची मजबूत भावना असते.

## ४.३ राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारे घटक

राष्ट्रनिर्मितीसाठी वंश, धर्म, भाषा, इतिहास, संस्कृती, इत्यादीतील समानता, राजकीय जागृकता, आर्थिक हितसंबंध इत्यादी घटक कारणीभूत होतात. या घटकांमुळे लोकांमध्ये एकतेची म्हणजेच राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते. आणि राष्ट्रीयत्वाच्या भावनेतून राष्ट्राचा उदय होतो. लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्यास आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यात खालील घटक महत्वपूर्ण असतात.

१) **समान वंश :** लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण करण्यासाठी समान वंश हा घटक मदत करतो; उदा. भारतात आर्य वंशाचे, द्रविड वंशाचे लोक. अमेरिकेत गोरे आणि निग्रो वंशाचे लोक एकतेच्या भावनेने एकत्रित येतात. परंतु आज जगात कोणत्याही राज्यात शुद्ध एकाच समान वंशाचे लोक नाही. उदा. अमेरिका, भारत इत्यादी अनेक वंशीय राज्य आहेत. परंतु समान वंशाचे लोक असतील तर त्याचा राष्ट्रनिर्मितीसाठी निश्चितच हातभार लागतो.

२) **समान धर्म :** राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे समान धर्म होय. पाकिस्तान या राष्ट्राच्या उदयाचा मुख्य आधार समान धर्म आहे. ज्यू आणि जपानी यांच्या राष्ट्रीय जीवनाचे मुख्य स्त्रोत धर्म आहे. तथापि आधुनिक राष्ट्र मात्र धमनिरपेक्ष आहेत आणि सर्व धर्मांच्या प्रति सहनशीलतेचे धोरण स्विकारले आहे. १९७१ साली समान धर्म पाकीस्तानचे विभाजन थांबवू शकला नाही. त्यामुळे आजच्या काळात धर्म हा एकता निर्माण करण्याच्या दृष्टीने पूर्वी इतका शक्तिशाली घटक राहिला नाही हे दिसून येते. सर्वसाधारणपणे हिंदूधर्म, इस्लामधर्म, बौद्धधर्म, ख्रिश्चन धर्म इत्यादी धर्माच्या लोकांमध्ये धर्माच्या नावाखाली एकतेची भावना प्रखरतेने असते असे दिसते.

३) **समान भाषा :** लोकांमध्ये जागृकता आणि एकता आणण्याच्या दृष्टीने समान भाषा हा घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. समान भाषेमुळे लोकांमध्ये समान आदर्श, कल्पना, भाावना, नैतिकता, ऐतिहासिक परंपरा इत्यादी गोष्टी निर्माण होतात.भाषेच्या देवाणघेवाणिमुळे लोक लवकर एकत्रित येतात. समान भाषा लोकांना लवकर एकत्रित आणत असते. उदा. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजी भाषेमुळे लोक एकत्रित आले होते.

४) **समानसंस्कृती :** लोकांचे समान आदर्श, मूल्य, दृष्टीकोन, वृत्ती म्हणजेच समान संस्कृती राष्ट्र उभारणीसाठी मदत करतात. सांस्कृतिक एकतेमध्ये समान प्रथा, परंपरा, वाङ्मय, कला इत्यादीचाही समावेश होतो. सांस्कृतिक एकतेमुळे लोकांमध्ये भावनिक एकता साधली जाते. राष्ट्रीय वाङ्मयामुळे लोकांमध्ये अभिमानाची भावना निर्माण होते. राष्ट्रीय शिक्षणामुळे लोकांमध्ये अभिमानाची भावना निर्माण होते. राष्ट्रीय शिक्षणामुळे समान मूल्यपद्धती आणि दृष्टी निर्माण होते आणि त्यामुळे राजकीय संस्कृती घडविण्यास मदत होते. समान संस्कृतीमुळे भावनिक आणि मानसिक एकता साधली जाते.

५) **भौगोलिकता :** समान भूप्रदेशावर अनेक वर्षापासून लोक राहत असेल तर त्यांच्यात राष्ट्रीय भावना निर्माण होते आणि लोक मदरलॅन्ड असा शब्दप्रयोग आपल्या देशासाठी करायला लागतात. शमान भूप्रदेशामुळे समान शारिरीक, मानसिक, भावनिक बंध लोकांमध्ये निर्माण होतात आणि लोक एकत्र येतात.

६) **समान इतिहास :** राष्ट्र उभारणीसाठी समान ऐतिहासिक वारसा ही मदत करतो. लोकांची समान सुख दुःख, समान विजय, पराजय, राष्ट्रीय पुढारी, समान आठवणी राष्ट्राचा आत्मा असतो. उदा. शिवाजी महाराजांच्या आठवणी, राणाप्रताप, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, क्रांतीकारकांचे बलिदान, महात्मा गांधींचा स्वातंत्र्य लढा इत्यादीमुळे भारतातील लोकांमध्ये भावनिक एकता निर्माण झाली आहे. आजही या स्वातंत्र्यवीरांवर करण्यात आलेली गाणी, पोवाडे ऐकूण लोकांना स्फूरण येते.

७) **आर्थिक घटक :** समान आर्थिक हितसंबंधामुळे लोक एकत्र येतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे उत्तर अमेरिकेमध्ये ब्रिटिशांच्या तेरा वसाहती एकत्र आलेल्या होत्या. तेथील लोकांच्या जेव्हा लक्षात आले की इंग्लंड त्यांचे शोषण करीत आहे तेव्हा १७७५

ला अमेरिकन स्वातंत्र्य लढा झाला. म्हणजेच समान आर्थिक हिसंबंध राष्ट्र उभारणीला हातभार लावणारा घटक आहे.

८) **राजकीय घटक :** परकीय अमलाखाली राष्ट्र असेल तर स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण होत असते. उदा. आशिया, आफ्रिका खंडातील राष्ट्रे परकीयांपासून स्वातंत्र्य मिळविणे या तीव्र इच्छेमुळे लोक आपआपसातील भाषा, धर्म, जात इत्यादी भेदभाव विसरून एकत्र आले आणि राष्ट्रीयत्वाच्या भावनेने भारले जाऊन त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले.

९) **लोकांची इच्छा** - लोकांमध्ये स्वतःच्या राष्ट्राविषयी प्रखर प्रेमाची, देशभक्तीची भावना असेल. तर एकतेच्या भावनेने लोक पेटून उठतात. एकत्रित राहतात.

## ४.४ राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाच्या मार्गातील अडथळे

राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये निर्माण होण्यासाठी वरील घटकांची आवश्यकता असते. जगामध्ये एकराष्ट्रीय राज्यांपेक्षा अनेक राष्ट्रीय राज्ये अधिक दिसून येतात. अशा देशांमध्ये लोकांच्या राष्ट्रीयत्वाच्या मार्गात अडथळे आणून लोकांना विभाजित करणारे घटक खालील असतात.

अ) प्रादेशिकता ब) सांप्रदायिकता, धर्मवाद क) जातीवाद ड) भाषावाद

इ) संस्कृतिवाद इत्यादी. उदा. भारतात ‘विविधतेतून एकता’ निर्माण झालेली आहे. भारत राष्ट्रराज्य आहे परंतु भारतीय राष्ट्रराज्याला वरील विभाजनवादी घटकांमुळे बरेचदा धोका निर्माण होतो.

## ४.५ राज्य आणि राष्ट्र यातील भेद

राज्य आणि राष्ट्र दोन्ही शब्द बरेचदा समानार्थी वापरण्यात येतात. परंतु दोन्ही संकल्पनामध्ये भेद आहे. राष्ट्र लोकांच्या भावनेतून आणि मानसिकतेतून उदयाला येते. राज्य राजकीय आणि प्रशासकीय आहे. राज्य शासनकर्त्यांचे हितसंबंध दर्शविते तर राष्ट्र शासीतांच्या गरजांवर भर देते.

१) राष्ट्र ही भावनिक संकल्पना आहे. समान धर्म, वंश यापैकी कोणत्याही समान धाग्याने लोक एकत्रित येतात. त्यांच्यात बंधुत्वाची, राष्ट्रनिष्ठेची भावना निर्माण होते आणि राष्ट्राचा उदय होतो. म्हणजेच राष्ट्र व्यक्तिनिष्ठ आहे. भावनांवर आधारलेले असते. अर्थात प्रत्येक व्यक्ति आणि समाजाप्रमाणे या भावनेची तीव्रता कमी अधिक असू शकते. या भावनेची तीव्रता मोजता येणे कठीण आहे. कारण ती एक मनाची स्थिती आहे. राष्ट्रीयत्व ही एक भावना आहे. त्यातून मालकीची भावना उदयाला येते.

याउलट राज्य कायदेशीर संघटना आहे. राज्य त्या राज्यात राहणाऱ्या लोकांना नियंत्रित करण्याचे, त्यांची व्यवस्था ठेवण्याचे कार्य करते. राज्य वस्तुनिष्ठ आहे. कायदा, आबंधन ह्या संकल्पना राज्याशी संबंधित आहे. राज्यात चार घटक असतात, लोकसंख्या,

भूप्रदेश, शासनसंस्था, सार्वभौमसत्ता होय. यापैकी एक घटक जरी नसला तरी राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. राज्याचे राजकीय व्यक्तित्व असते.

२) एका राज्यात अनेक राष्ट्रीयत्वाचे लोक राहतात. अनेक वंशाचे, धर्माचे, संस्कृतीचे लोक एकाच राज्यात एकत्रित राहतात. आधुनिक राज्यात त्यामुळे अल्पसंख्यांकाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. 'एक राष्ट्र एक राज्य' हा उपाय म्हणून त्यावर सुचविण्यात येतो. या आधारावर ज्यू लोकांचे इस्त्राएल हे राज्य उदयाला आले आहे. भारतात शिख या सिद्धांताच्या आधारावर वेगळ्या राज्याची मागणी करतात. आधुनिक काळात दोन प्रकारची राष्ट्र राज्ये आढळून येतात. १) एक राष्ट्रीय राज्य, २) अनेक राष्ट्रीय राज्य. एक राष्ट्रीय राज्य हे एक राष्ट्रीयत्व एक राष्ट्र या तत्वावर आधारलेले असतात. प्रत्येक राष्ट्रीयत्व असलेल्या गटाला स्वतःचे राष्ट्रराज्य असावे या इच्छेतून राष्ट्र राज्ये २० व्या शतकात उदयाला आली आहेत. उदा. अमेरिका, भारत इत्यादी राज्यांमध्ये एकाच राज्यात अनेक राष्ट्रीयत्वाचे लोक राहतात. अशा राज्यात राष्ट्रीय एकात्मतेची समस्या बरेचदा निर्माण होते. झिर्मन यांनी राज्य आणि राष्ट्र यातील भेट खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

१) राष्ट्र व्यक्तिनिष्ठ आहे; राज्य वस्तुनिष्ठ आहे.
२) राष्ट्र मानसिक आहे; राज्य राजकीय आहे.
३) राष्ट्र मनाची स्थिती आहे; राज्य कायद्याची स्थिती आहे.
४) राष्ट्रात आध्यत्मिक मालकी अंतर्भूत असते, राज्यात आंबधन अंतर्भूत असते.
५) राष्ट्रीयत्व हा एक जीवनाचा विचार करण्याचा मार्ग आहे; राज्य ही सुसंस्कृतपणे जगण्याची अवस्था आहे.

**सारांश :**

राष्ट्र हा समान घटकांनी एकत्रित आलेला संघटीत लोकांचा समूह असतो; की जो राजकीय दृष्टीने जागरूक असतो.

राष्ट्रवाद म्हणजे एकतेच्या भावनेने एकत्रित आलेला लोकांचा समूह असतो, आणि राजकीय सार्वभौमत्वाची इच्छा बाळगतो. राष्ट्रीयत्व म्हणजे एकतेची तीव्र भावना, आपली संस्कृती, भाषा, इतिहास याविषयी अति प्रेमाची भावना. राष्ट्रीयत्व मानसिक बंध आहे की ज्या बंधामुळे लोक एकत्र बांधले जातात आणि देशासाठी बलिदान द्यायला तयार होतात.

## ४.६ राष्ट्र-राज्यांची उत्क्रांती

**प्रस्तावना :**

आधुनीक राष्ट्रराज्य काळाच्या ओघात ऐतिहासिक उत्क्रांतीतून निर्माण झाली आहेत. आधुनीक राष्ट्रराज्यांची उत्क्रांती कशी झाली आहे, या प्रक्रियेतील विविध पायऱ्यां कोणत्या याचा अभ्यास आपण करणार आहोत.

आधुनिक राष्ट्रराज्याच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील मुख्य पायऱ्या पुढीलप्रमाणे आहेत-

१) टोळीचे राज्य २) पूर्वेकडील साम्राज्य, ३) नगर राज्य, ४) रोमन साम्राज्य, ५) सरंजामशाही (Feudal) राज्य, ६) आधुनिक राष्ट्रराज्य

राज्याची उत्क्रांती ही सलगपणे, सातत्याने ठराविक पद्धतीने झाली नाही. पहिल्या पायरीपासून ते आजच्या राष्ट्रराज्यापर्यंत कोणती पायरी कुठे संपली हे सांगता येणार नाही. विविध प्रकारच्या ऐतिहासिक सामाजिक, भौगोलिक स्थितीतून विविध समाज उदयास आले व विविध प्रकारचे राज्य अस्तित्वात आले आहे. राष्ट्र राज्य हे खालील स्वरूपात विकसित झालेले आहे.

**१) टोळीचे राज्य :** सर्वात आधी निर्माण झालेले राजकीय संघटन म्हणजे टोळीचे राज्य होय. टोळीच्या संघटनेला राज्य असे म्हणता येणार नाही परंतु पितृसत्ताक समाजातील टोळींच्या राज्याला एक प्रकारची सत्ता होती. ही टोळी काही स्थळी भटकणारी होती तर काही एका ठिकाणी स्थिर होती. हे टोळींचे राज्य प्रथा, परंपरेच्याद्वारे वयस्क व्यक्तिंकडून शासित केले जात असे. टोळी प्रमुखांची सत्ता ही प्रथांच्याद्वारे निश्चित केली जात असे. टोळी प्रमुख हा वंशपरंपरेने येत किंवा त्याला विशिष्ट काळासाठी निवडून देण्यात येत असे. त्यावेळी खाजगी संपत्ती आणि जातीसंस्था नव्हती. अजूनही काही अविकसित समाजामध्ये टोळीचे राज्य या स्वरूपाचे राजकीय संघटन आढळून येते.

**२) पूर्वेकडील साम्राज्य** (Oriental Empires) **:** प्राचीन पितृसत्ताक कुटुंब पद्धतीतून राष्ट्रराज्य उदयाला आले हे राज्य म्हणजेच पूर्वेकडील साम्राज्य होय. टोळीच्या राज्यांमध्ये अतिशय कमी लोकसंख्या, मर्यादीत भूप्रदेश आणि साधने होती. राज्याचे दैनंदिन कार्य करण्यासाठी काम करणारा वर्ग, संरक्षणासाठी सैन्य, साधनांची योग्य बांधणी आवश्यक असते. नदीच्या किनाऱ्याजवळ जी मोठी साम्राज्यवादी राज्य विकसित झाली होती तिथे हे घटक उदयाला आले होते.

उदा. इजिप्तमध्ये नाईल नदिच्या सुपीक खोऱ्यात तसेच भारतात सिंधू आणि गंगा नदीच्या खोऱ्यात अशा तहेची साम्राज्ये उदयाला आली होती. या खोऱ्यांची जमीन ही सुपीक होती त्यामुळे उत्पादन मुबलक होत असे. संपत्तीसंचय वृत्ती विकसित झाली आणि त्यातूनच गरीब-श्रीमंत असा वर्गभेद निर्माण झाला. ज्यांनी जास्त संपत्ती कमावली ते इतरांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करायला लागले. काही शक्तिशली लोकांनी आपल्या वर्चस्वाखाली बराच भूप्रदेश घेतला. त्या भूप्रदेशाची व्यवस्था ठेवण्यास त्यांनी संरक्षण, अंतर्गत शांतता यासाठी सैन्य, पोलीस, कर योजना अस्तित्वात आणली. त्यातूनच हळूहळू प्रशासन व्यवस्था, कर योजना, कायमचा प्रशासकीय वर्ग, शासकीय वर्ग उदयाला आला. कायदा, सैन्य, कर योजना इत्यादीतूनच पूर्वेकडील साम्राज्ये उदयाला आली.

पूर्वेकडील साम्राज्यांमध्ये एकसुत्रीपणा, केंद्रीभूत सत्ता, लोकांचा प्रामाणिकपणा इत्यादींचा अभाव होता. अंतर्गत दृष्टीने अनेक संघ एकत्रित होते. या संघामध्ये धर्म, वंश, प्रादेशिकता इ. बाबतीत विविधता होती. स्थिरतेच्या दृष्टीने त्यांना प्रशासकांची कार्यक्षमता, सैन्य, पोलीस यांच्यावर अवलंबून रहावे लागते. सत्ताधारी दुर्बल झाल्याबरोबर संघ वेगळे होत

असे आणि त्या संघाला एका विशिष्ट भूप्रदेशाची ठेव मिळत असे. प्रथा, परंपरा पुढे कायद्यात बदलल्या आणि अशा प्रकारे राज्याच्या संकल्पनेत विकास होत गेला.

**३) नगरराज्ये :** पूर्वेकडील साम्राज्य शेती, कला यावर आधारलेली होती. परंतु हळूहळू लक्षात यायला लागले की समुद्रावर नियंत्रण प्रस्थापित केल्यास भरभराट आणि संपत्ती येऊ शकते. विशेषतः ग्रीक लोकांनी समुद्रकिनाऱ्यालगतची जमीन हस्तगत केली. इ.स.पूर्वी ८०० वर्षापूर्वी त्यांनी सामाजिक आणि राजकीय संस्था विकसित केल्या. त्यांनाच 'नगरराज्ये' असे संबोधले जात असे. हे नगरराज्य म्हणजे स्वतंत्र सार्वभौम घटकच होते. ग्रीक लोकांचा नगरराज्यात सक्रिय सहभाग असायचा. या ग्रीक नगरराज्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष लोकशाही, सक्रीय राजकीय सहभाग आणि स्वातंत्र्य हे होते. ग्रीक नगरराज्यात विविध प्रकारच्या शासनांचाही प्रयोग केला जात असे परंतु एक केंद्रीभुत मोठे राज्य निर्माण करण्याचया बाबतीत ग्रीक मात्र अयशस्वी झाले. नगरराज्यांचे आपआपसात असलेले संघर्ष यामुळे ग्रीक नगरराज्यांचा फायदा रोम लोकांनी घेतला.

**४) रोमन साम्राज्य :** रोमन साम्राज्य हे रोम नगरराज्याच्या स्वरूपात, नंतर रिपब्लिक राज्य स्वरूपात आणि शेवटी साम्राज्याच्या स्वरूपात विकसित झाले. वर्गावर आधारित या साम्राज्यात विशेषाधिकार असणारा वर्ग राजाबरोबर सत्ता उपभोगत असे. यात गरिबांना आणि सर्वसाधारण लोकांना नागरी अधिकार देण्यात आले नाही. जवळजवळ इ.स. पूर्व ५१० च्या दरम्यान रोममध्ये उमरावशाही असलेले गणराज्य अस्तित्वात आले. श्रीमंत उमराव सत्ता परिणामकारकपणे आमलात आणत असे. रोमनसाम्राज्य त्यांच्या संविधानासाठी प्रसिद्ध होते. त्या संविधानाला चार तत्वांचा आधार होता तो असा. विभागलेली सत्ता, न्यायधीशांचा मर्यादीत कार्यकाल, लोकांचे सार्वभौमत्व, मर्यादीत लष्करी सत्ता, सत्तेची व्याप्ती मर्यादीत करण्यासाठी या चार तत्वांचा उपयोग होत असे. रोमनसाम्राज्य त्यांच्या संविधानासाठी प्रसिद्ध होते. त्या संविधानाला चार तत्वांचा आधार होता तो असा. विभागलेली सत्ता, न्यायधीशांचा मर्यादीत कार्यकाल, लोकांचे सार्वभौमत्व, मर्यादीत लष्करी सत्ता, सत्तेची व्याप्ती मर्यादीत करण्यासाठी या चार तत्वांचा उपयोग होत असे. रोमन साम्राज्यात प्रभावी प्रशासकीय यंत्रणा, केंद्रीभुत राज्य, कायद्याची सार्वत्रीक पद्धती, दळणवळणाची प्रभावी साधने, लोक कल्याणकारी कार्ये इत्यादीला महत्त्व देण्यात आले होते. रोमन साम्राज्यात राज्याच्या एकतेसाठी व्यक्ति स्वातंत्र्याचे मात्र बलिदान देण्यात आले होते. त्यांची प्रशासकीय व्यवस्था चांगली होती परंतु ती व्यवस्था आत्मा नसलेली होती. पुढे रोमन साम्राज्य हे योग्य वारस नसल्यामुळे कोलमडले. गेटेलच्या मते,

'ग्रिकांनी एकतेशिवाय लोकशाही विकसित केली होती; तर रोमन लोकांनी लोकशाही शिवाय एकता निर्माण केली होती.'

**५) सांमतशाही स्वरूपाचे राज्य :** रोमन साम्राज्याच्या पाडावानंतर युरोपमध्ये अंदाधुंदी आणि गोंधळ निर्माण झाला. या काळातच रोमच्या केंद्रीय सत्तेचे विभाजन झाले. काही टोळ्यांनी युरोपमध्ये सत्ता प्रस्थापित केली त्यांना केंद्रीय सत्तेची कल्पना नव्हती. मॅकआयव्हरच्या मते, युरोपमधून काहीकाळ राज्य दिसेनासे झाले. युरोपमध्ये याच दरम्यान सरंजामशाहीचा उदय झाला. सरंजामशाहीमध्ये त्या त्या भागाचा प्रमुख राजा होता. राजाने आपली जमीन आपल्या सरदारांमध्ये विभाजीत केली. सत्तेची सर्वोच्चता आणि राज्याच्या सत्तेचे सार्वभौमत्व या

कल्पनांचाही लोप झाला. चर्चने सामाजिक आणि राजकीय चीवनावर सर्वोच्चता प्रस्थापित केली आणि राजावर वर्चस्व प्रस्थापित केले. पीगीसच्या मते, मध्ययुगात राज्य म्हणजे चर्चची पोलीसव्यवस्था झाली होती. एकूण सरंजामशाहीची सर्वोच्चता, एकता नष्ट झाली. तसेच केंद्रीभूत सत्ता, समान कायदा, समान नागरिकत्व नष्ट झाले. राज्याच्या विकासाला मागे नेणारा हा टप्पा होता.

**६) आधुनिक राष्ट्र राज्ये :** सुधारलेल्या दळणवळणाच्या पद्धती, चलनव्यवस्थेवर आधारीत अर्थव्यवस्था, राष्ट्रीय बाजारपेठांचा उदय, बंदुकीच्या दारुचा शोध, युरोपीय भाषांचा विकास इत्यादीमुळे सरंजामशाहीचा नाश झाला. भाषिक, आर्थिक व भौगोलीक या बंधामुळे लोकांमध्ये एकतेची नवी जाणीव निर्माण व्हायला लागली. हळूहळू चर्चच्या सत्तेचा लोप होऊ लागला आणि यासर्व कारणांमुळे धर्मनिरपेक्ष राज्याचा उदय झाला. साधारणपणे सोळाव्या शतकात इंग्लंड, फ्रान्स, स्पेनमध्ये राष्ट्रराज्याचा उदय झाला. अनियंत्रित राजेशाही राष्ट्र राज्यांमध्ये उदयाला आली. यात लोकांचे शोषण होत होते परंतु राजेशाहीत शांतता, सुव्यवस्था, सुरक्षा निर्माण झाली. अनियंत्रित राजेशाहीचे १६ व्या आणि १७ व्या शतकात वर्चस्व होते. मध्यमवर्गाचा उदय झाला या वर्गाने राजकीय सत्तेमध्ये जास्तीत जास्त सत्तेचा वाटा मागितला. त्यामुळे राजा आणि मध्यमवर्ग यांच्यात संघर्ष सुरू झाला. इग्लंडमध्ये १६८८ ला रक्तहीन क्रांती झाली. या क्रांतीने पुढे घटनात्मक राजेशाहीचा पाया घातला. १९व्या शतकात लोकशाही आणि प्रातिनिधीक शासनपद्धतीचा विस्तार झाला. लोकांचे सार्वभौमत्व आणि समता ही तत्वे हळूहळू स्विकारण्यात आली. मताधिकाराच्या हक्काचाही विस्तार झाला. २० व्या शतकात सर्वत्र प्रौढमताधिकाराचे तत्व स्विकारण्यात आले. लोकशाही आणि प्रातिनिधीक शासनपद्धतीचा विकास मात्र सगळीकडे एकाच पद्धतीने झाला नाही. उदा. – इंग्लंडमध्ये हळुहळू शांततेने प्रातिनिधीक लोकशाही आली. फ्रान्समध्ये त्यासाठी क्रांती झाली. १९वे शतक म्हणजे साम्राज्यवाद आणि लोकशाहीचे विचित्र मिश्रण होते. युरोप आणि अमेरिकेत लोकशाहीने आपले पाय हळुहळु रोवले. आशिया आणि आफ्रिका खंडातील राज्यात साम्राज्यवाद अस्तित्वात आला. २० व्या शतकात पहिल्या महायुद्धानंतर अनेक देश स्वतंत्र झाले.

आधुनिक राष्ट्रराज्ये राज्याच्या उत्क्रांतीतील शेवटची अवस्था नाही. राष्ट्रराज्य पद्धती आणि राष्ट्रीयत्व यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात संघर्ष सुरू झाले. राष्ट्रांचे आर्थिक परावलंबित्व, जागतिक शांततेची इच्छा, जागृत विचार यामुळे हळूहळू जागतिक संघराज्य या संकल्पनेचा उगम होत आहे.

**सारांश :**

राष्ट्र, राज्य अचानक, एकदम उदयाला आले नाही. जगातील देशही एकाच वेळी उदयाला आले नाही. टोळींच्या राज्यापासून आधुनिक लोकशाही राष्ट्र-राज्य याप्रमाणे राज्य हळुहळु उदयास आले आणि विकसित झाले. राज्याचे कार्य आणि भूमिका यातही बदल होत गेले. आधुनिक राष्ट्र राज्य लोकांना स्वातंत्र्य, अधिकार, विविध सेवा उपलब्ध करून देते त्यामुळे आज राज्याचे कार्यक्षेत्र वाढले आहे.

## ४.७ दिर्घोत्तरीय प्रश्न

१) टोळीच्या राज्यापासून आधुनिक राष्ट्रराज्यापर्यंत राज्याच्या विकासाच्या उत्क्रांतीचा आढावा घ्या?

२) आधुनिक राष्ट्र राज्याच्या उत्क्रांतीचा मागोवा घ्या.

३) राष्ट्र म्हणजे काय? राष्ट्राचे घटक सांगा.

४) राष्ट्रीयत्व म्हणजे काय? राष्ट्रीयत्वाची भावना विकसित करणारे घटक कोणते सविस्तर लिहा.

❖❖❖❖

# ५

## मोड्युल ३
# सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता

**घटक रचना :**

५.० उद्दीष्ट
५.१ प्रस्तावना
५.२ सत्ता- अर्थ आणि प्रकार
५.३ अधिसत्ता- अर्थ आणि प्रकार
५.४ अभिमान्यता- अर्थ आणि प्रकार
५.५ दिर्घोत्तरीय प्रश्न

## ५.० उद्दीष्ट

सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता राज्यशास्त्राच्या अभ्यासातील मूलभूत संकल्पना आहेत. या कल्पनांचा अर्थ, त्यांच्यातील भेद आणि राज्याच्या कार्यात त्यांची भूमिका समजून घेणे.

## ५.१ प्रस्तावना

सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या संकल्पना राज्यशास्त्रातील महत्त्वाच्या आणि केंद्रीभूत संकल्पना आहेत. या संकल्पनांचा अर्थ, स्वरूप, प्रकार आणि उपयोगिता इत्यादीचा अभ्यास केल्याशिवाय शासन आणि राजकारणाचे स्वरूप समजू शकत नाही.

राज्यशास्त्र विषयाचा अभ्यास आदर्शवादी (Normative) आणि वास्तववादी (Empirical) दृष्टीकोनानुसार करण्यात येतो. आदर्शवादी दृष्टीकोन काय असावे, कसे असावे यावर भर देतो. आजच्या शतकातील राज्यशास्त्राचे अभ्यासक राज्यशास्त्राचा अभ्यास वास्तविक दृष्टीकोनानुसार करण्यावर जास्त भर देतात. वरील संकल्पनाचा अभ्यास वास्तविक राजकारणाची कल्पना येण्यासाठी आवश्यक आहे.

## ५.१ सत्ता- अर्थ आणि प्रकार

**सत्तेचा अर्थ (Meaning) :** सर्वसाधारणपणे सत्ता म्हणजे शक्ति (Force) किंवा ताकद होय. राज्यशास्त्रामध्ये ‘‘सत्ता म्हणजे एखाद्या व्यक्ति, समुह किंवा संस्था यांची दुसऱ्या व्यक्ती, समुह किंवा संस्थेवर प्रभाव पाडण्याची क्षमता होय.” दुसयाला आपल्या मताप्रमाणे वागण्यास भाग पाडण्याची क्षमता म्हणजे सत्ता.

आधुनिक राजकीय विचारवंत **रॉबर्ट डाल** यांच्या मते ‘‘एकाची दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय.‘‘

**बर्टान्ड रसेल :** यांच्यामते ‘‘अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची क्षमता म्हणजे सत्ता.‘‘

**डेव्हिड ईस्टन :** यांच्यामते ‘‘एखादी व्यक्ती किंवा गट स्वतःच्या इच्छेनुसार इतर व्यक्ती किंवा गटाच्या कृती निर्धारित करतो तेव्हा तो गट दुसऱ्या गटावर आपली सत्ता प्रस्थापित करतो.‘‘

**लॉसवेल :** यांच्या मते ‘‘निर्णय प्रक्रियेतील सहभाग किंवा निर्णय प्रक्रियेवरील नियंत्रण म्हणजे सत्ता होय.‘‘

**सत्तेची वैशिष्ट्ये :**

**१) सत्तेचे स्वरूप सापेक्ष (Relative) असते-** सत्ता म्हणजे दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याची, अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची, निर्णय प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय, परंतु सत्तेचे स्वरूप स्थळ, काळ, व्यक्ती, सामाजिक आर्थिक, राजकीय परिस्थितीप्रमाणे बदलत असते.

**२) सत्ता संबंधात्मक असते-** व्यक्ती-व्यक्तींच्या संबंधातून सत्ता स्पष्ट होते. सत्ता वापरण्याची क्षमता एखाद्या व्यक्तीमध्ये असली तरी ही क्षमता वापरण्यासाठी त्या व्यक्तीचे समाजातील इतर घटकांशी संबंध असणे जरुर असते. सत्ता कोणावर तरी असावी लागते.

**३) सत्ता वर्तनात्मक असते-** सत्ताधारक आणि ज्यांच्यावर त्या सत्तेचा प्रभाव पडणार असतो त्यांच्या वर्तनातून सत्ता व्यक्त होत असते. उदा. एखाद्याकडे बळसामर्थ्य असेल आणि दुसऱ्याकडे अर्थसत्ता (म्हणजे खूप संपत्ती) असेल तर या दोघांपैकी कोणाच्या इच्छेवरून किती लोक आपले वर्तन बदलतात हे कळत नाही. सत्ता वर्तनावर, आचरणावर प्रभाव पाडणारी असते.

**४) प्रसंगविशिष्ट-** पदामुळे सत्ता व्यक्तीला मिळते. पदावर नसतांना त्या पदाशी संबंधीत सत्तेचा वापर व्यक्ती करु शकत नाही. म्हणजेच पदानुसार, प्रसंगाप्रमाणे सत्ता असते.

**५) सत्तेला मर्यादा असतात-** एका मर्यादेपलीकडे अनियंत्रीतपणे सत्ता गाजविण्याचा कुणी प्रयत्न केल्यास त्याचे परिणाम आणि प्रतिक्रिया निर्माण होतात. उदा. शासनाने अनियंत्रीतपणे सत्ता गाजविण्याचा प्रयत्न केल्यास लोक त्या शासनाला प्रतिकार करते.

६) सत्ता ही सामाजिक, राजकीय, आर्थिक किंवा नैतिक कोणत्याही स्वरुपाची असू शकते. उदा. राजकारण्यांकडे राजकीय सत्ता असते. श्रीमंताकडे आर्थिक सत्ता असते. स्वामी, गुरु यांच्याकडे नैतिक सत्ता असते.

## ५.२ सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता संबंध :

Force is the instrument of Power, influence is the outcome of the power and authority is the legitimised power.

सत्तेचे मोजमाप करण्याचे साधन म्हणजे प्रभाव (influence) होय. (Influence is the yardstick of power) सत्ता प्रभावातून व्यक्त होते. एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेवर प्रभाव पाडून जेव्हा सत्ता अपेक्षित बदल घडवून आणते तेव्हा सत्ता व्यक्त होते.

जेव्हा सत्तेला लोकांची अधिमान्यता (Ligitimacy) मिळते किंवा ती सत्ता लोक जेव्हा स्विकारतात तेव्हा त्या सत्तेचे रुपांत्तर अधिसत्तेमध्ये होते. सत्ता (Power) + अधिमान्यता (Ligitimacy) = अधिसत्ता (Authority).

१) Authority without power is toothless Tiger) सत्तेअभावी अधिसत्ता कळसुत्रे बाहुले ठरू शकते. सत्ता असा घटक आहे की, जो साधारण व्यक्तीलासुद्धा असाधारण बनवू शकतो.

२) (Power without authority is not legal and it is insecure) सत्तेला अधिसत्तेची जोड असेल तरच ती सत्ता परिणामकारी आणि प्रभावी ठरते.

३) सत्ता आणि अधिसत्ता यांना जोडणारी अधिमान्यता असते. Ligitimacy is the link between power and authority. सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या तिन्ही संकल्पना एकमेकांवर आधारित आणि घनिष्ठ संबंधीत आहेत. एका शब्दात Authority is legitimate power असते. अधिसत्ता म्हणजे अधिमान्यता मिळालेली सत्ता होय.

**सत्तेचे प्रकार (Types or Forms of Power):-**

व्यक्तिकडे असलेले घटक (potential elements) आणि ते घटक वापरण्याची व्यक्तीची क्षमता (capability of the person to use following elements) यावरून सत्तेचा प्रकार कोणता हे लक्षात घेता येते.

**१) आर्थिक सत्ता (Economic Power) :** संपत्ती, पैसा (**Money**) यावर आधारित आर्थिक सत्ता असते. श्रीमंताकडे श्रीमंतीची किंवा संपत्तीची सत्ता असते. व्यक्ति, गट, राजकीय पक्ष आणि राष्ट्र या सर्वांच्याच दृष्टीने आर्थिक सत्ता असणे एक महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. भ्रष्टाचारावर उपाय म्हणून आर्थिक सत्ता आणि राजकीय सत्ता यांचे विभाजन करणे गरजेचे आहे, असे मत प्लेटो या विचारवंताने मांडले होते. आजच्या लोकशाहीमध्ये सुध्दा निवडणुकांमध्ये आर्थिक सत्तेचा प्रभाव दिसून येतो. आर्थिकसत्ता आणि राजकीय सत्ता हातात हात घालून चालतांना दिसतात.

समाजामध्ये आर्थिक सत्ता (Economice Power) ज्यांच्याकडे असते त्यांच्याकडे राजकीय सत्ताधाऱ्यांवर प्रभाव पाडण्याची क्षमता असते. कार्ल मार्क्सने साम्यवादी विचारसरणी मांडतांना भांडवलशाही राज्यव्यवस्थेत मुख्य दोन घटक असतात. एक श्रीमंत भांडवलदार आणि दुसरे कामगार असे मत मांडले होते. यापैकी श्रीमंत भांडवलदारांकडे आर्थिक सत्ता असल्यामुळे त्यांचे राज्यावर वर्चस्व असते. आर्थिक सत्तेच्या आधारावर ते कामगारांचे शोषण करतात. समाजात वर्गविहीन (classless) व्यवस्था आणल्याशिवाय समता येणार नाही यावर भर दिला होता.

जमिनदारी व्यवस्था, सरंजामशाही व्यवस्थांमध्ये जमीनदार आणि सरंजामदाराकडे आर्थिक सत्ता असते. आधुनिक भारतीय लोकशाही शासनपद्धतीमध्ये सुद्धा शासनाला अंबानी, टाटा, गोदरेज, बीर्ला या उद्योगपतींच्या दबावाला आणि सत्तेला दुर्लक्षित करून चालत नाही.

२) **लष्करी सत्ता (Military Power) :** सत्ताधारी राज्याच्या निर्मितीसाठी त्या राज्याकडे लष्करी सत्ता असणे गरजेचे असते. ज्या राष्ट्राला जागतिक राजकारणात प्रभावी व्हायचे असते त्या राष्ट्राला लष्करी दृष्टीने स्वतःला अद्यावत असावे लागते. लष्करी सत्तेशिवाय राज्य टिकू शकत नाही. हॉब्ज आणि मॅकॅव्हली या विचारवंतानी राज्य लष्करी दृष्टीने सत्ताधारी असावे यावर अतिशय भर दिला होता. त्यांच्यामते सत्तधारी राज्यच सर्वांवर पाडू शकते.

३) **सामाजिक सत्ता (Social status) :** समाजामध्ये जात, लिंग, वंश यावरून असलेले स्थान व दर्जा सत्तेसाठी कारणीभूत असते. उदा. हिंदू जाति व्यवस्थेप्रमाणे समाजातील वरिष्ठ जातींना नेमहीच समाजामध्ये सत्ता व विशेषाधिकार होते पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या समाजामध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांना अधिक सत्ता होती. जातीच्या आधारावर सत्ताधारी असलेले राजकीय पक्ष आजच्या लोकशाहीमध्ये आहेत.

४) **लोकशक्तीचा पाठिंबा (Numrical strength) :** ज्या राजकीय पक्षांना, व्यक्तीला लोकांचा पाठिंबा मिळतो ते राजकीय पक्ष शासकीय सत्ताधारी होतात. लोकशक्तीचा पाठिंबा असल्याशिवाय कोणतीच व्यक्ती, गट प्रभावी ठरू शकत नाही. महात्मा गांधीच्या सत्याग्रह चळवळीमध्ये लोकशक्तीचा पाठिंबा व सहभाग होता म्हणून स्वातंत्र्य चळवळीला यश मिळाले. लोकशक्तीचा पाठींबा ही एक प्रचंड शक्ती आहे. लोकशक्तीचा पाठिंबा मिळवण्यासाठी अनेक पुढारी लोकांच्या भावनांचा फायदा घेतात.

५) **नैसर्गिक साधनसंपत्ती (Natural resources) :** नैसर्गिक साधनसंपत्ती उदा. तेल, खनिजे, जमीन, खाणी, पाणी असणाऱ्या राष्ट्रांकडे आपोआप सत्ता प्राप्त होते. यावरूनच राजकारणामध्ये 'तेलाचे राजकारण', 'पाण्याचे राजकारण' घडत असते. नैसर्गिक साधनसंपत्ती असलेल्या राष्ट्राचा प्रभाव इतर राष्ट्रावर असतो.

६) **मानवी साधनसंपत्ती (Human resources) :** ज्या देशातील लोक प्रामाणिक, शिक्षित आणि एखाद्या कार्याला वाहून घेणारे असतात म्हणजेच ज्यांच्याकडे मानवी साधनसंपत्ती असते ते राज्य आपोआपच सत्ताधारी आणि प्रभावी बनते. याउलट भ्रष्टाचारी, आळशी, अशिक्षित जनता असलेला देश दुर्बल बनत जातो.

७) **विचारसरणीवर आधारित सत्ता (Ideological power) :** विशिष्ट विचारसरणीच्या आधारावर एक प्रचंड ताकद निर्माण होत असते. उदा. मार्क्सच्या साम्यवादी

विचारसरणीने रशियामध्ये क्रांती घडवून आणली. इटालीमध्ये फॅसिझम या विचारसरणीच्या आधारावर मुसोलिनिने इटालीला सत्ताधारी बनविले होते. हिंदूत्व विचारसरणी, आजही विशिष्ट गटाला सत्ताधारी व प्रभावी होण्यास कारणीभूत ठरते. भावनिक आणि मानसिकदृष्टीने लोकांना एकत्रित आणण्यास व सत्ताधारी बनण्यास विचारसरणी महत्त्वाचे कार्य करतात.

८) **राजकीय सत्ता (Political power) :** राज्याकडे राजकीय सत्ता असते. जो पक्ष सत्तेवर असतो तो पक्ष राजकीय सत्ताधारी असतो आणि शासनकार्य करतो. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ हे शासनाचे घटक त्या त्या क्षेत्रामध्ये सत्ताधारी असतात.

९) **वरील साधने वापरण्याची क्षमता (The capacity to use the resources) :** पैसा, नैसर्गिक साधनसंपत्ती, राजकीय सत्ता फक्त असून चालत नाही तर ते घटक वापरण्याची क्षमता व्यक्तीमध्ये, राष्ट्रामध्ये असावी लागते. त्यासाठी योग्य नेतृत्व गुण (leadership qualities) असावे लागते. योग्य नेतृत्व देणारा पुढारी लोकांना प्रेरणा देणारा, मार्गदर्शन करणारा, सर्वांमध्ये योग्य समन्वय आणणारा असतो. उदा. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी योग्य नेतृत्वामध्ये खूप मोठी ताकद आहे. दुसरे म्हणजे निर्णय घेण्याची क्षमता व्यक्तीमध्ये असावी लागते. योग्य वेळी योग्य निर्णय घेणे अतिशय गरजेचे असते. तिसरा घटक म्हणजे वाटाघाटी (Negotiation) करण्याची क्षमता असावी. प्रचार (propaganda) यामुळे लोकांच्या मनात योग्य परिवर्तन घडविता येतो. योग्य नेतृत्व गुण असलेले नेता, त्याची निर्णय घेण्याची क्षमता, वाटाघाटी करण्याची क्षमता, लोकांचा प्रतिसाद मिळवण्याची क्षमता असलेली व्यक्तीच सत्ताधारी बनत असते.

**निष्कर्ष :** वरील घटकांच्या आधारावर सत्तेचे स्वरुप आणि सत्तेचे प्रकार स्पष्ट होतात.

सारांश – 'सत्ता ही संकल्पना खालील तक्त्यावरुन सारांशरुपाने स्पष्ट होते.

तक्ता –

**सत्ता (powep)**

१ सत्तेचा अर्थ
- १) राज्यशास्त्रातील अर्थ
- २)रसेल
- ३) ईस्टन
- ४) लॉसवेल

२ वैशिष्टे
- १) सापेक्ष
- २) संबधात्मक
- ३) वर्तनात्मक
- ४)प्रसंगविशिष्ट
- ५) मर्यादीत
- ६) अनेक प्रकारची

३ सत्ता, अधिमान्यता, अधिसत्ता संबंध
- १) सत्ता+अधिमान्यता=अधिसत्ता
  Power +Legitimacy=Authority
- २) तिनही घटक एकमेकांवर आधारीत

४ सत्तेचे प्रकार
- १ आर्थिक सत्ता
- २ लष्करी
- ३ सामाजिक
- ४ लोकशक्ति चा पाठिंबा
- ५ नैसर्गिक साधनसंपत्ती
- ६ विचारसरणी च्या रुपात
- ७ राजकीय
- ८ क्षमता
- ९ मानवी साधनसंपत्ती

**आपली प्रगती तपासा :**

१) सत्ता म्हणजे काय ?
२) सत्तेचे स्वरुप स्पष्ट करा ?
३) सत्तेचे प्रकार सांगा ?
४) सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता यातील संबंध स्पष्ट करा.

---

## ५.३ अधिसत्ता (Authority) - अर्थ आणि प्रकार

**अधिसत्तेचा अर्थ (Meaning) :** अधिसत्तेला इंग्रजीत Authority म्हणतात. हा शब्द लॅटीन शब्द `auctor' आणि `auctoritas' या शब्दापासून उदयास आला आहे. Auctor म्हणजे आज्ञा देणारा (promoter of some order) किंवा `originator' होय.

**मॅकआयव्हर :** यांनी अधिसत्तेची व्याख्या केली आहे. ``Aucthority as the power to command ob edience''.

**सायमनच्या मते :** ''अधिसत्ता म्हणजे निर्णय घेण्याची आणि इतरांच्या कृतींना मार्गदर्शन करण्याची सत्ता होय.'' (``Authority as the power to make decision which guides the actions of others.) कायदेशीर सत्ता (legitimate power) म्हणजेच अधिसत्ता (Authority) होय.

**अधिसत्तेची वैशिष्ट्ये :**

१) **कायदेशीर असते (Legitimacy) :** अधिसत्ता कायदेशीर (legal) असते. अधिसत्ता कायदेशीर असल्यामुळे प्रभावी आणि परिणामकारी होते. अधिसत्तेचा स्विकार सर्वजण करतात. कायदेशीर अधिसत्ता म्हणजे मान्यता मिळालेली सत्ता.

२) **वर्चस्ववादी (Dominance) :** अधिसत्तेचे स्वरूप वर्चस्ववादी असते. अधिसत्तेच्या आज्ञा सर्व पाळतात. आज्ञा देण्याचा अधिसत्तेला अधिकार असतो. ज्या व्यक्ती किंवा गटाकडे अधिसत्ता असते त्या व्यक्ती किंवा गटाचे वर्चस्व इतरांवर असते.अधिसत्तेवर असणाऱ्या व्यक्तिला किंवा गटाला आज्ञा देण्याचा अधिकार असतो.

३) **जबाबदारी असते (Accountability) :** अधिसत्ते वर जबाबदारी असते. लोकशाहीमध्ये राजकीय अधिसत्ताधारी त्या राज्यातील लोकांना जबाबदार असतात. प्रशासकीय रचनेत खालचा वरच्याला जबाबदार असतो.

४) **अधिसत्ता विशिष्ट पदाशी निगडीत असते :** त्या पदावर जी व्यक्ती असेल त्या व्यक्तीला त्या पदाप्रमाणे सत्ता असते. उदा. पंतप्रधान, राष्ट्रपती, महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक.

५) **विवेक (Reason) :** अधिसत्ताधारकांच्या आज्ञांचे पालन लोक इच्छेने आणि विवेकाने करतात. अधिसत्तेवर असणाऱ्या व्यक्तिच्या आज्ञा पाळणे लोकांचे कर्तव्य असते.

**अधिसत्तेचे प्रकार (Types of Authority) :**

अधिसत्तेचे उगमस्थान (Sources) आणि स्थान (Location) यावरून अधिसत्तेचे प्रकार स्पष्ट करता येतात. मॅक्सवेबर या राज्यशास्त्रज्ञाने अधिसत्तेचे तीन प्रकार अधिसत्तेचे उगमस्थानावरून स्पष्ट केले आहेत.

१) पारंपारिक अधिसत्ता (Traditional)
२) दिव्यवलयी अधिसत्ता (Charismatic)
३) वैधानिक अधिसत्ता (Legal rational)

१) **पारंपरिक अधिसत्ता :** अधिसत्तेचे उगमस्थान प्रथा, परंपरा असते तेव्हा अधिसत्तेच्या त्या प्रकाराला पारंपारिक अधिसत्ता म्हणतात. परंपरा प्रथानुसार अनुवंशिकता तत्त्वाप्रमाणे राजा सत्तेवर असतो तेव्हा ती पारंपरिक अधिसत्ता होय. पारंपरिक अधिसत्ता सातत्य आणणारी असते. उदा. राजेशाही. राज्याच्या दैवी सिध्दान्तावर विश्वास करुन राजकीय नेत्याला राजा समजण्यात येते. अशा समाजामध्ये परंपरागत अधिसत्ता दिसून येते.

२) **दिव्यवलयी अधिसत्ता :** राज्य करण्याचा हक्क जेव्हा एखाद्याला त्या व्यक्तीच्या नेतृत्व गुणांमुळे (Leadership qualities) मिळतो. तेव्हा त्याला दिव्यवलयी अधिसत्ता म्हणतात. एखाद्या अलौकीक व्यक्तीमत्त्वाच्या प्रभावामुळे लोक आकर्षित होतात आणि त्या अधिसत्तेच्या आज्ञा पाळतात. उदा. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडीत नेहरू दिव्यवलयी अधिसत्ता असलेली व्यक्तिमत्व होती. या नेत्यांच्या पात्रतेमुळे लोक त्यांचा अतिशय आदर करीत. प्रभावी व्यक्तिमत्व असा गुण आहे जो मानसशास्त्रीय दृष्टया अतिशय प्रेरणादायी ठरतो. त्यामुळे अनेक लोक प्रभावी होतात.

३) **वैधानिक अधिसत्ता :** घटनात्मक नियम आणि कायदे यानुसार असलेल्या अधिसत्तेला वैधानिक अधिसत्ता म्हणतात. उदा. लोकशाही शासनपद्धतीमध्ये अधिसत्तेचे स्वरूप वैधानिक आणि कायदेशीर असते.

आर. एस. पेटर (peters) यांनी अधिसत्तेचे दोन प्रकार स्पष्ट केले आहेत.

१) **Dejure - नाममात्र अधिसत्ता**

२) **Defacto - वास्तविक अधिसत्ता**

१) **Dejure - नाममात्र अधिसत्ता :** नाममात्र अधिसत्ता म्हणजे कायद्याप्रमाणे (authority in law) सत्ता असते परंतु त्या सत्तेचे स्वरूप औपचारिक (formal) असते. उदा. ब्रिटनचा राजा, भारताचे राष्ट्रपती.

२) **Defacto - वास्तविक अधिसत्ता :** प्रत्यक्षात वास्तवामध्ये सत्ताधारी असतो. (Defacto) त्याला वास्तविक अधिसत्ता म्हणतात. उदा. पंतप्रधानांची सत्ता भारतात आणि इंग्लमध्ये वास्तविक अधिसत्ता होय.

**सारांश –**

अधिसत्ता (Authority)

- १ अधिसत्तेचा अर्थ
  - १) उदय
  - २) मॅकआयव्हर
  - ३) सायमन
- २ वैशिष्ट्ये
  - १) कायदेशीर
  - २) वर्चस्ववादी
  - ३) जबाबदारी
  - ४) विशिष्ट पदाशी निगडीत
  - ५) अधिसत्तेचे पालन विवेकाने
- ३ अधिसत्तेचे प्रकार
  - मॅक्सवेबर
    - १ परंपरागत
    - २ दिव्यवलयी
    - ३ वैधनिक
  - पेटर
    - १ नाममात्र
    - २ वास्तविक
- ४ अधिसत्तेचा सत्ता आणि अधिमान्यतेशी संबंध

**आपली प्रगती तपासा :**

१)अधिसत्ता म्हणजे काय ?

२)अधिसत्तेचे स्वरुप स्पष्ट करा ?

३)अधिसत्तेचे प्रकार लिहा.

४)अधिसत्तेचा सत्ता आणि अधिमान्यतेशी संबंध स्पष्ट करा.

## ५.४ अधिमान्यता (Legitimacy) - अर्थ आणि प्रकार

अधिमान्यता ही संकल्पना सत्ता आणि अधिसत्ता या संकल्पनाशी घनिष्ट संबंधित आहे. Legitimacy is an important ingredient of authority along with power.

**अर्थ :** अधिमान्यता म्हणजे वैधानिकता (Legality) होय.

सत्तेचे अधिसत्तेमध्ये रूपांतर होण्यासाठी अधिमान्यता आवश्यक असते. It is legitimacy that converts power into authority.

ऑक्सफोर्ड इंग्लिश डिक्शनरी प्रमाणे अधिमान्यता म्हणजे कायद्याप्रमाणे मान्य असणे होय. (allowed by the law.)

अधिमान्यता या संकल्पनेमध्ये तीन गोष्टी अंतर्भूत आहेत.

१)अधिसत्तेवरील व्यक्तीची न्यायता The rightfulness of an individual’s claim to authority.

२) अधिसत्तेवरील शासनाची न्यायता The rightfulness of a Government’

३) राजकीय व्यवस्थेची घटनात्मकता The rightfulness and constitutionality of a political system as a whole उदा. एखादी व्यक्ती कायद्यामध्ये दिलेल्या नियमांप्रमाणे त्या विशिष्ट पदावर असेल; तर त्या व्यक्तीचा त्या पदावरील (अधिकार) अधिसत्ता न्याय होय. राज्यघटनेतील नियमांप्रमाणे आणि प्रक्रियेनुसार शासन सत्तेवर आले असेल तर त्या शासनाची अधिसत्ता न्याय होय.

**अधिमान्यतेचे आधार (Grounds of Legitimacy) :**

**१) मॅक्सवेबर** या राज्यशास्त्रज्ञाने अधिसत्तेला अधिमान्यता तीन आधारावर असते असे म्हटले आहे.

१) परंपरा traditional grounds
२) दिव्यवलयी charismatic प्रभावी व्यक्तिमत्वाच्या आधारावर.
३) वैधानिक legal rational grounds

**२) ॲरिस्टॉटल** या ग्रीक विचारवंतांच्या मते- शासनाची वैधानिकता यावरून ठरविण्यात यावी की ते शासन लोककल्याणासाठी कितीप्रमाणात कार्य करते. जे शासन लोकांच्या हितासाठी कार्य करते त्या शासनाला अधिमान्यता द्यावी. जे शासन स्वार्थासाठी कार्य करते त्या शासनाला अधिमान्यता देण्यात येऊ नये.

**३) रुसो** या फ्रेंच विचारवंताने असे म्हटले आहे की, ‘‘जे शासन लोकांच्या सामुहिक इच्छेनुसार (General will) कार्य करते त्या शासनाला अधिमान्यता द्यावी.‘‘

**४) बेथंम** या विचारवंताने अधिमान्यतेचे आधार सांगतांना खालील मुद्द्यांवर भर दिला आहे. ''जे शासन त्या राज्यातील कायद्यांप्रमाणे असते आणि लोकसंमती (consent of the people) वर आधारलेले असते त्या शासनाची अधिसत्ता न्याय आहे.''

**५) राजकीय व्यवस्थेच्या प्रकाराप्रमाणे** अधिमान्यतेचे आधारभूत घटक खालीलप्रमाणे आहेत-

१) राजेशाही (Monarchical system) शासनपद्धतीमध्ये प्रथा, परंपरा, वारसा अधिमान्यतेचा आधारभूत घटक होता. दैवी सिद्धान्ताप्रमाणे राजाला राज्य करण्याचा अधिकार देवानेच दिला आहे असे समजण्यात येत असे. वंशपरंपरेप्रमाणे राजेशाहीमध्ये राजाला अधिमान्यता मिळत असे.

२) लोकशाही (Democratic system) शासनपद्धतीमध्ये लोकसंमती, लोकांची इच्छा या आधारावर शासनाला अधिमान्यत मिळते.

३) सरंजामशाही (Elitist systems) मध्ये शिक्षण, श्रीमंती, व्यक्तीमत्त्व सामाजिक दर्जा या घटकांमुळे श्रेष्ठ असलेल्या व्यक्ति किंवा गटाच्या शासनाला अधिमान्यता मिळते.

६) **डेव्हिड ईस्टन** या विचारवंताने अधिमान्यतेचे तीन प्रकार स्पष्ट केले आहेत.

१) विचारसरणीवर (ideological legitimacy) आधारित अधिमान्यता
२) रचनेच्या आधारावर (structural legitimacy) अधिमान्यता
३) व्यक्तिगत आधारावर (personal legitimacy) अधिमान्यता

विचारसरणी (ideology) या घटकाच्या आधारावर अधिसत्तेला अधिमान्यता मिळते तेव्हा विचारात्मक अधिमान्यता म्हणतात.

एखादी रचना किंवा व्यवस्था (structure) या आधारावर अधिमान्यता मिळते तेव्हा रचनात्मक अधिमान्यता म्हणतात.

व्यक्तिच्या व्यक्तीगत क्षमतेच्या आधारावर अधिसत्तेला अधिमान्यता मिळते तेव्हा त्याला व्यक्तीगत अधिमान्यता असते.

**सारांश –**




## ५.५ दिर्घोत्तरीय प्रश्न

१) सत्ता म्हणजे काय ? सत्तेचे स्वरूप आणि प्रकार सांगा ?
२) अधिसत्तेचा अर्थ सांगा ? अधिसत्तेचे स्वरूप आणि प्रकार स्पष्ट करा.
३) अधिमान्यतेची व्याख्या द्या आणि अधिमान्यतेचे आधारभूत घटक लिहा.
४) सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या संकल्पनातील भेद स्पष्ट करा.
५) सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या संकल्पनांचा एकमेकांशी संबंध स्प्ष्ट करा.

❖❖❖❖

# ६

## मोड्युल ३

# सार्वभौमसत्ता

**घटक रचना :**

६.० उद्दीष्ट
६.१ प्रस्तावना
६.२ सार्वभौमसत्ता संकल्पना उत्क्रांती
६.३ सार्वभौमसत्तेच्या बाजू
६.४ सार्वभौमसत्तेच्या व्याख्या
६.५ सार्वभौमसत्तेची वैशिष्ट्ये
६.६ ऑस्टीनचा सार्वभौमसत्तेचा सिद्धान्त
६.७ सार्वभौमसत्तेचा अनेकसत्तावादी सिद्धान्त
६.८ सार्वभौमसत्तेचे वर्गिकरण
६.९ सारांश
६.१० दिर्घोत्तरीय प्रश्न

## ६.० उद्दीष्ट

लोकसंख्या, निश्चित भूप्रदेश, शासनसत्ता, सार्वभौमसत्ता हे राज्याचे चार महत्त्वाचे घटक आहेत. या प्रकरणात सार्वभौमसत्तेचा सर्वसाधारण संदर्भात अभ्यास केला आहे.

## ६.१ प्रस्तावना

राज्याच्या चार घटकांपैकी सार्वभौमसत्ता हा एक अतिशय महत्त्वाचा घटक आहे. सार्वभौमसत्ता म्हणजे सर्वोच्च सत्ता, राज्याची सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याची सर्वोच्य सत्ता होय. सार्वभौमसत्तेला राज्याचा आत्मा किंवा हृदय संबोधतात. एखाद्या देशाला तोपर्यंत राज्य म्हटले जाऊ शकत नाही जोपर्यंत तो देश आपल्या अंतर्गत भूप्रदेशावर, लोकांवर सर्वोच्च सत्ता उपभोगात नाही. राज्याच्या अधिसत्तेचे सार म्हणजे सार्वभौमसत्ता होय. राज्याजवळ असलेल्या या घटकामुळेच राज्य आणि इतर संस्था, संघटनापेक्षा वेगळे आणि श्रेष्ठ ठरते. प्रत्येक राज्यात अशी अधिसत्ता असते की जी सर्वोच्च अंतिम असते. त्या अधिसत्तेची इच्छा सर्व संस्था,

संघटना आणि व्यक्तिंवर कायदेशीररित्या बंधनकारक असते. एकूण सार्वभौमसत्ता म्हणजे सर्वोच्च, अंतिम, कायदेशीर सत्ता होय.

## ६.२ सार्वभौमसत्ता संकल्पना उत्क्रांती

आधुनिक राज्याच्या उदयाशी ही कल्पना संबंधित आहे. ॲरिस्टॉटलच्या विचारांमध्ये राज्याच्या सर्वोच्च सत्तेचा उल्लेख आहे. रोमन ज्युरिस्ट आणि मध्ययुगीन विचारक यांच्याही लिखाणात राज्याच्या सर्वोच्च सत्तेचा उल्लेख आहे. मध्ययुगात राज्याला जरी सार्वभौम समजले जात होते तरी एकीकडे राजावर सरंजामदाराचे आणि दुसरीकडे चर्चचे वर्चस्व होते. परंतु राष्ट्रराज्याचा उदय झाल्यानंतर जेन बोदीन याच्या लिखाणात सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याची सर्व जनतेवर असलेली अमर्यादित सत्ता होय असा उल्लेख आहे. बोदीनच्या मते कायदा सार्वभौमसत्ताची इच्छा होय.

## ६.३ सार्वभौमसत्तेच्या बाजू

### अंतर्गत आणि बाह्य सार्वभौमसत्ता

बोदीन या विचारवंतांने अंतर्गत सार्वभौमसत्तेची कल्पना स्पष्ट केली आहे. राज्यातील सर्व नागरीकांवर व लोकांवर असलेली राज्याची सर्वोच्च सत्ता म्हणजे अंतर्गत सार्वभौमसत्ता होय. ह्युगो ग्रोशियस या डच लेखकाने बाह्य सार्वभौमसत्तेची कल्पना स्पष्ट केली आहे. सार्वभौम राज्यांचे एकमेकांशी संबंध समान स्थान यावर आधारलेले असतात. प्रत्येक राज्य बाह्य क्षेत्रात म्हणजे इतर राज्यांची संबंध ठेवतांना स्वतंत्र असते. मॅकॅव्हली या विचारवंताने राजपुत्राला उपदेश करताना असे म्हटले आहे की राजपुत्राने बाह्य नियंत्रण आणि अंतर्गत क्षेत्रातील चर्चचे नियंत्रण झुगारून द्यावे. थॉमस हॉब्ज या विचारवंताने राज्याच्या सार्वभौमसत्तेवर कोणतेही कायदेशीर बंधने नसतात असे म्हटले आहे. राज्य कायदे निर्माण करीत असते. राज्य हे एकच सत्तेचे एकमेव केंद्र आहे. अशाप्रकारे हॉब्जने कायदेविषयक सार्वभौमत्वाची कल्पना मांडली आहे. सार्वभौमत्वाची कल्पना पुढे बेंथम, ऑस्टीन, रुसो, हेगेल यांनी विकसित केली. या सर्व विचारवंतांच्या मते राज्याची सार्वभौमसत्ता अंतर्गत आणि बाह्यक्षेत्रात सर्वोच्च, अंतिम, निरपेक्ष असते.

### सार्वभौमसत्तेवरील मर्यादा

याउलट जॉन लॉक, मॉटेस्क्यु, स्पिनोझा, काँट यांच्या मते राज्याची सार्वभामसत्ता मर्यादित आहे. अमेरिकन क्रांतीच्या कल्पनेने प्रभावित होऊन या विचारकांनी आधुनिक राज्य सर्वोच्च आहे का? याविषयी प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या मते मानवाने अनेक संस्था, संघटना सुसंस्कृत सामाजिक जीवन जगण्यासाठी निर्माण केल्या. त्यापैकीच राज्य ही एक संस्था आहे. या सर्व संस्था संघटनांचे एकमेकांवर वर्चस्व नाही तर राज्यातील या सर्व संस्था, संघटनामध्ये सत्ता विभागलेली असते. लॉक, माँटेस्कु यांनी सत्ताविभाजन, मर्यादित सार्वभौमत्व, घटनात्मक शासन, नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत विकसित केला आणि मर्यादित सार्वभौमसत्ता ही संकल्पना मांडली.

## ६.४ सार्वभौमसत्तेच्या व्याख्या

बोदीन, ग्रोशियस यांनी सार्वभौमत्वाच्या ज्या व्याख्या केल्या आहेत त्या वरच्या विवेचनात आल्या आहेत.

**ब्लॅक स्टोनची व्याख्या :** "राज्याची सर्वोच्च, निरपेक्ष, अनियंत्रित आणि कायदेशीर सर्वोच्च सत्ता म्हणजे सार्वभौमसत्ता होय."

**जेलीनेकच्या मते :** "सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याचे असे वैशिष्ट्य की ज्याद्वारे राज्य स्वत:च्या इच्छेशिवाय कशानेही बांधलेले नसते."

**बर्जेसच्या मते :** "सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याची मूळ, निरपेक्ष, अमर्यादित सत्ता होयः जी सर्व व्यक्ती, लोक आणि सर्व संस्थावर असते."

**गार्नरच्या मते :** "सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याची सर्वोच्च इच्छा आणि सत्ता होय की ज्यामुळे राज्य हे इतर संस्था संघटनापेक्षा वेगळे भासते."

**राज्यशास्त्राच्या शब्दकोशानुसार :** "सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याची सर्वोच्च सत्ता होय; जी अंतर्गत आणि बाह्य हस्तक्षेपापासून मुक्त असते."

एकूण "सार्वभौमसत्ता सर्वोच्च, निरपेक्ष, अंतर्गत आणि बाह्य क्षेत्रात स्वतंत्र, असलेली राज्याची सर्वोच्च सत्ता होय." अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायधिश सुंदरलँड यांचे भाष्य याबाबतीत नमूद करण्यासारखे आहे. ते म्हणतात, "राज्यकर्ते येतात आणि जातात, शासन आणि शासनाचे प्रकार बदलतात. परंतु सार्वभौमसत्ता कायम राहते. राज्य सार्वभौसत्तेशिवाय अस्तित्त्वात राहू शकत नाही." सार्वभौमसत्ता राज्याचा एक आवश्यक घटक आहे. जर एखाद्या देशाने त्या राज्याला जिंकून घेतले तर त्या राज्याची सार्वभौमसत्ता नष्ट होते. राज्याची सार्वभौसत्ता कायदेशीर असते. राज्याच्या सार्वभौमसत्तेमुळे राज्य सर्व निर्णय घेऊ शकते, बाह्यनियंत्रणापासून मुक्त राहू शकते.

## ६.५ सार्वभौमसत्तेची वैशिष्ट्ये

वरील व्याख्यांच्या आधारावर सार्वभौमत्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **निरपेक्षता :** कायदेशीर दृष्टीकोनातून राज्याची सार्वभौमसत्ता निरपेक्ष असते. राज्याचा अतिशय महत्त्वाचा आणि आवश्यक घटक म्हणजे सार्वभौमसत्ता होय. राज्याच्या सार्वभौमसत्तेला आणि इच्छेला राज्यांतर्गत कुणीही आव्हान करू शकत नाही. बाह्यबाबतीतही राज्याच्या सत्तेत कुणीही हस्तक्षेप करू शकत नाही. अर्थात

सार्वभौमसत्ता निरपेक्ष असली तरी वास्तवामध्ये कायदेशीर व न्यायिक दृष्टिने राज्याच्या सार्वभौमसत्तेवर अनेक घटक मर्यादा टाकतात. उदा. प्रथा, परंपरा, लोकमत, मतदार इत्यादी. बाह्य सार्वभौमसत्तेवर आंतरराष्ट्रीय कायदे, संस्था, इतर राष्ट्रांशी संबध इत्यादी बंधनात्मक असते.

२) **शाश्वत :** सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याचे हृदय आणि आत्म आहे. सार्वभौमसत्तेचा नाश म्हणजे राज्याचा शेवट होय. शासनात बदल किंवा राष्ट्रपतीचा मृत्यु या कशानेही सार्वभौमसत्ता नष्ट होत नाही. ती फक्त एका व्यक्ती किंवा गटाकडून दुसऱ्या व्यक्ती किंवा गटाकडे सत्तातंरीत होते. म्हणजेच सार्वभौमसत्तेचे स्वरूप शाश्वत असते.

३) **सर्वव्यापी :** सार्वभौमसत्ता सर्वव्यापी आहे म्हणजे राज्यातील सर्व लोक, नागरीक संस्था, संघटना यांच्यावर त्या राज्याची सार्वभौमसत्ता असते. राज्याच्या सार्वभौम सत्तेच्या वर्चस्वापासून कुणीही सुटू शकत नाही.

४) **अदयेय :** सार्वभौमसत्ता राज्याचा असा घटक आहे की जो राज्यापासून वेगळा करता येत नाही. हा घटक जर राज्यापासून वेगळा केला तर त्या राज्याचा शेवट होता. एखादा देश जेव्हा आक्रमण करून एखाद्या देशाला जिंकतो तेव्हा सार्वभौमसत्ता जिंकलेल्या राष्ट्राकडे जाते आणि हरलेले राज्य, राज्य न राहता गुलाम राष्ट्र बनते.

५) **वगळता किंवा देता न येणारी सत्ता :** राज्याच्या अंतर्गत सर्व संस्था व नागरीक यांच्यावर राज्याची सार्वभौमसत्ता चालते. कारण राज्याजवळ सार्वभौमसत्ता असते. राज्याच्या व्यतिरिक्त कुणालाही सार्वभौमसत्ता देता येत नाही. सार्वभौमसत्तेचे केंद्र राज्यच असते. सार्वभौमसत्ता अनेक ठिकाणी विभागल्यास ते विभाजन शासन प्रशासनाच्या कार्याच्या सोयीपुरती असते.

६) **न विभागता येणारी :** राज्याची सार्वभौमसत्ता विभागता येत नाही. उदा. संघराज्यात घटनेपासून प्राप्त झालेली सत्ता केंद्र आणि घटक राज्य यांच्यात विभागली जाते; परंतु सार्वभौमसत्ता विभागल्या जाऊ शकत नाही.

७) सार्वभौमसत्ता निश्चित, स्पष्ट, संघटित, कायदेशीर असते. ही सत्ता एका व्यक्तिकडे गटाकडे असू शकते.

८) सार्वभौमसत्तेलाच कायदेशीर अधिकार असतात.

## ६.६ ऑस्टीनचा सार्वभौमसत्तेचा सिद्धान्त

इंग्लिश ज्युरीस्ट जॉन ऑस्टीन यांनी १८३२ साली “लेक्चरर्स ऑन ज्युरिसप्रुडन्स” पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी आपली सार्वभौमसत्तेची व्याख्या आणि सिद्धांत स्पष्ट केला आहे. ऑस्टीनच्या ह्या सिद्धांताचा अभ्यास केल्याशिवाय सार्वभौमसत्तेची संकल्पना समजू शकत नाही.

ऑस्टीनने सार्वभौमसत्तेच्या कायदेविषयक सिद्धांताचे विश्लेषण केले आहे. त्याच्या या सिद्धांतालाच ''सार्वभौमसत्तेचा एकसत्तावादी सिद्धांत'' म्हणतात. हा सिद्धांत स्पष्ट करतांना ऑस्टीन म्हणतो, राज्यात एक निश्चित व्यक्ती किंवा गट सर्वोच्च असतो. त्यांच्या आज्ञा सर्व लोकांना पाळाव्या लागतात. प्रत्येक कायदा सार्वभौम व्यक्ती किंवा सार्वभौम गट ठरवितो.

ऑस्टीनच्या सिद्धांताचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) प्रत्येक राजकीय स्वतंत्र समुदायात सार्वभौम सत्ता अस्तित्वात असते. स्वतंत्र राजकीय समाजाचा सार्वभौमसत्ता महत्त्वाचा घटक आहे.

२) सार्वभौमसत्ता निश्चित व्यक्तिकडे किंवा गटाकडे असते.

३) सार्वभौमाचीसत्ता कायदेशीर दृष्ट्या अमर्यादित असते. कोणतीही कायदेशीर बंधने सार्वभौमावर नसतात.

४) सार्वभौमाच्या आज्ञा किंवा त्याचे आबंधन लोक सवयीनेच करतात, सार्वभौमाचे राजकीय आबंधन प्रत्येकावर बंधनकारक असते.

५) सार्वभौमाची सत्ता विभागता येत नाही.

६) सार्वभौमाच्या आज्ञा म्हणजेच कायदा होय. या आज्ञा प्रत्येकाने पाळणे आवश्यक असते; नाहीतर दंड होतो.

**ऑस्टीनच्या सार्वभौमसत्तेच्या सिद्धांतावर टीका :**

हेन्री मेन, क्लर्क, सिडविक, लास्की इत्यादी विचारकांनी ऑस्टीनच्या सिद्धांतावर टीका केली आहे.

१) हेन्री मेन अशी टीका करतात की सार्वभौमसत्ता ही निश्चित व्यक्तिकडे राहू शकत नाही. सार्वभौमाची सत्ता निरपेक्ष असू शकत नाही. महाराजा रणजित सिंह या राज्याचे उदाहरण देऊन तो स्पष्ट करतो की महाराजा रणजित सिंग कोणत्याही आज्ञा देऊ शकत असे परंतु त्याच्या आज्ञांना कायदा म्हणता येत नव्हते. सार्वभौम स्वतः समाजातील प्रथांनी बांधलेला असतो. आशियातच नाही तर युरोपियन समाजातही सार्वभौम हा प्रथा परंपरांचा कधीच अनादर करू शकत नाही. मध्ययुगात सार्वभौमाच्या सत्तेवर चर्चचे नियंत्रण होते. हेन्री मेन असा निष्कर्ष काढतो की सार्वभौमसत्ता निरपेक्ष कधीही नव्हती आणि कधीही असू शकत नाही.

२) हेन्रीमेनच्या मते ऑस्टीनचा सिद्धांत लोकांचे सार्वभौमत्व या कल्पनेशी विसंगत आहे. लोकशाही हा सिद्धांत चुकीचा ठरतो. कारण लोकशाहीत सार्वभौमसत्ता लोकांच्याकडे असते. या अर्थाने सार्वभौमसत्ता एका निश्चित व्यक्तिकडे किंवा गटाकडे असते असे म्हणणे चुक आहे.

३) ऑस्टीनची कायद्याची व्याख्या चुकीची आहे. लास्कीच्यामते सार्वभौमाच्या आज्ञा म्हणजे कायदा होऊ शकत नाही. समाजातील सामाजिक, नैतिक मूल्यांकडे कायदा दुर्लक्ष करू शकत नाही. सामाजिक मूल्ये आणि प्रथा याबाबतीत ऑस्टीन जागृत नव्हता त्यामुळेच तो सार्वभौमाच्या आज्ञा म्हणजे कायदा अशी व्याख्या करतो.

४) सार्वभौमसत्ता ही कधीही निरपेक्ष आणि अमर्यादित राहू शकत नाही. कितीही प्रभावशाली, सार्वभौम असला किंवा हुकुमशहा असला तरी तो लोकमत, प्रथा, परंपरा याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. बोलताना सार्वभौमसत्ता अमर्यादित व निरपेक्ष असते असे आपण म्हणत असलो तरी प्रत्यक्षात मात्र सार्वभौमाच्या सत्तेवर अनेक मर्यादा असतात.

५) ऑस्टीनने शक्तिवर सत्तेवर अतिभर दिला आहे. परंतु सार्वभौमाच्या शक्तिमुळे लोक सार्वभौमाच्या आज्ञा पाळतात असे नाही तर सत्तेला आणि कायद्याला लोकांच्या संमतीचा आधार असावा लागतो तरच लोक कायदे पाळतात.

६) आधुनिक लोकशाही राज्यात प्रत्यक्ष सार्वभौम सत्ता निश्चित कुठे आहे हे दाखविणे कठीण असते. उदा. सांसदीय पद्धतीत संसद सार्वभौम असते. परंतु संसदेच्या मागे मतदारांची सत्ता असते आणि मतदारांच्या मागे संपूर्ण जनता असते. त्यालाच लोकांचे सार्वभौमत्व असे आपण म्हणतो. म्हणजेच लोकशाहीत ऑस्टीन ज्याअर्थाने सार्वभौमत्व निश्चित ठिकाणी असते असे म्हणतो तसे शक्य नसते.

७) लोकांचे सार्वभौमत्व, राजकीय सार्वभौमत्व आणि कायदेशीर सार्वभौमत्व यामध्ये भेद करण्यास ऑस्टीन अयशस्वी ठरला आहे. सासंदीय पद्धतीत संसद कायदेशीर सार्वभौम असते. तर मतदार राजकीय सार्वभौम असतात.

८) आधुनिक राज्यातील इतर संघटनांची भूमिका ओळखण्यासही ऑस्टीन अयशस्वी ठरला आहे. लास्कीच्यामते आधुनिक राज्यात अनेक शक्तिशाली संघटना आणि गट अस्तित्वात असतात, ज्यांचा लोकांवर अतिशय प्रभाव असतो.

९) आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत कोणतेही राज्य परकीय वर्चस्वपासून पूर्णपणे मुक्त राहू शकत नाही. अतिशय शक्तिशाली राज्यांनासुद्धा लहान राज्याच्या भावनांकडे दुर्लक्ष करता येत नाही. याउलट लहान राज्य हे सतत मोठ्या राज्यांच्या आर्थिक आणि राजकीय नियंत्रणाखाली राहतात.

१०) ऑस्टीनच्या सिद्धांताचा सर्वात मोठा दोष म्हणजे हा सिद्धांत एकसत्तावादी आहे. ऑस्टीनच्या मते सार्वभौम हा निश्चित व्यक्ती किंवा गट असतो आणि लोक त्याच्यावर आधारलेले असतात. ऑस्टीनच्या या मतामुळे सर्वंकषवादाला चालना मिळते.

११) सार्वभौमसत्ता निरपेक्ष आणि अमर्यादित असते, या ऑस्टीनच्या मताशी अनेक सत्तावादी सहमत नाही. अनेक सत्तावाद्यांच्या मते राज्य समाजातील इतर संघटनाप्रमाणेच एक संघटना आहे. आधुनिक राज्यातील सार्वभौमसत्ता अनेक संस्था आणि संघटनांमध्ये विभागलेली असते. बाह्यक्षेत्रात सुद्धा कोणतेही सार्वभौमराज्य आंतरराष्ट्रीय कायद्यांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन प्रत्येक सार्वभौम राज्याला करावेच लागते. ऑस्टीनचा सार्वभौमसत्तेचा सिद्धांत फक्त कायदेविषयक दृष्टिकोनातून मांडला आहे. लॉस्कीच्या मते प्रत्येक सार्वभौम राज्य लोककल्याणाशी बांधलेले असते. आज आंतरराष्ट्रीय समाजाची कल्पना मांडण्यात येत आहे. अनेक समान आंतरराष्ट्रीय प्रश्न आहेत की जे सर्व राज्यांच्या सहकार्याशिवाय सोडविल्या जाऊ शकत नाही. युनोच्या सर्वशाखा सर्व राज्यांच्या सहकार्यानेच कार्य करतात. अनेक राष्ट्रीय सहकारी संघटनाही आज अस्तित्वात आल्या आहेत. आज जागतिकरणाची संकल्पना अस्तित्वात आली आहे. अशा काळात ऑस्टीनचा सिद्धांत लागू पडत नाही.

## ६.७ सार्वभौमसत्तेचा अनेकसत्तावादी सिद्धान्त

ऑस्ट्रीनच्या एकसत्तावादी सिद्धांताला सर्वात मोठे आव्हान म्हणजे सार्वभौमसत्तेचा अनकेसत्तावादी सिद्धांत होय.

अनेक सत्ता वाद्यांच्या मते समाजात अनेक संस्था आणि संघटना अंतर्भुत असतात; राज्य त्यापैकी एक होय.

सार्वभौमसत्तेचा अनेक सत्तावादी सिद्धांत म्हणजे सार्वभौमसत्तेच्या परंपरागत सिद्धांताला आणि ऑस्टीनच्या सिद्धांताला निर्माण झालेली प्रतिक्रिया होय. राज्याच्या ठिकाणी सत्तेचे एककेंद्रीकरण अनेकसत्तावादी मान्य करीत नाही.

**अनेक सत्तावाद्यांचा मुद्दा :**

सार्वभौमसत्तेच्या एकसत्तावादी सिद्धांताला पहिल्यांदा आव्हान जर्मन ज्युरिस्ट व्होन सिरके यांनी केले आहे. एकसत्तावादी सिद्धांतात बदल घडविणाऱ्या घटकांमध्ये खालील घटकांचा समावेश होतो असे त्यांचे मत होते.

१) १९व्या शतकात राज्याचे कार्य आणि स्वरूपामध्ये झालेला बदल, आधुनिक काळात राज्याचे स्वरूप पोलिस राज्य यापुरते मर्यादित न राहता लोककल्याणकारी राज्य, (लोकांना सेवा देणारे राज्य) असे राज्याचे स्वरूप झाले आहे. लोकांना सेवा देण्याचे कार्य राज्य विविध संस्था आणि संघटनाच्या मदतीने करीत असते. राज्यातील विविध संस्थामध्ये राज्याची सत्ता विभागलेली असते.

२) आंतरराष्ट्रीय सहकार्याची प्रक्रिया १९व्या आणि २० व्या शतकात उदयास आली आहे. आंतरराष्टीय संबंध आणि सहकार्यासाठी बाह्य सार्वभौमसत्तेवर मर्यादा आल्या आहेत.

३) अनेक संस्था, संघटना आणि सामाजिक गट मनुष्याच्या गरजा पूर्ण करीत असतात. उदा. धार्मिक संघटना, राजकीय पक्ष इत्यादी प्रत्येक सामाजिक गटाला स्वतःच्या इच्छा आणि व्यक्तिमत्व आहे.

सार्वभौमसत्तेचा अनेक सत्तावादी सिद्धांत गिरके, फिग्ज, मेटलॅन्ड, बार्कर, या विचारवंतानी मांडला आहे. त्यांचा मुख्य आणि केंद्रिभुत मुद्दा म्हणजे राज्य अनके संघटनांपैकी एक संघटना आहे. चर्च, व्यापारी संघटना, मजुर संघटना, राजकीय पक्ष, दबावगट, व्यावसायिक संघटना इत्यादी अनेक संघटना समाजात असतात. या संघटना नैसर्गिक असतात. त्या संघटना विशिष्ट क्षेत्रात कार्य करतात आणि आपल्या क्षेत्रात त्या स्वतंत्र असतात. राज्य त्यांच्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकत नाही. या सर्व संघटनांना स्वतंत्र अस्तित्व असते, स्वतंत्र कार्य असते. राज्य एकटेच व्यक्तिला आज्ञा देऊ शकत नाही. राज्याचा अति हस्तक्षेप अनेकसत्तावाद्यांना मान्य नाही. ते आर्थिक, धार्मिक, राजकीय, व्यावसायिक संघटनांच्या स्वातंत्र्यावर भर देतात.

राज्यात अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संघटना महत्वपूर्ण कार्य करतात. राज्य त्यांच्या कार्यात हस्तक्षेप करू शकत नाही. अनेक सत्तावाद्यांनी राज्याच्या सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर दिला आहे.

राज्यातील संस्था आणि संघटनांची सत्ता आणि प्रभाव त्या संस्थेतील व संघटनेतील सभासदांवर निश्चितच असतो. राज्याची सत्ता सर्वांवर असते हे सत्यही आपल्याला नाकारता येत नाही. राज्य जर आपली प्रभावी सत्ता राज्यात प्रस्थापित करू शकले नाही तर राज्यात अंदाधुंदी निर्माण होईल आणि राज्याची सुव्यवस्था नष्ट होईल. राज्यात सार्वभौमाची सर्वोच्च सत्ता आवश्यक आहे. सोव्हिएट युनियन आणि भारत यासारख्या राष्ट्रांमध्ये अनेक धर्म, अनेक वंश, यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, आणि मार्गदर्शन करण्यासाठी राज्याची सर्वोच्च सार्वभौमत्व असण्याची गरज आहे.

अनेक सत्तावादी सिद्धांतातील दोष किंवा उणीवा खालीलप्रमाणे आहेत.

१) राज्य सर्वोच्च आणि एकसत्तावादी असते. राज्याच्या सर्वोच्च शक्तिच्या अभावी समाजाचे तुकडे होतील आणि मानव पुन्हा निसर्गावस्थेत जाईल. राज्यशिवाय समाजात सुव्यवस्था आणि शांतता, न्याय नाही. राज्यातील इतर संघटनांना स्वायतत्ता दिल्यास त्यामुळे राज्यात अंधाधुंदीच निर्माण होईल. राज्याच्या सार्वभौमसत्तेमुळे राज्य सर्व संस्था संघटनापेक्षा सर्वोच्य असते.

२) अनेकसत्तावाद्यांना सर्व संघटनांना समान स्थान आहे, असे वाटत असले तरी, सर्व संघटनांमध्ये राज्याला प्रथम स्थान देण्यास ते सुद्धा बांधलेले आहेत. राज्यातील प्रत्येक संघटनेला राज्याने आखून दिलेले नियम पाळावे लागतात. कायदे पाळावे लागतात. अराजकीय संघटनांनासुद्धा राज्याने सुरक्षितता आणि सुरक्षा दिल्याशिवाय कार्य करता येत नाही.

३) अनेक सत्तावादी राज्याच्या काही खास कार्याकडे दुर्लक्ष करतात. राज्य इतर संस्था संघटनांप्रमाणे कार्य करू लागले तर ते कर कसे गोळा करून शकेल, कायदे अंमलात कसे आणू शकले आणि अंदाधुंदीवर कसे नियंत्रण ठेवू शकेल? राज्याकडे सर्वोच्च सत्ता असल्यामुळे राज्याला ही सर्व कार्य समर्थपणे करता येतात.

४) सार्वभौमसत्ता विभागल्यास ती नष्ट होईल. सार्वभौमसत्तेच्या विभाजनामुळे प्रभुत्व प्रथापित करण्याची राज्याची शक्ती नष्ट होईल. समाजात अनेक विभाजनवादी घटक अस्तित्वात येतील. प्रत्येक गट सर्वोच्चतेसाठी भांडणे करील.

५) आज राज्यांमध्ये अशी सामाजिक, आर्थिक परिस्थिती निर्माण झाली आहे की ज्यामुळे राज्याला जास्तीत जास्त सत्ता मिळणे आवश्यक झाले आहे.

सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक नियोजन, कल्याणकारी राज्याची गरज यामुळे राज्याची सत्ता वाढणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

राज्याची सार्वभौमसत्ता सर्वोच्च, अंतिम, शाश्वत, अविभाज्य, अद्येय, निरपेक्ष असते. वास्तवामध्ये प्रत्यक्षात कोणतेही राज्य अंतर्गत आणि बाह्य दृष्टिने निरपेक्ष सत्ता अंमलात आणू शकत नाही. राज्याच्या अंतर्गत सार्वभौमसत्तेवर अनेक बंधने असतात. राज्याची बाह्य सार्वभौमसत्तासुद्धा पूर्णपणे निरपेक्ष नाही. बाह्य क्षेत्रातही राज्याला अनेक मर्यादा असतात.

## ६.८ सार्वभौमसत्तेचे वर्गीकरण

सार्वभौमसत्तेचे अनेक प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

१) **नाममात्र आणि वास्तविक सार्वभौमसत्ता :** नाममात्र सार्वभौम म्हणजे नावापुरता प्रमुख होय. उदा. ब्रिटनचा राजा, भारताचा राष्ट्रपती, वास्तविक सार्वभौम आणि वास्तवात सत्तेचा वापर करणारा प्रमुख होय. उदा. भारताचा पंतप्रधान संसदीय शासनपद्धतीत राजा किंवा राणी, राष्ट्रपती हे नाममात्र सार्वभौम असतात आणि संसद वास्तविक सार्वभौम असते.

२) **कायदेशीर आणि राजकीय सार्वभौमसत्ता :** कायदेशीर सार्वभौम म्हणजे ज्याला कायदे करण्याची सर्वोच्च सत्ता असते. उदा. संसद, केंद्रीय कायदेमंडळ, अमेरिकन काँग्रेस कायदेशीर सार्वभौम आहेत. कायदेशीर सार्वभौम दैवी कायदे किंवा सामाजिक प्रथांच्या बाबतीतही कायदे करू शकतात. कायदेशीर सार्वभौमाचे वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहे.

१) कायदेशीर सार्वभौम निश्चित, संघटित असतो.
२) कायदे करण्याचा अधिकार कायदेशीर सार्वभौमालाच असतो.
३) कायदेशीर सार्वभौमाच्या आज्ञांचे पालन केले नाही तर दंड होतो.
४) कायदेशीर सार्वभौमाकडूनच सर्व हक्कांची प्राप्ती होते.
५) कायदेशीर सार्वभौमाची सत्ता अमर्यादित असते.
ब्रिटनची संसद, अमेरिकन काँग्रेस कायदेशीर सार्वभौमाची उदाहरणे आहेत.

३) **राजकीय सार्वभौमसत्ता :** कायदेशीर सार्वभौमाच्या मागे राजकीय सार्वभौमत्व असते. लोकशाहीत राजकीय सार्वभौमसत्ता मतदारांच्या हातात असते. राजकीय सार्वभौमसत्तेचे निश्चित स्थान याबाबत मतभेद आहेत. काही राजकीय विचारकांच्या मते राजकीय सार्वभौम फक्त मतदारच नाही तर मतदारांच्या मागे अनेक शक्ती कार्य करतात. कायदेशीर सार्वभौमावर मतदार, लोकमत प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात. लोक राजकीय सार्वभौम असतात.

४) **लोकांचे सार्वभौमत्व :** लोकांचे सार्वभौमत्व ही संकल्पना जुनीच आहे. मध्ययुगात "लोकांची संमती" याला राजकीय विचारवंतानी महत्त्व दिले होतेच. मॅकॅव्हली म्हणतो, लोकांचा "आवाज म्हणजे देवाचा आवाज होय." लॉक रुसो यांनी राज्याचा आधार लोकांची संमती आहे असा मुद्दा मांडला होता. जेम्स ब्राईसच्या मते, "लोकशाहीचा आधार लोकांचे सार्वभौमत्व आहे." परंतु राजकीय सार्वभौमाप्रमाणेच लोकांचे सार्वभौमत्वाचे स्थान निश्चित करणे कठीण आहे. लोकांची इच्छा लोकमत जाणून घेणे कठीण आहे. लोकांचे सार्वभौमत्व म्हणजे राज्यातील लोक ज्यांना मतदानाचा हक्क असतो त्यांना सार्वभौम म्हणता येईल.

५) **डी ज्युरो आणि डी फ्रॅक्टो सार्वभौम :** डी ज्युरो म्हणजे कायदेशीर सार्वभौम आणि डी फॅक्टो म्हणजे वास्तविक सार्वभौम होय. डी ज्युरो सार्वभौमाला कायदेशीर मान्यता मिळालेली असते आणि आज्ञा देण्याची पात्रता त्यांच्यात असते. डी ज्युरो सार्वभौमाची

सत्ता कायद्याप्रमाणे मिळालेली असते. उदा. प्लासीच्या लढाई नंतर बंगालचा नवाब डी ज्युरो सार्वभौम होता आणि ईस्ट इंडिया कंपनी डी फॅक्टो सार्वभौम झाले आणि पेशवे डी फॅक्टो सार्वभौम झाले.

## ६.९ सारांश

१) सार्वभौमसत्ता राज्याचा आत्मा आणि हृदय आहे. अंतर्गत सार्वभौमसत्ता म्हणजे राज्याच्या भूप्रदेशात राज्य सर्वोच्च असते आणि बाह्य सार्वभौमत्व म्हणजे सर्वप्रकारच्या बाह्य नियंत्रणापासून राज्य मुक्त असते.

२) ऑस्टीनने सार्वभौमत्वाचा एकसत्तावादी सिद्धांत मांडला. गिरेक, मेटलॅन्ड, बार्कर इत्यादींनी एकसत्तावादी सिद्दांतावर टीका केली. सार्वभौमसत्तेचा एकसत्तावादी सिद्धांतावर टीका करणाऱ्या विचारकांच्या गटालाच पुढे अनेक सत्तावादी म्हणण्यात येऊ लागले.

३) राज्याला आपले कार्य प्रभावीपणे करता यावे म्हणून अमर्यादित सार्वभौमसत्ता राज्याकडे असणे आवश्यक आहे. राज्याच्या सार्वभौमसत्तेअभावी पुन्हा निसर्गावस्था येऊ शकते. आजच्या आधुनिक काळात दोन प्रवाह आले आहेत. एक म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा विस्तार आणि दुसरे म्हणजे राज्याच्या सत्तेत, कार्यात वाढ. लोककल्याणकारी कार्य पार पाडण्यासाठी राज्याच्या कार्याचा विस्तार आवश्यक असतो.

## ६.१० दिर्घोत्तरीय प्रश्न

१) सार्वभौमसत्तेच्या संकल्पनेच्या उत्क्रांतीचा आढावा घ्या.
२) ऑस्टीनच्या सार्वभौमसत्तेच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण करा.
३) सार्वभौमत्वाची संकल्पना स्पष्ट करून वैशिष्ट्ये सांगा.
४) सार्वभौमसत्तेच्या अनेकसत्तावादी सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण करा.
५) सार्वभौमसत्तेचे विभाजन द्या.

❖❖❖❖

# ७

## मोड्युल ४

# कायदा (Law)

**घटक रचना :**

७.० उद्दीष्ट
७.१ प्रस्तावना
७.२ कायद्याचा अर्थ
७.३ कायद्याची वैशिष्ट्ये आणि व्याप्ती
७.४ कायद्याचे उगमस्थान
७.५ कायद्याचे प्रकार
७.६ कायद्याचे महत्त्व

## ७.० उद्दीष्ट

दैंनदिन जीवनामध्ये प्रत्येक व्यक्तिचा कायद्याशी संबंध येतो. कायदा म्हणजे काय, कायद्याचे प्रकार, व्याप्ती, महत्त्व समजावून घेणे गरजेचे आहे.

## ७.१ प्रस्तावना

आधुनिक राज्याचे 'कायदा', हे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. कायदा एक नियमांचा समुच्चय असतो. कायदा समाजापासून विज्ञानापर्यंतच्या सर्व कृतींना लागू होतो; ज्यानुसार मानवी कृती कार्यान्वित होतात त्या नियमांना साधारणपणे कायदा म्हणतात.

राज्यशास्त्र या विषयात आपण राज्याच्या कायद्यांविषयी अभ्यास करणार आहोत. राजकीय सिध्दान्तातील कायदा ही मध्यवर्ती कल्पना आहे. कारण राज्य ही मानवी आणि (कायदेशीर) वैधानिक संस्था आहे. राज्याकडे सार्वभौम सत्ता असते त्यामुळे राज्य सर्वोच्च आहे. मानवी समाजाला दोन मुख्य संघटनात्मक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. एक म्हणजे मानवी वर्तन नियंत्रित करणे आणि कायदा व सुव्यवस्था राखणे. दुसरा प्रश्न म्हणजे लोकांमध्ये असलेल्या समस्या, संघर्ष सोडविण्याची एक समान पध्दत निश्चित करणे. कायद्याचे अंतिम उद्यीष्ट लोकांसाठी न्याय आणि स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण करणे होय. कायदा जेव्हा समाजातील मानवी वर्तन नियंत्रित करतो तेव्हाच व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करु शकतो.

सर्वसामान्य लोकांना कायद्याविषयी एवढीच माहिती असते की कायदा शासनाने केलेला असतो. कायदा पाळला नाही तर दंड होतो. कायद्याचे पालन करणे आवश्यक असते. कायदा पाळला नाही तर अंदाधुंदी निर्माण होऊ शकते.इत्यादी.

## ७.२ कायद्याचा अर्थ

कायद्याच्या अनेक व्याख्या आहेत. विविध विचारवंतांनी कायद्याच्या व्याख्या खालीलप्रमाणे केल्या आहेत.

**कायदा शब्दाचा उगम**

' लॉ ' हा शब्द ' लॅग ' (Lag) या शब्दापासून निर्माण झाला आहे. लॅग म्हणजे निश्चित (fixed) किंवा (uniform) एकच. याचा अर्थ 'सर्वांना लागू होणारे मानवी वर्तनाचे समान नियम' म्हणजे कायदा होय.

**जॉन ऑस्टीन** म्हणतात "सार्वभौमत्वाच्या आज्ञा म्हणजेच कायदा होय". या आज्ञा राजेशाहीत राजाच्या किंवा लोकशाहीत संसदेच्या असू शकतात. राज्य सार्वभौम (सर्वोच्च) आहे. राज्याच्या नियमांना कायदा म्हणतात.

**टी.इ.हॉलॅंड :-** "मानवाची बाहय वर्तणूक ठरविणारे सर्वसामान्य नियम जे सार्वभौम राजकीय सत्ता अंमलात आणते त्या नियमांना कायदा म्हणतात".

**ऑक्सफोर्ड इंग्लीश डिक्शनरी :-** "सत्तेने लादलेले वर्तनाचे नियम म्हणजे कायदा होय".

**जॉन सालमन्ड** कायद्याची व्याख्या करतात की, "न्यायाच्या स्थापनेसाठी राज्याने केलेले आणि अंमलात आणलेल्या नियमांचा संच म्हणजे कायदा" होय.
कायद्याच्या वरील व्याख्यांवरुन असे लक्षात येते की कायदा या संकल्पनेच्या विविध बाजू आणि वैशिष्टये आहेत. त्यावरुन कायद्याचा अर्थ स्पष्ट होतो.

## ७.३ कायद्याची वैशिष्टये

### १) कायद्यातून राज्याची इच्छा व्यक्त होते :-

राज्याने केलेल्या नियमांनाच कायदा म्हणतात. त्या नियमातून राज्याची इच्छा व्यक्त होते.

### २) शासनाचे कायदेमंडळ कायदा करतात :-

राज्य सर्वोच्च आहे. राज्याच्यावतीने कार्य करण्याचे काम शासनसंस्था करीत असते. शासनसंस्थेच्या तीन शाखा असतात. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ होय. यापैकी कायदेमंडळ ही शाखा कायदे करण्याचे कार्य करते. कार्यकारी शाखा कायद्याची अंमलबजावणी करते तर न्यायमंडळ कायद्याचा अर्थ लावण्याचे कार्य करते आणि जे कायद्याचा भंग करतात त्यांना शिक्षा देण्याचे कार्य न्यायमंडळ करते.

**३) लोकांचे बाहय वर्तन आणि कृती कायदा नियंत्रित करतो :-**

लोकांचे विचार, भावना, मन इत्यादीवर कायदा नियंत्रण ठेवू शकत नाही. लोकांचे बाहय वर्तन आणि कृतीच फक्त कायदा नियंत्रित करु शकतो. उदा. लिंगभेद करु नये, स्त्री आणि पुरुषांना समान कायदा लागू व्हावा, हा कायदा पुरुषांनी स्त्रियांना समान वागणूक द्यावी एवढेच करु शकतो. स्त्रीयांबाबतीत पुरुषांनी कोणता विचार करावा यावर नियंत्रण समतेचा कायदा ठेऊ शकत नाही. समाजातील लोकांनी काय करावे, कसे वागावे यावर कायदा नियंत्रण ठेवू शकतो. समाजातील लोकांच्या विचारांवर आणि मनावर कायदा नियंत्रण ठेवू शकत नाही.

**४) कायदा सर्वांना समान लागू होतो म्हणजेच कायद्याचे राज्य :-**

एकच कायदा सर्व लोकांना सारखाच लागू होतो. कायद्यापुढे सर्वांना समान वागणूक असते. कायद्याचे सर्वांना समान संरक्षण असते. उदा. अंमली पदार्थ विकणे आणि त्याचे सेवन करणे भारतात कायद्याप्रमाणे गुन्हा आहे. हा कायदा सर्वसामान्य भारतीयांपासून तर चित्रपटसृष्टीतील नायकांपर्यंत सर्वांनाच लागू होतो. अशाप्रकारे कायद्यापुढे भेदभाव नाही. कायदा सर्वत्र, सर्वांना सारखाच लागू होणारा असतो. कायद्यापुढे भेदभाव नाही.

**५) घटनेची मान्यता :-**

शासनाला कायदे करतांना घटनेच्या चौकटीतच म्हणजेच घटनेच्या नियमांप्रमाणेच कायदे करावे लागतात.

**६) कायद्याच्या मागे दंडशक्ती असते :-**

कायद्याचा भंग केल्यास राज्याकडून शिक्षा मिळते, दंड होतो. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यामध्ये पोलीस व्यवस्था असते. कायदेभंग करणा-यांना पोलीस योग्य ती कारवाई करुन दंड देतात. म्हणजेच कायद्याच्या मागे दंडशक्ती असते.

**७) कायद्याचे उद्यीष्ट :-**

लोकहित, लोकांचे कल्याण करणे, लोकांना सुरक्षा, शांतता देणे, स्वातंत्र्य, समता, न्याय मिळवून देणे हेच कायद्याचे अंतिम उद्यीष्ट असते.

**८) कायद्याचे पालन करणे सक्तीचे असते :-**

राज्याच्या अंतर्गत असणा-या सर्व संस्था, संघटना आणि नागरिकांना कायद्याचे पालन करावे लागते. प्रत्येकाला राज्यातील कायदा माहित असावा लागतो. कायदा माहित नव्हता या कारणासाठी कायदेभंग करणा-यांनासुध्दा सुटका नसते. म्हणजेच कायदा पाळणे, ऐच्छिक नाही तर सक्तीचे आहे.

**निष्कर्ष :-** कायद्याच्या या सर्व व्याख्या आणि वैशिष्टयावरुन कायद्याचा अर्थ स्पष्ट होतो.

**तक्ता**

कायदा म्हणजे काय ?

कायद्याचा अर्थ, स्वरुप आणि वैशिष्टे

१ कायद्याचा अर्थ

१) उदय
२) ऑस्टीन
३) हालँड
४) ऑक्सफोर्ड डिक्शनरी
५) सालमन्ड

२ स्वरुप आणि वैशिष्टे

१) राज्याच्या इच्छा
२) कायदेमंडळाने केलेले नियम
३) लोकांचे बाह्य वर्तन नियंत्रित करतात
४)सर्वांना लागू होतो
५) घटनेची मान्यता
६) कायद्यामागे दंडशक्ती
७) कायद्याचे उद्दीष्ट
८) पालन करणे सक्तीचे

## ७.४ कायद्याची उमगस्थाने (Sources of law)

एखादा कायदा करतांना कायद्याविषयीची माहिती निर्धारीत करण्यास हातभार लावणारे विविध घटक म्हणजेच कायद्याची उगमस्थाने होय.

कायदा राज्याची इच्छा व्यक्त करतो शासनाचे कायदेमंडळ कायदे करतात. कायदा बनवितांना किंवा करतांना शासनाला इतर घटकांचा विचार करावा लागतो. अनेक घटकांचा प्रभाव कायदे निर्मितीवर होतो. कायदेमंडळ कायदे निर्मिती करणारी शाखा असली तरी आणि कायद्याचे मुख्य उगमस्थान असली तरी कायदेनिर्मितीवर इतर अनेक घटकांचा प्रभाव असतो. त्या दृष्टीने त्या घटकांना कायद्याची उमगस्थाने असे संबोधले आहे. कायद्याची मुख्य उगमस्थाने खालील आहेत.

### १) रुढी, प्रथा, परंपरा :-

राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी रुढीनुसार समाजात सर्व नियंत्रित होत असे. त्या दृष्टीने कायद्याचे पहिले उमगस्थान म्हणजे रुढी होय. समाजामध्ये लोक रुढी पाळत असे कारण समाजाच्या दृष्टीने रुढी उपयोगी होत्या. रुढींची सामाजिक उपयोगिता होती. काही काळानंतर लोकांना रुढी पाळण्याची सवय लागली. रुढींना महत्व प्राप्त झाले आणि लोक रुढींचा आदर करायला लागले. एखाद्याने रुढी पाळली नाही तर त्या व्यक्तीवर समाजाचा रोष होत असे. त्यानंतर राज्याचा उदय झाल्यानंतर या रुढीतूनच कायद्यांचा जन्म झाला. रुढींची उपयोगिता राज्याने लक्षात घेतली. ज्या रुढी समाजोपयोगी होत्या त्या रुढींना राज्याने मान्यता दिली. रुढी म्हणजे कायदा नाही. कारण जोपर्यंत रुढींना राज्याची मान्यता प्राप्त होत नाही तोपर्यंत त्या रुढींचे कायद्यात रुपांतर होत नाही. इंग्लंडमध्ये अनेक कायद्यांची निर्मिती रुढीतून झाली आहे.

याचा अर्थ सर्वच रुढींना राज्य मान्यता देते असे नाही. ज्या रुढी दृष्ट आणि अन्यायी आहेत, शोषणाला वाव देणा-या असतात अशा रुढी राज्य कायदा करुन नष्ट करीत असते. उदा. सतीची रुढी, बालविवाह, अस्पृष्यता इत्यादी रुढी कायद्याद्वारे नष्ट करण्यात आल्या आहेत.

### २) धर्म :-

पूर्वी समाजामध्ये रुढी, प्रथा, परंपरांना धर्माची संमती होती. मानवी जीवनाची प्रत्येक बाजू धर्म नियंत्रित करीत असे. लोकांचा धर्मावर विश्वास आणि श्रध्दा होती. त्यामुळे धर्मातील नियमांचे पालन लोक करीत असत. हळूहळू काळाच्या ओघात धर्मातील नियमांना कायद्याचे स्वरुप आले. उदा. हिंदू कायदे मनुस्मृतीवर आधारलेले आहेत. कुराणावर मुस्लिम कायदे आधारलेले आहेत.

### ३) न्यायलयीन निर्णय :-

न्यायव्यवस्थेचे प्राथमिक आणि मुख्य कार्य म्हणजे कायद्याचा अर्थ लावून लोकांना न्याय देणे. हे कार्य करतांना न्यायधीश आपल्या ज्ञान व माहितीप्रमाणे, अनुभवानुसार विशिष्ट खटल्याच्या संदर्भात त्या कायद्याचा अर्थ लावतात. त्यांनी लावलेला अर्थ इतर खटल्यांच्या संदर्भात इतर न्यायधीश पुरावा म्हणून वापरतात. त्यातून नविन कायदा उदयास येतो. उदा. भारतात आणि अमेरिकेत न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनचा अधिकार आहे. या अधिकाराप्रमाणे कायद्याचा अर्थ लावतांना न्यायालय नविन कायद्याला जन्म देतात.

### ४) तज्ज्ञांची न्यायविषयक विधाने, लिखाण :-

काही प्रसिध्द तज्ञ न्यायधिशांच्या लिखाणांमध्ये आणि त्यांनी केलेल्या विधानांमध्ये काही कायदेविषयक महत्वाच्या गोष्टी अंतर्भूत असतात. ज्युरिस्ट महत्वाची माहिती गोळा करतात, अस्तित्वात असलेल्या कायदेविषयक पध्दतीचा अभ्यास करतात, त्यातील उणिवांचा शोध घेतात आणि त्यात महत्वपूर्ण सुधारणा सुचवितात. वकील आणि न्यायधिशांना त्या-त्या खटल्यांच्या संदर्भात या लिखाणाचा उपयोग होतो. जेव्हा न्यायधिश त्या लिखाणाला किंवा विधानांना संमती देतात तेव्हा त्याला कायद्याचे स्वरुप प्राप्त होते.

### ५) समन्यायबुध्दी :-

न्याय आणि समतेचा विचार करुन न्यायधिश समन्यायबुध्दीने न्याय देतात. त्याचाही प्रभाव कायद्यावर पडतो. साधारणपणे जेव्हा कायदा अति परिदृढ असतो, त्यात लवचिकता नसते त्यावेळी न्यायधिशांना स्वतःच्या समन्यायबुध्दीचा उपयोग करावा लागतो. न्यायधिशांच्या बरेचदा असे लक्षात येते की अस्तित्वात असलेल्या प्रस्थापित कायद्याप्रमाणे न्याय देता येत नाही. तेव्हा न्यायधिश समन्यायबुध्दीद्वारे न्याय देतात. इतर किंवा तशाच प्रकारच्या खटल्यात निर्णय देतांना दरवेळी एक उदाहरण म्हणून त्याकडे बघण्यात येते. बरेचदा त्यातून नवा कायदा उदयास येतो किंवा जून्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात येते.

### ६) कायदेमंडळ :-

शासनाची कायदे करणारी शाखा म्हणजे कायदेमंडळ होय. सर्व कायदे शासनाची शाखा असलेले कायदेमंडळ, कायदेनिर्मिती प्रक्रियेद्वारा करीत असते. उदा. भारतीय संसद कायदे निर्माण करणारी शाखा आहे.

### ७) अध्यादेश :-

आणिबाणीच्या काळात शासन अध्यादेश घोषित करीत असते. जेव्हा कायदेमंडळाचे अधिवेशन नसते परंतू त्या विशिष्ट परिस्थितीत एखाद्या कायद्याची ताबोडतोब गरज असते अशावेळी शासन अध्यादेश जाहीर करतात. या अध्यादेशांना कायद्याचे स्वरुप प्राप्त होते. कायदेमंडळ या अध्यादेशांना मान्यता देऊन त्या अध्यादेशांना कायद्याचे स्वरुप देतात.

### ८) विविध विचारवंत आणि विचारसरणी यांच्या मते कायद्याची उगमस्थाने :-

कायद्याचे स्वरुप आणि कायद्याचे उगमस्थान याविषयी विविध विचारवंत आणि विविध विचारसरणी यांनी आपआपली मते व्यक्त केली आहेत.

### अ) The Analytical View

ऑस्टीन, हॉब्ज आणि बेथंम हे या विचारसरणीचे समर्थक आहेत. यांच्या मते "सर्वोच्च सार्वभौमसत्ताच कायद्याचे खरे उमगस्थान आहे; ते म्हणजे राज्य होय". राज्य सर्वोच्च आणि सार्वभौम असते. सार्वभौमसत्ताधारी या नात्याने राज्यच कायदा निर्माण करीत असते आणि कायद्याची अंमलबजावणीही करीत असते. जे कायदेभंग करतात त्यांना दंड व शिक्षा देण्याचा अधिकारही राज्याला आहे. राज्याकडे त्यासाठी दंडशक्ती असते. लोक कायदेपालन राज्याकडे असलेल्या या दंडशक्तीमुळे करतात.

**मुल्यमापन – टीका :–** या दृष्टीकोनावर अशी टीका करण्यात येते की, कायदेविषयक हा औपचारिक दृष्टीकोन आहे. राज्य कायद्याचे उगमस्थान आहे असे सांगून कायद्याचे औपचारिक उगमस्थानावर हा दृष्टीकोन भर देतो. कायद्याची इतर उमगस्थाने उदा. प्रथा, परंपरा, धर्म याकडे दूर्लक्ष करतो. दुसरे म्हणजे कायद्याचे उत्क्रांतीवादी स्वरुप. याकडे हा दृष्टीकोन दूर्लक्ष करतो. कायद्याचे स्वरुप विकसित असते. कोणताच कायदा एका रात्रीतून ठरत नाही. कायदा तयार करतांना कायदेमंडळाला कायदेनिर्मिती प्रक्रियेद्वारा कायदा करावा लागतो. या कायदेनिर्मिती प्रक्रियेवर अनेक घटकांचा प्रभाव असतो.

### ब) ऐतिहासिक दृष्टीकोन

कायदेविषयक ॲनॅलिटीकल दृष्टीकोनाला विरोध आणि प्रतिक्रिया यातून ऐतिहासिक दृष्टीकोन निर्माण झाला आहे. या दृष्टीकोनवादी विचारवंतांच्या मते कायदा इतिहासातील प्रथा, परंपरा, रुढी, धर्म या घटकांच्या द्वारे उदयास येतो. समाजोपयोगी परंपरांना आपोआपच कायद्याचे स्वरुप येते. ऐतिहासिक उत्क्रांती, सामाजिक विकास प्रक्रिया, भूतकाळाच्या प्रभावातून कायदा उदयास येतो यावर ऐतिहासिक दृष्टीकोन भर देतो.

### क) समाजशास्त्रीय दृष्टीकोन

कायदा आणि समाज यांचा घनिष्ट संबंध आहे. यावर या दृष्टीकोनाचा भर आहे. कायदा अनेक सामाजिक घटकांतून निर्माण झालेली निर्मिती असते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनवादी विचारवंतांच्या मते वास्तविकपणे राज्य कायदा निर्माण करीत नाही तर प्रस्थापित सामाजिक नियमांना कायदेशीर स्वरुप देतो. कायदा समाजाच्या गरजा आणि हित पूर्ण करतो. लोक कायदा पाळतात कारण कायदा समाजहितकारी असतो.

### ड) तत्वज्ञानात्मक दृष्टीकोन

संस्कृतितून कायदा निर्माण होतो यावर तत्वज्ञानात्मक दृष्टीकोन भर देतो. समाजाची मूल्ये, भावना, दृष्टीकोन म्हणजे त्या समाजाची संस्कृति होय. त्या-त्या समाजाच्या संस्कृतीतून कायदा निर्माण होत असतो.

### इ) साम्यवादी किंवा मार्क्सवादी दृष्टीकोन

समाजात वर्चस्व असलेल्या आणि विशेषाधिकाराचा उपभोग घेणा-या वर्गाचे संरक्षण कायदा करतो. कारण राज्यावर विशेषाधिकार असलेल्या वर्गाचे वर्चस्व असते. त्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक तेच कायदे करण्यास ते राज्याला भाग पाडतात. राज्याने संपूर्ण व्यवस्था बदलायला पाहिजे. तरच वर्चस्ववादी गटाचे महत्त्व कमी होईल.

**सारांश आणि निष्कर्ष :-** वरीलप्रमाणे कायद्याची अनेक उगमस्थाने आहेत. कायद्याच्या उगमस्थानविषयक विविध विचारप्रवाहही अस्तित्वात आहेत. परंतू निष्कर्षतः असे दिसून येते की 'कायदेमंडळ' हे कायद्याचे मुख्य उगमस्थान आहे. कायदेमंडळ कायदे करतांना कायदेनिर्मिती प्रक्रियेद्वारा कायदा पास करीत असते. एखादा कायदा करतांना त्या कायद्याचे स्वरुप (content) वरील विविध घटकांतून ठरत असते. त्या दृष्टीने त्या सर्व घटकांना कायद्याची उगमस्थाने असे म्हटले आहे.

**तक्ता**

कायद्याची उगमस्थाने (soupces of law)

१ प्रस्तावना कायद्याची उगमस्थानाचा अर्थ

२ कायद्याची उगमस्थाने

१ रुढी प्रथा परंपरा
२ धर्म
३ न्यायालयीन निर्णय
४ न्यायधीशांची विधाने व लिखान
५ समन्याय बुध्दी
६ कायदेमंडळ
७ अध्यादेश
८ विचारसरणीच्या मते

अ)ॲनॅलीटीकल - राज्य
ब)ऐतिहासिक – इतिहास प्रथा, परंपरा
क)समाजशास्त्रीय – सामाजिक नियम
ड)तत्वज्ञानात्मक - संस्कृति
इ)साम्यवादी - श्रीमंतवर्ग

३ निष्कर्ष

## ७.५ कायद्याचे प्रकार

कायद्याची उगमस्थाने, स्वरुप, उपयोग आणि कार्य या आधारे कायद्याचे विविध प्रकारात विभाजन करण्यात येते. ॲरिस्टॉटल, जॉन लॉक आणि थॉमस हॉब्ज या विचारवंतांनी नैसर्गिक कायदा आणि नैसर्गिक कायद्याचे राज्यामध्ये कार्य याचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते नैसर्गिक कायद्याला कोणतीही सत्ता आणि कुणीही नष्ट करु शकत नाही. नैसर्गिक कायदा आपोआप आणि निसर्गतःच निर्माण होतो. नैसर्गिक कायदा राज्याच्या कायद्यापलीकडे आणि राज्याच्या कायद्यापेक्षा श्रेष्ठ असतो. या प्रकरणामध्ये राजकीय कायद्याचा आपण अभ्यास करणार आहोत. राजकीय कायदा राज्यांतर्गत आणि राज्यामध्ये असतो. राजकीय कायद्याचे मुख्यतः राष्ट्रीय कायदा आणि आंतरराष्ट्रीय कायदा असे दोन प्रकारात विभाजन करतात. हे विभाजन खालील तक्त्यामध्ये दाखविले आहे.




### १) आंतरराष्ट्रीय कायदा :- (International law)

जगात राज्याराज्यामधील संबंधी निश्चित करणा-या कायद्याला आंतरराष्ट्रीय कायदा म्हणतात. एका राष्ट्राचे दुस-या राष्ट्राशी किंवा राष्ट्राराष्ट्रांचे एकमेकांशी वर्तन कसे असावे याचे हे नियम असतात. हे कायदे कोणत्याही सर्वोच्च कायदे निर्माण करणा-या सत्तेने निर्माण केलेले नसतात. राज्य ऐच्छिकपणे या कायद्यांचे पालन करते. आंतरराष्ट्रीय कायदे राज्याने पाळलेच पाहिजे अशी सक्ती कोणत्याही राज्यावर करता येत नाही. आंतरराष्ट्रीय कायदे राज्याराज्यांमध्ये असलेले नैतिक बंध असतात जे प्रत्येक राज्याला स्विकारावे लागतात आणि पाळावे लागतात. आधुनिक काळात प्रत्येक राज्य सार्वभौम असल्यामुळे कोणत्याही राज्याला आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या पालनाबाबतीत विनंती केली जाऊ शकते; कोणत्याही राज्यावर सक्ती केली जाऊ शकत नाही. आंतरराष्ट्रीय कायदा पाळणे अथवा न पाळणे प्रत्येक राज्याच्या शासनावर अवलंबून असते. आंतरराष्ट्रीय कायदा एखाद्या राज्याने पाळला नाही म्हणून त्या राज्याला दंड कोणत्याही आंतरराष्ट्रीय संघटनेकडून केला जात नाही.

### २) राष्ट्रीय कायदा (National law) :-

राज्याने केलेल्या कायद्याला राष्ट्रीय कायदा म्हणतात. राज्य आणि नागरिक तसेच राज्यातील व्यक्तीव्यक्तींमध्ये संबंध ठरविण्याचे काम राष्ट्रीय कायदे करतात. राष्ट्रीय कायदे

राज्यातील सर्व नागरीक, संस्था, संघटना सर्वांनाच समानपणे (uniformly) लागू होतात. हे कायदे पाळणे सर्वांवर सक्तीचे (compulsory) असते. राष्ट्रीय कायद्यामागे दंडशक्ती असते. जो कुणी राष्ट्रीय कायद्याची अवज्ञा करेल त्याला दंड होतो. राष्ट्रीय कायदे कायदेमंडळ तयार करतात, त्यांची अंमलबजावणी कार्यकारीमंडळ करते आणि त्या कायद्यांचा अर्थ लावून न्याय देण्याचे काम न्यायमंडळ करते. राष्ट्रीय कायदा राज्याने केलेला असल्यामुळे राज्याच्या पोलीसयंत्रणेद्वारे राष्ट्रीय कायद्यांचे संरक्षण करण्यात येते.

### ३) **घटनात्मक कायदा (Constitutional law) :-**

राष्ट्रीय कायदा दोन भागात विभाजीत होतो. एक म्हणजे घटनात्मक कायदा आणि दुसरे म्हणजे सामान्य कायदा. राज्याच्या राज्यघटनेमध्ये ज्या कायद्यांचा समावेश होतो त्यांना घटनात्मक कायदे म्हणतात. हे कायदे राज्याचे सर्वोच्च आणि मुलभूत कायदे असतात. राज्याची रचना, शासनाचा प्रकार, कार्ये, सत्ता, सत्तेची व्याप्ती, नागरीकांची कर्तव्ये इत्यादी ठरविण्याचे कार्य घटनात्मक कायदे करतात. शासनाला घटनात्मक कायद्यांप्रमाणे कार्य करावे लागते. घटनात्मक कायदे लिखित किंवा अलिखित दोन्ही प्रकारचे असू शकतात. उदा. भारतात लिखित आहे तर इंग्लंडमध्ये अलिखित आहे.

### ४) **सामान्य कायदे (Ordinary law) :-**

राष्ट्रीय कायद्याचा दुसरा प्रकार म्हणजे सामान्य कायदे होय. सामान्य कायदे करण्याचे कार्य राज्याचे कायदेमंडळ करते. घटनात्मक कायद्यापेक्षा सामान्य कायदे दुय्यम असतात. घटनात्मक कायद्यांना सामान्य कायद्यांपेक्षा श्रेष्ठ समजण्यात येते. गरजेप्रमाणे हे कायदे करण्यात येतात. घटनात्मक कायदे लक्षात घेऊनच या कायद्यांची निर्मिती करण्यात येते. शासन आणि लोक यांच्यातील संबंध निश्चित करण्याचे कार्य सामान्य कायदे करतात. सामान्य कायदे हे खाजगी कायदे आणि सार्वजनिक कायदे याप्रमाणे विभाजीत करण्यात येतात.

### ५) **खाजगी कायदे (Private) :-**

व्यक्तीव्यक्तींमध्ये असणारे संबंध ठरविणारे कायदे म्हणजे खाजगी कायदे होय. उदा. विवाह, घटस्फोट, दत्तक इत्यादी. व्यक्तीव्यक्तींमध्ये असणा-या संबंधाच्या बाबतीत हे कायदे असतात.

### ६) **सार्वजनिक कायदे (Public) :-**

सार्वजनिक ठिकाणी व्यक्तीव्यक्तींचे संबंध कसे असावेत हे ठरविणा-या कायद्यांना सार्वजनिक कायदे म्हणतात. उदा. मालक आणि नोकर यांचे संबंध, रस्त्यावरील व्यक्तीची वागणूक इत्यादी. सार्वजनिक कायद्यावरुन त्या राज्याची रचना आणि कार्ये लक्षात येतात. त्या राज्यामध्ये त्या राज्यातील नागरीक आणि राज्य यांचे संबंध कसे आहेत हेही सार्वजनिक कायद्यांवरुन दिसून येते. सार्वजनिक कायद्यांचे पालन प्रत्येक व्यक्तीला करणे सक्तीचे असते.

### ७) **प्रशासकीय कायदे (Administrative) :-**

राज्य आणि राज्यातील प्रशासकीय नोकरवर्ग यांचे संबंध निश्चित करणा-या कायद्यांना प्रशासकीय कायदे म्हणतात. हे कायदे राज्य आणि शासकीय नोकरवर्गाच्या संबंधावर नियंत्रण ठेवतात. शासकीय नोकरवर्गाच्या सत्ता आणि जबाबदा-या कोणत्या असाव्यात हे या

कायद्यांमध्ये अंतर्भूत असते. शासकीय नोकरवर्गाच्या बाबतीत असलेले खटले प्रशासकीय न्यायालयात चालतात आणि या खटल्यांमध्ये प्रशासकीय कायद्यांप्रमाणे निर्णय देण्यात येतात.

### ८) सर्वसामान्य कायदे (General) :-

नागरीक आणि राज्य यांचे त्या-त्या संबंधांच्या बाबतीतील कायदे म्हणजे सर्वसामान्य कायदे होय. सर्वसामान्य कायद्यांचे विभाजन त्या कायद्याचे उगमस्थान आणि कायदा बनविण्याची पध्दती यावरुन करण्यात येते. उदा. कॉमन लॉज, अध्यादेश, केस लॉज इत्यादी.

### कॉमन लॉज :-

प्रथा, परंपरा, रुढी, धर्म यातून निर्माण झालेले असतात. हे कायदे वर्षानुवर्षानंतर काळाच्या ओघात निर्माण होतात. औपचारिक स्वरुपात कागदोपत्री ते असताततच असे नाही. उदा. इंग्लंडमध्ये या स्वरुपाचे कायदे आहेत.

### अध्यादेश :-

देशातील सर्वोच्च सत्तेने दिलेला आदेश म्हणजे अध्यादेश होय. उदा. भारतात राष्ट्रपती असा अध्यादेश देतात. विशेषतः आणिबाणीच्या काळात जेव्हा संसदेचे अधिवेशन नसते अशावेळी राष्ट्रपती अध्यादेश देतात.

### केस लॉज :-

न्यायधीश आपल्या समन्यायबुध्दीनुसार एखाद्या खटल्याच्या संदर्भात न्याय देतात. अशा प्रकारच्या न्यायाला केस लॉज म्हणतात. तशाच प्रकारचा खटला पुन्हा उद्भवला म्हणजे केस लॉजचा संदर्भ घेण्यात येतो.

## ७.६ कायद्याचे महत्व

कायद्याचा हेतू आणि कायदे पाळण्याची गरज म्हणजेच कायद्याचे महत्व होय. राज्यातील प्रत्येक व्यक्तीने कायदे पाळण्याची गरज असते. त्याची खालील कारणे आहेत.

### १) राज्याची सार्वभौमसत्ता कायद्यातून व्यक्त होते :-

एखादे राज्य सार्वभौम आहे हे त्या राज्याच्या कायद्यांवरुन लक्षात येते. कारण प्रत्येक राज्यामध्ये त्या देशाची शासनपध्दती विशेषतः लोकशाही पध्दतीच्या कार्यरत होण्यास, यशस्वी होण्यास कायद्यांची आणि कायदे पाळण्याची गरज असते.

### २) शांतता, सुव्यवस्था, स्थिरता प्रस्थापित करण्याचे कार्य :-

मानवी वर्तन नियंत्रित करण्याचे, समाजात व्यक्तीव्यक्तींच्या एकमेकांशी क्रियाप्रतिक्रिया नियंत्रित करण्याचे साधन म्हणजे कायदा होय. संपूर्ण समाजाचे हित लक्षात घेऊनच कायदा करण्यात येतो. कायदा नसेल तर समाजात सगळीकडे अंदाधुंदी माजेल कारण कायदा समाजातील सर्वांवर नियंत्रण ठेवून सुव्यवस्था, स्थिरता, शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य करतो.

### ३) दूर्बलांचे रक्षण कायदा करतो :-

समाजविरोधी घटकांच्या कृती थांबविण्याचे काम कायदा करतो. कायद्याचे उद्दिष्टचमूळी भितीमुक्त वातावरण निर्माण करण्याचे आहे. लोकशाहीमध्ये शासन कारभारामध्ये लोकांना स्वतंत्रपणे सहभागी होता येणे महत्वाचे असते. कायद्यामुळे दूर्बल, गरीब, सत्ता नसलेले सर्वांनाच राज्याच्या कारभारात सहभागी होता येते. राज्य कायद्याच्या माध्यमातून कार्य करते आणि दूर्बलांना पूर्ण संरक्षण मिळेल याची खात्री करीत असते. म्हणजेच कायद्यामुळे स्वातंत्र्याचा उपभोग श्रीमंत, गरीब सर्वांनाच समानतेने घेता येतो. लोकांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचे रक्षण करणे हे राज्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. राज्य ते कायद्याद्वारे करीत असते.

### ४) मानवी संस्कृतीची प्रगती :-

सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी मानवी संस्कृतीच्या सर्वच बाजूंचा विकास तेव्हाच शक्य होतो जेव्हा समाजात शांतता असेल. सामाजिक सुरक्षिततेशिवाय विकास, प्रगती, शांतता निर्माण होऊ शकत नाही. ही सामाजिक सुरक्षितता कायदा प्रस्थापित करते. म्हणजेच व्यक्ती, समाज, राज्य यांच्या प्रगतीसाठी कायद्याचा आदर करणे गरजेचे आहे. कायदा आहे म्हणून स्वातंत्र्य, समता, न्याय अस्तित्वात आहे.

**निष्कर्ष** :- सर्व देशांमध्ये सर्वच समाजात कायदा आहे; कायद्याशिवाय मानवी संस्कृतीचे अस्तित्वच शक्य नाही.

## ७.७ दिर्घोत्तरीय प्रश्न

१) कायद्याची व्याख्या थोडक्यात द्या आणि कायद्याची उमगस्थाने सांगा.

२) कायद्याचे विविध प्रकार स्पष्ट करा.

३) कायदा म्हणजे काय ? कायद्याचे स्वरुप स्पष्ट करा.

४) कायद्याचे महत्व यावर टिप द्या.

❖❖❖❖

# ८

# राजकीय आबंधन (Political obligation) आणि प्रतिकाराचा हक्क

**घटक रचना :**


८.० उद्दीष्ट

८.१ प्रस्तावना

८.२ राजकीय आबंधनाचा अर्थ आणि स्वरूप

८.३ राजकीय आबंधनाचे आधार किंवा कारणे

८.४ राजकीय आबंधनाचे सिद्धात

८.५ राजकीय आबंधन निरपेक्ष आहे काय ? राजकीय आबंधनाच्या मर्यादा

८.६ राजकीय आबंधन तक्ता

८.७ राज्याला प्रतिकार करण्याचा हक्क आणि प्रतिकाराची साधने

८.८ दिर्घोत्तरीय प्रश्न


## ८.० उद्दीष्ट

राजकीय आबंधन केले नाही तर दंड होतो. राजकीय आबंधन म्हणजे काय ? राजकीय आबंधनाचे आधार कोणते ? किती मर्यादेपर्यंत राजकीय आबंधन करावे. राज्याला प्रतिकार केव्हा आणि कसा करावा याचा अभ्यास करणे.

## ८.१ प्रस्तावना

राज्याचा नागरिक या नात्याने प्रत्येक व्यक्तीवर राजकीय आबंधनाची जबाबदारी असते. प्रत्येक देशामध्ये नागरीक राजकीय आबंधन करतात आणि लोक शासनाला सहकार्य करतात.

राजकीय तत्वज्ञानातील राजकीय आबंधन मध्यवर्ती संकल्पना आहे. एखादी राजकीय व्यवस्था टिकणे आणि अस्तित्वात राहणे याच्याशी संबंधीत ही कल्पना आहे. जेव्हा लोक राजकीय व्यवस्थेप्रती आपली जबाबदारी पाळतात आणि राजकीय आबंधन करतात तेव्हा ती राजकीय व्यवस्था टिकून राहते. राज्यशास्त्रात दोन प्रश्न त्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरतात.

१) एक म्हणजे लोक राज्याच्या आज्ञा का पाळतात? आणि दुसरा प्रश्न म्हणजे २) लोक राजकीय आज्ञापालन करीत नाही त्याचे कारण काय? कोणत्या मार्गाने लोक राज्याला प्रतिकार करतात?

## ८.२ राजकीय आबंधनाचा अर्थ आणि स्वरुप :

लॅटिन शप्द 'ऑब्लिगेट' यापासून 'ऑब्लिगेशन' शब्द आला आहे. त्याचा अर्थ कर्तव्य करणे होय. एखादी कृती करणे किंवा न करणे म्हणजे आबंधन होय.

राजकीय आबंधन म्हणजे ''राज्याच्या आज्ञा पाळणे होय.'' राज्य आणि समाजाचे सभासद या नात्याने समाजाप्रती आणि राज्याप्रती आपली काही कर्तव्ये असतात. समाजाला हितकारी गोष्टी पाळणे आणि समाजाला नुकसान होईल त्या गोष्टीचा त्याग करणे, या गोष्टीचा आबंधनामध्ये समावेश होतो. राज्य सार्वभौम आहे. राज्याकडे सर्वोच्च सत्ता असते. त्यामुळे राज्याने नागरिकांना आज्ञा देणे आणि त्या आज्ञा नागरिकांनी पाळणे हे अपेक्षित असते. काही गोष्टी प्रत्येक नागरिकाने कराव्यात, पाळाव्यात आणि काही गोष्टी नागरिकांनी करू नये हे सांगण्याचा राज्याला अधिकार आहे. राज्याप्रति काय करावे आणि काय करू नये यालाच राजकीय आबंधन किंवा राजकीय उत्तरदायित्व म्हणतात.

**२) राजकीय आबंधन किंवा राजकीय उत्तरदायित्व यातील फरक :**

सामान्यपणे राजकीय आबंधन आणि राजकीय उत्तरदायित्व, राजकीय आज्ञापालन एकाच अर्थाने वापरण्यात येते. परंतु या दोन्हीत खालील भेद आहे. राजकीय आबंधनाचा अर्थ राजकीय उत्तरदायित्वापेक्षा अधिक व्यापक आहे. राजकीय उत्तरदायित्व किंवा आज्ञापालन लोक विवेकाने, इच्छेने करतातच असे नाही. परंतु राजकीय आबंधन व्यक्ती विवेकाने, इच्छेने, मनापासून करते. ''स्वेच्छेने, विवेकाने, अंतर्गत प्रेरणेमुळे नागरिक जेव्हा राजकीय आज्ञापालन करतात तेव्हा त्याला राजकीय आबंधन म्हणतात.'' उदा. प्राणीसुद्धा आज्ञापालन करतात परंतु प्राण्याचे आज्ञापालन सवय, प्रशिक्षण, मालकाला प्रामाणिक असणे यातून प्राणी मालकाच्या आज्ञा पालन करतात. लोक राज्याच्या आज्ञापालन करतात कारण त्यांना मनापासून पटलेले असते, की राज्य सर्वोच्च आहे. राज्याला आज्ञा करण्याचा अधिकार आहे. त्या आज्ञा पाळणे लोकांच्याच हिताचे आहे. राज्याच्या आज्ञा पाळल्या नाही तर अंदाधुंदी अस्तित्वात येईल हे लोकांना मनापासून पटलेले असते म्हणून लोक राज्याच्या आज्ञा पाळतात. आज्ञापालन असे स्वइच्छेने, विवेकाने, मनापासून असते तेव्हा त्याला आबंधन म्हणतात.

**राजकीय आबंधानाचे स्वरूप :**

१) नैतिक आणि कायदेशीर आबंधन
२) सकारात्मक आणि नकारात्मक आबंधन

**नैतिक आबंधन :** अनेक वर्षापासून प्रथा, परंपरा, रुढी या स्वरूपात समाजाच्या मान्यता व इच्छेतून जी नैतीक कर्तव्ये व्यक्तिला करावी लागतात त्याला नैतिक आबंधन म्हणतात. लोक नैतिक आबंधन करतात कारण चांगल्या वागण्याचे नियम म्हणून समाजाने ते मान्य केलेले असते. नैतिक कर्तव्याचे स्वरूप समाज, काळ, देशाप्रमाणे भिन्नभिन्न असते. नैतिक कर्तव्ये पाळणे

व्यक्तिच्या इच्छेवर अवलंबून आहे. त्यामुळे नैतिक आबंधन ऐच्छिक आहे. उदा. समाजातील गरजूंना मदत करणे, मोठ्यांचा आदर करणे इत्यादी नैतीक आबंधन ऐच्छिक आहे कारण नैतिक नियमांना राज्याचे पाठबळ नसते.

**कायदेशीर आबंधन :** राज्याने मान्य केलेले, कायद्याने प्रस्थापित केलेले नियम पाळणे म्हणजे कायदेशीर आबंधन होय. कायद्यांना राज्याचे पाठबळ असल्यामुळे नागरिक राजकीय आबंधन करतात. राजकीय आबंधन केले नाहीतर व्यक्तिला दंड होतो. उदा. भारतीय नागरिकांने राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राज्यघटना यांचा आदर करावा हे राजकीय आबंधन आहे. जर लोकांनी ते केले नाही तर दंड होतो.

**सकारात्मक आबंधन :** राज्यप्रति व्यक्तिने 'काय करावे' हे सांगणारे राज्याचे कायदे पाळणे म्हणजे सकारात्मक आबंधन होय. उदा. कर देणे, मतदान करणे इत्यादी.

**नकारात्मक आबंधन :** राज्याने 'मनाई केलेल्या गोष्टी न करणे' हे सांगणारे राज्याचे कायदे पाळणे म्हणजे नकारात्मक आबंधन होय. उदा. चोरी करू नये, खून करू नये इत्यादी.

**महत्त्वाची राजकीय आबंधने :**

१) **राज्याशी सहकार्य करणे :** प्रत्येक नागरिकाचे तो ज्या राज्याचा नागरीक आहे त्या राज्याचे शत्रूपासून संरक्षण करणे, आपल्या राज्याला संकटांपासून वाचविणे, राज्याला सेवा देणे राज्याप्रति प्रामाणिक असणे. कोणत्याही परिस्थितीत राज्याच्या एकात्मतेचे रक्षण करणे. लोकांच्या सहकार्यानेच राज्यव्यवस्था आणि शासनव्यवस्था कार्य करु शकते.

२) **राज्याच्या कायद्यांचा आदर करणे आणि कायदे पाळणे :** लोकांच्या कल्याणासाठी, हितासाठी राज्याचे कायदे असतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाचे हे कर्तव्य आहे की राज्याच्या कायद्यांचे पालन करणे आणि त्यांचा आदर करणे.

३) **सर्वतहेचे कर वेळेवर आणि नियमित भरणे :** राज्याची शासकीय यंत्रणा, सैन्यव्यवस्था, पोलीसव्यवस्था, लोकहितकारी योजना इत्यादीचा खर्च राज्य करीत असते. हा खर्च करांच्या स्वरूपात जो पैसा लोकांकडून घेण्यात येतो त्यातून राज्य करते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे हे कर्तव्य आहे की सर्व प्रकारचे कर नियमित आणि वेळेवर राज्याला देणे.

४) **मतदानाचा हक्क प्रामाणिकपणे बजावणे :** मतदानाचा हक्क हा फक्त नागरिकांचा हक्कच नाही तर ते एक महत्त्वाचे आबंधन आहे. अर्थपूर्ण आणि यशस्वी लोकशाही निर्माण होण्यासाठी लोकांनी स्वइच्छेने आणि विवेकाने मतदान करावे. सार्वजनिक पद सेवाभावाने आणि निष्ठेने धारण करून कार्य करणे हेही महत्त्वाचे राजकीय आबंधन आहे.

५) **शासनाशी सहकार्य करणे :** शांतता, कायदा सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी शासनाशी सहकार्य करणे आणि शासनाला मदत करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. भ्रष्ट्राचार निर्मुलन करणे, आणीबाणीच्या काळात सेवा देणे, अव्यवस्था अंदाधुंदीला आळा घालणे इत्यादी कार्ये करण्यासाठी शासनाला नागरिकांचे सहकार्य गरजेचे असते. त्यामुळे शासनाशी सहकार्य करणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

## ८.३ राजकीय आबंधनाचे आधार किंवा कारणे

राज्याच्या आज्ञा किंवा कायदे लोकांनी का पाळावेत? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी राजकीय आबंधनाचे विविध आधार किंवा कारणे कोणती आहेत त्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. खालील घटक राजकीय आबंधनाचे आधार आहेत. किंवा लोक राजकीय आबंधन करतात त्याची कारणे खालील आहेत.




१) **कायदेशीर कारण (Legal Ground) :**

राज्याकडे सार्वभौमसत्ता असते. त्यामुळे राज्य सर्वोच्च आहे. राज्य सर्व संस्था, संघ, नागरिक यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. त्यासाठी राज्य कायदे करते. ते कायदे पाळणे प्रत्येकाचे राजकीयआबंधन आहे. राज्यघटना, राज्याचे कायदे पाळणे लोकांना आणि शासनाला बंधनकारी असते.

२) **ब्राईस यांच्या मते (Acc. To Bryce) :**

ब्राईस यांनी राजकीय आबंधनाची खालील कारणे दिली आहेत :

**अ) मानवी स्वभाव :** कोणत्याही प्रकारच्या त्रासापासून मुक्त राहणे हा मानवी स्वभाव आहे. त्यामुळे राज्याला विरोध करण्याचा सहसा कुणी प्रयत्न करीत नाही. राज्याचे कायदे लोक पाळतात. कारण कायदे पाळले नाही तर जो त्रास, दंड होणार असतो, तो नको या विचाराने लोक कायदे पाळतात.

**ब) आदर :** राज्याप्रति, शासनाप्रति आदर या कारणामुळेही लोक राज्याचे कायदे पाळतात.

**क) सहानुभूति :** एकमेकांप्रति मानसिक दृष्टीने सहानुभूतीची भावना असणे त्यामुळेही लोक राजकीय आज्ञापालन करतात.

**ड) भिती :** दंड किंवा शिक्षेची भीती लोकांच्या मनात असते. राज्याचे कायदे पाळले नाही तर राज्याच्या दंडशक्तीकडून शिक्षा होईल असे लोकांना वाटते त्यामुळे भीतीने लोक कायदेपालन करतात.

**इ) विवेक :** संपूर्ण समाजाचे आणि लोकांचे हित कायदे पाळण्यातच आहे या विचाराने लोक कायदे पाळतात.

## ८.४ विविध सिद्धांताच्याद्वारे समर्थन केलेले राजकीय आबंधनाचे आधार : (The theoretical justification of political obligation)

राजकीय आबंधनाचे समर्थनार्थ विविध सिद्धान्त राजकीय विचारवंतांनी मांडले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाचे सिद्धान्त खालीलप्रमाणे आहेत-

१) दैवी सिद्धान्त : दैवी हक्कांचा आधार
२) सामाजिक करार सिद्धान्त : सामाजिक कराराचे कारण
३) उपयोगितावादी सिद्धान्त : जास्तीतजास्त लोकांचे सुख व हित
४) आदर्शवादी सिद्धान्त : राज्य सर्वोच्च आहे
५) मार्क्सवादी सिद्धान्त :
६) परंपरावादी सिद्धान्त : - सवय
७) शक्ति सिद्धान्त : - राज्याचे सामर्थ्य

**१) दैवी सिद्धान्त : दैवी हक्कांचा आधार (divine will) :** सर्व धर्मातील ग्रंथामध्ये राजकीय आबंधनाचा आधार दैवी कारण आहे. यावर भर आहे. राज्य आणि राजा यांच्याकडे देवाने सत्ता दिली आहे. राजा देवाचा प्रतिनिधी आहे. लोकांना नियंत्रणात ठेवणे, राजाचे कार्य आहे. त्यामुळे राजाच्या आज्ञा पाळणे प्रत्येक व्यक्तिचे कर्तव्य आहे. राजाला विरोध करणे म्हणजे देवाच्या इच्छेला विरोध करणे होय आणि ते पाप आहे असा समज असल्यामुळे लोक राजकीय आबंधन करतात.राजेशाहीमध्ये लोक राजाची आज्ञा पाळणे म्हणजे देवाची आज्ञा पाळणे होय या समजूतीतून राजाज्ञा पाळत असत. राजेशाहीमध्ये हा सिद्धान्त बराच लोकप्रिय झाला होता. परंतु आधुनिक काळात हा सिद्धात अशास्त्रीय समजण्यात येतो. या सिद्धान्ताला ऐतिहासिक आधार नाही. आधुनिक काळात हा सिद्धान्त अमान्य करण्यात येतो. प्राचीन काळी आणि मध्ययुगामध्ये राजकीय आबंधनाचा आधार धार्मिक होता.

**२) सामाजिक करार सिद्धान्त : ‘लोकांची संमती‘** (**consent of the people**) **:** राजकीय आबंधनाचा मुख्य आधार आहे यावर हा सिद्धांत भर देतो. नैसर्गिक अवस्थेत माणूस असतांना, त्या अवस्थेला कंटाळून लोकांनी सामाजिक करार केला आणि राज्य निर्माण केले. राज्याच्या आज्ञा लोक स्वइच्छेने पाळायला लागले. म्हणजेच ‘लोकसंमती‘आणि ‘लोकांची इच्छा‘ राजकीय आबंधनाचे मुख्य कारण आहे. थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, जीनजेक रुसो हे विचारवंत या सिद्धान्ताचे समर्थक आहेत. थॉमस हॉब्जने असे म्हटले आहे की निसर्गावस्थेत राज्य नव्हते. राज्याच्या अभावी निसर्गावस्थेत अंदाधुंदी आणि अव्यवस्था होती. भीतीयुक्त वातावरण होते. अशा या वातावरणातून बाहेर पडण्यासाठी लोकांनी सामाजिक करार केला. राज्य निर्माण केले आणि एका संपूर्ण सत्ता असलेल्या व्यक्तीला आपले हक्क अर्पण केले. आपल्या हक्क संरक्षणाची जबाबदारी त्या व्यक्तीवर टाकली. संरक्षण देण्याची, शांततापूर्ण वातावरण देण्याची जबाबदारी राज्यावर लोकांनी टाकली आणि राज्याच्या आज्ञा पाळण्याचे स्वइच्छेने ठरविले.

जॉन लॉक यांच्या मते निसर्गावस्थेतून बाहेर पडण्यासाठी लोकांनी करार करून राज्य निर्माण केले. या करारामध्ये राज्याच्यावतीने काम करणारे शासन मात्र घटनात्मक आणि मर्यादित असेल असे ठरविले. लोक शासनाच्या आज्ञा तोपर्यंतच पाळतील जोपर्यंत शासन लोकहितासाठी काम करेल. परंतु शासन दडपशाही करणारे असेल तर अशा शासनाच्या आज्ञा लोक पाळणार नाही आणि अशा शासनाला प्रतिकार करतील.

रुसो या विचारवंताच्या मते राज्य लोकांनी केलेल्या सामाजिक कराराचा परिणाम होय. राज्य लोकसंमतीवर आधारलेले राहील. सर्वोच्च सत्ता लोकांच्या सामुहिक ईहेमध्ये राहील. लोकांनी केलेल्या कराराद्वारे राज्य निर्माण झाले ज्यामध्ये राजकीय सत्तेच्या आज्ञा पाळण्यास सर्व लोक बांधलेले राहतील. परंतु  शासन सत्तेचा दुरुपयोग करीत असेल तर अशा राजकीय सत्तेविरुद्ध क्रांती करण्याचा लोकांना हक्क आहे. एकूण शांततेने, सुरक्षिततने जगता यावे म्हणून लोकांनी सामाजिक करार केला आणि राज्याची निर्मिती केली. राज्याचा आधार लोकांची इच्छा व संमती आहे. म्हणजेच राज्याच्या नियमांचे पालन लोक इच्छेने करतात असे या सिद्धान्ताच्या समर्थकांचे मत आहे.

**३) उपयोगितावादी सिद्धान्त :** जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुखासाठी राज्य निर्माण झाले आहे. ‘**राज्याची उपयोगिता**‘ लक्षात घेऊन लोक राजकीय आबंधन करतात. राज्य एक साधन आहे आणि राज्याचे साध्य सर्वसामान्यांचे हित व कल्याण आहे. राज्य लोकांसाठी स्थापन झालेली एक उपयोगी संस्था आहे हे पटल्यामुळे लोक राजकीय आबंधन करतात असे या सिद्धान्ताच्या समर्थकांचे मत आहे. राज्य निर्माण झाले आणि अस्तित्वात आहे ते जास्तीतजास्त लोकांच्या जास्तीत जास्त सुखासाठी असे जेरेमी बेथंम या उपयोगीतावादी विचारवंतांचे मत आहे. राज्य कायदे, दंडशक्ति, न्यायालय यांच्याद्वारे आपले लोकहिताचे साध्य पूर्ण करते. राज्याचे कायदे पाळणे आणि राज्याच्या कार्याला सहकार्य करणे प्रत्येक व्यक्तिचे कर्तव्य आहे.

**४) आदर्शवादी सिद्धान्त : ‘मानवी विवेक‘** राजकीय आबंधनाचा मुख्य आधार आहे. मानवी प्राणी विवेकी आहे. मानवाला आपले बळ आणि दुर्बलता दोन्हीची जाणीव असते. प्रत्येक व्यक्ती आपले बळ वाढविण्याचा आणि दुर्बलता कमी करण्याचा सतत प्रयत्न करतो. प्रत्येक व्यक्तीचे

जीवनाचे ध्येय्य स्वत:चा जास्तीत जास्त विकास करणे आहे. हे ध्येय्य प्रत्येक व्यक्ती, समाज आणि राज्यात राहूनच पूर्ण करते. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास  समाजाच्या बाहेर राहून नाही तर समाजात आणि राज्यात राहूनच शक्य आहे.

सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल या ग्रीक विचारवंताच्या आणि आदर्शवादी विचारवंत उदा. हेगेल, टी.एच. ग्रीन यांचा असा विश्वास होता की राज्याच्या आज्ञा, नियम, कायदे पाळणे व्यक्तीचे कर्तव्य आहे. कारण फक्त राज्यामुळेच व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकतो. मानवी प्राणी विवेकी असल्यामुळे राज्यांतर्गतच आपले हितसंवर्धन शक्य आहे हे समजू शकते. या विचारातून स्वविवेकाने, स्वइच्छेने लोक राजकीय आबंधन करतात. हेगेल या आदर्शवादी विचारवंतांच्या मते ‘‘राज्य मानवी विवेकाचे मूर्त स्वरुप होय आणि पृथ्वीवरील देवाचे राज्य होय.‘‘ राजकीय आबंधन करण्यामध्येच व्यक्तीस्वातंत्र्य आहे. टी.एच. ग्रीन यांच्या मते, ‘‘ताकद किंवा बळ नाही; इच्छा हाच राज्याचा आधार आहे.‘‘ अशा प्रकारे इच्छा आणि विवेक यामुळे लोक राजकीय आबंधन करतात असे आदर्शवाद्यांचे मत आहे.

५) **मार्क्सवादी सिद्धान्त :** मार्क्सवादी राज्याला शोषण करणारे यंत्र समजतात. मार्क्सवाद्यांच्या मते भांडवलवादी व्यवस्थेमध्ये राज्य भांडवलदारांच्या हिताचे रक्षण करणारी आणि भांडवलदारांच्या वर्चस्वाखाली काम करणारी संस्था म्हणून काम करीत असते. त्यामुळे विशिष्ट वर्गाचे हित करणारी संस्था एवढेच महत्त्व राज्याला असते. भांडवलवादी व्यवस्थेखाली असलेल्या राज्याला प्रतिकार करण्याचा, क्रांती करण्याचा लोकांना अधिकार आहे. परंतु भांडवलशाही एकदा नष्ट झाली आणि साम्यवादी व्यवस्था प्रस्थापित झाली की, राज्य सर्वांचे हित करणारी संस्था असेल. तेव्हा सर्वांचे हित करणाऱ्या राज्याला विरोध करण्याचा प्रश्नच उरत नाही.

६) **परंपरावादी सिद्धान्त - रुढी, परंपरा, वहिवाट :** सर हेन्री मेन यांच्या मते लोकांना रुढी परंपरेप्रमाणे राजाज्ञा पालन करण्याची सवय लागलेली असते. अनेक वर्षांपासून युगानेयुगे लोक इच्छेने, सवयीने राजकीय आज्ञा पाळत असतात. तीच सवय त्यांना होते. एडमंड बर्क या परंपरावादी विचारवंताने असे म्हटले आहे की, राज्य उत्क्रांतीतून निर्माण झालेले असते. अनेक पिढ्यांचे सामुहिक शहाणपण, अनुभव यातून राज्य निर्माण झाले असते.

७) **शक्तिसिद्धान्त :** ‘शारिरीक बळ, युद्ध, वर्चस्व प्रस्थापित करणे‘ यातून राज्य उदयास आले आहे. राज्य निर्माण झाल्यानंतरसुद्धा राज्य टिकून राहते ते राज्याच्या दंडशाक्तिमुळे होय. राज्यात शांतता, सुव्यवस्था ठेवण्याचे काम, परकीय आक्रमणापासून राज्याचे संरक्षण करण्याचे काम फक्त राज्याच्या बळामुळेच शक्तय असते. राज्याचे बळ सैन्यव्यवस्था, पोलीसव्यवस्था असते. त्यांच्या भीतीमुळे लोक राजकीय आबंधन करतात. कायदेभंग करणाऱ्या व्यक्तिला दंड देण्याचा आणि शिक्षा करण्याचा राज्याला अधिकार आहे. म्हणजेच ‘राज्याची दंडशक्ति‘ राजकीय आबंधनाचा मुख्य आधार आहे यावर या सिद्धान्ताचा भर आहे.

**४) राजकीय आबंधनाचे इतर आधार :**

१) व्यक्तिची सामाजिक आणि राजकीय गरज
२) शासनाची अधिमान्यता
३) अंदाधुंदीची भीती
४) परंपरा, रुढी, सवय आणि सामाजिक दबाव

१) **व्यक्तिची सामाजिक आणि राजकीय गरज :** मनुष्य सामाजिक आणि राजकीय प्राणी आहे. कारण मनुष्यप्राणी एकटा राहू शकत नाही. मनुष्याच्या सामाजिक गरजांमधून समाजाची स्थापना झाली आणि राजकीय गरजांमधून राज्याची स्थापना झाली. समाज आणि राज्य दोन्ही संस्था मानवी हितासाठी निर्माण करण्यात आल्यामुळे मानव या दोन्ही संस्थांचे राजकीय आबंधनाच्या स्वरूपात देणे लागतो.

२) **शासनाची अधिमान्यता :** सुशिक्षित आणि राजकीय दृष्टीने जागरुक नागरीक राजकीय आबंधन करतात कारण त्यांना हे माहित असते की शासन राज्याच्यावतीने काम करणारी संस्था आहे आणि शासनाला कायदेशीर सत्ता म्हणजेच अधिमान्यता आहे. उदा. भारतात संसदेने निर्माण केलेले कायदे बहुतेक नागरीक पाळतात कारण सांसदीय सदस्यांची निवड लोकांनी घटनेमध्ये दिलेल्या मुक्त व खुल्या मतदान पद्धतीने केलेली असते. जेव्हा शासनाला अशी अधिमान्यता असते तेव्हा राजकीय आबंधन करणे आपले कर्तव्य आहे यावर लोकांचा विश्वास असतो.

३) **अंदाधुंदीची भीती :** सर्वसामान्यतः बहुतेक लोक शांतताप्रिय असतात; त्यांना सुरक्षित सुव्यवस्थित जीवन हवे असते असे जीवन राज्य आणि कायद्यांअभावी शक्य नसते. जर सुरक्षित, सुव्यवस्थित जीवन हवे असेल तर राजकीय आबंधन करणे समर्थनीय आहे हे लक्षात घेऊन अनेक लोक रज्याप्रति आपली कर्तव्ये पाळतात.

४) **परंपरा, रुढी, सवय, सामाजिक दबाव :** परंपरा आणि रुढीमुळे एक सवय म्हणून समाजात सगळ्यांबरोबर राहायचे म्हणून लोक बरेचदा राजकीय आबंधन करतात.

## ८.५ राजकीय आबंधनाच्या मर्यादा

राजकीय आबंधन करणे गरजेचे आहे. परंतु ते निरपेक्ष (**absolute**) नाही, मर्यादीत आहे. काही विशिष्ट परिस्थितीत उदा. राज्याचे कायदे अन्यायी, समाजहिताच्या विरोधी असेल तर अशा कायद्यांना लोकांनी विरोध करावा. अशावेळी शासनाशी सहकार्य न करता आणि राजकीय आज्ञापालन न करता राज्याला विरोध करणे लोकांचे कर्तव्य ठरते. राजकीय आबंधन डोळसपणे करावे. दडपशाही आणि जुलमी राज्याला, कायद्यांना लोकांनी प्रतिकार करावा.

## ८.६ राजकीय आबंधन तक्ता




## ८.७ प्रतिकाराचा हक्क (Right to Resistance)

### ८.७.१ प्रस्तावना :

राजकीय आबंधन निरपेक्ष (absolute) नाही; मर्यादित आहे. राज्याच्या कायद्यांना विरोध आणि प्रतिकार करण्याचा लोकांना हक्क आहे. कोणत्या परिस्थितीत प्रतिकाराचा हक्क समर्थनीय आहे. प्रतिकाराचा हक्क यासंबंधीत खालील मुद्दे महत्त्वाचे आहेत.

१) प्रतिकाराचा हक्क म्हणजे काय ?
२) कोणत्या परिस्थितीत हा हक्क समर्थनीय आहे ?
३) प्रतिकाराच्या हक्काचे स्वरूप आणि साधने कोणती ?

### ८.७.२ प्रतिकाराचा हक्क म्हणजे काय? (Meaning) :

शासनाच्या आज्ञा आणि कायदे पाळण्यास नागरिकांनी नकार देणे म्हणजे शासनाला प्रतिकार करणे होय. राजकीय आज्ञापालन आणि आबंधन न करणे म्हणजे प्रतिकार करणे.

### ८.७.३ शासनाला प्रतिकार करण्याचे उद्दिष्ट :

लोक जेव्हा शासनाला प्रतिकार करतात तेव्हा त्यांना शासकीय व्यवस्थेमध्ये, कायद्यामध्ये, राज्याच्या धोरणामध्ये किंवा कार्यामध्ये काही बदल हवे असतात. राज्याच्या कायद्याने मनाई केलेली एखादी कृती करणे किंवा जी कृती करणे राज्याच्या कायद्याप्रमाणे आवश्यक असेल ती न करणे या दोन्हीचा समावेश राजकीय प्रतिकार हक्कामध्ये होतो.

अनेक देशांच्या इतिहासामध्ये प्रतिकाराचा हक्क लोकांनी अंमलात आणण्याची उदाहरणे आहेत. उदा. अमेरिकेत जॉर्ज वॉशिग्टन यांनी ब्रिटिश शासनाला प्रतिकार केला आणि बंड केले होते. भारतात महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली हजारो भारतीयांनी ब्रिटीशांच्या दडपशाहीला प्रतिकार केला होता.

### ८.७.४ प्रतिकाराच्या हक्काचे समर्थन :

प्रतिकाराचा हक्क केव्हा अंमलात आणावा. कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या कारणांसाठी राज्याला प्रतिकार करावा? नागरिकांना राज्याच्या कायद्यांना, शासनाला प्रतिकार करण्याचा हक्क आहे. राजकीय आबंधन करणे नागरिकांचे कर्तव्य आहे; त्याचप्रमाणे अन्यायी कायद्यांना प्रतिकार करणे हेही नागरिकांचे कर्तव्य आहे. राजकीय आबंधन निरपेक्ष (absolute) नाही. काही परिस्थितीत सत्तेला विरोध आणि प्रतिकार करण्याचा लोकांना हक्क आहे. परंतु प्रतिकाराचा हक्क औषधाप्रमाणे वापरायला हवा; रोजचे जेवण म्हणून नाही. याचा अर्थ असा की कायदे लोकांच्या कल्याणासाठी व हितासाठी असतात. कायदे पाळणे लोकांचे कर्तव्य आहे. परंतु काही वेळी शासनाचा कायदा अन्यायी, नुकसानकारक, लोकांच्या हक्कांचा भंग करणारा, दडपशाही करणारा असू शकतो. अशावेळी त्या अन्यायी कायद्याला विरोध करावा. त्या अन्यायी कायद्याला प्रतिकार करणे समर्थनीय असते. प्रतिकाराचा हक्क फक्त न्याय कारणासाठीच अंमलात आणावा आणि दुसरे म्हणजे विशिष्ट परिस्थितीतच तो हक्क अंमलात आणावा.

विविध राजकीय विचारवंतांनी याबाबतीत वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत : **ॲरिस्टॉटल** (राज्यशास्त्राचे जनक) च्या मते प्रस्थापित राजकीय व्यवस्थेला प्रतिकार करण्याचा लोकांना हक्क आहे. तो दोन कारणांसाठी १) न्याय प्राप्तीसाठी२) समता, समान दर्जा मिळावा यासाठी. ॲरिस्टॉटलने अनेक देशांना भेट देऊन तेथील राज्यव्यवस्थांचा अभ्यास केला. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की लोक अन्याय व असमता कधीच सहन करीत नाही; त्यासाठी क्रांती करतात. **जॉन मिलटन :** म्हणतात की जुलमी आणि दडपशाही करणाऱ्या राज्यकर्त्याला विरोध करणे लोकांचा नैसर्गिक हक्क आहे. व्यक्ति जन्मतः स्वतंत्र असते. सर्वांच्याच संमतीने लोकांनी एकमेकांच्या संरक्षणासाठी शासनाची स्थापना केली. तेच शासन अन्याय करीत असेल तर, सर्वसामान्यांच्या हितासाठी, अन्याय करणाऱ्या शासनाला विरोध करणे आणि सर्वसामान्यांच्या हिताचे संरक्षण करणे हा लोकांचा हक्क आणि कर्तव्य दोन्ही आहे.

**उदारमतवादी विचार :** जॉन लॉक उदारमतवादी आणि व्यक्तिवादी विचारांचे समर्थक होते. त्यांच्या मते प्रतिकाराचा हक्क लोकांना आहे. परंतु अंतिम मार्ग म्हणून या हक्कांची अंमलबजावणी करण्यात यावी. शासन खरोखरच अन्यायी असेल तेव्हाच या हक्काची अंमलबजावणी करावी. कारण प्रतिकाराचा हक्क लोकांजवळ असतोच. परंतु हा हक्क वापरणे तेव्हाच प्रभावी परिणामकारी असते जेव्हा अन्यायी शासनाला कायदेशीर, घटनात्मक मार्गाने विरोध करूनही शासन लक्ष देत नसेल किंवा शासन आपली जबाबदारी पूर्ण करीत नसेल किंवा लोकांच्या नैसर्गिक हक्क स्वातंत्र्यावर बंदी आणत असेल अशावेळीच अंतिम मार्ग म्हणूनच प्रतिकाराचा हक्क वापरणे समर्थनीय ठरते.

**आदर्शवादी विचार :** टी.एच ग्रीन या आदर्शवादी विचारवंताच्या मते प्रतिकाराचा हक्क समर्थनीय आहे, परंतु तो विशिष्ट परिस्थितीतच. शासनाला प्रतिकार करण्यापूर्वी काही प्रश्न लोकांनी स्वतःला विचारावे. त्या नंतरच शासनाला प्रतिकार करणे समर्थनीय आहे किंवा नाही हे ठरवावे. खालील प्रश्नांचा विचार केल्यानंतर प्रतिकाराचा हक्काचा अवलंब करावा किंवा नाही याचा विचार लोकांनी करावा.

१) अन्यायी शासन किंवा कायदे यात दुरुस्ती व्हावी म्हणून सर्व कायदेशीर आणि घटनात्मक मार्गांचा उपयोग केला काय?

२) प्रतिकाराचा हक्क वापरणे ही पायरी गाठण्यापूर्वी त्यासाठी शांतपणे विचार केला काय?

३) हा हक्क सर्व लोकांच्या हितासाठी वापरणारा आहोत काय?

४) प्रतिकाराचा हक्क बजावण्यासाठी ज्या नैतीक शक्ती आवश्यक असतात त्या माझ्यात आहेत काय? उदा. इच्छाशक्ति, निश्चय, धैर्य इत्यादी.

५) प्रतिकाराचा हक्क वापरल्यानंतर त्याचा परिणाम कोणता होणार आहे. माझ्या कृतीमुळे परिस्थितीत सुधारणा होणार आहेत काय?

ग्रीनच्या मते या प्रश्नांचा शोध घेऊन नंतरच प्रतिकाराचा हक्काविषयी ठरवावे.

**गांधीवादी विचार :** महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांच्या दडपशाही विरुद्ध या हक्काची अंमलबजावणी अनेकदा केली होती. त्यांच्या मते अन्यायी कायद्यांविरुद्ध प्रतिकार करण्याचा हक्क लोकांना आहे. जेव्हा सर्व घटनात्मक आणि कायदेशीर मार्गाने विरोध केल्यानंतर सरकार दाद देत नाही. त्यानंतर लोकांनी प्रतिकार करावा. परंतु प्रतिकार शांततेच्या मार्गाने करावा. जयप्रकाश नारायण, मार्टीनलयुथर किंग, दलाई लामा आणि अँगसँग स्युंकी या सर्व गांधीवादी लोकांनी असे मत मांडले की, अन्यायी कायदे नागरिकांनी पाळणे अनैतीक आहे. न्याय कायदे पाळणे लोकांचे कर्तव्य आहे. परंतु अन्यायी कायद्यांना प्रतिकार करणे हे सुद्धा लोकांचे कर्तव्य आहे. जयप्रकाश नारायण यांनी गरीब शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या जमीनीसंबंधी अन्यायी कायद्यांना विरोध करण्यास प्रतिकार केला होता. आणि चळवळ सुरू केली होती. मार्टीन ल्युथर किंग यांनी अमेरिकन शासनाविरूद्ध वंशभेद करणारे कायदे नष्ट करावे म्हणून चळवळ केली होती.

**निष्कर्षतः** असे म्हणता येईल प्रतिकाराचा हक्क समर्थनीय आहे; परंतु काही विशिष्ट परिस्थितीतच हा हक्क समर्थनीय ठरतो.

शासनाला प्रतिकार का करावा आणि केव्हा करावा
किंवा
प्रतिकाराच्या हक्काचे समर्थन

**प्रतिकाराची कारणे**

१) अन्यायी कायद्यांविरुध्द
२)ॲरिस्टाटल- असमतेविरुध्द
३)मिल्टन – सर्वसामान्यांच्या हितासाठी
४)लॉक – नैसर्गिक हक्कांचे संरक्षणासाठी

**प्रतिकार केव्हा करावा**

१) विशिष्ट परिस्थितच
२) अंतिम मार्ग म्हणूनच करावा
३) सर्व घटनात्मक मार्गाचा अवलंब केल्यानंतर
४) प्रतिकार केल्यानंतरचे परिणाम लक्षात घेऊन
५) शांततेने प्रतिकार करावा- गांधीवादी

### ८.७.५ प्रतिकाराची साधने किंवा पद्धती :

शासनाला दोन मार्गाने प्रतिकार करता येतो. १) हिंसात्मक मार्ग, २) अहिंसात्मक मार्ग.

**प्रतिकाराची साधने - तक्ता**

प्रतिकाराची साधने

१ हिंसात्मक मार्ग
- क्रांती
- दहशतवाद
- लष्करी हस्तक्षेप

२ अहिंसात्मक मार्ग
- सत्याग्रह
  - १ सत्याग्रह म्हणजे
    - अहिंसात्मक लढा
  - २ सत्याग्रहाचा हेतू
    - अन्याय करणाऱ्यामध्ये बदल घडविणे
  - ३ तत्वे
    - १)स्वनियंत्रण
    - २)भयमुक्त
    - ३)लोभ नसावा
    - ४)शारीरीक श्रमाची वृत्ती
    - ५) स्वदेशी
    - ६) नम्रता
  - ४ मार्ग
    - १)असहकार
    - २)सविनय कायदेभंग
    - ३)हरताळ
    - ४)बिहष्कार
    - ५)धरणे
    - ६)उपोषण
    - ७)अटक करवून घेणे
    - ८)अर्ज
    - ९)निषेध
    - १०)रॅलीज

**हिंसात्मक मार्ग :** क्रांती, दहशतवाद, लष्करी हस्तक्षेप, बंड, शस्त्रांचा उपयोग, जाळपोळ, तोडफोड करणे इत्यादी मार्गांना हिंसात्कमक साधने म्हणतात.

**क्रांती (Revolution) :** जबरदस्तीने शासनाला सत्तेवरून काढून टाकणे म्हणजे क्रांती असा क्रांतीचा सर्वसाधारण अर्थ आहे. क्रांती करुन अन्यायाला प्रतिकार करणे हा मार्ग फार जुना आहे. अन्याय करणाऱ्या राजाविरुद्ध क्रांती करणे या मार्गाला प्राचीन भारतीय परंपरेनेसुद्धा स्वीकृती दिली होती. साधारणपणे क्रांतीचे स्वरूप हिंसात्मक असते, रक्तरंजित क्रांती अशा स्वरूपाचे असते. अपवाद १६८८ ची इंग्लंडमध्ये झालेली रक्तहीन क्रांती. **रॉबर्ट ढाल** क्रांतीची व्याख्या अशी देतात की, क्रांती म्हणजे हिंसात्मक कृती जी समुहात्मक असते. ज्या कृतीद्वारे प्रस्थापित सत्तेला लोक अमान्य करतात, त्या सत्तेवर हक्क करतात, आणि त्या सत्तेला नष्ट करतात. क्रांतीचे उद्दीष्ट संपूर्ण आणि आमूलाग्र बदल प्रस्थापित व्यवस्थेत आणणे हा असतो.

फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) ला सर्व क्रांतीमध्ये मुख्य क्रांती समजण्यात येते. त्यानंतर २० व्या शतकात अनेक राज्यक्रांत्या झाल्यात. त्यापैकी १९१७ मध्ये झालेली रशियातील राज्यक्रांती आणि १९४९ मध्ये झालेली चीनमधील राज्यक्रांती होय.

आजच्या काळात दूरगामी होणाऱ्या बदलांनासुद्धा क्रांती म्हणतात. उदा. हरितक्रांती काम्प्युटर क्षेत्रात झालेली क्रांती. परंतु प्रतिकाराचे साधन म्हणून क्रांतीचा उल्लेख होतो तेव्हा सामाजिक किंवा राजकीय व्यवस्था जबरदस्तीने प्रतिकार करून काढून टाकणे होय. क्रांती ही नेहमी मोठ्या प्रमाणात असते. क्रांतीचे स्वरूप खालीलप्रमाणे असते.

१) राज्याच्या सर्व बाजूवर परिणाम करणारी असते- क्रांती राज्याच्या फक्त राजकीय बाजूंवर परिणाम करीत नाही तर समाज, अर्थ, संस्कृती अशा सर्व बाजूंवर परिणाम करणारी असते.

२) क्रांतीने आमूलाग्र बदल होतो – शासनामध्ये छोटा बदल करणाऱ्या घटनेला क्रांती म्हणता येणार नाही. क्रांतीचे परिणाम संपूर्ण, आमूलाग्र, दूरगामी असतात.

३) हिंसात्मक - क्रांतीचे स्वरूप साधारणपणे हिंसात्मक असते.

४) नविन व्यवस्था आणणे हे उद्दीष्ट – प्रस्थापित व्यवस्थेचा शेवट करणे, त्या व्यवस्थेला नष्ट करणे एवढाच उद्देश नसतो तर जुनी व्यवस्था नष्ट करून त्या जागी नवीन व्यवस्था आणणे हे क्रांतीचे उद्दीष्ट असते. बंड आणि क्रांती यात फरक आहे.

**दहशतवादी कारवाया :** सत्तेला प्रतिकार करण्याचा आणखी एक हिंसावादी मार्ग म्हणजे कट, कारस्थान दहशतवादी कृती करणे इत्यादी होय. काही थोड्या व्यक्ती ज्या सत्तेपासून समाधानी नसतात, सत्तेने ज्यांची निराशा केलेली असते त्या व्यक्ती सत्तेविरुद्ध प्रतिकार करण्यास हिंसात्मक कृती करतात. अशा दहशतवादी गटाच्या कृती लोकांच्या मनात दहशत निर्माण करतात. उदा. खलिस्तान, तामीलएलम इत्यादी किडनॅपींग, हॉयजॅकींग, बॉम्बब्लास्ट इत्यादी मार्गांचा उपयोग आपल्या मागण्या शासनाकडून करवून घेण्यसाठी दहशतवादी करतात. या कारवाया राज्य विरोधीच नाही तर राष्ट्र-विरोधी ही असतात. त्यामुळे अशा कारवाया करणाऱ्या संघटनांना बेकायदेशीर ठरविण्यात येते आणि त्यांच्या कृतींचा निषेध करण्यात येऊन त्यावर बंदी घालण्यात येते.

**लष्करी हस्तक्षेप :** शासनाविरुद्ध बंड करून, लष्करी हस्तक्षेपाव्दारे त्या शासनाला मागे खेचून सत्ता मिळविणे ह्या हिंसात्मक प्रतिकाराचा मार्गाचा अनेक देशामध्ये उपयोग करण्यात आला होता. उदा. पाकिस्तान, बांगलादेश, बर्मा इत्यादी देशांमध्ये लष्करी हस्तक्षेपाद्वारे सत्ता मिळविण्यात आली होती. लष्कराचा प्रमुख जर राजकीय दृष्टीने अति महत्त्वाकांक्षी असेल तर तो या मार्गाने सत्ता मिळविण्यात यशस्वी होतो. कारण लष्करावर त्याची सत्ता आणि वर्चस्व असते.

**अहिंसात्मक प्रतिकाराची साधने :** दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगामध्ये गांधीचे अहिंसात्मक प्रतिकाराचे साधन अतिशय लोकप्रिय झाले आहे.. त्यालाच सत्याग्रह असे म्हणतात. सत्याग्रह तंत्र जुने असले तरी या मार्गाचा खरा विकास आणि अवलंब महात्मा गांधी यांनी केला होता. मानवी सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडविण्यास गांधीनी सत्याग्रह मार्गाचा अवलंब केला होता.

अन्यायी कायदे, दडपशाही करणारे शासन कायदेशीर मार्गाने बदलत नसेल तर अशा शासनाला प्रतिकार करण्याचा लोकांना हक्क आहे. असा प्रतिकार शांततापूर्ण मार्गाने असावा. शांततापूर्ण प्रतिकाराचा मार्ग म्हणजे सत्याग्रह होय.

**सत्याग्रहाचा अर्थ :** सत्याग्रह हे नैतीक साधन आहे. संघर्षाचा अहिंसात्मक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. शब्दशः सत्याग्रह म्हणजे सत्याला चिकटून राहणे. सत्याग्रह म्हणजे आत्मशक्ती असेही गांधी म्हणत असत. प्रेमाने जग जिंकणे आणि दुसऱ्यांसाठी सहन करणे यात अंतर्भुत असते. सत्याग्रह म्हणजे एक प्रकारे सत्यासाठी केलेली तपस्या होय. सत्याग्रह दुर्बल आणि ढोंगी लोकांचे नाही तर जागृक, सक्रीय आणि शूर लोकांचे साधन आहे. सत्याग्रह हिंसेला नकार देतो. सत्याग्रह म्हणजे अहिंसात्मक लढा असतो. सत्याग्राहामध्ये स्वबलिदानाव्दारे अन्याय करणाऱ्याला त्याच्या कृतीची जाणीव करून देण्यात येते.

**सत्याग्रहाचा हेतू :** चर्चेने, समजूतीने, आत्मबळाने, स्वबलीदानाने, लढा देण्याची अहिंसात्मक पद्धती आणि संघर्ष सोडविण्याची प्रक्रिया म्हणजे सत्याग्रह होय. यामध्ये अन्याय करणाऱ्याच्या मनामध्ये, हृदयामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दीष्ट असते.

**सत्याग्रहाची तत्वे :**

**१) स्वनियंत्रण :** विचार, उच्चार, कृती यावर सत्याग्रहीचे पूर्ण नियंत्रण असावे लागते. गांधींच्या मते व्यक्तिचे स्वतःच्या विचारांवर पूर्ण नियंत्रण असेल तर ती व्यक्ती जास्तीत जास्त काम, कमीत कमी ताकदीने करू शकते. सत्याग्रह करतांना त्या व्यक्तिचे विचार, उच्चार आणि कृतीवर पूर्ण नियंत्रण असावे.

**२) भयमुक्त असावी :** जेव्हा व्यक्ती कशालाच घाबरत नाही. उदा. मृत्यू, लाठीचार्ज, तुरुंगात जाणे इत्यादी तेव्हाच सत्याग्रह करू शकते. म्हणूनच असे म्हणतात, की सत्याग्रह शूरांचे साधन आहे.

**३) मालकी नसणे :** सत्याग्रह करणाऱ्यामध्ये कोणताही प्रकारचा लोभ नसावा. एवढेच नाही तर स्वतःचे शरीर, ताकद, वेळसुद्धा सत्याग्रहीला बरेचदा समाजाच्या हितासाठी खर्च करावी लागते. व्यक्तीमध्ये लोभी वृत्ती, विकसित झाली की भौतिक गोष्टींप्रति ती वृत्ती वाढतच जाते. आणि

मानवतेला सेवा देण्यापासून दूर जाते. म्हणून सत्याग्रहीमध्ये स्वमालकीची भावना फारशी विकसित होता कामा नये.

**४) शारिरीक श्रमाची वृत्ती :** विधायक कामामध्ये व्यक्तिने शक्यतोवर आपला वेळ खर्च करावा. उदा. शारिरीक श्रम करणे सर्वात मोठी समाजसेवा आहे असे गांधींचे मत होते.

**५) स्वदेशी :** आपल्याच देशात तयार होणाऱ्या वस्तू वापरणे म्हणजे स्वदेशी होय. या मार्गाने आपली सेवा आपल्या देशाला देणे.

**६) नम्रता :** सत्ता, दर्जा, पैसा याचा लोभ किंवा आसक्ती बाळगू नये.

**७) आत्मशक्ति :** आपआपसातील समजुतीने, स्वबलीदानाने संघर्ष सोडविर्याची प्रक्रिया म्हणजे सत्याग्रह होय. त्यासाठी सहानशक्तिची गरज असते. आत्मशक्तिने सहनशक्ति विकसित होते. आत्मशक्तिचा विकास तेव्हाच होतो जेव्हा व्यक्ति सत्य, अहिंसा, आत्मबलिदान या मार्गाने जाते. वरील सर्व तत्वे म्हणजे एक प्रकारे सत्याग्रहीची शस्त्रे असतात.

**सत्याग्रहाचे मार्ग :**

१) असहकार
२) सविनय कायदेभंग
३) हरताळ
४) बहिष्कार
५) शांततेच्या मार्गाने धरणे
६) उपोषण
७) अटक करवून घेणे
८) अर्ज, निषेध, रॅलीज इत्यादी.

**१) असहकार :** १९२० साली राष्ट्रीय स्तरावर महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली शासनाला विरोध आणि प्रतिकार करण्यास असहकार चळवळ करण्यात आली होती. १९१९ साली ब्रिटिशांनी रौलट ॲक्ट पास केला. हा कायदा दडपशाही करणारा होता. त्यानंतर जालीयनवाला बाग हत्याकांड झाले. या घटनांचा निषेध करण्यासाठी ही चळवळ सुरू झाली होती. या चळवळीमध्ये अनेक नेत्यांनी पदव्यांचा त्याग केला. शासकीय नोकऱ्या सोडल्या, कर दिले नाही, शाळा, न्यायालय यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला. अशाप्रकारे सर्व बाजूने ब्रिटिशांना सहकार्य देण्याचे भारतीय लोकांनी नाकारले. लोकांच्या सहकार्याशिवाय ब्रिटिशांचे शासन चालू शकणार नाही हे या सत्याग्रहात लोकांनी ब्रिटिशांना दाखवून दिले.

**२) सविनय कायदेभंग :** कायद्याचा आदर न करणे किंवा कायदा तोडणे म्हणजे कायदेभंग होय. सविनय कायदेभंग म्हणजे उघडपणे, मुद्दाम, अहिंसात्मक मार्गाने कायदा तोडणे किंवा कायद्याचा भंग करणे होय. जेव्हा लोक एखाद्या अन्यायी कायद्याला घटनात्मक मार्गाने प्रतिकार करतात; तरीही शासन त्याकडे लक्ष देत नाही अशावेळी सविनय कायदेभंग या साधनाचा उपयोग लोक करतात. कायदे करतांना शासन लोकांच्या सूचना आणि मागण्यांकडे लक्ष देत नाही, शासकीय धोरणे, लोकहिताविरुद्ध असतात तेव्हा तेव्हा लोकांनी सविनय कायदेभंग केला आहे.

महात्मा गांधी यांनी १९०७ साली दक्षिण आफ्रिकेमध्ये शासनाच्या जुलमी कायद्याविरूद्ध सविनय कायदेभंग केला होता. भारतात चंपारण्य येथे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, १९३० साली मिठाचा कायदा मोडून दांडीमार्च करून सविनय कायदेभंग केल्याची उदाहरणे आहेत.

सविनय कायदेभंगामध्ये दोन कृतींचा समावेश होतो. १) शासनाने मनाई केलेली कृती करणे, २) शासनाने आवश्यक केलेली कृती न करणे, एखादी गोष्ट किंवा कायदा करण्यास शासनाने मनाई केलेली असेल, तरीही लोकांनी ती कृती करणे म्हणजे सविनय कायदेभंग होतो. एखादी कृती किंवा कायदा पाळणे आवश्यक आहे असा शासनाचा आदेश असेल परंतु ती कृती किंवा कायदा लोकांनी न करणे त्यालाही सविनय कायदेभंग म्हणतात.

**३) हरताळ :** विशिष्ट समस्या किंवा प्रश्नावर लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी संबंधीत काम करणे थांबविणे म्हणजे हरताळ होय. अशावेळी दुकाने, हॉटेलस् आणि इतरांनीही आपआपले उद्योग ऐच्छिकपणे बंद ठेवणे म्हणजे जुलमी कायद्याविषयी असामाधान, असंमति दर्शविणे होय त्यालाही हरताळ म्हणतात.

**४) बहिष्कार :** असंमती दाखविण्याचा आणि निषेध करण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे बहिष्कार होय. महात्मा गांधीनी निरनिराळ्या कारणांसाठी दक्षिण आफ्रिका आणि भारतात बहिष्कार या साधनाचा उपयोग केला होता. उदा. परदेशी वस्तू, शासनाने दिलेल्या पदव्या इत्यादीवर बहिष्कार टाकला होता. बहिष्काराचा मुख्य उद्देश म्हणजे शांततापूर्ण पद्धतीने एखाद्या गोष्टीचा निषेध करून अन्यायी शासनाशी आम्ही सहभागी नाही असा संदेश सर्वांपर्यंत पोहचविणे.

**५) शांततापूर्ण धरणे :** जी गोष्ट लोकांना मान्य नाही अशा गोष्टीसाठी धरणे धरतात. सत्याग्रहाच्या या तंत्रामुळे अन्याय व जुलूम करणाऱ्यांवर सामाजिक आणि आर्थिक दबाव आणण्यात येतो. त्याला न्याय देण्यास भाग पाडण्यात येते. त्याचवेळी लोकांमध्ये राजकीय जागृकता आणण्यात येते.

**६) उपोषण :** सत्याग्रहाचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे उपोषण होय. उपोषण सर्वात शेवटचा आणि अंतिम मार्ग आहे. उपोषण तेव्हाच करतात जेंव्हा कारण योग्य आणि न्याय आहे. उपोषण करणाऱ्याची परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा हवी आणि त्या व्यक्तीमध्ये आत्मशक्ती हवी. उपोषण करणाऱ्यामध्ये मृत्यूचेसुद्धा भय असू नये. व्यक्तिगत स्वार्थासाठी या मार्गाचा अवलंब करु नये असे गांधीचे मत होते.

**७) अटक करवून घेणे :** अन्यायी कायद्याला प्रतिकार करण्याचे आणखी एक सत्याग्रहाचे तंत्र म्हणजे तो कायदा तोडून लोक मुद्दाम स्वतःला अटक करवून घेतात. त्या कायद्याला आमची पूर्ण असंमती आहे हे दाखविण्यासाठी लोक स्वइच्छेने मुद्दाम तशी कृती करतात. अटक करवून घेण्यामागे लोकांचा मुख्य उद्देश असतो की शासनाने न्याय द्यावा म्हणून शासनावर दबाव आणणे. उदा. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये हजारो भारतीयांनी आणि नेत्यांनी स्वच्छेने अटक करवून घेतली होती आणि ब्रिटिशांनी भारत सोडून जावे म्हणून ब्रिटिशांवर दबाव आणला होता.

**८) अर्ज, रॅलीज, निदर्शने, विनंती :** सत्याग्रहाचा हा प्रकार सौम्य आहे. साधारणपणे घटनात्मक मार्गाने, कायदेशीर मार्गाने, बॅलेट काढून, पत्रके वाटून, भाषणाद्वारे, रॅली काढून शांततेने निषेध करण्यात येतो. असंमति दाखविणे किंवा मतभेद व्यक्त करणे म्हणजे शांततापूर्ण मार्गाने निषेध व्यक्त करणे होय. कायदे अन्यायी आहे हे दाखविण्यासाठी अशा तहेचा निषेध करण्यात येतो. एखाद्या शासना विरूद्ध सुद्धा मतदान प्रक्रियेतून असा निषेध दाखविण्यात येतो.

**निष्कर्ष :** भारतात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचा लढा सत्याग्रह या अहिंसात्मक मार्गाने देण्यामध्ये भारतीय यशस्वी झाले. लोकशाही शासन पद्धतीमध्ये अन्याय, दडपशाही, जुलूम इत्यादीला प्रतिकार करण्यासाठी सत्याग्रह तंत्र या साधनांचा उपयोग आज लोक सर्वसाधारणपणे करतात.

**तक्ता – सारांश – प्रतिकाराचा हक्क**

प्रतिकाराचा हक्क

- १ अर्थ
- २ कारणे
  - १) अन्याय
  - २) असमता
  - ३) जुलुम
  - ४) सर्वसामान्य हिताचे संरक्षण
  - ५) नैसर्गिक हक्क सरंक्षण
- ३ अटी
  - १) विशिष्ट परिस्थितीत
  - २) अंतिम मार्ग
  - ३) घटनात्मक मार्गांच्या अवलंबनानंतर
  - ४)परिणाम लक्षात घेऊन
  - ५)शांततापूर्ण मार्गाने
- ४ मार्ग
  - हिंसात्मक — क्रांती
  - अहिंसात्मक — सत्याग्रह

## ८.८ दिर्घोत्तरीय प्रश्न

१) राजकीय आबंधन म्हणजे काय? नागरिकांची काही महत्त्वाची राजकीय आबंधने कोणती? स्पष्ट करा.

२) राज्याच्या आज्ञा नागरिकांनी का पाळाव्यात?

३) राजकीय आबंधनाचे आधार सांगा? किंवा कारणे द्या?

४) राजकीय आबंधनाचा अर्थ आणि स्वरूप सांगा?

५) राजकीय आबंधनाचा अर्थ सांगून प्रकार सांगा?

६) प्रतिकार म्हणजे काय? प्रतिकार कोणत्या परिस्थितीमध्ये समर्थनीय असतो?

७) प्रतिकाराचे विविध मार्ग किंवा साधने सांगा?

८) टिपा द्या.

१) प्रतिकाराचा हक्क

२) राजकीय आबंधन

३) सत्याग्रह

❖❖❖❖

# ९

# मोड्यूल ५
# स्वातंत्र्य, समता आणि न्याय

**घटक रचना :**


९.० उद्दीष्ट

९.१ प्रस्तावना

९.२ स्वातंत्र्य

अ) अर्थ आणि व्याख्या

ब) स्वातंत्र्याचे वर्गीकरण किंवा प्रकार

क) स्वातंत्र्य संरक्षण करण्याच्या पध्दती

ड) सारांशतक्ता

९.३ समता

अ) समतेचा अर्थ आणि व्याख्या

ब) समतेचे प्रकार

क) समतेला आव्हाने

ड) सारांशतक्ता

९.४ न्याय

अ) न्यायाचा अर्थ, व्याख्या आणि बाजू

ब) न्यायाचे प्रकार

क) Procedural न्याय

ड) Distributive न्याय

इ) न्याय - सारांशतक्ता

९.५ दिर्घोत्तरी प्रश्न


## ९.० उद्दीष्ट

स्वातंत्र्य,समता, न्याय राज्याची मूलभूत मुल्ये आणि तत्वे आहेत. या तत्वांचा अभ्यास केल्याशिवाय राज्यशास्त्राचा अभ्यास होऊ शकत नाही. ही तत्वे समजून घेणे हे उद्दीष्ट या प्रकरणाचे आहे.

## १.१ प्रस्तावना

जागतिक राजकीय इतिहासामागे स्वातंत्र्य, समता, न्याय ही तत्वे होती. जगामध्ये अनेक क्रांत्या आणि बंड या मूल्यासाठी झाली होती. आधुनिक राष्ट्र-राज्यामध्ये नागरीकांना स्वातंत्र्य समता आणि न्याय या मुलभूत मूल्यांची हमी राज्यघटनेद्वारे देण्यात येते. मानवी जीवनासाठी आणि राष्ट्राच्या विकासासाठी ही मूल्ये मूलभूत असतात. या मुल्यांच्या स्थापनेशिवाय लोकशाही कार्य करु शकत नाही. म्हणूनच या मुल्यांना मुलभूत राजकीय मूल्ये म्हणतात.

## १.२ स्वातंत्र्य (Liberty)

**अ) अर्थ आणि व्याख्या :-**

स्वातंत्र्य ही संकल्पना १९ व्या शतकामध्ये उदयास आली आहे. लोकशाहीमध्ये या संकल्पनेला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे.

लिबर्टी हा शब्द लिबर (Liber) या लॅटिन शब्दापासून उदयास आला आहे. लिबर म्हणजे (Free) बंधनांचा अभाव होय. स्वातंत्र्याच्या मुख्यतः दोन बाजू आहेत. नकारात्मक (Negative) स्वातंत्र्य आणि सकारात्मक (Positive) स्वातंत्र्य. नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे बंधनांचा अभाव (absence of restraint) असा होतो. सकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तिला व्यक्तित्व विकास करण्याची संधी होय (freedom to do something).

**प्रा.लास्की** - "व्यक्तीला व्यक्तीविकासाची योग्य संधी आणि योग्य परिस्थिती असणे म्हणजे स्वातंत्र्य होय".

**डॉ.आशीर्वादम** म्हणतात - "एखाद्याच्या व्यक्तिमत्वाच्या अभिव्यक्तीसाठी आणि विकासासाठी संधी असणे म्हणजे स्वातंत्र्य होय".

**सीली** यांच्या मते "स्वातंत्र्य म्हणजे अतिशासनाचा विरोध होय".

**हर्बट स्पेन्सर** म्हणतात "अन्य व्यक्तींना अपाय न पोहोचविता कोणतीही गोष्ट करण्याची अनुमती असणे म्हणजे स्वातंत्र्य होय".

**स्वातंत्र्य संकल्पनेमध्ये अंतर्भूत मुद्दे :-**

१) स्वातंत्र्य म्हणजेच मोकळीक (Liberty implies freedom)

२) स्वातंत्र्य म्हणजे बंधने असलेली मोकळीक होय (Liberty does not mean absolute freedom) उचित व मर्यादीत बंधने स्वातंत्र्यावर असतात. समाजहिताच्या आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने स्वातंत्र्यावर काही मर्यादा असतात. बंधनरहित स्वातंत्र्यातून स्वैराचार अस्तित्वात येतो. उदा. भाषण स्वातंत्र्याचा हक्क आहे. परंतू समाजाची शांतता, सुव्यवस्था नष्ट होणार नाही अशा त-हेने या स्वातंत्र्याचा उपयोग घ्यावा लागतो (unrestrained liberty means Law of Jungle).

३) स्वातंत्र्यामध्ये कृतीचे, विचार करण्याचे, निर्णय घेण्याचे अशा जीवनाच्या सर्व अंगाना लागू असणाऱ्या स्वातंत्र्यांचा समावेश असतो.

४) स्वातंत्र्याला कायद्याचे पाठबळ असते. स्वातंत्र्याची व्याप्ती आणि मर्यादा कायद्याद्वारे स्पष्ट केलेल्या असतात (Liberty is usually backed by law. Law protects liberty).

५) समाजात आणि राज्यातच स्वातंत्र्याला खरा अर्थ प्राप्त होतो. राज्याचे कायदे, हक्कांच्या तरतूदी यामुळेच ख-या अर्थाने व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगता येते (It is responsibility of the state to create required conditions for enjoyment of liberty).

६) स्वातंत्र्य म्हणजे विशेषाधिकारांचा अभाव होय. जिथे लोकांना विशेषाधिकार देण्यात येतात तेथे स्वातंत्र्याला अर्थ नाही कारण हक्क देतांना राज्य समता तत्व पाळत नसेत तर अशा राज्यात स्वातंत्र्य नावापुरतेच असते.

**ब) स्वातंत्र्याचे प्रकार (Types of Liberty)**

स्वातंत्र्य खालीलप्रकारे विभाजित करता येते.
१) नैसर्गिक स्वातंत्र्य (Natural liberty)
२) वैयक्तिक किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य (Personal liberty)
३) राष्ट्रीय स्वातंत्र्य (National liberty)
४) राजकीय स्वातंत्र्य (Political liberty)
५) आर्थिक स्वातंत्र्य (Economic liberty)
६) नागरी स्वातंत्र्य (Civil liberty)
७) नैतिक स्वातंत्र्य (Ethical liberty)

**१) नैसर्गिक स्वातंत्र्य (Natural liberty) :-** Total and complete freedom म्हणजे नैसर्गिक स्वातंत्र्य होय.

निसर्गतः प्रत्येक मनुष्य स्वतंत्र असतो. म्हणूनच रुसो या विचारवंताने असे विधान केले होते की, “Man is born free but everywhere he is in chains”. मनुष्य जन्मतः स्वतंत्र असतो परंतू नंतर तो अनेक बंधनांमध्ये असतो. निसर्गावस्थेत राहणा-या मनुष्याला नैसर्गिक स्वातंत्र्य होते म्हणजे स्वातंत्र्यावर त्यावेळी कोणतीही बंधने नव्हती. अमर्यादित आणि बंधनरहीत ते स्वातंत्र्य होते. It was total and complete freedom. But it was a myth. नागरी समाजामध्ये नैसर्गिक स्वातंत्र्य असू शकत नाही (not possible in a civil society)

**२) वैयक्तिक किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य (Personal liberty) :-**

प्रत्येकाला आपल्या जीवनातील गोष्टी ठरविण्याचे स्वातंत्र्य असते. स्वतःच्या वैयक्तिक जीवनामध्ये कोणताही प्रयोग करण्यास प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र असते. उदा. जीवनातील शिक्षण, व्यवसाय, विवाह, जीवनशैली ठरविण्याचे प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य असते.

### ३) राष्ट्रीय स्वातंत्र्य (National liberty) :-

परकीय वर्चस्वापासून राष्ट्र सार्वभौम असणे (National Indepedence) म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य होय. अंतर्गत आणि बाहय बाबतीत राष्ट्राची स्वतंत्रता असणे लोकांच्या स्वातंत्र्यासाठी गरजेचे असते. राष्ट्रीय स्वातंत्र्य नसेल त्या राष्ट्रातील लोकांची स्थिती गुलामाप्रमाणे असते. नागरीकांच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य असणे ही पहिली अट आहे. It is foundation of all other liberties. उदा. भारताला १५ ऑगस्ट, १९४७ ला राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळाले.

### ४) राजकीय स्वातंत्र्य (Political liberty) :-

लोकशाही शासनपध्दतीमध्ये फक्त नागरीकांनाच राजकीय स्वातंत्र्य असते. राज्याच्या शासन आणि प्रशासनात लोकांचा सहभाग, वाटा आणि भूमिका म्हणजे राजकीय स्वातंत्र्य होय. शासकीय प्रक्रियांमध्ये सहभाग घेण्याचे स्वातंत्र्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्य होय. प्रौढ मताधिकार आणि शासकीय ध्येयधोरणांवर चर्चा याद्वारे प्रत्येक व्यक्ती आपआपल्या क्षमतेप्रमाणे शासनात सहभागी होते.

राजकीय स्वातंत्र्यामध्ये मतदानाचा हक्क, निवडणूकीला उभे राहण्याचा आणि शासकीय पद धारण करण्याचा हक्क, शासनावर टिका करण्याचा, शासनाला प्रतिकार करण्याचा हक्क अंतर्भूत आहेत.

राजकीय स्वातंत्र्यामुळे प्रत्येक नागरीकाला राज्यकारभारात भाग घेण्याची संधी प्राप्त होते. लास्की यांच्या मते राजकीय स्वातंत्र्याला तेव्हाच खरा अर्थ प्राप्त होतो जेव्हा लोक शिक्षित असतात आणि त्यांना देशातील घडामोडीची माहिती असते. असेच लोक जागृकपणे राजकीय स्वातंत्र्याचा लाभ घेतात. राजकीय स्वातंत्र्यामुळे शासन सत्तेचा दुरुपयोग करीत असेल तर लोक त्या शासनाला प्रतिकार करु शकतात. राजकीय स्वातंत्र्य त्या देशातील नागरीकांनाच असते.

### ५) आर्थिक स्वातंत्र्य (Economic liberty) :-

आर्थिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय आणि नागरी स्वातंत्र्याला काहीही अर्थ नाही. दारिद्रय, बेकारी, आर्थिक विषमता असेल तर लोक आपल्या गरजा पूर्ण करण्याच्या काळजीत राहतात. प्रत्येक व्यक्तीच्या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्याशिवाय त्या व्यक्तिचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. आर्थिक स्वातंत्र्यामुळे इतर स्वातंत्र्याला पोषक वातावरण निर्माण होत असते.

हॅराल्ड लस्कीच्या मते आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे “Security and the opportunity to find reasonable significance in the earning of one’s daily bread”. आर्थिक स्वातंत्र्यामध्ये काम करण्याचा हक्क, कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, नोकरीच्या संधी, कामाचा योग्य मोबदला मिळणे, स्त्री-पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन, कामाच्या जागी योग्य परिस्थिती, आर्थिक क्षेत्रात योग्यतेनुसार समान संधी इत्यादी स्वातंत्र्याचा समावेश होतो.

### ६) नागरी स्वातंत्र्य (Civil liberty) :-

समाजाचा आणि राज्याचा सदस्य या नात्याने व्यक्तीला नागरी स्वातंत्र्य देण्यात येते. (exists in a civil society) समाजामध्ये सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी आणि सर्वांगीण

प्रगतीसाठी प्रत्येक व्यक्तीला नागरी स्वातंत्र्याची गरज असते. प्रत्येक राज्यामध्ये मुलभूत हक्कांच्या स्वरुपामध्ये नागरीकांना नागरी स्वातंत्र्याची हमी देण्यात येते.

नागरी स्वातंत्र्यामध्ये खालील स्वातंत्र्याचा समावेश होतो. शारिरीक स्वातंत्र्य उदा. जीवन जगण्याचा हक्क, सुरक्षितता, बौध्दीक स्वातंत्र्य उदा. भाषण स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य आणि व्यावहारिक स्वातंत्र्य उदा. व्यावहारिक जीवनासाठी आवश्यक ते स्वातंत्र्य उदा. संचार स्वातंत्र्य, स्थायी होण्याचे स्वातंत्र्य इत्यादी.

नागरी स्वातंत्र्याची हमी शासनाकडून असते. परंतू नागरी स्वातंत्र्य अमर्यादित नाही. समाजहित आणि राज्यहितासाठी या स्वातंत्र्यावर राज्य बंधने टाकू शकते.

### ७) नैतिक स्वातंत्र्य (Ethical liberty) :-

स्वतःवर नियंत्रण ठेवण्याचे स्वातंत्र्य म्हणजे नैतिक स्वातंत्र्य. काम, क्रोध, लोभ, मोह, माया, भय, मत्सर हे माणसाचे शत्रू आहेत. त्यापासून दूर राहून प्रत्येक व्यक्तीला स्वतःला नियंत्रित करता यायला पाहिजे म्हणजे प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र राहू शकते.

प्राचीन ग्रीक विचारवंत प्लेटो, चाणक्य (कौटिल्य), महात्मा गांधी या विचारवंतांनी लोकांच्या नैतिक स्वातंत्र्यावर भर दिला होता. त्यांच्या मते लोक नैतिक दृष्टीने स्वतंत्र असतात तेव्हाच आदर्श समाज अस्तित्वात येतो. राज्यामध्ये समता आणि न्यायाची स्थापना होण्यास लोकांमध्ये नैतिक स्वातंत्र असावे असे त्यांचे मत होते.

## क) स्वातंत्र्याचे संरक्षक घटक (Safeguards of Liberty)

स्वातंत्र्याशिवाय व्यक्ती संपूर्ण आणि अर्थपूर्ण जीवन जगू शकत नाही. त्यामुळे लोकांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण राज्याने करणे आवश्यक असते. अमर्यादीत (absolute) स्वातंत्र्यामुळे समाजात “बळी तो कान पिळी” (might is right) हा न्याय प्रस्थापित होतो. असे होऊ नये राज्यातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा लाभ घेता यावा यादृष्टीने स्वातंत्र्य उपभोगण्यास योग्य परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी राज्याची असते. व्यक्ती स्वातंत्र्याला संरक्षण देऊन राज्य ही जबाबदारी पार पाडते. राज्यातील खालील घटक स्वातंत्र्याचे संरक्षण करीत असतात.
प्रत्येक राज्य आपल्या पध्दतीने स्वातंत्र्याला संरक्षण देत असते.

### १) लोकशाही :-

लोकशाही शासनपध्दतीत लोक आपल्या प्रतिनिधींना प्रश्न विचारु शकतात. त्यांना जबाबदार धरु शकतात. लोकशाही शासनपध्दतीमध्ये ख-या अर्थाने लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात नागरीकांना स्वातंत्र्य आणि समता देण्यात येते. लोकांमध्ये लोकशाही संस्कृतीचा विकास होण्यास विविध प्रकारचे स्वातंत्र्य लोकशाहीमध्ये देण्यात येते.

### २) सत्ताविभाजन आणि नियंत्रण :-

शासनाची सत्ता कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ या शाखांमध्ये विभागली असते. अशा प्रकारच्या सत्ता विभाजनामुळे सत्तेचे केंद्रीकरण होऊ शकत नाही. कारण सत्तेचे केंद्रीकरण व्यक्तिस्वातंत्र्याला धोकादायक असते. सत्ता विभाजनामुळे शासनकर्ते सहजासहजी

सत्तेचा दुरुपयोग करु शकत नाही. नागरीकांच्या स्वातंत्र्यामध्येही शासनकर्ते सहजासहजी हस्तक्षेप करु शकत नाही.

### ३) राज्यघटनेद्वारे मुलभूत हक्कांच्या स्वरुपामध्ये स्वातंत्र्याची हमी :-

राज्यघटनेमध्ये मुलभूत हक्कांची यादी दिलेली असल्यामुळे एकतर लोकांना त्यांच्या स्वातंत्र्याची हमी मिळते. लोकांच्या स्वातंत्र्याला बाधा येईल अशा त-हेने शासनकर्ते वागू शकत नाही. राज्यातील कुणीही लोकांच्या स्वातंत्र्याला बाधा आणली तर लोक न्यायालयाकडे दाद मागू शकतात. दुसरे म्हणजे राज्यघटनेमध्ये हक्कांची यादी दिलेली असल्यामुळे लोकांना आपल्याला कोणते हक्क स्वातंत्र्य आहे, त्या स्वातंत्र्याची व्याप्ती किती आहे, त्यावर कोणत्या मर्यादा आहेत याची कल्पना येते.

### ४) कायद्याचे राज्य :-

राज्य आणि कायदा याशिवाय खरे स्वातंत्र्य अस्तित्वात येऊ शकत नाही. जे राज्य कायद्याप्रमाणे चालते, कार्य करते अशाच राज्यामध्ये नागरीकांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण होते. कायद्याप्रमाणे राज्य म्हणजे शासनकारभार राज्यघटनेनुसार, घटनेतील नियमांप्रमाणे करण्यात येतो. प्रत्येकाला राज्यघटनेप्रमाणे वागावे लागते.

कायद्याच्या राज्यामुळे सर्व नागरीकांना कायद्याचे समान संरक्षण, कायद्यापुढे समान वागणूक मिळते. लोकांच्या स्वातंत्र्याला कायद्याचे पाठबळ असते. कुणीही व्यक्तिस्वातंत्र्याचे उल्लंघन करु शकत नाही. नागरीकांच्या हक्क स्वातंत्र्याचे उल्लंघन कुणी केल्यास नागरीक न्यायालयाकडे दाद मागू शकतात. म्हणजेच राज्याच्या कायद्यामुळे स्वातंत्र्याला संरक्षण मिळते.

### ५) स्वतंत्र न्यायव्यवस्था :-

लोकांना नि:पक्षपातीपणे न्याय मिळावा आणि लोकांच्या हक्क स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे म्हणून स्वतंत्र न्यायव्यवस्था आवश्यक असते.
कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि इतर प्रकारच्या हस्तक्षेपापासून नियंत्रणापासून मुक्त न्यायव्यवस्था म्हणजे स्वतंत्र न्यायव्यवस्था होय.

लोकांच्या हक्क स्वातंत्र्याची पायमल्ली झाल्यास त्याच्या संरक्षणासाठी लोक न्यायालयाकडे जातात. स्वतंत्र न्यायव्यवस्था असल्यामुळे न्यायधीश लोकांना नि:पक्षपाती न्याय देऊन त्यांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करु शकतात.

### ६) स्वतंत्र वृत्तपत्र :-

वृत्तपत्र, टि.व्ही., रेडिओ ही प्रसारमाध्यमे लोकांच्या स्वातंत्र्याचे रक्षक म्हणू कार्य करतात. हक्क स्वातंत्र्याचा भंग होणा-या घटना, स्वातंत्र्याची गळचेपी करणा-या घटना, शासनाची दडपशाही यावर प्रकाश टाकून त्याबाबतीत लोकमताला जागृक करण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करतात.म्हणूनच वस्तूस्थितीनिष्ट बातम्या देणारे आणि शासकीय नियंत्रणापासून मुक्त असे वृत्तपत्र असणे आवश्यक आहे.शासकीय हस्तक्षेपापासून आणि नियंत्रणापासून प्रसारमाध्यमे मुक्त असणे म्हणजेच स्वतंत्र वृत्तपत्र होय.

### ७) लोकांची जागरुकता :-

सुदृढ आणि जागृक लोकमत स्वातंत्र्याची सर्वात मोठी हमी होय.स्वतःच्या हक्क स्वातंत्र्याविषयी लोकांमध्ये जर अज्ञान असेल तर हक्कस्वातंत्र्याच्या तरतूदींना काहीही अर्थ राहत नाही. स्वतःच्या स्वातंत्र्य व हक्कांविषयी जागृक असण हा स्वातंत्र्याचा मुलाधार आहे. जोपर्यंत स्वातंत्र्याविषयी ओढ आंतरीक इच्छेतून व्यक्त करीत नाही तोपर्यंत स्वातंत्र्याला संरक्षण मिळत नाही. लोकांनी स्वातंत्र्यासाठी सतत लढा देण्याची तयारी ठेवावी.

### ८) समता :-

स्वातंत्र्याची दुसरी बाजू म्हणजे समता होय. समतेअभावी स्वातंत्र्य विशेषाधिकार बनतो. राज्यात जात, धर्म, वंश, लिंग इत्यादी आधारावर कोणताही भेदभाव असता कामा नये. राज्यातील सर्व नागरीकांना कोणताही भेदभाव न होता समान स्वातंत्र्याची प्राप्ती मिळाली तरच त्या स्वातंत्र्याचा प्रत्येकाला उपभोग घेता येतो. सर्व नागरीकांना समान वागणूक, समान संधी, समान कायदा असेल तरच प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य सुरक्षित राहते.

### ९) आर्थिक विवंचनापासून मुक्तता :-

भूक, दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता इत्यादी प्रकारच्या आर्थिक विवंचनापासून नागरीक मुक्त असेल तरच ते स्वातंत्र्याचा ख-या अर्थाने उपभोग घेऊ शकतात. म्हणूनच स्वातंत्र्य उपभोगता येण्यास आवश्यक पूरक परिस्थिती राज्यात निर्माण करणे शासनाचे एक महत्वाचे कार्य आहे.

### १०) घटनात्मक उपायांचा हक्क :-

हक्कस्वातंत्र्यावर एखाद्या संस्थेने, शासनाने, व्यक्तीने आक्रमण केल्यास त्या अन्यायाविरुध्द दाद मागण्याचा हक्क व्यक्तीला असणे आवश्यक आहे. हा हक्क घटनात्मक उपाययोजना या हक्काच्या स्वरुपात आहे. या हक्काप्रमाणे व्यक्ती आपल्या हक्कस्वातंत्र्य संरक्षणासाठी न्यायालयाकडे जाऊ शकते. न्यायालय हक्कभंग करणा-याला आदेश देऊन त्याप्रमाणे योग्य ती कारवाई करीत असते.

**निष्कर्ष :-** राज्याने केलेल्या तरतुदींमुळे आणि वरील घटकांमुळे नागरीकांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण होते. स्वातंत्र्य हे तत्व लोकशाहीचा एक महत्वाचा खांब (pillar) आहे. तसेच मानवी जीवनाचे मानवी व्यक्तिमत्व विकासाचे एक महत्वाचे साधन आहे.

### ड) सारांश

**तक्ता**

**स्वातंत्र्य (Liberty)**

- १ स्वातंत्र्य म्हणजे काय ?
  - १)उदय
  - २)स्वातंत्र्याच्या दोन बाजू
    - सकारात्मक स्वातंत्र्य
    - नकारात्मक स्वातंत्र्य
  - ३)आर्शीवादम
  - ४)हर्बट स्पेन्सर
- २ स्वातंत्र्यामध्ये समाविष्ट मुद्दे
  - १)मोकळीक
  - २)लोकिहतासाठी बंधने
  - ३)जीवनाच्या सर्व अंगाना लागू होणारे
  - ४) कायद्याचे पाठबळ
  - ५) समाज व राज्य आवश्यक
  - ६)भेदभाव नसावा
- ३ प्रकार
  - १)नैसर्गिक
  - २)व्यक्तिगत
  - ३)राष्ट्रीय
  - ४)राजकीय
  - ५)आर्थिक
  - ६)नागरी
  - ७)नैतिक
- ४ संरक्षक घटक
  - १)लोकशाही
  - २)सत्ताविभाजन
  - ३) राज्यघटना
  - ४)कायद्याचे राज्य
  - ५)स्वतंत्र न्यायव्यवस्था
  - ६)स्वतंत्र वृत्तपत्र
  - ७)लोकमत
  - ८)समता
  - ९)आर्थिक विवंचने पासून मुक्तता
  - १०)घटनात्मक उपाययोजना

## १.३ समता (Equity)

स्वातंत्र्याप्रमाणेच समता हे त्तव सुध्दा लोकशाहीचे महत्वाचे तत्व आहे.

अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाच्या घोषणेमध्ये (१७७६) असे म्हटले आहे की, “All men are created equal, that they are endowed by their creator with certain unalienable rights”. देवाने सर्वांना समान बनविले आहे आणि समान अदयेय असे हक्क दिले आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीने घोषित (१७८९) केले होते की, “Men are born and live free and equal in their rights”. जन्मतः सर्वांना समान हक्क स्वातंत्र्ये असतात. सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी समता आणणे आवश्यक असते.

### अ) समतेचा अर्थ :-

**सर्वसाधारणपणे समता म्हणजे सारखेपणा (sameness)** असे समजतात. परंतू समता म्हणजे सारखेपणा नाही. कारण निसर्गतः प्रत्येक व्यक्तिचा रंग, उंची, बौध्दीक क्षमता, मानसिकता या बाबतीत सारखेपणा नाही; विविधता आढळते. अशाप्रकारची नैसर्गिक विषमता नष्ट करुन सारखेपणा आणणे शक्य नाही. Natural inequality is afact.

**समता म्हणजे मानवनिर्मित (Manmade inequalities)** विषमता आणि भेदभाव नष्ट करणे होय.उदा. जात, धर्म, लिंग, वंश इत्यादी आधारावर एक माणूस दुसरा माणूस यांच्यात भेदभाव करण्यात येतो. त्यातूनच श्रेष्ठ-कनिष्ठता, उच्चनिच भेदभाव येतात. अशा त-हेच्या मानवनिर्मित भेदभावांमुळे काहींना विशेषाधिकार मिळतात तर काही लोकांच्या शोषणाला ते कारणीभूत होतात. हे मानवनिर्मित भेदभाव कायदा करुन नष्ट करणे, सर्वांना समान हक्कांची प्राप्ती करुन देणे म्हणजे समता प्रस्थापित करणे होय.

**हॅराल्ड लॉस्की** यांच्या मते समता म्हणजे “a leveling process” आहे. सर्वांना समान पातळीवर आणण्याची प्रक्रिया होय.

**समता म्हणजे** १) absence of special privileges २) adequate opportunities and facilities to all.
समता या संकल्पनेमध्ये खालील मुद्दे समाविष्ट होतात:-
१)समान वागणूक (identity of treatment)
२)समान दर्जा व पातळी (a Leveling Process)
३)समान संधी (equal opportunities)
४)विशेषाधिकारांचा अभाव (absence of special privileges)
५)आवश्यक गोष्टी सर्वांना उपलब्ध होणे (Essential things must be provided to all.)

**ब) समतेच्या विविध बाजू आणि प्रकार (Types of Equality)**

१) नागरी समता (Civil equality)
२) सामाजिक समता (Social equality)
३) राजकीय समता (Political equality)
४) आर्थिक समता (Economic equality)
५) वैधानिक समता (Legal equality)

**१) नागरी समता (Civil equality) :-**

सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी ज्या नागरी हक्क आणि स्वातंत्र्याची गरज असते ते हक्कस्वातंत्र्य उपभोगण्याची समान संधी प्रत्येक नागरीकाला मिळणे म्हणजे नागरी समता होय. भाषण आणि विचार स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, शिक्षण स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तिला जात, धर्म, लिंग इत्यादी आधारावर भेदभाव न करता मिळणे म्हणजे नागरी समता होय. अर्थात नागरी समता प्रस्थापित होण्यासाठी वैधानिक समता असावी लागते.

**२) सामाजिक समता (Social equality) :-**

सामाजिक स्थळी जात, धर्म, लिंग, वंश इत्यादी आधारावर भेदभाव न करणे (absence of distinction) म्हणजे सामाजिक समता होय. उदा. सार्वजनिक विहीर, रस्ते, वाहने, सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी खुली असणे. कायद्यानुसार सार्वजनिक स्थळी समता प्रस्थापित करण्यात आली आहे. (Absence of distinction in respect of social status)

सामाजिक समता ख-या अर्थाने लोकशाही निर्माण होण्यासाठी आवश्यक असते. समाजामध्ये समता असणे राजकीय समतेसाठी गरजेचे असते. सामाजिक समता कायद्यद्वारे प्रस्थापित करण्यात आली आहे परंतु ख-या अर्थाने सामाजिक समता येण्यासाठी लोकांच्या वृत्तीमध्येसुध्दा बदल व्हायला पाहिजे.

### ३) राजकीय समता (Political equality) :-

राजकीय शासन प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची समान संधी आणि समान हक्कस्वातंत्र्याची हमी असणे म्हणजे राजकीय समता होय. उदा. भारतात राजकीय हक्कस्वातंत्र्य नागरीकांना देण्यात आले आहे. प्रौढ मताधिकार तत्व स्विकारले आहे.

अर्थात उदार लोकशाही शासनपध्दतीमध्ये राजकीय समता असते. लस्की यांच्या मते राजकीय समता प्रस्थापित होण्यासाठी आर्थिक समता असणे आवश्यक असते.

### ४) आर्थिक समता (Economic equality) :-

प्रत्येकाला आर्थिक विकास करण्याची समान संधी मिळणे म्हणजे आर्थिक समता होय. प्रत्येक व्यक्तीला योग्यतेनुसार काम, कामाप्रमाणे वेतन, समान कामासाठी समान वेतन, व्यवसाय स्वातंत्र्य असणे आर्थिक समतेसाठी आवश्यक असते. आर्थिक समता म्हणजे संपत्तीचे समान वाटप नव्हे. संपत्तीचे समान वाटप करणे शक्य नाही. प्रत्येकाला गरजा पूर्ण होण्याइतपत मिळणे म्हणजे आर्थिक समता होय.

इतिहासाचे अवलोकन केल्यास असे आढळते की, अनेक क्रांत्या, बंड, दहशतवाद आर्थिक विषमतेतून झाल्या आहेत. कारण आर्थिक समता सर्व प्रकारच्या समतेचा आणि स्वातंत्र्याचा पाया आहे. समाजवादी विचारसरणी, साम्यवादी विचारसरणी, महात्मा गांधींची विश्वस्तता संकल्पना आर्थिक समता कशी आणावी यासंबंधी आहे.

भारतात आर्थिक समता प्रस्थापित व्हावी म्हणून व्यवसाय स्वातंत्र्य, समान कामासाठी समान वेतन, विशिष्ट उत्पन्नापलिकडे जास्त उत्पन्न असणा-यांवर कर इत्यादी अनेक तरतूदी करण्यात आल्या आहेत.

त्याशिवाय आर्थिक समतेमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

१) उत्पन्न आणि संपत्तीचे केंद्रीकरण होता कामा नये.
२) आर्थिक विषमता आणि आर्थिक शोषण नष्ट करणे.
३) प्रत्येकाला चांगले जीवन जगण्यासाठी पुरेशा संधी असणे.

### ५) वैधानिक समता (Legal equality) :-

सर्व लोकांसाठी एकच कायदा असणे, कायद्यापुढे समानता आणि सर्व नागरिकांना समान वागणूक असणे म्हणजे वैधानिक समता होय. कायद्यापुढे जात, लिंग, वंश, धर्म इत्यादी आधारावर भेदभाव न करता सर्व नागरीकांना कायद्याची समान वागणूक असणे म्हणजे वैधानिक समता होय.

भारतीय राज्यघटनेप्रमाणे ‘समता’ प्रस्थापित होण्यास खालील तरतुदी केल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ मध्ये समतेच्या हक्कांची तरतूद केली आहे.

कलम १४ – हे कलम कायद्यापुढे समानता (equality before law) संबंधी आहे. कायद्याद्वारे कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक, समान संरक्षण देण्यात आले आहे.

कलम १५ - सार्वजनिक स्थळी वंश, जात, लिंग, धर्म इत्यादी आधारांवर कोणताही भेदभाव करण्यात येणार नाही यासंबंधी आहे.

कलम १६ - सर्व लोकांना समान संधी आणि समान दर्जा यावर आहे.

कलम १७ - अस्पृश्यता पाळणे कायद्याद्वारे गुन्हा आहे.

कलम १८ - विशेषाधिकार देणा-या पदव्या नष्ट करणे. पात्रता आणि गुणवत्तेनुसार एखाद्याला पदवी दिली तरी त्यासाठी विशेषाधिकार देण्यात येणार नाही.

याशिवाय राज्याची मार्गदर्शक तत्वे अंतर्भूत केली आहे. ज्यामध्ये आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी राज्याने अनेक उपाय योजावेत यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

## क) समता प्रस्थापित होण्याच्या मार्गातील अडथळे (Challenges to Equality) किंवा समतेला आव्हाने.

### १) कायदा आणि वास्तविकता यातील दरी :-

बहुतेक लोकशाही देशांनी समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने राज्यघटनेमध्ये तरतूदी केल्या, कायदे केले आणि त्या कायद्यांची अंमलबजावणी केली आहे. तरीही वास्तवामध्ये समता प्रस्थापित होण्यामध्ये अनेक अडचणी दिसून येतात. उदा. भारतात अस्पृश्यता पाळणे गुन्हा असला तरी गुप्त मार्गाने पाळली जाते. आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कायदा असूनही दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांना इतर समता आणि स्वातंत्र्य उपभोगता येत नाही.

### अ) सामाजिक कारण :-

प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा यावर विश्वास ठेवून अनेक लोक सर्वांना समान सामाजिक दर्जा द्यायला तयार होत नाहीत. लोकांच्या वृत्तीमध्ये आणि मानसिकतेमध्ये अजूनही बदल न झाल्यामुळे अप्रत्यक्षरित्या भेदभाव होतात. सामाजिक विषमता कायद्याव्दारे सहज नष्ट केली जाऊ शकत नाही. त्यासाठी लोकांनी संकुचित मनोवृत्ति सोडायला हवी.

### ब) आर्थिक कारण :-

श्रीमंत आर्थिक सुबत्तेच्या आधारावर राजकीय हक्कांचा उदा. निवडणूकीला उभे राहणे, राजकीय पद धारण करणे या स्वातंत्र्याचा फायदा घेतात. याउलट सर्वसामान्य या राजकीय स्वातंत्र्याचा विचारही करु शकत नाही. ज्यांच्याकडे संपत्ति आहे ते त्याचा फायदा घेतात आणि संपत्ति नसणाऱ्यांचे शोषण करतात.

### क) राजकीय कारण :-

राजकीय पदे विशिष्ट कुटुंबाची आणि जातीची मक्तेदारी झाली आहे. संघटित राजकीय पक्ष वर्षोनुवर्ष सत्ता उपभोगतात. त्यामुळे समता धोक्यात आहे.

### ड) शिक्षण आणि जागृकतेचा अभाव :-

लोकांमध्ये हक्कस्वातंत्र्य, शासकीय धोरणे त्यांची अंमलबजावणी याविषयीचे अज्ञान आढळून येते. जोपर्यंत लोकांना स्वातंत्र्य, समता, न्याय, हक्क यादृष्टीने असलेली शासकीय धोरणे यांची जाणीव येत नाही तोपर्यंत फक्त कायद्याच्या आधारे ख-या अर्थाने समता प्रस्थापित होणे अडचणीचे आहे.

### इ) भारताच्या संदर्भात :-

भारतातील जातीव्यवस्था, सरंजामशाही पध्दती, ब्रिटिशांनी प्रोत्साहन दिलेली भाडवलशाही, ग्रामीण शहरी विषमता, स्वातंत्र्यानंतर लोकशाहीच्या नावाखाली निर्माण झालेला स्वार्थीपणा, भ्रष्टाचार, सत्तेचा दुरुपयोग इत्यादी गोष्टी समता प्रस्थापित होण्याच्या मार्गातील अडथळे आहेत.

### समतेचे महत्व (Importance of Equality)

१) शांततापूर्ण समाज समतेच्या पायावरच निर्माण होऊ शकतो. असमता या घटकांमुळे क्रांती, बंड झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. कारण असमतेतून अन्याय जन्मास येतो. म्हणून न्याय आणि शांततापूर्ण समाज स्थापन होण्यास समाजात समता असणे आवश्यक आहे.

२) स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास समता आवश्यक आहे. (equality is a necessary precondition for enjoyment of liberty)

३) लोकशाही शासनव्यवस्था यशस्वी होण्यासाठी सर्व क्षेत्रातील समता असणे गरजेचे आहे. कारण लोकशाही म्हणजेच सर्व लोकांचा सहभाग असलेली शासनपध्दती होय. लोकशाहीमध्ये समतेअभावी सर्व लोकांचा सहभाग शासनामध्ये झाला नाही तर ती लोकशाही व्यवस्था विशिष्ट लोकांची मक्तेदारी असलेली पध्दती होईल. समता हे मूल्य लोकशाहीचा महत्त्वाचा खांब आहे.

४) सुसंस्कृत, सुदृढ न्याय समाजरचना अस्तित्वात येण्यासाठी त्या समाजात समता आणि स्वातंत्र्य दोन्ही हातात हात घालून जोडूनच प्रस्थापित व्हायला पाहिजे.

### ड) सारांश :-

समता (Equality)

- १ समतेचा अर्थ समता म्हणजे काय ?
  - १)सारखेपणा नाही
  - २)मानवनिर्मित भेदभाव नष्ट करणे
  - ३)लास्की समान पातळीवर आणणे
- २ समता संकल्पनेत अंतर्भुत मुद्दे
  - १)समान वागणूक
  - २)समान दर्जा
  - ३)समान संधी
  - ४)विशेषाधिकार नसणे
  - ५)आवश्यकता पूर्ण होणे
- ३ समतेचे प्रकार
  - १)नागरी
  - २)सामाजिक
  - ३)राजकीय
  - ४)आर्थिक
  - ५)वैधानिक
- ४ अडथळे
- ५ समतेचे महत्व

## १.४ न्याय (Justice)

### अ) न्यायाचा अर्थ

न्याय या कल्पनेच्या बाबतीत विविध प्रकारच्या छटा दिसून येतात. सर्वसामान्यतः न्यायधिशाने दिलेला न्याय असा न्यायाचा अर्थ कायद्याची व्यक्ति सांगेल.

न्याय (Justice) हा शब्द लॅटिन शब्द Justitia या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे. या शब्दाचा अर्थ एकत्र बांधणे किंवा जोडणे (joining or fitting) असा होतो. म्हणजेच Justice एक बंध (bond) आहे जो मानवी संबंधामध्ये एका माणसाला दुस-याशी जोडतो.

**बार्कर** या राज्यशास्त्राज्ञाच्या मते 'न्याय' हे तत्व bond म्हणजे एकाला दुस-याशी जोडणारे बंध आहे; शिवाय न्यायतत्व 'अनेक राजकीय मुल्यांचे मिश्रण आहे.' (synthesis of political values) उदा. स्वातंत्र्य, समता, हक्क, बंधूता, आदर, प्रतिष्ठा या सर्व मुल्यांचे एकत्रिकरण केल्यास 'न्याय' निर्माण होतो. **सिफॉल्स** यांच्या मते, प्रत्येकाने आपला शब्द पाळणे म्हणजे न्याय होय.

**प्लोटो** या प्राचीन ग्रीक विचारवंताने न्याय ही संकल्पना "समाजहिताशी जोडली आहे. समाजातील प्रत्येक वर्गाने आपआपले कार्य करणे आणि इतरांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे म्हणजे न्याय प्रस्थापित होतो".असे प्लेटोचे मत होते.

**ॲरिस्टॉटल** या विचारवंताने 'डिस्ट्रिब्युटीव्ह जस्टीस' ची कल्पना मांडली आहे. त्याच्या मते न्याय म्हणजे "समाज जीवनातील सर्व फायदे आणि तोटे समाजातील सर्व लोकांमध्ये लोकांच्या क्षमता आणि पात्रतेनुसार विभाजीत करणे म्हणजे न्याय होतो".

**महात्मा गांधीं** च्या मते 'रामराज्य म्हणजेच न्यायराज्य' होय. "राज्यामध्ये समता, स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा प्रस्थापित करणे म्हणजे न्याय होय".

**अर्नेस्ट बार्कर** यांच्या मते "स्वातंत्र्य आणि समता या मुल्यांचा मेळ व समन्वय घडवून आणणे म्हणजे न्याय होय".

**न्यायाचा तत्वज्ञानात्मक अर्थ** म्हणजे "योग्य आणि चांगली व्यवस्था (right order) आणणे म्हणजे न्याय होय".

### न्यायाच्या विविध बाजू (Dimensions of Justice)

१) वैधानिक न्याय (Legal Justice)
२) राजकीय न्याय (Political Justice)
३) न्यायाची सामाजिक बाजू (Social dimension of Justice)
४) न्यायाची आर्थिक बाजू (Economical dimension of Justice)

### १) वैधानिक न्याय (Legal Justice) :-

कायदे म्हणजेच राज्याचे नियम होय. राज्याने मान्य केलेले ते नियम असतात. या कायद्यांचा अर्थ लावण्याचे काम न्यायमंडळ करीत असते. राज्याच्या कायद्याप्रमाणे सर्व संस्था, संघटना, नागरीक यांचे हक्क आणि कर्तव्ये नमूद केलेले असतात. कायद्याप्रमाणे जो चूक करतो त्याला शिक्षा देण्यात येते. देशाची घटना, कायदेमंडळाने केलेले कायदे न्यायाची कायदेशीर बाजू निश्चित करतात. राज्यामध्ये सर्व नागरीकांसाठी समान कायदे, कायद्याचे सर्वांना समान संरक्षण, कायद्याप्रमाणे राज्य या तरतूदी न्याय प्रस्थापित करण्यासाठीच असतात. कायद्याच्या माध्यमातून न्याय आणणे म्हणजेच न्यायाची वैधानिक बाजू होय. कायद्याच्या व्दारे राज्यामध्ये न्याय परिस्थिती निर्माण करणे होय.

### २) राजकीय न्याय (Political Justice) :-

लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये राजकीय न्यायाची हमी देण्यात येते. लोकशाही संस्थांची स्थापना राजकीय न्यायाच्या प्रस्थापनेसाठी करण्यात येते. उदा. प्रौढ मताधिकार पध्दती, निवडणूका, स्वतंत्र न्यायव्यवस्था, लोकसंमतीवर आधारीत प्रतिनिधी कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळामध्ये, लोकांना हक्क व स्वातंत्र्याची हमी, अल्पसंख्यांकाना संरक्षण इत्यादी तरतूदी . या संस्थांमुळे राज्यकारभारात भाग घेण्याची समान संधी नागरीकांना मिळते आणि राजकीय न्याय प्रस्थापित होतो.

### ३) न्यायाची सामाजिक बाजू (Social Justice) :-

सर्व प्रकारचे भेदभाव आणि विशेषाधिकार जे जात, धर्म, लिंग, वंश इत्यादी आधारावर असतात ते नष्ट करणे म्हणजेच सामाजिक न्याय होय.

सामाजिक व्यवहारांमध्ये प्रत्येक व्यक्तीला समान संधी देणे, दूर्बल घटकांना विशेष सवलती देऊन त्यांचा विकास घडवून आणणे, राज्यातील सर्व प्रकारच्या सेवा आणि वस्तूंचे सर्व समाजघटकांमध्ये योग्य वाटप करणे, सर्व प्रकारचे शोषण थांबविणे इत्यादींचा समावेश सामाजिक न्यायामध्ये होतो.

### ४) आर्थिक न्याय (Economical Justice) :-

आर्थिक न्याय म्हणजे ‘वर्ग’ (श्रीमंत-गरीब) या आधारावर भेदभाव न करणे आणि आर्थिक विषमता नष्ट करणे होय. Non-discrimination between men on the basis of economic values म्हणजे आर्थिक न्याय होय.

साम्यवादी, समाजवादी विचारसरणी आणि महात्मा गांधींच्या विश्वस्तता कल्पना आर्थिक न्यायावर अतिशय भर देतात. कारण समाजामध्ये आर्थिक न्याय असेल तरच सामाजिक, राजकीय, वैधानिक न्यायाला अर्थ प्राप्त होतो. उदा. उपाशी व्यक्ती पोट भरण्याशिवाय दुस-या कशाचाही विचार करु शकत नाही.

आर्थिक न्याय राज्यामध्ये प्रस्थापित व्हावा म्हणून साम्यवादी विचारवंतांनी ‘वर्गविहीन’ व्यवस्था स्थापन करण्यावर भर दिला. समाजवाद्यांनी आर्थिक व्यवस्थेवर राज्याने काही प्रमाणात नियंत्रण ठेवावे यावर भर दिला होता. महात्मा गांधींनी कुटीरोद्योग व्यवस्था आणि स्वावलंबन, परस्पर सहकार्य यावर भर दिला होता.

सर्वसाधारणपणे शासकीय कार्यक्रमात आर्थिक न्याय आणण्यासाठी खालील गोष्टी केल्या आहेत. राज्यनियंत्रित उत्पादन, आर्थिक नियोजन, जमीन सुधारणा कायदे, वस्तूंचे उत्पादन, वितरण, किंमती यावर राज्याचे नियंत्रण इत्यादी.

न्यायाच्या वरील बाजू एकमेकांवर आधारीत आणि परस्परपूरक आहेत. न्यायाच्या या सर्व बाजूंची अंमलबजावणी झाली तरच राज्यात खऱ्याअर्थाने न्याय प्रस्थापित होतो.

## ब) न्यायाचे प्रकार (Types of Justice) :-

१) कार्यपध्दतीविषयक न्याय (Procedural Justice)
२) वितरणात्मक न्याय (Distributive Justice)
३) Restorative Justice
४) Retributive Justice

### १) कार्यपध्दतीविषयक न्याय (Procedural Justice) :-

**अर्थ :-** न्याय हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जी कार्यपध्दती (Method) असते ती योग्य असणे म्हणजे 'कार्यपध्दतीविषयक न्याय' होय. (Procedural Justice means fairness in the methods of securing justice) राजकीय दृष्ट्रीने कार्यपध्दतीविषयक न्याय म्हणजे न्याय देण्यासाठी योग्य वैधानिक पध्दती (lawful procedure) असणे होय.

**महत्त्व :-** कार्यपध्दतीविषयक न्याय प्रस्थापित होणे अतिशय महत्वाचे आहे. कारण

१) न्याय समाजव्यवस्था स्थापन करण्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे त्या समाजामध्ये कार्यप्रणाली, कार्यपध्दतीमध्ये न्यायता असावी लागते. (Procedural Justice is the foundation of a just society)
२) कार्यपध्दतीविषयक न्यायामध्ये न्यायाच्या सर्व (चार) बाजू समाविष्ट असतात (It encompasses three dimensions of justice) वैधानिक न्याय, राजकीय न्याय, सामाजिक न्याय. न्यायाच्या या बाजू परस्परपूरक आहेत. राज्यामध्ये कार्यपध्दतीच्या बाबतीत न्यायता असेल तर वरील न्यायाच्या सर्व बाजू साध्य होतात.

**अटी :-** कार्यपध्दतीविषयक न्याय प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक अटी (conditions) :-

१) न्याय देणारी योग्य यंत्रणा (Proper and just judicial machinery and processes) म्हणजेच योग्य न्यायव्यवस्था असणे गरजेचे असते.
२) योग्य कायदे (Laws governing these operations should be just)

सर्व नागरीकांसाठी समान कायदेपध्दती आणि समान न्यायविषयक यंत्रणा असावी. उदा. एखाद्या गुन्हेगाराला पोलीस लॉकअपमध्ये ठेवण्यापासून ते कोर्टापुढे उभे करण्यापर्यंत समान कार्यपध्दती असावी.

कार्यपध्दतीविषयक न्यायाच्या अटीमध्ये योग्य न्यायव्यवस्था आणि योगय कायदेपध्दती या दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. योग्य न्यायव्यवस्था आणि योग्य कायदेपध्दती यामध्ये खालील गोष्टींचा (crieteria) समावेश असावा.

१) **पारदर्शकता (Transparency) :-** न्याययंत्रणेची पध्दती आणि कायदेपध्दतीमध्ये पारदर्शकता (openness) असावी. उदा. न्यायालयाने एखाद्या बाबतीत जो निर्णय दिला असेल; तो निर्णय कोणता दिला, कसा दिला, का दिला याची सर्व माहिती सर्व नागरीकांना मिळायला हवी. न्यायधिशांनी दिलेल्या न्यायामागे विशिष्ट कारणे असतात. उदा. एखाद्या खुन्याला आजन्म तुरुंगवासाची शिक्षा देण्यात येते तर एखाद्याला फाशीची शिक्षा देण्यात येते. या दोन्ही खटल्यांमध्ये वेगवेगळी शिक्षा का याबाबतीत सर्व प्रकारची माहिती लोकांना मिळाल्यास न्यायालयीन कार्यपध्दतीच्या पारदर्शकतेमुळे योग्य न्याय मिळाला किंवा नाही याची समज मिळते.

२) **एकात्मकता (Uniformity) :-** न्यायप्रक्रियेमध्ये एकात्मकता असावी. उदा. दोन व्यक्तींनी समान गुन्हा केला तर त्या गुन्हयांसाठी दोघांनाही कोणताही भेदभाव न होता समान शिक्षाच व्हायला पाहिजे किंवा बरेचदा गुन्हा सारखाच असतो पण तो गुन्हा करण्याची पध्दती आणि कारण वेगवेगळे असते. अशावेळी दोन्ही गुन्हयांचे खटले वेगवेगळया पध्दतीने न्यायालयाने हाताळावेत.

३) **सातत्य (Consistency) :-** कार्यपध्दतीमध्ये सातत्य असावे.

४) **नि:पक्षपाती आणि तटस्थवृत्ती :-** कायदे करणारे, कायदे अंमलात आणणारे आणि कायद्याचा अर्थ लावणारे न्यायमंडळ नि:पक्षपाती आणि तटस्थ वृत्तीने काम करणारे असावे.

अशाप्रकारे देशातील कार्यपध्दती आणि कार्यप्रणालीमध्ये योग्यता व न्यायता असणे आवश्यक आहे.

**सारांश**

कार्यपध्दतीविषयक न्याय
Procedural justice

- १ कार्यपध्दतीविषयक न्यायाचा अर्थ – योग्य कायदेपध्दती असणे व त्याप्रमाणे कार्य होणे
- २ महत्व न्यायसमाजरचना स्थापन करणे
- ३ प्रस्थापित होण्यास अटी
  - १)योग्य न्यायव्यवस्था
  - २)योग्य कायदे
  - ३)कार्यप्रणालीत पारदर्शकता
  - ४)एकात्मकता
  - ५)सातत्य
  - ६)तटस्थवृत्तीने काम करणारे

## वितरणात्मक न्याय (Distributive Justice) :-

**अर्थ :-** वितरण म्हणजे विभागणे किंवा वाटणे. समाजाच्या प्रत्येक घटकाला त्याचा योग्य वाटा मिळणे म्हणजे वितरणात्मक न्याय होय. राजकीय दृष्टीने वितरणात्मक न्याय म्हणजे आर्थिक साधनांचे, वस्तूंचे (Economic resources) समाजाच्या सर्वांमध्ये योग्य व न्याय वाटणी करणे होय. वितरणात्मक न्याय म्हणजेच आर्थिक न्याय होय.

वितरणात्मक न्यायामध्ये आर्थिक न्याय समाविष्ठ आहे. राष्ट्राच्या संपत्तीमध्ये राष्ट्रातील प्रत्येक नागरीकाला योग्य वाटा मिळायला हवा.
वितरणात्मक न्याय प्रस्थापित करण्याच्या मार्गात खालील **अडचणी** येतात.

१) वितरणाची साधने कोणती आहेत याचा निश्चित अंदाज घेणे कठीण असते.

२) प्रत्येकाला हे वितरण कुणी करावे आणि कोणत्या पध्दतीने करावे हे ठरविणे कठीण असते.

३) वितरणाप्रमाणे प्रत्येक घटकाला त्याचा वाटा मिळाला किंवा नाही हे लक्षात घेणे.

उदा. केंद्रशासनाकडून महाराष्ट्राला दुष्काळग्रस्त फंड मिळाला. परंतू त्या फंडातील किती आणि कोणकोणत्या भागांना फंड द्यावा. मराठवाडा, विदर्भ, कोकण यापैकी कोणाला जास्त आणि कोणाला कमी द्यावा. त्या-त्या भागाला तो फंड दिल्यानंतर त्यातील निधी दुष्काळग्रस्तांपर्यंत खरेच पोहचला किंवा नाही इत्यादी अडचणी वितरणात्मक न्याय प्रस्थापित करतांना येतात. भारतात दुर्बल घटकांसाठी राखीव जागा आहेत. परंतू या राखीव जागांचा फायदा दुर्बल घटकांना बरेचदा होतच नाही असे दिसते. म्हणजेच वितरणात्मक न्याय आणण्यासाठी तरतूदी अनेक आहेत. वास्तवामध्ये त्या तरतूदींची अंमलबजावणी करण्यामध्ये अनेक उणिवा दिसून येतात. सर्व उदार लोकशाही राज्यांनी आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी 'वितरणात्मक न्याय' आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तरीही तळागाळातील लोकांपर्यंत हा न्याय पोहचत नाही. यावरुन वितरणात्मक न्याय आणतांना 'समन्यायबुध्दी' च्या आधारावर केल्यास अधिक योग्य होईल असे लक्षात आले आहे. न्यायाचा सिध्दान्त मांडणारे जॉन रॉल्स यांच्या मते "Distributive Justice can be secured when the influence of luck is minimized and goods are distributed in a fairer way on the basis of one's needs and contributions alone."

**सारांश –**

वितरणात्मक न्याय

- १ अर्थ — आर्थिक साधनांचे योग्य वाटप करणे
- २ रॉल्सच्या मते
- ३ प्रस्थापित करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी

**२) Restorative Justice :-** भरपाई करणारा न्याय-

नुकसान झालेल्या गोष्टीची भरपाई करुन किंवा मोबदला देऊन न्याय आणणे होय. वर्षानुवर्ष ज्या लोकांचे शोषण झाले, ज्यांना हक्क स्वातंत्र्य, न्याय मिळाला नाही अशा वर्गांना सवलत देणे म्हणजे भरपाई करणारा न्याय प्रस्थापित करणे होय.

**३) Restributive Justice :-**

खूनाचा बदला खूनाने घेणे म्हणजे रेस्ट्रीव्यूटीव्ह न्याय होय. डोळयास डोळा फोडणे. उदा. एखाद्या खुन्याला ज्याचा खून झाला असेल त्या कुटुंबाने ठेचून मारणे म्हणजे रेस्ट्रीव्यूटीव्ह न्याय होय. परंतू सुसंस्कृत समाजव्यवस्थेमध्ये अशा प्रकारचा न्याय क्रूर आणि अयोग्य समजण्यात येतो.

**निष्कर्ष :-** आधुनिक लोकशाही शासनपध्दतीमध्ये मुख्यतः कार्यपध्दतीविषयक न्याय (Procedural Justice) आणि वितरणात्मक न्याय (Distributive Justice) ला महत्व देण्यात येते.

### इ) सारांश-

**न्याय(Justice)**

१२३

- न्याय म्हणजे काय ?
  - अर्थ -
    - १) उगम
    - २) बार्कर
    - ३) सिफॉल्स
    - ४) प्लेटो
    - ५) ॲरिस्टाल
    - ६) महात्मागांधी
    - ७) तत्वज्ञानात्मक
- न्यायाच्या बाजू
  - १) वैधानिक
  - २) राजकीय
  - ३) सामाजिक
  - ४) आर्थिक
- न्यायाचे प्रकार
  - १ कार्यपध्दतीविषयक न्याय
    - १) अर्थ
    - २)महत्त्व
    - ३) अटी
  - २ वितरणात्मक न्याय
    - १) अर्थ
    - २)महत्त्व
    - ३) अडचणी
  - ३ Restorative justice
  - ४ Retributive justice

## १.५ प्रश्न

१) 'स्वातंत्र्य' म्हणजे काय ? स्वातंत्र्याचे प्रकार सांगा.

२) स्वातंत्र्याच्या संरक्षण घटकांची चर्चा करा.

३) समतेच्या विविध बाजू स्पष्ट करा.

४) न्याय म्हणजे काय स्पष्ट करा. न्यायाचे प्रकार सांगा.

५) टिपा द्या

   १) समता

   २) स्वातंत्र्य

   ३) वितरणात्मक न्याय

   ४) कार्यपध्दतीविषयक न्याय

❖❖❖❖

# १०

# मोड्यूल ६
# हक्क (Rights) किंवा अधिकार

**घटक रचना :**


१०.० उद्दीष्ट

१०.१ प्रस्तावना

१०.२ हक्कांच्या व्याख्या आणि अर्थ

१०.३ हक्कांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

१०.४ हक्कांचा उगम आणि विकास

१०.५ हक्कांचे प्रकार

१०.५.१ नागरी हक्क

१०.५.२ राजकीय हक्क

१०.५.३ आर्थिक हक्क

१०.५.४ सांस्कृतिक हक्क

१०.६ हक्कांचे महत्त्व

१०.७ हक्कांचे संरक्षक घटक

१०.८ दिर्घोत्तरीय प्रश्न


## १०.० उद्दीष्ट

अलिकडच्या काळात मानवी हक्कांच्या प्रश्नाने सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यामुळे हक्क संकल्पना समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

## १०.१ प्रस्तावना

विश्वातील पशूपक्षी, प्राणी, वनस्पती, मानवी प्राणी सर्वांनाच नैसर्गिकपणे जीवन जगण्याचा हक्क आहे. त्या अर्थाने हक्क ही संकल्पना फक्त मानवी प्राण्यांनाच नाही तर सर्व सजीवांना लागू होणारी संकल्पना आहे. त्यामुळेच मानवाचे हक्क, प्राण्यांचे हक्क,

पर्यावरणविषयक हक्क इत्यादी हक्कविषयक प्रकार आहेत. परंतू राजकीय अर्थाने हक्क ही संकल्पना मानवाचे हक्क या संदर्भात आहेत. मानवी हक्कांविषयी दिवसेंदिवस जागृकता वाढत आहे. मानवी हक्कांचा विकास अनेक शतकापासून होत आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या पुस्तकांमध्ये त्यांचा संदर्भ सापडतो. आधुनिक काळात मॅग्नाचार्टा, मानवी हक्कांची सनद, अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा, फ्रेंच राज्यक्रांती व शेवटी मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा असे हक्क या संकलपणेच्या विकासाचे टप्पे दिसतात.

## १०.२ हक्काच्या व्याख्या आणि अर्थ - हक्क म्हणजे काय ?

**हॅरॉल्ड लास्की** यांनी ‘ए ग्रामर ऑफ पॉलिटिक्स‘ या ग्रंथात असे म्हटले आहे की “ज्या सामाजिक परिस्थितीशिवाय व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा क्षमतांचा विकास करता येत नाही त्या सामाजिक परिस्थितीला हक्क म्हणतात”. याचा अर्थ व्यक्तीच्या परिपूर्ण विकासासाठी आवश्यक संधी म्हणजेच हक्क.

**ग्रीन** या विचारवंताच्या मते “व्यक्तीच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असणारी बाहय परिस्थिती म्हणजे हक्क होय”.

**वाईल्ड** या विचारवंताच्या मते “विशिष्ट प्रकारच्या कृती व कार्य करण्यासाठी न्याय मोकळीक असणे म्हणजेच हक्क होय”.

**बोसॅकेच्या** मते “हक्क म्हणजे समाजाला मान्य असलेली व राज्याने अंमलात आणलेली मागणी होय”. **मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्यात मानवी हक्कांची व्याख्या,** ‘‘माणसाच्या माणूस असण्यामुळे मिळालेले हक्क अशी करण्यात आली आहे.”

**१९९३ साली मानवी हक्क कायद्याने** हक्कांची व्याख्या करतांना म्हटले की, “राज्यघटनेने व्यक्तीचे जिवित, स्वातंत्र्य, समता, व्यक्तीचा आदर याबाबतीतील हक्कांची हमी देणे आणि न्यायालयाने ते हक्क अंमलात आणणे होय”.

प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिमत्व विकासासाठी, प्रतिष्ठेने राहण्यासाठी स्वातंत्र्य असणे आवश्यक असते. प्रत्येक राज्यामध्ये स्वातंत्र्य व्यक्तीला हक्कांच्या स्वरुपात मिळते. हक्कांची हमी देणे, हक्कांच्या संरक्षणाची व्यवस्था करणे राज्याचे कार्य आहे.

## १०.३ हक्कांचे स्वरुप किंवा हक्कांची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :-

१) हक्क नैसर्गिक असतात (Natural)

२) हक्क सार्वत्रिक असतात (universal)

३) हक्क कर्तव्यांशी निगडीत असतात (linked with duties)

४) हक्कांवर मर्यादा असतात (never absolute)

५) हक्क बदलणारे असतात, परिस्थितीसापेक्ष (dynamic)

६) हक्क सामाजिक असतात (social)

७) हक्क माणसाला माणसाप्रमाणे जीवन जगण्यास मदत करतात (enable human beings to live a human life)

८) मानवी हक्क संकल्पनेमध्ये नैतिक आणि कायदेशीर हक्क दोन्हींचा समावेश होतो

**१) हक्क नैसर्गिक आणि जन्मसिध्द असतात :-**

प्रत्येक व्यक्तीला जन्मापासूनच हक्क मिळतात. मानवी हक्क एक माणूस म्हणून व्यक्तिला प्राप्त होतात. मानवी हक्कांनाच 'मुलभूत हक्क' असेही म्हणतात.मानवी हक्क नैसर्गिक असतात याचा अर्थ असा की हे हक्क मानवाने निर्माण केलेले किंवा दिलेले नसतात; तर निसर्गनिर्मितच असतात. निसर्गतःच व्यक्तिला हक्क मिळतात. राज्य फक्त त्या हक्कांना मान्यता देऊन हक्क व्यक्तिला उपभोगता येण्याच्या दृष्टीने आवश्यक परिस्थिती कायद्याद्वारे निर्माण करते. म्हणजेच हक्क जन्मसिध्द व अविभाज्य आहेत.

**२) हक्क सार्वत्रिक असतात :-**

याचा अर्थ असा की हक्क जन्मतःच प्रत्येक व्यक्तिला मिळतात. जात, धर्म, वंश, राष्ट्रीयता या आधारावर भेदभाव नसतो. मानवी हक्क सर्वांचेच असतात. त्यात कोणत्याही कारणास्तव भेदभाव असता कामा नये.

**३) हक्क कर्तव्यांशी निगडीत असतात :-**

हक्क आणि कर्तव्ये एकमेकांशी इतके निगडीत असतात की, त्यांना एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणतात. राज्याकडून व्यक्तिला हक्कांची हमी मिळते तेव्हाच हक्कांचा उपभोग घेतांना काही जबाबदारी किंवा कर्तव्य पार पाडावी लागतात. समाजहित, शांतता, सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने हक्कांवर विशिष्ट मर्यादा टाकण्यात येतात. त्या मर्यादांचा अवलंब करणे प्रत्येक व्यक्तिचे कर्तव्य असते. मानव एक सामाजिक प्राणी आहे. तो समाजात राहतो. समाजात शांततेने, सुखाने राहण्यासाठी प्रत्येकाने एकमेकांचा आदर करावा लागतो. त्या दृष्टीने एकमेकांच्या हक्कांचा आदर करणे राज्याच्या प्रती असलेली कर्तव्ये पाळणे व्यक्तिचे कर्तव्य असते.

**४) हक्कांवर मर्यादा असतात :-**

हक्क निरपेक्ष कधीच नसतात. कारण समाजाचा आणि राज्याचा एक भाग या नात्याने व्यक्तीला हक्क उपभोगता येतात. उदा. जेव्हा व्यक्तिला स्वातंत्र्य हवे असते तेव्हा इतरांनाही स्वातंत्र्य उपभोगता यावे म्हणून मर्यादित स्वातंत्र्याचा व्यक्तिला स्विकार करावा लागतो. हक्कांवर मर्यादा टाकण्याचा अधिकार राज्याला असतो. सार्वजनिक शांतता, कायदा सुव्यवस्था, सार्वजनिक हितासाठी राज्य हक्कांवर मर्यादा टाकू शकते.

**५) हक्क बदलणारे असतात, परिस्थितीसापेक्ष असतात :-**

हक्क ही कल्पना सार्वत्रिक आहे. परंतू हक्कांचे स्वरुप, प्रकार, व्याप्ती इत्यादी परिस्थितीसापेक्ष आहे. प्रत्येक देशाच्या परिस्थितीप्रमाणे, गरजेप्रमाणे, समाजाच्या स्वरुपाप्रमाणे,

काळाप्रमाणे हक्कांचे स्वरुप बदलत असते. राज्यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक बदल झाले की बरेचदा हक्कांच्या स्वरुपातही बदल होऊ शकतो. त्या अर्थाने हक्कांचे स्वरुप स्थिर नाही; बदलणारे आहे. काळ जसा पुढे सरकतो, त्याप्रमाणे ही संकल्पना बदलते.

**६) हक्क सामाजिक असतात :-**

मानवी व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी आवश्यक असलेले स्वातंत्र्य आणि ते स्वातंत्र्य उपभोगण्यास आवश्यक असलेली परिस्थिती निर्माण करणे हे हक्कांमागचे मुख्य उद्‌दिष्ट असते. स्वातंत्र्य उपभोगण्यास आवश्यक असलेली परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य राज्य करीत असते. सामान्य हित, सार्वजनिक कल्याणाचा विचार करुन हक्कांच्या यादीला राज्य व समाज मान्यता देतात. राज्य हक्कांची हमी देऊन त्यासाठी आवश्यक परिस्थिती कायदे, न्यायालय, पोलिस व्यवस्था इत्यादीच्या मदतीने करते. त्यामुळे हक्क समाज आणि राज्य या यंत्रणामुळेच ख-या अर्थाने व्यक्तिला उपभोगता येतात आणि व्यक्तिला सुसंस्कृत जीवन जगता येते. समाजातच हक्कांची निर्मिती होते आणि समाजाचा एक भाग म्हणूनच व्यक्तिला हक्क मिळतात. समाज आणि राज्याबाहेर हक्क राहू शकत नाही.

**७) हक्क माणसाला माणसाप्रमाणे जगण्यास मदत करते :-**

सर्व मानवांना हक्क अत्यावश्यक आहे. हक्कांमुळेच व्यक्तिला सुसंस्कृत जीवन जगता येते. राज्यातील सुरक्षित वातावरणामुळे लोकांना आपल्या क्षमतांचा पूर्ण विकास करता येतो. हक्कांअभावी व्यक्तिला माणूस म्हणून जगणे शक्य झाले नसते. प्रत्येकाला आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी हक्क आवश्यक असतात. म्हणूनच लोकशाही देशांमध्ये नागरिकांना हक्कांची हमी देण्यात येते. राज्यघटनेमध्ये हक्कांची तरतूद करण्यात येते. स्वातंत्र्य, समता, न्याय हक्कांमुळे प्रस्थापित होत असते. हक्कांचा भंग झाल्यास व्यक्तिला न्यायालयात जाण्याचे, कायदेशीर कारवाई करण्याचे स्वातंत्र्य असते. अर्थात हक्कांमुळे व्यक्तिविकास तर होतोच पण व्यक्तिविकासाबरोबरच समाजविकास आणि राष्ट्रविकास होतो. हक्क व्यक्तिविकासाचे प्रमुख साधन आहे.

**८) मानवी हक्क संकल्पनेमध्ये नैतिक आणि कायदेशिर दोन्ही बाजूंचा समावेश होतो :**

माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तिला मानवी हक्क असतात. मानवतावादी दृष्टीकोनातून नैतिक हक्कांचाही विचार मानवी हक्कांमध्ये होतो. उदा. मानवी प्रतिष्ठा राखणे, प्रत्येकाला आदरपूर्ण वागणूक मिळणे इत्यादी. मानवी हक्क कायदेशीर हक्कांच्या स्वरुपातही अस्तित्वात असतात. स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवी प्रतिष्ठा मानवी हक्कांचा मध्य आहे त्यादृष्टीने विविध हक्कांना राज्य कायदा करुन मान्यता देते.

**सारांश :-** हक्कांचे स्वरुप आणि वैशिष्टये यावरुन हक्क संकल्पनेचा अर्थ लक्षात येतो.

## १०.४ हक्कांचा उगम व विकास

हक्क या संकल्पनेचे मूळ प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या लिखाणात सापडते. आधुनिक काळातील मानवी हक्कांचे मूळ आपल्याला काही महत्वाच्या दस्तऐवजांमध्ये सापडते.

१) मॅग्नाचार्टा - मॅग्नाचार्टात मानवी हक्क प्रथमच सुस्पष्ट स्वरुपात पुढे आले. आणि हक्क या संकल्पनेचापाया घातला गेला.

२) हक्कांची सनद (The Bill of Rights)- इंग्लडमध्ये हक्कांची सनद याद्वारे नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य मांडले.

३) अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा - अमेरिकेची घटकराज्ये ही एकेकाळची इंग्रजांची वसाहत. या वसाहतींनी इंग्लंडविरुध्द उठाव करुन १७७६ साली आपले स्वातंत्र्य घोषित केले. अमेरिकेतील 'हक्कांची सनद' तयार केली. यात धार्मिक स्वात्ंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य, शांततेने एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, अन्यायाचे निराकरण करण्यासाठी शासनाकडे याचिका करण्याचे स्वातंत्र्य याचा समावेश होता.

४) फ्रान्समधील मानवाच्या व नागरिकांच्या अधिकारांचा जाहीरनामा - फ्रेंच राज्यक्रांती १७८९ साली झाली. या राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता या घोषणा होत्या. या जाहीरनाम्यात मानवी हक्कांची चर्चा होती. सुरवातीलाच त्यात म्हटले आहे की "मानव स्वतंत्र जन्माला येतो व हक्कांच्या बाबतीत स्वतंत्र व समान राहतो.

५) विसावे शतक - १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांचा मानवी हक्कांचा जाहीरनामा स्वीकृत झाला.

सारांश तक्ता

हक्कांचा अर्थ, स्वरुप आणि विकास

| अर्थ | स्वरुप | विकास |
|---|---|---|
| १)लास्की | १)नैसर्गिक | १) मॅग्नाचार्टा |
| २)ग्रीन | २) सार्वत्रिक | २) हक्कांची सनद |
| ३)वाईल्ड | ३)कर्तव्यांशी निगडीत | ३) अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा |
| ४)बोसॅके | ४) मर्यादीत | ४) फ्रान्सचा जाहीरनामा |
| ५)मानवी हक्क कायद्याप्रमाणे | ५)परिस्थिती सापेक्ष | ५) संयुक्त राष्ट्राचा जाहीरनामा |
| | ६) सामाजिक | |
| | ७) अत्यावश्यक | |
| | ८) कायदेशीर | |

## १०.५ हक्कांचे प्रकार

युनोच्या डॉक्युमेन्टसप्रमाणे मानवी हक्कांचे मुख्य दोन प्रकार दिले आहेत.

१) नागरी आणि राजकीय हक्क

२) आर्थिक आणि सांस्कृतिक हक्क

### १०.५.१ नागरी हक्क (Civil Rights)

नागरीकांच्या नागरी आणि सामाजिक जीवनाशी निगडीत हक्कांना नागरी हक्क म्हणतात. नागरी हक्कांमुळे नागरी स्वातंत्र्य व्यक्तीला प्राप्त होते. राज्यामध्ये राज्यघटनेद्वारे या

हक्कांची हमी लोकांना देण्यात येते. सुसंस्कृत आणि चांगले जीवन जगण्यासाठी, मानवी आदरप्रतिष्ठा यासाठी नागरी हक्क आवश्यक असतात. हे हक्क सर्व नागरिकांना, कोणताही भेदभाव न करता देतात. नागरी हक्कांमध्ये खालील हक्कांचा समावेश होतो.

१) शारिरीक स्वातंत्र्य – जीवन जगण्याचा हक्क, व्यक्तिगत जीवन स्वातंत्र्य हक्क

२) बौध्दीक स्वातंत्र्य – विचार करण्याचा हक्क, भाषणाचा हक्क, विचार व्यक्त करण्याचा हक्क

३) व्यावहारिक स्वातंत्र्य – सभासंघ स्थापन करण्याचा हक्क, कौटुंबिक जीवनाचा हक्क

संपूर्ण जगामध्ये सर्व उदार लोकशाही राज्यपध्दतींमध्ये नागरिकांच्या नागरी आणि राजकीय हक्कांना महत्व देण्यात आले आहे. युनोच्या जनरल असेंब्लीने नागरी व राजकीय हक्कसंबंधात एक आंतरराष्ट्रीय सभा घेतली होती. १९७६ सालापासून त्याप्रमाणे करार करण्यात आला. त्यावर बहुतेक देशांनी सहया केल्या आणि खालील तरतूदी करण्यास बहुतेक देश तयार झाले. आय.सी.सी.पी.आर. (International Covenant on Civil and Political Rights) नागरीकांना साधारणपणे कोणते नागरी आणि राजकीय हक्क असावे यासंबंधी संदर्भ दिला. ते नागरी हक्क खालीलप्रमाणे आहेत :-

**४) जीवन जगण्याचा हक्क :-**

प्रत्येक व्यक्तिला जीवन जगण्याचा हक्क आहे. कोणत्याही व्यक्तिला या हक्कांपासून वंचित केले जाऊ शकत नाही. एखाद्या देशामध्ये मृत्यूदंडाची शिक्षा जर देण्यात येत असेल तर ती फक्त फार मोठया गुन्हयासाठीच दिली जाऊ शकते. ती शिक्षाही कायद्याद्वारे आणि मानवी पध्दतीनेच दिली जाऊ शकते. जन्मास येणा-या प्रत्येक व्यक्तिला आपल्या मतानुसार जीवन जगण्याचा हक्क आहे. या हक्काशिवाय इतर हक्क निरर्थक ठरतात. नागरिकांच्या जीवन जगण्याच्या हक्कामुळेच नागरिकांच्या जीवनाला सुरक्षितता देण्याची जबाबदारी राज्याची असते.

**५) व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क :-**

प्रत्येक व्यक्तिला व्यक्तिगत स्वातंत्र्य व सुरक्षिततेचा हक्क आहे. विशिष्ट कारण असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तिला व्यक्तिस्वातंत्र्यापासून वंचित केले जाऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तिला अटक झाली तर ती कायद्याप्रमाणेच करता येते. ज्या व्यक्तिला अटक झाली असेल त्या व्यक्तिला कोणत्या कारणासाठी अटक केली आहे त्याचे कारण द्यावे लागते. एखाद्या व्यक्तिला चूकीने अटक झाली तर त्याचा मोबदला त्या व्यक्तिला द्यावा लागतो.

**६) कायद्यापुढे समता :-**

कायद्यापुढे सर्व व्यक्तिंना समान लेखणे होय. सर्व व्यक्तिंनाच कायद्याचे समान संरक्षण होय. कायद्यापुढे जात, धर्म, वंश, लिंग इत्यादी भेदभाव न करता सर्व समान असणे होय.

**७) राष्ट्रीयता आणि नांव प्राप्त करण्याचा हक्क :-**

प्रत्येक जन्मास येणा-या मुलाला कोणत्याही जात, धर्म, लिंग, वंशाची असली तरी राष्ट्रीयता प्राप्त करण्याचा हक्क आहे. जन्मानंतर प्रत्येक व्यक्तीचे नांव रजिस्टर करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे.

### ८) खाजगी आयुष्याचा हक्क :-

स्वत:चे कुटुंब, घर इत्यादी प्रकारचे खाजगी आयुष्य जगण्याचा हक्क आहे. विवाह करुन कुंटुब स्थापन करण्याचे स्वातंत्र्य यात समाविष्ट आहे.

### ९) शोषणाविरुध्दचा हक्क :-

अमानवी वागणूकीपासून संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने शोषणाविरुध्दचा हक्क प्रत्येक व्यक्तिला आहे.

### १०) विचार करण्याचे स्वातंत्र्य :-

प्रत्येक व्यक्तिला विचार करण्याचा, आपले विचार व्यक्त करण्याचा हक्क आहे.

### ११) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क :-

प्रत्येक व्यक्तिला आपल्या इच्छेप्रमाणे धर्म स्विकारण्याचा, पूजा करण्याचा हक्क आहे. अर्थात सार्वजनिक हित, आरोग्य, नैतिकता यासाठी राज्य या हक्कावर मर्यादा टाकू शकते.

### १२) मत व्यक्त करण्याचा हक्क :-

प्रत्येक व्यक्तिला त्याचे व्यक्तिगत मत व्यक्त करण्याचा हक्क आहे. ते मत भाषण, लिखाण किंवा छापणे कोणत्याही रुपात व्यक्ती मांडू शकते. अर्थात सार्वजनिक हिताच्या दृष्टीने या हक्कावरही राज्य मर्यादा टाकू शकते.

नागरी हक्क (Civil Rights)

- १ नागरी हक्कांचा अर्थ
  - सामाजिक जीवनासाठी आवश्यक हक्कांना नागरी हक्क म्हणतात.
- २ ना हक्कांचे उद्दीष्ट
  - १)सुसंस्कृत सामाजिक जीवनाची प्राप्ती
  - २) मानवी प्रतिष्ठेची स्थापना
  - ३) सामाजिक न्यायाची स्थापना करणे
- ३ नागरी हक्कांचे विभाजन
  - १ शारीरीक
  - २ बौध्दीक
  - ३ व्यावहारीक

## १०.५.२ राजकीय हक्क (Political Rights)

हे हक्क फक्त नागरिकांनाच दिले जातात. या हक्कांमुळे नागरिकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होता येते. राजकीय जीवनाशी संबंधित हक्कांना राजकीय हक्क म्हणतात. राजकीय हक्कांमुळे लोकांना राजकीय स्वातंत्र्य प्राप्त होते. लोकशाही राज्यव्यवस्थेत लोकांना राजकीय हक्क आणि स्वातंत्र्य असल्याशिवाय लोकशाही शासनपध्दती यशस्वी होऊ शकत नाही. म्हणूनच प्रत्येक लोकशाही देशांमध्ये तेथील नागरिकांना राजकीय हक्कांची हमी देण्यात येते. या हक्कांमुळे राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची लोकांना संधी मिळते. महत्वाचे राजकीय हक्क खालीलप्रमाणे आहेत.

अ) मतदानाचा हक्क – शासन निवडण्याचा हक्क

ब) निवडणूक लढविण्याचा हक्क – शासन चालविण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क

क) सरकारी पद धारण करण्याचा हक्क

ड) शासनावर टीका करण्याचा हक्क

इ) राष्ट्रीयता प्राप्त करण्याचा हक्क

फ) अर्ज करण्याचा हक्क, याचिका दाखल करण्याचा अधिकार

ज) शासनाला प्रतिकार करण्याचा हक्क

राजकीय हक्क (Political Rights)

- १ राजकीय हक्कांचा अर्थ
  - राजकीय जीवनाशी संबंधित हक्क म्हणजे राजकीय हक्क होय
- २ राजकीय हक्कांचे उद्दीष्ट
  - १)राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते
  - २)लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक
- ३ राजकीय हक्कांचे विभाजन
  - मत देण्याचा निवडणूक लढविण्याचा इत्यादी

## १०.५.३ आर्थिक हक्क (Economic Rights)

या अधिकारांमुळे व्यक्ती स्वयंपूर्ण होते. आर्थिक हक्क व्यक्तिजीवनात अतिशय महत्वाचे आहेत. व्यक्तिचे जीवन स्वावलंबी, स्वयंपूर्ण होण्यासाठी आर्थिक हक्क असणे गरजेचे आहे. आधुनिक काळात असे लक्षात आले आहे की, व्यक्तिला सामाजिक-नागरी आणि आर्थिक हक्क असल्याशिवाय इतर हक्कांना अर्थ उरत नाही. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण या मुलभूत गरजा पूर्ण झाल्याशिवाय व्यक्ती इतर गोष्टींचा विचार करीत नाही. आर्थिक विवंचनेत असणारी व्यक्ती इतर हक्कांचा प्रभावीपणे उपयोग करु शकत नाही. उदा. भूकेल्या व्यक्तिला राजकीय पक्ष त्याच्या दैनंदिन जेवणाविषयी, कामाविषयी हमी देईल किंवा पैसे देईल त्या पक्षाला मत देण्याचा ती व्यक्ती विचार करते.

बरेचदा असा अनुभव येतो की, आर्थिक दृष्टीने समस्या असलेली व्यक्ती म्हणजे एखादा गरीब आणि सामाजिकदृष्टीने मागासलेला दोघांच्याही समस्या एकाच प्रकारच्या असतात. उदा. दारिद्रय, बेकारी, रोगराई, अशिक्षितपणा इत्यादी समस्या फक्त आर्थिकच नाहीत तर सामाजिक सुध्दा आहेत. म्हणून सामाजिक आणि आर्थिक सबलीकरण एकाचवेळी होणे गरजेचे आहे. आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने व्यक्ती सुधारल्याशिवाय राज्याची प्रगती होऊ शकत नाही. आर्थिक व सामाजिक दृष्टीने मागासलेल्या समाजात लोकशाही शासनपध्दती कधीच

यशस्वी होऊ शकत नाही. लोकांची प्रगती झाली तर राज्य लवकर प्रगतीपथावर वाटचाल करु शकते.आर्थिक हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनाचा दर्जा सुधारणे आणि पुरेसा पैसा कमविण्याची समान संधी मिळणे होय. महत्वाचे आर्थिक हक्क खालीलप्रमाणे आहेत.

अ) काम करण्याचा हक्क
ब) मालमत्तेचा हक्क
क) समान कामासाठी समाच वेतनाचा हक्क
ड) शिक्षण घेण्याचा हक्क
इ) कामगार संघटना स्थापन करण्याचा किंवा कामगार संघटनेचा सभासद होण्याचा हक्क
फ) संप करण्याचा हक्क
ज) कामाच्या ठिकाणी योग्य परिस्थिती असण्याचा हक्क

**अ) काम करण्याचा हक्क**

प्रत्येकाला त्या व्यक्तिच्या इच्छेप्रमाणे काम करण्याची संधी मिळणे होय. काम करण्याची संधी शोधताना किंवा कामाची निवड करतांना कोणताही भेदभाव करण्यात येऊ नये.

**ब) मालमत्तेचा हक्क**

योग्य मार्गाने मालमत्ता कमविण्याचा आणि आर्थिक सुबत्ता प्राप्त करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

**क) समान कामासाठी समान वेतन हक्क**

समान कामासाठी प्रत्येकाला समान वेतन मिळण्याचा हक्क होय. जात, धर्म, लिंग असा भेदभाव समान कामासाठी वेतन देतांना होऊ नये.

**ड) शिक्षणाचा हक्क**

आपल्या इच्छेप्रमाणे शिक्षण घेण्याचा हक्क आहे. शिक्षणामुळे समाजात आणि राज्यात व्यक्ती प्रभावीपणे वावरु शकते. म्हणूनच प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे आणि मुक्त करण्यात आले आहे. यांत्रिक शिक्षण व उच्च शिक्षण सर्वांसाठी खुले करण्यात आले आहे.

**इ) कामगार संघटना स्थापन करण्याचा किंवा कामगार संघटनेचा सभासद होण्याचा हक्क**

या हक्कांमुळे व्यक्तिला हिताचे संरक्षण करता येते.

**फ) संप करण्याचा हक्क**

कामाच्या ठिकाणी अन्याय होत असेल तर न्याय मिळविण्यासाठी, अन्यायाच्या विरुध्द प्रतिकार करण्याचा हक्क व्यक्तिला आहे.

**ज) कामाच्या ठिकाणी योग्य परिस्थिती असण्याचा हक्क**

मालकाने काम करणा-यांचा अनावश्यक गैरफायदा घेऊ नये, त्यांचे शोषण करु नये म्हणून हा हक्क देण्यात आला आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षित, आरोग्याला हितकारी वातावरण असावे. प्रत्येकाला कमीतकमी वेतन किती मिळावे म्हणजेच योग्य कामासाठी योग्य वेतन असावे, कामाच्या वेळा निश्चित व योग्य असाव्यात इत्यादीचा समावेश या हक्कामध्ये होतो.

अर्थात या सर्व आर्थिक हक्कांची सर्वच देशांनी हमी दिली आहे असे नाही. कारण आर्थिक हक्कांचे स्वरुप प्रत्येक देशात भिन्न दिसून येते. बरेचदा त्या देशाच्या आर्थिक स्थितीवरही ते अवलंबून असते. आर्थिक हक्कातील सर्वात महत्वाचा हक्क म्हणजे काम करण्याचा हक्क या हक्कांची हमी बहुतेक देशांमध्ये दिली आहे.

**आर्थिक हक्क**

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| आर्थिक हक्कांचा अर्थ | महत्व | प्रकार |
| व्यक्तीला स्वयंपूर्ण स्वावलंबी होण्यास मदत करणारे हक्क | १) चांगल्या जीवनाच्या प्राप्तीसाठी<br>२) इतर हक्कांना अर्थ प्राप्त होण्यास | |

## १०.५.४ सांस्कृतिक हक्क (Cultural Rights)

सांस्कृतिक हक्क आणि सांस्कृतिक स्वातंत्र्यसुध्दा व्यक्तीसाठी अतिशय आवश्यक असते. व्यक्तिच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबतीत सबलीकरण झाले की, व्यक्तीला सांस्कृतिक गोष्टींची गरज असते. सांस्कृतिक हक्कांमुळे व्यक्तिजीवनाला पूर्णता, सुदृढता येते. व्यक्तिचा भावनिक आणि मानसिक विकास सांस्कृतिक हक्कांमुळे होतो. म्हणूनच आर्थिक आणि सामाजिक हक्कांबरोबरच सांस्कृतिक हक्कांनासुध्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता देण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर खालील सांस्कृतिक हक्कांना मान्यता दिली आहे.

१) सामाजिक सुरक्षितता प्राप्त करण्याचा हक्क

२) सांस्कृतिक जीवन जगण्याचा हक्क

३) बाल्यावस्थेतील सुरक्षितता हक्क

४) मातृत्वाचा हक्क

५) तंत्रविज्ञानाचे फायदे घेण्याचा हक्क

६) बौध्दीक मालमत्तेचा हक्क

**१) सामाजिक सुरक्षितता प्राप्त करण्याचा हक्क :-**

उदा. अपंगांसाठी आर्थिक फायदे, अपघात प्रसंगीची मदत इत्यादी प्रकारची सामाजिक सुरक्षितता प्राप्त करण्याचा प्रत्येक व्यक्तीला हक्क आहे.

**२) सांस्कृतिक जीवन जगण्याचा हक्क :-**

सांस्कृतिक सण, उत्सव साजरे करण्याचा, त्यात सहभागी होण्याचा हक्क व्यक्तिला आहे.

**३) बाल्यावस्थेतील सुरक्षितता हक्क :-**

सामाजिक, आर्थिक शोषणापासून लहान मुलांना सुरक्षितता मिळणे गरजेचे आहे. म्हणूनच लहान मुलांचे शोषण होऊ नये म्हणून बालमजूरीला अमान्यता देण्यात आली आहे.

**४) मातृत्त्वाचा हक्क :-**

प्रत्येक स्त्रीला हा हक्क आहे. त्यासाठीच मॅटरनिटी लिव्ह नोकरी करणा-या स्त्रीयांना मिळते.

**५) तांत्रिक प्रगतीचे फायदे घेण्याचा हक्क :-**

**६) बौध्दीक मालमत्तेचा हक्क :-**

प्रत्येकाला आपआपल्या बौध्दीक क्षमतेप्रमाणे लिखाण करण्याचा, ते प्रसिध्द करण्याचा हक्क आहे.

**सारांश –**




## १०.६ हक्कांचे महत्व

व्यक्तिजीवनात नागरी, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक सर्वच हक्कांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. म्हणून १० डिसेंबर, १९४८ हा दिवस मानवी हक्क दिवस म्हणून पाळण्यात येतो. याच दिवशी युनोच्या जनरल असेंब्लिने मानवी हक्कांची यादी प्रसिध्द केली होती. सर्व सभासद देशांनी या घोषणेला प्रसिध्दी दिली आणि मान्यता दिली.

या घोषणेप्रमाणे समता या तत्वावर अतिशय भर देण्यात आला आहे. जनरल असेंब्लिने मानवी हक्कांसंबंधी जी घोषणा केली ती घोषणा कोणत्याही देशावर बंधनकारक नाही. परंतू त्या घोषणेला अतिशय महत्वपूर्ण स्थान आहे. या घोषणेचा अनेक देशांच्या राज्यघटनांवर प्रभाव पडला आहे.

या घोषणेमध्ये सर्व प्राणीमात्रांनाही एक प्रकारे आव्हान आहे की, सर्वांनी एकमेकांमध्ये बंधूभावाची भावना निर्माण होण्यास मदत करावी. सर्व लोकांनी एकमेकांचा आदर करावा आणि जागतिक शांततेला हातभार लावावा.

भारतीय राज्यघटनेने नागरी आणि राजकीय हक्कांबरोबरच आर्थिक आणि सामाजिक हक्कांनाही महत्व दिले आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिस-या भागामध्ये या हक्कांची यादी ‘मुलभूत हक्क’ या नांवाखाली दिली आहे. या हक्कांमुळे लोकांना स्वातंत्र्य, समता, न्यायाची हमी मिळाली आहे. आर्थिक आणि सामाजिक हक्क भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात ‘मार्गदर्शक तत्वे’ या नांवाने आहेत.

**१) सामाजिक महत्व :-**

सामाजिक हक्क व स्वातंत्र्यामुळे व्यक्ती समाजाशी जोडल्या जाऊन एकरुप होवू शकते. जाती व्यवस्था व त्यातून निर्माण होणारी श्रेष्ठ-कनिष्ठता, लिंगभेद, असमता इत्यादी दोष व

वैगुण्यापासून या हक्कामुळे व्यक्तीचे संरक्षण होते. समाजात प्रत्येक ठिकाणी समान संधी मिळते. त्यामुळे सामाजिक हक्क व स्वातंत्र्यामुळे सामाजिक न्यायाची स्थापना होते.

**२) आर्थिक महत्व :-**

आर्थिक हक्कांमुळे आदरयुक्त पध्दतीने, प्रतिष्ठेने जीवनात अर्थार्जन करणे शक्य होते. समान आर्थिक संधी प्राप्त होतात आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या व्यावसायिक क्षमतांचा जास्तीतजास्त विकास करु शकते. आर्थिक हक्क व स्वातंत्र्यामुळे आर्थिक न्याय प्रस्थापित होतो.

**३) राजकीय महत्व :-**

राजकीय हक्कांमुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या राज्याच्या राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होता येते. लोकशाही राज्यामध्ये राजकीय हक्क व स्वातंत्र्य लोकांना असणे ही लोकशाही व्यवस्थेची एक अट आहे. राजकीय हक्कांमुळे राजकीय न्यायाची स्थापना होते.

**४) नागरी महत्व :-**

लोकांना जेव्हा आपली जीवनपध्दती निवडण्याचा, आपले विचार, मत उघडपणे व्यक्त करण्याचा हक्क असतो तेव्हा लोक सुखी होतात आणि समाधानी असतात. नाकरी हक्क व स्वातंत्र्यामुळे प्रत्येकाला आपला नैतिक, बौध्दीक विकास करता येतो. व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

**निष्कर्ष :-** अशाप्रकारे हक्क आणि स्वातंत्र्यामुळे स्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्यांची स्थापना होते, ज्यामुळे प्रत्येकाला आपल्या जीवनाचा दर्जा सुधारण्याची संधी मिळते.

**सारांश-**

हक्कांचे महत्व

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| सामाजिक | आर्थिक | राजकीय | नागरी |
| १)व्यक्तिचा सामाजिक विकास<br>२) सामाजिक न्याय<br>३) व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास | १)व्यक्ती स्वावलंबी स्वयंपूर्ण बनते<br>२) आर्थिक न्याय<br>३) इतर हक्कांना अर्थ प्राप्त होतो. | १)राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी<br>२) लोकशाहीत महत्वपूर्ण | १)व्यक्तिचा बौध्दीक व नैतिक विकास होतो |

## १०.७ हक्कांचे संरक्षक घटक

## (Safeguards for the protection of Rights)

लोकशाही राज्यव्यवस्थेचे यश किंवा अपयश नागरीकांना कोणते हक्क आहेत, किती मर्यादेपर्यंत ते हक्क आहेत यावर बरेचदा अवलंबून असते. प्रत्येक राज्याच्या हक्कांच्या यादीच्या तरतूदीवरुन ते राज्य कोणत्या प्रकारचे आहे याचा अंदाज घेता येतो. म्हणूनच **प्रा. लास्की**

म्हणतात “Every state is known by the rights it maintains”. राज्यघटनेमध्ये हक्कांची फक्त यादी देऊन हक्कांची हमी मिळत नाही तर त्या यादीतील हक्कांचा उपभोग लोक घेऊ शकतात का ? हक्कांमुळे व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण झाली का इत्यादी लक्षात घेणे महत्वाचे आहे.नाही तर हक्क काल्पनिक ठरतील. म्हणूनच ख-या अर्थाने हक्क प्रत्यक्षात येण्यासाठी हक्कांच्या संरक्षणाची व्यवस्था असणे गरजेचे असते.

हक्कांचा भंग कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ किंवा कुणाकडून होऊ नये आणि झाल्यास त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्याची सोय असल्याशिवाय हक्कांना संरक्षण मिळत नाही. हक्कांची प्राप्ती करणे राज्यकर्त्यांच्या मर्जीवर अवलंबून राहता कामा नये. म्हणूनच हक्कांच्या संरक्षणासाठी खालील उपाय केलेले असतात.

**१) राज्यघटनेमध्ये मुलभूत हक्कांच्या स्वरुपात हक्कांना संरक्षण असणे होय :-**

बहुतेक लोकशाही देशांमध्ये नागरीकांचे मुलभूत हक्क राज्यघटनेमध्ये तरतूद करुन समाविष्ट केलेले असतात. त्यामुळे हक्कांना विशेष संरक्षण मिळते. कोणताही राजकीय पक्ष सत्तेवर आला तरी राज्यघटनेत समाविष्ट हक्कांमध्ये सहजासहजी बदल करु शकत नाही.

**२) घटनात्मक उपाययोजना :-**

राज्यघटनेमध्ये फक्त हक्कांची यादी देऊन हक्कांना पुरेसे संरक्षण प्राप्त होऊ शकत नाही. जोपर्यंत त्या हक्कांचा भंग झाला किंवा नाकारले गेले तर त्यावर कोणते उपाय करावे याची तरतूद असत नाही तोपर्यंत हक्कांना खऱ्या अर्थाने संरक्षण मिळत नाही. उदा. भारतीय राज्यघटनेच्या तिस-या भागात मुलभूत हक्कांची यादी दिली आहे. त्याप्रमाणेच कलम नं.३२ ते ३५ मध्ये हक्कांसाठी घटनात्मक उपाययोजना सांगितल्या आहेत. एखाद्या व्यक्तीच्या मुलभूत हक्कांचा भंग झाल्यास ती व्यक्ती सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाकडे दाद मागू शकते. बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषदे, उत्प्रेषण इत्यादी प्रकारचे अर्ज करु शकते.

**३) कायद्याचे राज्य :-**

कायद्यापुढे समानता आणि कायद्याप्रमाणे राज्यकारभार असणे म्हणजे कायद्याचे राज्य होय. कायद्याप्रमाणे चालणारे राज्य असेल तर कायद्याचे समान संरक्षण नागरीकांना मिळते. कायद्यामुळेच व्यक्तीचे स्वातंत्र्य, हक्क, समता, न्याय इत्यादीची व्यवस्था राखली जाते.

**४) स्वतंत्र न्यायव्यवस्था :-**

स्वतंत्र भितीमुक्त न्यायव्यवस्था असेल तरच नि:पक्षपाती न्याय लोकांना मिळू शकतो. सर्व प्रकारच्या हस्तक्षेपांपासून आणि दडपणापासून, नियत्रंणापासून न्यायव्यवस्था मुक्त व स्वतंत्र असणे आवश्यक असते. न्यायालयाकडून न्याय मिळण्याची खात्री असल्याशिवाय लोक न्यायालयाकडे जाणार नाहीत. म्हणूनच स्वतंत्र न्यायव्यवस्थेची तरतूद केलेली असते.

**५) स्वतंत्र वृत्तपत्र :-**

प्रामाणिकपणे, नि:पक्षपातीपणे काम करणारे वृत्तपत्र असेल तर लोकांच्या हक्कभंगाच्या घटनांना प्रसिध्दी देतात. लोकांमध्ये जागृकता निर्माण करतात आणि लोकमत तयार करण्याचेही काम करतात. शासनाच्या दडपशाहीवर प्रकाश टाकण्याचे कामही वृत्तपत्र

करतात. म्हणूनच वृत्तपत्र शासकीय हस्तक्षेपापासून आणि नियंत्रणापासून स्वतंत्र असणे गरजेचे असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये स्वतंत्र वृत्तपत्राची तरतूद केलेली असते.

### ६) जागृक लोकमत :-

सुदृढ आणि जागृक लोकमत शासनावर योग्यप्रकारे नियंत्रण ठेवू शकते. हक्कांविषयी लोकांमध्ये अज्ञान असेल तर हक्कांचे संरक्षण करणा-या इतर घटकांना अर्थ उरत नाही. जागृक लोकमत असेल तर हक्कांची पायमल्ली आणि दडपशाही करणा-या शासनालासुध्दा सत्तेवरुन दूर करु शकते. म्हणजेच जागृक लोकमत हाच हक्क संरक्षणाचा मुलाधार आहे.

### ७) सत्ताविभाजन आणि नियंत्रण :-

सत्तेचे नियंत्रण होऊन राज्यकर्त्यांची मक्तेदारी निर्माण होऊ नये म्हणून शासनाची सत्ता अनेक घटकांमध्ये विभाजित असणे आवश्यक असते. शासनाची सत्ता कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ अशा निरनिराळया शाखांमध्ये विभाजित झाल्यास सत्तेची एकाधिकारशाही निर्माण होत नाही आणि या शाखांचे एकमेकांवर नियंत्रण राहते. अशाप्रकारच्या सत्ताविभाजन आणि सत्तानियंत्रणामुळे नागरीकांच्या हक्कांनाही एकप्रकारे संरक्षण मिळते.

### ८) बिगरशासकीय संघटना (NGOs) :-

अलिकडे नागरीकांच्या हक्कांसाठी अनेक चळवळी झाल्या आहेत. अनेक बिगर शासकीय संघटनाही लोकांना त्यांच्या हक्कांबाबतीत जागृक करतात आणि हक्क संरक्षणासाठी लढण्याची प्रेरणा देतात. उदा. नर्मदा बचाव आंदोलन, ॲमनेस्टी इंटरनॅशनल, ग्रीनपीस, अग्नी, आश्रय चिल्ड्रन होम इंडिया इत्यादी संस्था मानवी हक्क संरक्षणासाठी काम करीत आहेत.

भारत सरकारने नॅशनल हयुमन राईटस् कमिशनची स्थापना १२ ऑक्टोबर, १९९३ साली केली आहे. अशा अनेक संघटना स्त्रीया, लहान मुले, अल्पसंख्यांक इत्यादींच्या हक्क संरक्षणासाठी दिवसेंदिवस काम करीत आहेत.

### ९) **राष्ट्रीय मानवी हक्क आयोग** National human Rights Commision –

शासकीय स्तरावर राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, स्त्रिया, अनुसूचित जातीजमाती, अल्पसंख्याक आयोग कार्यरत आहेत. हे मानवी हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीचा प्रयत्न करतात.

**सारांश -**

हक्कांचे संरक्षक घटक

Safeguards

१ संरक्षणाची आवश्यकता

२ संरक्षक उपाय

१)राज्यघटनेत समावेश
२)घटनात्मक उपाययोजना
३)कायद्याचे राज्य
४)स्वतंत्र न्यायव्यवस्था
५)स्वतंत्र वृत्तपत्र
६)जागृक लोकमत
७)सत्ताविभाजन
८) N.GO.S
९)राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

## १०.८ प्रश्न

१) हक्कांचे अर्थ सांगून महत्व सांग

२) लोकांचे नागरी आणि राजकीय हक्क यावर भाष्य करा.

३) सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक हक्क कल्पना स्पष्ट करा.

४) हक्कांचे प्रकार सांगा.

५) व्यक्तिजीवनात हक्कांचे महत्व कोणते ?

६) हक्कांचे संरक्षक यावर टिप द्या.

❖❖❖❖

# ११

## मोड्यूल ७

# लोकशाही आणि हुकुमशाही शासन पद्धती

**घटक रचना :**

११.० उद्दिष्ट
११.१ लोकशाही शासनपद्धती
  ११.१.१ प्रस्तावना
  ११.१.२ लोकशाहीचा अर्थ, व्याख्या आणि लोकशाहीच्या बाजू
  ११.१.३ लोकशाहीचे प्रकार
  ११.१.४ लोकशाहीचे फायदे आणि तोटे
  ११.१.५ लोकशाहीसाठी आवश्यक अटी
  ११.१.६ लोकशाहीपुढील आव्हाने
११.२ हुकुमशाही किंवा सर्वंकषवादी राज्य
  ११.२.१ सर्वंकषवादी राज्य अर्थ, व्याख्या
  ११.२.२ सर्वंकषवादी राज्याचे स्वरूप
  ११.२.३ सर्वंकषवादी राज्याची वैशिष्ट्ये
  ११.२.४ लोकशाही आणि सर्वंकषवादीराज्ये भेद
११.३ भारतीय लोकशाही
११.४ दिर्घोत्तरीय प्रश्न

## ११.०उद्दीष्ट

आधुनिक जगात दोन प्रकारची राज्ये दिसून येतात. १) उदारमतवादी लोकशाही राज्य २) सर्वकषवादी राज्य. या दोन्ही शासन प्रकारांचा अभ्यास करणे आणि भारतीय लोकशाहीचे स्वरुप समजून घेणे आवश्यक आहे.

# ११.१लोकशीही शासनपद्धती

### ११.१.१ प्रस्तावना

लोकशाही शासनाचा सर्वात चांगला प्रकार आहे, भारतात लोकशाही आहे. लोकशाही फक्त शासनप्रकारच नाही तर लोकशाही ही एक जीवनपद्धती सुद्धा आहे. आज लोकशाहीला अनेक आव्हाने आणि धोके निर्माण झाले आहेत. जास्तीतजास्त सहभागप्रधान लोकशाही अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने लोकशाहीचा अर्थ, प्रकार लोकशाहीसाठी आवश्यक तत्वे इत्यादीचा अभ्यास आवश्यक आहे.

### ११.१.२ लोकशाहीचा अर्थ, व्याख्या आणि बाजू

लोकशाहीला इंग्रजीत डेमॉक्रसी Democracy म्हणतात. यात Demos म्हणजे (समाज) किंवा लोक and kratos म्हणजे (सत्ता) असे दोन लॅटिन शब्द एकत्र आलेले आहेत. डेमॉक्रसी म्हणजे 'लोकांचे राज्य' होय.

लोकशाही जुनी संकल्पना असली तरी या संकल्पनेची सर्वमान्य व्याख्या उपलब्ध नाही. एवढेच नव्हे तर लोकशाहीचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत. प्रत्येक देशातील लोकशाहीचे स्वरुप भिन्न असते. संस्थात्मक रचना वेगळी असू शकते.

लोकशाहीचे खरे रूप समजून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या व्याख्यांचा अभ्यास गरजेचा आहे.

**जे. एस. मिल्ल** - "लोकशाही म्हणजे असा शासनाचा प्रकार जेथे सरकार बहुमताच्या हातात असते. प्रत्यक्ष सरकारी कारभार समाजाने निवडून दिलेल्या प्रतिनिधिद्वारे चालवला जातो. हे प्रतिनिधी ठराविक कालावधीनंतर होणाऱ्या निवडणूकांद्वारे निवडले जातात."

**ऑक्सफर्ड शब्दकोशात** लोकशाहीचा दिलेला अर्थ उद्बोधक आहे. "लोकशाही म्हणजे अशी शासन यंत्रणा जी लोकांनी निवडलेले प्रतिनिधी चालवतात."

या व्याख्यांद्वारे आपल्याला लोकशाहीचे विविध पैलू समजतात.

### लोकशाहीच्या तीन बाजू किंवा पैलू

सुरुवातीच्या काळात लोकशाही या संकल्पनेला फक्त राजकीय बाजू होती. आजच्या काळात मात्र याला आता आर्थिक आणि सामाजिक बाजू प्राप्त झाली आहे. लोकशाहीचा अभ्यास या तीन्ही बाजूने करावा लागतो.

**राजकीय बाजू** - राजकीय बाजू म्हणजे राजकीय सत्तेत सर्वांचा वाटा. शासकीय सत्तेला जनमताचा पाठिंबा महत्त्वाचा मानला जातो. आज परमताचा आदर, टिकाटिप्पणी, विरोधी पक्षांची टिका सहन करण्याची सहनशीलता वगैरे महत्त्वाचे असतात. याखेरीज येथे नागरिकांचे मूलभूत हक्क घटनेने दिलेले असताता. आधूनिक लोकशाहीत तर मर्जीप्रमाणे गटांना हक्का प्रदान केलेले असतात. भारताचे उदाहरण द्यायचे झाले तर आपल्या राज्यघटनेने अल्पसंख्याक समाजाला सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क दिले आहेत.

**<u>सामाजिक बाजू</u>** - फक्त राजकीय लोकशाही असून भागत नाही. याच्या जोडीने सामाजिक लोकशाही सुध्दा असावी लागते. येथे व्यक्तीची प्रतिष्ठा महत्त्वाची मानली जाते. व्यक्तीला जीवनाच्या सर्व क्षेत्रांत योग्य तो मान मिळालाच पाहिजे. प्रत्येक व्यक्तिला तिच्या आवडी-निवडीप्रमाणे कोणत्याही संघटनेचे /युनियनचे सभासद होता आले पाहिजे. व्यक्तीवर केवळ ती एखाद्या जातीची, धर्माची, वंशाची आहे म्हणून अन्याय होता कामा नये.

**<u>आर्थिक बाजू</u>** - हे सर्वात महत्त्वाचे अंग आहे. येथे जर यश मिळाले नाही तर राजकीय लोकशाही आणि सामाजिक लोकशाहीला फारसा अर्थ उरणार नाही. यात गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी कमी व्हावी, असे अपेक्षित आहे. यात भूकेपासून मूक्तता, रोजगाराच्या संधी, आर्थिक विकास अपेक्षित असतो. याशिवाय आरोग्य सेवा, निवृत्ती वेतन, महिलांना बाळंतपणाची पगारी रजा वैगेरेचाही अंतर्भाव असतो.

### ११.१.३ लोकशाहीचे प्रकार

**१) अभिजात (क्लासिकल) लोकशाही** - याचा उगम ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकात ग्रीसमध्ये दाखवता येतो. त्याकाळी ग्रीसमध्ये 'नगर राज्य' होते. अथेन्स, स्पार्टा वगैरे गाजलेली नगर-राज्ये होती. या नगर-राज्यात प्रत्यक्ष (डायरेक्ट) लोकशाही अस्तित्वात होती. नगर-राज्यांतील नागरिक पूर्ण वेळ राजकीय क्षेत्रात असायचे. प्रत्येक नागरिकाला नगर-राज्यातील सर्वोच्च सभागृहाचा सभापती होण्याचा मान एकदातरी मिळायचा. नागरिकांची संख्या इतर लोकांपेक्षा खूपच कमी असायची. उदा. अथेन्स हे त्या काळचे सर्वात मोठे नगर राज्य. या नगर राज्यांची एकूण लोकसंख्या सुमारे तीन लाख होती. यापैकी फक्त ५,०४० लोकांना मतदानाचा हक्क होता. अथेन्स समाजाचा महत्त्वाचा आणि मोठा घटक म्हणजे गुलाम ! प्रत्येक नागरिकाकडे शेकड्याने गुलाम असायचे. त्यांच्यामुळेच प्रत्येक नागरिक दिवसभर बारा महिने राजकारण करु शकायचा. नगर-राज्यांत गुलाम, महिला आणि परदेशवासी यांना राजकीय अधिकार नव्हते.

त्याकाळी प्रत्यक्ष लोकशाही राबवणे शक्य होते. याची दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे नगर-राज्यांच्या भौगोलिक विस्तार छोटा असायचा. दुसरे म्हणजे नगर-राज्यांत राजकीय अधिकार असलेल्यांची संख्या अगदीच छोटी असायची.

### २) उदारमतवादी लोकशाही -

इग्लंडला लोकशाहीची जननी म्हणतात. इंग्लंडनंतर हा प्रकार इतर युरोपियन देशांत लोकप्रिय झाला. या उदारमतवादी लोकशाहीची उत्क्रांती दोन टप्प्यात झाल्याचे दाखवता येते. १) अभिजात उदारमतवाद २)आधुनिक उदारमतवाद

**अभिजात उदारमतवाद** - याच्या प्रगतीमागे काही युरोपियन विचारवंतांचे योगदान कारणीभूत आहे. ब्रिटिश विचारवंत थॉमस हॉब्ज (१५८१-१६७९), जॉन लॉक (१६३२-१७०४) आणि फ्रेंच विचारवंत रुसो (१७१२-१७७८) यांच्या विचारांमुळे उदारमतवादी लोकशाहीचा पाया रचला गेला. त्यानी व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांची चर्चा केली. या हक्कांचे रक्षण शासनाने करावे असा त्यांचा आग्रह होता. त्यांना राजेशाहीचे अमर्याद अधिकार मान्य नव्हते. त्यांनी शासनाला मर्यादित अधिकार असावेत अशी मांडणी केली. त्यांनी खाजगी मालमत्ता, मुक्त बाजरपेठ वगैरेंची मागणी केली होती. या सर्वांना मिळून अभिजात उदारमतवाद म्हणतात.

**आधुनिक उदारमतवाद** -

अभिजात उदारमतवादाने व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांची मागणी केली. मात्र आर्थिक क्षेत्रात याच व्यक्तीला बाजारपेठेतील राक्षसी शक्तींसमोर असहाय्य केले. या विचारवंतांची मुक्त बाजारपेठेला पाठिंबा दिला. याचा अर्थ असा की गरिबांना बाजारपेठेत कोणी वाली नव्हता. त्यांच्यानतंर आलेल्या विचारवंतांना ही त्रुटी जाणवली. त्यांच्या लक्षात आले की अभिजात उदारमतवादात वेळीच लगाम घातला नाही तर यामुळे गरिब वर्ग आणि श्रीमंत वर्गातील दरी वाढतच जाईल. यामुळे समाजात उलथापालथ होईल. हे टाळायचे असेल तर शासनाला बाजारपेठेत गरिबांच्या बाजूने हस्तक्षेप करावाच लागेल.

आधुनिक उदारमतवादाच्या मते शासनाने गरिबांचे कल्याण करणारी धोरणे आखावी तशा योजना राबवाव्या. यामुळे गरिब आणि श्रीमंत यांच्यातील दरी असह्य होणार नाही. हे साध्य करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर नियोजन असावे, शासनाने किंमतीवर नियंत्रण ठेवावे. थोडक्यात म्हणजे समाजाच्या आर्थिक-सामाजिक अंगात सरकारने महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी.

**३) सहभाग असणारी लोकशाही** - ही संकल्पना समजून घेण्यासाठी आपल्याला दोन महायुध्दांच्या मधल्या काळात (१९१८-१९३९) युरोपात काय परिस्थिती होती, याचा अभ्यास करावा लागेल. पहिले महायुध्द१९१८ मध्ये संपले पहिले महायुध्दाच्या शेवटच्या टप्प्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष विलसन यांनी स्वयं-निर्णयाचे पत्रक जाहीर केले. पहिले महायुध्द संपल्यावर तीन साम्राज्ये लयाला गेली - रशीयन साम्राज्य. ऑटोमान साम्राज्य आणि ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य ! या साम्राज्यांतून अनेक नवे देश निर्माण झाले. या नव्या देशांपैकी अनेक ठिकाणी लोकशाही टिकण्यासाठी आवश्यक असणारी परिस्थिती नव्हतीच. दुसऱ्या बाजूने पहिल्या महायुध्दाच्या खर्च पेलता पेलता, युरोपातील अनेक राष्ट्रांचे कंबरडे मोडले होते. या युरोपियन देशांत नाझीवादी, फॅसिस्ट शक्ती थैमान घालत होत्या. यशावकाश या शक्ती जर्मनी (नाझी), इटली (फॅसिस्ट) देशांत सत्तारूढ झाल्या. मात्र या शक्तींचा १९४५ साली संपलेल्या दुसऱ्या महायुध्दात पराभव झाला.

दोन महायुध्दांच्या अनुभवांतून बाहेर आलेल्या जगाला सहभाग असणाऱ्या लोकशाहीचे (पार्टीसिपेटरी डेमॉक्रसी) महत्त्व पटले. समाजातील सर्वसामान्य तक्रारीला राजकीय समस्यांचे भान असावे, सरकारसमोर असलेल्या प्रश्नांची जाण असावी,असे अभ्यासकांना वाटायला लागले. यासाठी नागरिकांनी सरकारी कारभारात सहभागी झाले पाहिजे. हा सहभाग राजकीय पक्षांचा मदतीने, पक्षांच्या माध्यामातून साध्य करता येईल. याखेरीज नागरी समाजाची (सिव्हील सोसायटी) यंत्रणा कार्यान्वित करावी लागेल. याप्रमाणे स्वंयसेवी क्षेत्राला (नॉन-गव्हर्नमेंट सेक्टर) यात सहभागी करुन घेता येईल. शिवाय दबाव गट, माध्यमांची मदत घेता येईल. या सर्वांच्या मदतीने, लोकशाहीचे रुपांतर सहभाग असलेल्या लोकशाहीत करता येईल. यामुळेच काही अभ्यासक सहभागी लोकशाहीला लोकशाहीचा आणखी एक प्रकार न मानता लोकशाहीचा अधिक प्रगत, अधिक उत्क्रांत टप्पा मानतात.

अभ्यासकांनी समाजाचा सहभाग असलेल्या लोकशाहीची काही वैशिट्ये सांगितली आहेत. ती खालीलप्रमाणे आहेत -

१) **बहुसंख्यांकाची सत्ता** - येथे सत्तारूढ वर्ग बहुमताच्या जोरदार सत्ता काबीज करतो. याचा अर्थ असा की समाजातील बहुसंख्य नागरिकांना या पक्षाला सत्ता द्यावी असे वाटते. पण याचा अर्थ असा खचितच नव्हे की सत्तारूढ पक्षाने बहुमताच्या जोरावर अल्पसंख्याक

समाजावर दादागिरी करावी. उलटपक्षी आधुनिक, प्रगत, लोकशाही शासन व्यवस्थेत अल्पसंख्याकाना खास अधिकार असतात.

२) **समाजाचा पाठिंबा** - प्रगत, सहभाग असणाऱ्या लोकशाहीत निपःक्ष पध्दतीने, खुल्या वातावरणात घेतलेल्या निवडणूकांना फार महत्त्व असते. यासाठी निवडणूक आयोगाला खास अधिकार दिलेले असतात. त्या निवडणूका ठराविक काळानंतर घेतल्या जातात आणि शांततेच्या मार्गाने सत्तेचे सत्तांतर होते.

३) **जनमत** - दर ठराविक अंतराने होणाऱ्या निवडणूकांच्या दरम्यानचा काळसुध्दा महत्त्वाचा असतो. या दरम्यानच्या काळात शासनाला जनमताचा सतत अंदाज घ्यावा लागतो.

४) **चर्चा, वादविवाद, टिका** - सहभाग असणाऱ्या लोकशाहीत सत्तात्तर असणे अभिप्रेत आहे. शासन कर्त्या वर्गाने प्रतिकूल टिकेचा आदर केला पाहिजे.अशा लोकशाहीत विरोधी पक्षांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. याचा अंतिम हेतू असतो की आपण सहमतीच्या राजकारणाकडे प्रवास करावा.

वर उल्लेख केलेले सहभाग असलेल्या लोकशाहीचे खास वैशिष्ट्ये आहेत.

### **११.१.४ लोकशाहीचे फायदे आणि तोटे** -

जरी आज जगभर लोकशाही शासन व्यवस्थेचे कौतुक होत असते. याचा अर्थ असा नव्हे की या स्वरूपात काही दोष नाहीत. लोकशाहीचे काही फायदे आहेत, त्याचप्रमाणे तोटे आहेत. आपल्याला दोन्ही माहिती असणे गरजेचे आहे.

**लोकशाहीचे फायदे :**

१) **समानता** - लोकशाही शासन व्यवस्थेचा पाया म्हणजे समानता होय. ही समानता म्हणजे संधीची समानता, कायद्याचे समान रक्षण, कोणत्याही प्रकारच्या (धर्म, भाषा, जात, वंश इ.) अन्याय होणार नाही, याची खात्री दिलेली असते.

२) **स्वातंत्र्य** - लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला विचार स्वातंत्र्य, अविष्कार स्वातंत्र्य, उच्चार स्वातंत्र्य दिलेले असते. त्याचप्रमाणे धार्मिक स्वातंत्र्य, नोकरी/व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, देशात कोठेही जाण्याचे/राहण्याचे स्थायिक होण्याचे स्वांतत्र्य दिलेले असते.

३) **स्थैर्य** - लोकशाहीत सत्ता बहुमत असलेल्या पक्षाकडे असतात. परिणामी आपोआपच स्थैर्य निर्माण होते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शासनाच्या मागे बहुसंख्य समाज असतो.

४) **संवेदनशील सरकार** - लोकशाहीत सरकार मतदारांना जबाबदार असतेच, त्याचप्रमाणे सरकारला समाजात वेळोवेळी होणाऱ्या बदलांबद्दल संवेदनशिलही असावे लागते.

५) **सर्वांची प्रगती** - आज जगातील सर्व लोकशाही देशांत 'कल्याणकारी शासन' ही संकल्पना मान्य झालेली आहे. याचा व्यावहारिक अर्थ म्हणजे शासन सर्वांची प्रगती साधण्यास वचनबध्द आहे.

६) **जागतिक शांतता** - लोकशाहीत शांततापूर्ण सह-जीवनात खूप महत्त्व आहे. एक लोकशाही राष्ट्र जागतिक शांततेसाठी प्रयत्नशील असतात.

**लोकशाहीचे तोटे -**

१) **मूठभरांच्या हातात सत्ता** - लोकाशाहीत जरी बहुसंख्याकांची सत्ता असते,तरी एखाद्या चाणाक्ष कपटी नेता समाजाला भावनिक आवाहन करून मतं मिळवू शकतो. राजकीय पक्षांचा जर अभ्यास केला तर तेथेसुध्दा साऱ्या पक्षाची सत्ता मूठभर जेष्ठ नेत्यांच्या हातात एकवटली असल्याचे दिसून येईल. ही स्थिती नक्कीच धोकादायक आहे.

२) **अज्ञानी वर्गाची सत्ता** - आज जगभर अशी स्थिती आहे की विकिसत देश असो की विकसनशिल देश असो, सर्वसामान्यांना शासकीय कारभारातील गुंतागुंत समजत नाही. त्यांच्यापैकी एका अज्ञानी व्यक्तीला ते प्रतिनिधी म्हणून निवडून देतात. परिणामी लोकशाही शासन म्हणजे अज्ञानी मंडळीनी चालवलेले सरकार, अशी परिस्थिती निर्माण होते.

३) **अकार्यक्षमता** - लोकशाहीत चर्चा, वादविवाद वगैरेंना अतोनात महत्त्व असल्यामुळे निर्णय घेण्यास फार विलंब होतो. साधे, छोटे निर्णय घ्यायलासुध्दा फार वेळ जातो. परिणामी अकार्यक्षमता वाढते.

४) **भ्रष्टाचार** - येथे आपल्याला सर्वच लोकशाही देशांचा अनुभव उद्‌बोधक ठरू शकतो. लोकशाहीतील प्रशासकीय यंत्रणेत सर्वच पातळ्यांवर कमीआधिक प्रमाणात भ्रष्टाचार आढळतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लोकशाहीत निवडणूका लढवणे फार खर्चिक झाले आहे. निवडणूका लढवण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षाला भ्रष्ट मार्गाचा वापर करावा लागतो.

वर उल्लेख केलेले लोकशाहीचे काही फायदे तर काही तोटे आहेत. लोकशाही शासन व्यवस्थेचे काही तोटे असले तरी कोणी असे म्हणत नाही की लोकशाही फेकून द्या आणि त्याऐवजी हूकूमशाही/राजेशाही/लष्करशाही आणा. लोकशाहीतील तोटे कमी करत जाणे यासाठी प्रयत्न करत राहणे, हे आपले उद्दीष्ट असावे.

### ११.१.५ लोकशाही यशस्वी होण्यासाठी गरजेची असलेली परिस्थिती किंवा अटी

आपण आता लोकशाहीच्या फायदे आणि तोटयांची चर्चा केली. एखाद्या देशांत केवळ लोकशाही आणणे फारसे महत्त्वाचे नाही. त्या देशात ही शासन व्यवस्था रुजणे फार महत्त्वाचे असते. त्यासाठी काही परिस्थिती अस्तित्वात असणे, काही अटींची पूर्तता होणे गरजेचे आहे.

१) **सुशिक्षित नागरिक वर्ग** - लोकशाही देशातील नागरिक सुशिक्षित असावा. त्याला आपले हक्क व कर्तव्ये माहिती हवे. शिवाय नागरिकांकडे अद्यावत माहिती असायला हवी, जेणे करून त्यांनी आपल्या सरकारला वेळोवेळी जबाबदार धरले पाहिजे.

२) **कार्यक्षम, निर्भिड माध्यमं** - आजच्या काळात माध्यमांना लोकशाहीचा चवथा स्तंभ म्हणतात. माध्यमे म्हणजे वृत्तपत्रे, पाक्षिके, रेडिओ, दूरदर्शन वाहिन्या आणि इंटरनेट. माध्यमांच्या द्वारे माहितीची देवाणघेवाण होते, बातम्या पसरु शकतात. मुख्य म्हणजे माध्यमांतून एखाद्या ज्वलंत विषयावर देशात साधकबाधक चर्चा होऊ शकते. सरकारला, नोकरशाहीला धारेवर धरण्यांचे महत्त्वाचे हत्यार म्हणजे माध्यमं !

३) **राजकीय पक्ष** - कार्यक्षम लोकशाहीसाठी सुदृढ राजकीय पक्ष असणे गरजेचे आहे. सत्तारूढ पक्षाला विरोध करण्यासाठी, समाजासमोर पर्यायी धोरणे आणण्यासाठी राजकीय पक्षांची नितांत गरज असते.

४) **स्थानिक स्वराज्य संस्था** -आज जगभर मान्य झाले आहे की स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकशाहीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था झाल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्फतचं उद्याचे नेते घडले जातात. परिणामी चांगल्या लोकशाहीसाठी स्थायिक स्वराज्य संस्था असणे अत्यावश्यक आहे.

५) **नेतृत्व** -लोकशाही शासन यंत्रणेत सर्वच महत्त्वाच्या पक्षांमध्ये चांगल्या नेतृत्वाची गरज आहे. चांगले नेतृत्व लोकांना प्रेरणा देते, लोकांना ज्ञानी बनवते. यासाठी चांगले नेते हवे असतात.

६) **आर्थिक सुरक्षा** - लोकशाही शासनात 'कल्याणकारी शासन' ही सर्वसामान्य संकल्पना आहे. यामुळे सर्वांची प्रगती साधली जाते. परिणामी अर्थिक सुरक्षा सर्वांना मिळू शकते. यात शिक्षणाची संधी, कला क्रिडा क्षेत्रातील संधी, रोजगाराच्या संधी इ. समावेश असतो.

लोकशाही शासन यशस्वी होण्यासाठी या सर्वांची गरज असते.

**११.१.६ लोकशाहीसमोरील आव्हाने** -

जरी लोकशाही समाज व्यवस्था सर्वांना आवडते. याचा अर्थ ही व्यवस्था सर्वांना प्रिय आहे असे नाही. प्रत्येक समाजातील, देशातील काही शक्तींना लोकशाही आवडत नाही. अशा शक्ती निरनिराळ्या प्रकारे लोकशाहीला विरोध करत असतात. या आव्हानाची चर्चा खाली केली आहे -

१) **धर्मिक दहशतवाद** - हे आव्हान जगातील अनेक लोकशाही शासनासमोर आहे. भारतात तर या जोडीला जातियवाद हे आणखी भयानक आव्हान आहे. इतर काही देशांत पंथापंथात भीषण दंगे होत असतात. उदा. पाकिस्तानात शिया-सुन्नी दंगे होतात, तर इंग्लंडमध्ये प्रोटेस्टंट आणि रोमन कॅथालिक यांच्यात रक्तरंजित वाद होतात.

२) **दहशतवाद आणि लष्करशाही** -अमेरिकेवर ११ सप्टेंबर २००१ नंतर झालेल्या दहशतवादी हल्यानंतर दहशतवादाच्या भेसून चेहरा जगासमोर आला. आता 'दहशतवाद' हा जागतिक शत्रू मानला जातो. भारताला तर गेली अनेक दशके या आव्हानाला तोंड द्यावे लागत आहे. जम्मू-काश्मीर, उत्तर-पूर्व भारत वगैरे ठिकाणी खूप वर्षांपासून दहशतवादी सक्रीय आहेत.

बांगला देशासारख्या देशांत तर सतत लष्कर सत्तारूढ होण्याची भिती असते. अशा देशांना लष्करशाही येण्याची नेहमी शक्यता असते. आज आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देश लष्कराच्या टाचेखाली आहेत.

३) **जातीयवाद** - हे आव्हान खास करून भारतीय लोकशाही समोर आहे. भारतातील समाजजीवन जातीव्यव्यस्थेवर आधारलेले आहे. परिणामी आपल्या देशात, खास करून बिहारसारख्या राज्यात जाती-जातीत दंगे होतात, मारामाऱ्या होतात. आजही भारतीय संघराज्यातील अनेक राज्यात काही ठराविक जातींच्या हातात सर्व प्रकारची सत्ता एकवटलेली आढळते.

४) **गुन्हेगारीकरण** - राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण ही खरी गंभीर समस्या आहे. कायदे मोडणारे जेव्हा कायदे करतात. तेव्हा खरी शोकांतिका असते. परिणामी अनेक ठिकाणी

आपल्याला कायदा आणि सुव्यवस्था कोसळलेली दिसते. अनेक राजकीय पक्षांचे, नेत्यांचे गुन्हेगारी जगताशी संबंध असतात. हे संबंध निवडणूकीच्या काळात प्रकर्षाने जाणवतात.

५) **भ्रष्टाचार** -ही समस्या तर अशी आहे की जी सर्वत्र आढळते. श्रीमंत /प्रगत देश असो की गरीब/विकसनशील देश असो भ्रष्टाचाराचा राक्षस सर्वत्र आढळतो. राजकीय पक्ष, नेते अवैध्य मार्गाने कोट्यावधी रुपयांची मालमत्ता गोळा करतात.

६) **दारिद्य आणि निरक्षरता** - या समस्या खास करून आशिया आणि आफ्रीकेतील देशांत आढळतात. भारताचा विचार केला तर आजही ४०% समाज दारिद्र्य रेषेखाली आहे, आणि जवळजवळ तेवढाच समाज आशिक्षित आहे, गरिब व्यक्तीला लोकशाही, नागरिकाचे मूलभूत हक्क वगैरेपेक्षा रोटी, कपडा, मकान वगैरे मूलभूत गरजा महत्त्वाच्या वाटतात. अशा गरिब, अशिक्षित व्यक्तीला लोकशाहीचे फारसे आकर्षण वाटत नाही.

लोकशाही शासन व्यवस्थेसमोर आज ही खरी आव्हाने आहेत. यातील काही आव्हाने फक्त भारतीय लोकशाहीसमोर आहेत. आपल्याला या आव्हानांचा सामना करावयाचा आहे. अन्यथा आपल्याला पुन्हा एकदा गुलाम व्हावे लागेल. म्हणूनच या आव्हानांना तोंड द्यायचे आहे आणि लोकशाही सुदृढ करावयाची आहे.

## ११.२ हुकुमशाही किंवा सर्वकषवादी राज्य (Non-Democratic Government)

### ११.२.१ सर्वंकषवादी राज्य :

**अर्थ :** सर्वंकषवादी राज्य हे आधुनिक अधिकारशाही राज्याचा प्रकार आहे. उदा. निरपेक्ष सर्वसत्ताधारी राजेशाही, सर्वकषवादी राज्य, या शासनपद्धतीत व्यक्ति जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर नियंत्रण असते. कोणत्याही संस्थेला स्वतंत्रपणे काम करण्याचा अधिकार नसतो. डिक्शनरी परिभाषा अशी आहे की, "सर्वंकषवादी राज्य लोकांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर नियंत्रण ठेवतात. त्यांच्याकडे एवढी राजकीय सत्ता असते की कुठल्याही व्यक्तिंना किंवा समुहांना निर्णय घेण्याची मोकळीक राहत नाही." पूर्वीच्या सोव्हीएट युनियनला सर्वकंषवादी राज्य म्हटले जायचे कारण ते एक पक्षीय राज्य होते म्हणून नाही तर तिथे ज्या प्रकारची सत्ता वापरली जायची त्यावरून त्या राज्याला सर्वकंषवादी राज्य म्हटले जात. संपर्काची सर्व माध्यमे, शिक्षण पद्धती, सर्व सामाजिक कार्यक्रम, खेळ हे सर्व कम्युनिस्ट पक्ष किंवा सोव्हीएट युनियनच्या नियंत्रणाखाली होते म्हणून त्यांनी ह्याचा उपयोग आपल्या तत्वप्रणालीच्या प्रचारासाठी केला. सर्वकंषवादी राज्य आपल्या अनियंत्रीत सत्तेवर आणि विचारप्रणालीवर आधारलेली असतात. व्यक्तिवाद आणि उदारमतवादाला या शासनपद्धतीत विरोध असतो.

### ११.२.२ सर्वंकषवादी राज्याचे स्वरूप :

**१) केंद्रीभूत :** सर्वंकषवादी राज्य हे उदारलोकशाहीवादी राज्यापासून वेगळे असून सर्वंकषवादी व्यवस्थेमध्ये राज्याची सत्ता, निरपेक्ष, निरंकुश असते. या पद्धतीत राज्याचे मानवाच्या संपूर्ण

आयुष्यवर पूर्ण नियंत्रण असते. मानवाच्या आयुष्यातील कुठलेही क्षेत्र हे राज्यातील अधिकारक्षेत्राच्या आणि नियंत्रणाच्या बाहेर नसते. हेगेलच्या मते 'भुतलावरील देवाचे वास्तव्य म्हणजे राज्य होय.' आणि राज्याची पूजा व्यक्तिने देवाप्रमाणे करायला पाहिजे. सर्वंकषवादी राज्यामध्ये राजकीय अधिसत्ता एका व्यक्तिकडे किंवा एका पक्षाकडे असते. लोकशाहीवादी राज्याच्या उलट सर्वंकषवादी राज्यात परिस्थिती असते.

**२) एकतंत्री :** सर्वंकषवादी राज्य जन्माला आले ते पहिल्या महायुद्धानंतर, इटालीमध्ये फॅसिझमच्या स्वरूपात जर्मनीत नाझीझमच्या स्वरुपात आणि रशियामध्ये सोव्हीएट साम्यवादी राज्य म्हणून. फॅसिस्ट आणि नाझी राज्य रशियातील सोव्हीएट राज्यापेक्षा वेगळे होते पण त्यांच्यात एक साम्य होते ते म्हणजे सत्तेच्या विभागणीला विरोध. 'सर्वकंषवादी राज्यामध्ये एका पक्षाची एकतंत्री आणि वंशपरंपरागत सत्ता असते. राज्याचा सर्व कारभार सांभाळण्याची संपूर्ण सत्ता एक तंत्राने चालते. त्यांच्याच हातात संपर्क माध्यमे असून, जबरदस्तीने सत्ता कायम करण्याची क्षमताही असते. मुसोलीनीने म्हटलेच आहे की, 'सर्वंकषवादी राज्यात सर्व राज्याबद्दलच असते, त्यात राज्याबाहेरचे आणि राज्याच्या विरोधी काहीही नसते.'

सर्वंकषवादी राज्याच्या शोधाला तत्वज्ञानात्मक आधार आहे. प्लेटो या राजकीय विचारवंताच्या लिखाणात राज्य अनियंत्रित आणि आदर्श संस्था आहे असा उल्लेख आला होता. त्यांच्या मते व्यक्तिने आपल्या नैतिक विकासासाठी राज्याच्या आज्ञांचे पालन करणे आवश्यक आहे. रुसो या विचारवंताने सामुहीत ईहेत अनियंत्रीत सत्ता असते. असा विचार मांडला आहे. हॉब्जने अनियंत्रीत राजेशाहीचे समर्थन केले आहे. जर्मन आदर्शवादी विचारक हेगेल यांनी राज्याला सर्वोच्च स्थान दिले आहे म्हणजेच सर्वंकषवादाला तत्वज्ञानात्मक आधार आहे.

सर्वंकषवादी राज्याचे व्यावहारीक स्वरुप म्हणजे मुसोलीनीची हुकुमशाही होती. इटलीतील फॅसिस्ट विचारसरणीचा तो शिल्पकार होता. जर्मनीतील नाझी विचारसरणीचा शिल्पकार हिटलर याने सर्वकंषवादी राज्य हुकुमशाहीच्या स्वरूपात प्रत्यक्षात आणले. कार्ल मार्क्सने कामगार वर्गांच्या हुकुमशाहीच्या नावाखाली एक प्रकारे सर्वंकषवादाचे समर्थन केले आणि लेनिनने रशियात हुकुमशाहीच्या स्वरूपात प्रत्यक्षात आणले.

### ११.२.३ सर्वंकषवादी राज्याची वैशिष्ट्ये :

सर्वंकषवादी राज्याच्या वैशिष्ट्यांनाच हुकुमशाहीची वैशिष्ट्ये काही विचारकांनी म्हटले आहे.

**(१) एका पक्षाची हुकुमशाही (Base on official ideadogy) :** एका सर्वोच्च नेतृत्वाचा एक पक्ष या पद्धतीत राज्य करतो. राज्याच्या संपूर्ण लोकसंख्येपैकी अगदी थोडे या पक्षात असतात आणि त्यांचे वर्चस्व असते. आपल्या पक्षाच्या विचारसरणीला त्यांनी वाहून घेतले असते. पक्षाच्या सर्वात वरच्या श्रेणींचे श्रेष्ठी सर्व निर्णय घेण्याचे काम करतात. त्या पक्षाचे संपूर्ण राजकीय सत्तेवर एकतंत्रीय शासन असते. उदा. चीन.

**(२) भितीयुक्त पद्धती (No right to criticize government) :** नागरिकांची वृत्ती, विचार क्रिया इत्यादींवर पूर्ण नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न या पद्धतीत करण्यात येतो. गुप्त पोलीस आणि पक्ष यांच्याद्वारे एक प्रकारे पूर्ण नियंत्रणयुक्त वातावरण राज्यामध्ये निर्माण करण्यात येते. व्यक्तिस्वातंत्र्य आणि युक्तिवादाला या पद्धतीत कोणतेही स्थान देण्यात येत नाही.

**(३) दळणवळणांच्या साधनांवर पूर्ण नियंत्रण असते-** वृत्तपत्र, रेडिओ, टेलिव्हीजन, चित्रपट इत्यादी दळणवळणाची साधने संपूर्णपणे शासनाच्या पूर्ण नियंत्रणाखाली असतात. कोणत्याही प्रकारचा प्रतिकार कोणत्याही व्यक्तिला, शासनाला या पद्धतीत करता येत नाही आणि केल्यास शासन तो विरोध किंवा प्रतिकार दडपून टाकतात.

**(४) सैन्य आणि शस्त्र यांच्यावर संपूर्ण नियंत्रण (Rulers Monoplize power) :** तिन्ही दलाचे सैन्य, सर्व प्रकारचे देशातील शस्त्र यावर शासनाचे आणि पक्षाचे प्रत्यक्ष नियंत्रण असते. पक्षातील श्रेष्ठी आणि लष्करी प्रमुख एकमेकांशी पूर्ण संबंधीत असतात.

**(५) आर्थिक व्यवस्थेवर संपूर्ण नियंत्रण (Never open and democratic) :** आर्थिक व्यवस्थेवर मार्गदर्शन आणि नियंत्रण प्रशासकीय व्यवस्थेद्वारे शासन ठेवीत असते. साम्यवादी व्यवस्थेत केंद्रीभुत नियोजनाचा स्विकार करण्यात येतो. आर्थिक क्षेत्रातील सर्व बाजू उदा.- उत्पादन, विभाजन, व्यापार इत्यादीवर शासनाचे पूर्ण नियंत्रण असते. सर्व आर्थिक धोरणे, शासनच निश्चित करत असते.

**(६) एकसत्तावादी समाज (Opposition parties banned) :** राज्य म्हणजेच 'सर्व काही' असते; इतर सामाजिक संघटनांना परवानगी देण्यात येत नाही. व्यक्तिस्वातंत्र्य नाकारण्यात येते. पक्षाचे सर्व वाङ्मय लेखन, प्रचार, पक्षश्रेष्ठींच्या कृती, दृष्टीकोन आणि व्यक्तिजीवनावर पूर्ण नियंत्रण असते. लोक समाज संपूर्ण व्यवस्था पक्षांच्या इच्छेप्रमाणे आणि पक्षांतर्गत असते. पक्षाच्या सेवेसाठी व्यक्तिजीवन अर्पण करण्यात आलेले असते. राज्याला सर्वोच्य स्थान आणि व्यक्तिला दुय्यम स्थान असते.

**(७) समस्यांना तोंड देण्यासाठी उदयास आलेले शासन :** सर्वंकषवादी राज्याचा उदय प्रस्थापित व्यवस्थेत ज्या समस्या निर्माण झालेल्या असतात त्यांना प्रतिकार करण्यातून उदयास आलेल्या असतात. जर्मनी, इटली रशिया इत्यादी देशातील प्रस्थापित व्यवस्था अयशस्वी झाल्यामुळे सर्वंकषवादी व्यवस्था या देशांमध्ये उदयास आल्या होत्या त्यामुळे या प्रकारच्या शासनाला 'क्रॉयसेस गव्हरमेंट' असेही म्हणतात.

**सारांश :**

पहिल्या महायुद्धानंतर युरोप खंडातील अनेक देशात सर्वंकषवादी राज्य उदयाला आली होती. युद्धानंतर आर्थिक अडचणी, बेकारी, नाश इत्यादी मुळे सर्वंकषवादाच्या उदयाला पोषक परिस्थिती निर्माण होते. सर्वंकषवादात शासनाचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, बौद्धीक नियंत्रण पूर्णपणे असते. इतिहासात सर्वंकषवादाला तत्वज्ञानात्मक आधार आहे. कांट, हेगेल,

निझ्ते यांच्या विचारसरणीतून हा आधार मिळाला आहे. राज्याला अति महत्त्व दिल्यामुळे या विचारसरणीचा जन्म झाला आहे. इटली येथील फॅसीझम, जर्मनीतील नाझीझम, सोव्हीएट रशियातील स्टॅलीनच्या वर्चस्वाखाली असलेला साम्यवाद सर्वंकषवादी राज्याचा सर्वात निकृष्ठ प्रकार होय.

### ११.२.४ लोकशाही आणि हुकुमशाही किंवा सर्वंकषवादी शासनपद्धतीतील भेद :

१) लोकशाहीमध्ये राजकीय निर्णय आणि राजकीय प्रक्रियेमध्ये लोकांचा सहभाग असतो. लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शासनात सहभागी होतात.

हुकुमशाहीमध्ये राजकीय क्रियाप्रक्रियांमध्ये लोकांचा सहभाग नसतो. शासनाची अनियंत्रित आणि संपूर्ण सत्ता असते, शासन एखाद्या व्यक्तिकडे किंवा एखाद्या पक्षाकडे केंद्रीत असते. ती व्यक्ति किंवा तो पक्षच सर्व निर्णय घेतो.

२) लोकशाहीमध्ये शासनाला लोक निवडून देतात, प्रौढमताधिकार या तत्वाप्रमाणे अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येकाला आपले प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार प्राप्त होतो.

हुकुमशाहीमध्ये बंड किंवा क्रांती याद्वारे एखादा पक्ष किंवा एखादा हुकुमशहा सत्तेवर येतो.

३) लोकशाहीमध्ये शासनावर कायदे, राज्यघटना, लोकमत इत्यादीचे बंधन असते. कायदे आणि राज्यघटनेच्या मर्यादेत राहूनच शासनाला कार्ये करावी लागतात.

हुकुमशाहीमध्ये शासनाला अमर्यादीत सत्ता असतात. हुकुमशहाच्या आज्ञा आणि इच्छांनाच कायद्याचे स्वरूप प्राप्त झालेले असते.

४) लोकशाहीमध्ये अनेकतावाद आणि अनेक पक्षपद्धती असते. हुकुमशाहीमध्ये एकसत्तावाद, एकपक्षपद्धती असते.

५) लोकशाहीमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य, समता, या मुलांना महत्त्व देण्यात येते.हुकुमशाहीमध्ये सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यावर बंधने असतात. अल्पसंख्यकांना या पद्धतीत कोणतेही संरक्षण देण्यात येत नाही. स्वातंत्र्य, समता या मुल्यांना हुकुमशाहीमध्ये स्थान नाही.

६) लोकशाहीमध्ये व्यापार, व्यवसायाचे स्वातंत्र्य असते. आर्थिक स्वातंत्र्य असते. हुकुमशाहीमध्ये सर्व आर्थिक व्यवहारावर शासनाचे नियत्रंण असते.

७) लोकशाहीमध्ये कायद्याचे राज्य असते. कायद्यापुढे कोणताही भेदभाव करण्यात येत नाही. कायदा सर्वोच्च असतो आणि समान कायदा सर्वांना लागू होतो.

हुकुमशाहीमध्ये नागरीकांमध्ये भेदभाव करण्यात येतो. सर्व नागरिकांसाठी समान कायदा नसतो.

## ११.३ भारतीय लोकशाही

भारतात गणराज्यात्मक लोकशाही आहे. भारतीय संघराज्यामध्ये २८ राज्यांचा आणि सात केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो. जगामध्ये भारत ६व्या क्रमांकाचा मोठा देश आणि दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असलेला देश आहे. भारताला समृद्ध आणि प्राचीन संस्कृतीचा वारसा आहे. भारतात विविधेतून एकता निर्माण झाली आहे. भारतीय राज्याचे स्वरूप सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि गणराज्य आहे. भारतीय राज्याचे स्वरूप संघराज्यात्मक आहे; म्हणजेच केंद्रशासन आणि राज्यशासन अशी दुहेरी शासनव्यवस्था आहे. सत्ताविभाजनाप्रमाणे कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात सत्तेची विभागणी केलेली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेवरून भारतीय राज्याचे आणि शासनाचे तत्वज्ञान स्पष्ट होते. भारतात सत्तेचे प्रमुख उगमस्थान भारतीय जनता आहे. भारतीय लोकांना स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता प्राप्त करून देणे आणि राज्यांचा एकता कायम राखणे हे भारत राज्याचे उद्दीष्ट आहे. या उद्दीष्टांच्या पूर्तीसाठी भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्कांची यादी, मार्गदर्शक तत्त्वे, स्वतंत्र न्यायव्यवस्था, सत्तेचे विभाजन, सांसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, प्रौढमताधिकार या तत्वांचा स्विकार करण्यात आला आहे.

२६ जानेवारी १९५० साली भारताची राज्यघटना लागू करण्यात आली; तेव्हांपासून भारताची लोकशाही यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. भारतीय लोकशाहीवर प्रभाव पाडणारे आणि भारतीय लोकशाहीला अडथळा आणणारे घटक खालीलप्रमाणे आहेत.

**१) धर्म-** धर्म भारतीय राजकारणात महत्त्वाची भूमिका करीत आहे. बहुतेक राजकीय पक्ष धर्मावर आधारित आहेत. काही राजकीय पक्ष तर त्या विशिष्ट धर्माचे पक्ष म्हणूनच ओळखले जातात. अनेक राजकारणी आणि राजकीयपक्ष धर्म या घटकाचा आधार घेऊन राजकारण करतात. त्यामुळे बरेचदा भारतीय लोकशाहीला धोका निर्माण होतो.

**२) जात** भारतातील अनेक राजकीय पक्ष जातीवर आधारलेले आहेत. ते राजकीय पक्ष आपआपल्या जातीचेच हितसंबंध जोपासतात त्यावेळी राष्ट्रीय हित आणि लोकशाहीला धोका निर्माण होतो. दिवसेंदिवस भारतीय राजकारणामध्ये जातिवाद अतिशय जोपासला जात आहे. जातीच्या नावाखाली राजकारण हा भारतीय लोकशाहीच्या मार्गातील फारमोठा अडथळा आहे.

**३) लोकसंख्या** - भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश लोकसंख्येच्या बाबतीत आहे. अति लोकसंख्या असल्यामुळे शिक्षण, नोकरी, अन्नधान्य, पाणी इत्यादी सोयी पुरेशा आणि व्यवस्थितपणे दिल्या जात नाही. लोकसंख्यावाढ थांबविणे हा भारतीय लोकशाही शासनापुढे असलेला फार मोठा प्रश्न आहे.

**४) प्रादेशिकता** भारतात २८ घटकराज्ये आहेत. प्रत्येक घटक राज्याची भाषा, संस्कृती वेगवेगळी आहे. ग्रामीण शहरी असमतोल खूप मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्यामुळे शहरी भागाची लोकसंख्या प्रचंड वाढली आहे आणि गावे ओस पडली आहे. हासुद्धा भारतीय लोकशाहीपुढे असलेला फार मोठा प्रश्न आहे. अनेक राजकारणी अति प्रादेशिक अस्मिता जोपासतात आणि भारतीय लोकशाहीला धोक्यात आणतात.

**५) श्रेष्ठीजणशाही** लोकशाहीच्या नावाखाली श्रेष्ठीजनशाही, घराणेशाहीचा विकास भारतात झालेला दिसून येतो. प्रत्येक राजकारणी आपली बायको, मुलेमुली यांना राजकारणात आणण्याचेच राजकारण लोकशाहीच्या नावाखाली करीत आहेत. श्रीमंत लोकांची आणि राजकारण्यांची घराणेशाही म्हणजे भारतीय लोकशाही होय असे सामान्य जणांना वाटायला लागले आहे.

**६) राजकीय पक्ष –** संधीसाधू राजकारण, भ्रष्ट्राचार, गुन्हेगारीकरण म्हणजेच राजकारण असे स्वरुप राजकीय पक्षानी भारतीय लोकशाहीला आणले आहे. घोषणाबाजी, जातीचा आधार, पक्षाचे हित इत्यादीनाच राजकीय पक्षानी वाहून घेतले आहे असे दिसते. राष्ट्रीय पक्ष सुद्धा संकुचित वृत्ती आणि दृष्टीकोन बाळगून आहेत.

**७) हक्काविषयी जागृकता आणि राजकीय सहभाग** - भारतीय लोकांमध्ये हक्कांविषयी जागृकता नाही. लोकांचा राजकीय सहभाग वाढत नाही तोपर्यंत भारतीय लोकशाही खऱ्याअर्थाने यशस्वी होवूच शकणार नाही. मत देणे एवढ्यापुरताच भारतीय लोकशाहीमध्ये बहुसंख्य लोकांचा सहभाग आहे. खऱ्याअर्थाने राजकीय सहभाग लोकांना वाढविणे गरजेचे आहे.

**८) अशिक्षितता** - लोकशाहीसाठी सुशिक्षित, सुंस्कारीत आणि राजकीय हक्कांच्या बाबतीत जागृक लोक असावे लागतात. नाहीतर व्होटबॅक राजकारण लोकशाहीच्या नावाखाली कार्यरत राहते. लोकशाहीच्या नावाखाली अशिक्षितांचे शासन अस्तित्वात आल्याचे चित्र भारतीय लोकशाहीमध्ये दिसून येते.

**९) दारिद्र्य** - भारतातील / लोकसंख्या आजही दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. ज्या देशात अस्तित्वासाठी आणि दोनवेळच्या जेवणासाठीच संघर्ष करणारी जनता आहे; अशा देशात लोकशाही समर्थ होणे कठीण असते.

**१०) संसदसदस्य** - अनेक संसदसदस्य सांसदीय कामकाजामध्ये लक्ष देत नाही. अनेकांचे गुन्हेगारी रेकॉडर्स आहेत. लोकशाही मुल्यांची जोपासना ज्यांच्याकडून व्हायला पाहिजे तेच लोकशाही मूल्ये तुडवितात. अपात्र संसदसदस्य गुणवत्ता प्रदान लोकशाही कशी उभारु शकतील ? हा भारतीय लोकशाहीपुढे असलेले एक आव्हानच आहे.

**११) आर्थिक प्रश्न** - बेकारी अति महागाई हे ही भारतीय लोकशाहीला धोका निर्माण करणारे घटक आहेत.

**१२) कायदा व सुव्यवस्था** - दहशतवाद, नक्षलवाद, धार्मिक दंगे, जातीय हिंसाचार देशातील राजकीय वातावरण दूषित करणारे घटक आहेत. भारतात लोकशाहीला या घटकांपासून धोका निर्माण झाला आहे.

**१३) व्होटबँक राजकारण** - 'विविधतेतून एकता' भारतात निर्माण झाली आहे. अनेक राजकीय पक्ष राष्ट्रीय प्रश्न, राष्ट्रीय कलपाण, सुरक्षितता यापेक्षा देशातील या विविधतेचा कायदा घेऊन व्होट बॅक राजकारणालाच अधिक महत्व देत आहेत.

**१४) स्थानिक प्रश्नांकडे दूर्लक्ष** - मंदिर कि मज्शिद अशा प्रश्नापेक्षा प्रत्येक गावाचे प्रश्न कोणते आहेत. शिक्षण, पाणी, आरोग्य, इतर सेवा सोयी प्रत्येक गावामध्ये आहेत कि नाही. भविष्यातील प्रश्नांचा वेध घेऊन त्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाय इत्यादीचा विचार करण्याची भारतीय लोकशाहीला आज गरज आहे. स्थानिय सबळता होऊन, स्थानिय विकासाकडे अधिक लक्ष देणे भारतीय लोकशाहीचे लक्ष्य व्हायला पाहिजे.

निष्कर्ष - भारतीय लोकशाहीची वाटचाल स्वातंत्र्यापासून सुरु आहे. आजच्या भारतीय लोकशाहीला अनेक आव्हानापासून धोका आहे, असे दिसते.

## ११.४ प्रश्न

१. लोकशाहीचा अर्थ सांगून; लोकशाहीसाठी आवश्यक अटी कोणत्या ते लिहा.
२. लोकशाहीपुढील आव्हानांची चर्चा करा.
३. सर्वकषवादी राज्याचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये सांगा.
४. भारतीय लोकशाहीवर लिहा.
५. लोकशाहीव्यवस्था आणि हुकुमशाही व्यवस्थेतील भेद स्पष्ट करा.

❖❖❖❖

# १२

# मोड्यूल ८
# प्रकरण - विचारसरणी

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ विचारसरणीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये
१२.३ विचारसरणीचे महत्त्व व भूमिका
१२.४ विचारसरणीचे वर्गीकरण
१२.५ प्रश्न

## १२.० उद्दिष्ट्ये

विचारसरणीची भूमिका प्रत्येक देशांच्या संदर्भात समजून घेण्यसाठी विविध विचारसरणींचा अभ्यास आवश्यक ठरतो. कोणतीही विचारसरणी अभ्यासतांना विचारसरणीचा अर्थ, वैशिष्ट्ये, पक्रार माहित असणे आवश्यक आहे.

## १२.१ प्रस्तावना

व्यक्तिवाद, उदारमतवाद, उपयोगितावाद, समाजवाद, साम्यवाद, फॅसिस्टवाद, गांधीवाद इत्यादी अनेक विचारसरणींचा उदय आणि विकास १९ व्या आणि २० व्या शतकात झाला. जगातील प्रत्येक देशाने यापैकी कोणत्याही एक किंवा दोन विचारसरणींचा स्विकार केलेला आहे. विचारसरणी त्या त्या काळात निर्माण झालेल्या समस्यांवर उपाय आणि चांगली राज्यव्यवस्था कशी आणावी हे सुचविण्यातून उदयास आल्या आहेत.

## १२.२ विचारसरणीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

**विचारप्रणाली म्हणजे काय ? विचारसरणीचा अर्थ** - विचारसरणीला इंग्रजीत Ideology म्हणतात. ह्या शब्दाचा अर्थ “The science of ideas” असा आहे.

**ऑक्सफोर्ड इंग्लीश डिक्शनरी** प्रमाणे "अर्थिक किंवा राजकीय सिध्दान्त विषयक विचार पध्दती म्हणजे विचारसरणी होय."

**मॅकआयव्हर** यांच्या मते - "विशिष्ट उद्दीष्टे केंद्रस्थानी ठेवून राजकीय, अर्थिक किंवा सामाजिक मुल्यांवर आधारित विचारपध्दती म्हणजे विचारसरणी होय"

**डेव्हिड इस्टन** - "विशिष्ट व्यवस्थेच्या सदस्यांना ज्या विचार आणि उद्दिष्टांच्या संचाद्वारे भूतकाळाचे निवेदन करता येते, वर्तमान परिस्थितीचा अर्थ स्पष्ट करता येतो आणि भविष्यकाळाचा वेध घेता येतो अशा उद्दिष्टांचा समुच्चय म्हणजे विचारप्रणाली होय."

वरील व्याख्यांवरून "विचारसरणी" ची वैशिष्ट्ये खालील आहेत हे स्पष्ट होते.

१) **विचारांचा संच** (a set of ideas) -

विचारसरणी मध्ये अनेक विचारांचा समुच्चय असतो. उदा. भांडवलशाही विचारसरणीमध्ये मुक्त अर्थव्यवस्था, खाजगीकरण, उदारमतवाद इत्यादी अनेक विचारांचा समावेश होतो. साम्यवादी विचारसरणी वर्गविहीन व्यवस्थेवर भर देणाऱ्या विचारांचा संच आहे.

२) **विचार करण्याचा एक मार्ग** (a way of thinking)–

विचारसरणी लोकांच्या दैंनदिन जीवनाकडे बघण्याचा एक दृष्टीकोन असतो किंवा विचार करण्याचा मार्ग असतो ज्यातून सामाजिक, अर्थिक, राजकीय व्यवस्थेविषयीही दृष्टीकोन तयार होतो.

३) **राष्ट्राच्या सर्व बांजूचा समावेश** (Encompasses all aspects of a nation) -

राष्ट्राच्या वैचारिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक सर्व बाजूंवर विचारसरणीचा प्रभाव पडणारा असतो. उदा. गांधीवादी विचारसरणी स्वयंपूर्ण स्वावलंबी ग्रामीण व्यवस्था, अर्थिक स्तरावर ग्रामीण व्यवस्थेला स्वावलंबी बनविणारी अशी कुटीरद्योग व्यवस्था, शैक्षणिक स्तरावर कला आणि अनुभवातून शिक्षण इत्यादीचा समावेश होतो. राष्ट्राची राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व बाजूंचा समावेश विचारसरणीमध्ये असतो.

४) **विशिष्ट राजकीय व्यवस्थेवर भर -**

विशिष्ट प्रकारची राजकीय आणि सामाजिक व्यवस्था यावर प्रत्येक विचारसरणीचा भर असतो. उदा. साम्यवाद वर्गविहीन आणि राज्यविहीन व्यवस्थेवर भर देणारी विचारसरणी आहे. भांडवलवाद मुक्त अर्थव्यवस्थेवर भर देणारी विचारसरणी आहे. गांधीवाद राजकीय आणि आर्थिक विकेंद्रीकरणावर भर देतो.

५) **विचारसरणी कार्यप्रेरीत** (an action oriented) असते -

प्रत्येक विचारसरणी मध्ये लोकांना प्रभावित करून कार्यप्रेरीत करण्याची क्षमता असते. उदा. इटलीमध्ये एकेकाळी फॅसिस्टवादाचा अतिशय प्रभाव होता. रशियन साम्यवादाने प्रभावित होऊन लोकांनी क्रांती केली होती. स्वातंत्र्यानंतर भारतात समाजवादाचा अतिशय प्रभाव होता. भारतात स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रवादाचा प्रभाव होता. बरेचदा लोकांनी त्या विशिष्ट विचारसरणीद्वारे कार्यप्रवण व्हावे म्हणून विशिष्ट भाषा, प्रतिके इत्यादीचाही उपयोग करण्यात येतो.

६)    **प्रचलित प्रस्थापीत व्यवस्थेचे मूल्यमापन** -

प्रस्थापित प्रचलित व्यवस्थेचे मूल्यमापन करुन त्या व्यवस्थेतून ज्या समस्या निर्माण झालेल्या असतात. त्या संमस्यावर कोणते उपाय करावेत अशा प्रतिक्रियात्मक स्वरुपात बरेचदा विचारसरणींचा उदय होतो. उदा. भांडवलशाहा आणि, अतिव्याक्तिवादी विचारसरणीमुळे ज्या समस्या निर्माण झाल्या होत्या त्या कशा सोडव्यावा. त्यावर कोणते उपाय व मार्ग आहेत हे सुचविणे अशा प्रतिक्रियात्मक स्वरुपात साम्यवाद आणि समाजवादाचा उदय झाला होता.

**सारांश :-**

विचारसरणी म्हणजे काय ?

१ व्याख्या

- शब्दश:-
- ऑक्सफोर्ड इंग्लीश डिक्शनरी -
- मॅकआयव्हर -
- डेव्हिडईस्टन -

२ विचारसरणीमध्ये सामाविष्ट मुद्दे

१) विचारांचा संच
२) विचार करण्याचा एक मार्ग
३) राष्ट्राच्या सर्व बाजूंचा समावेश
४) विशिष्ट राजकीय व्यवस्थेवर भर
५) कार्यप्रेरित
६) प्रचलीत व्यवस्थेचे मूल्यमापन

## १२.३ विचारसरणीची भूमिका आणि उदिष्ट

विचारप्रणाली मध्ये चांगली व्यवस्था, चांगले जीवन यासंबंधीच्या कल्पना सुचिवण्यात आलेल्या असतात. राजकीय क्षेत्रात विचारप्रणालींनी महत्त्वाची भूमिका केली आहे. त्या त्या काळी त्या त्या देशांमध्ये विचारसरणी एवढ्या लोकप्रिय कां झाल्यात. विचारसरणींने कोणती भूमिका केली आहे. त्याचे विवेचन खालीलप्रमाणे आहे.

१)    **राजकीय कृतिशीलता आणणारा मुख्य घटक** -

विशिष्ट उद्दीष्ट व हेतूने लोकांना प्रेरीत करणे, त्यांच्यात एकी घडविणे आणि ते उद्दीष्ट गाठण्यास कृतिप्रवण करण्याचे काम विचारसरणींनी केले आहे. जगामध्ये आतापर्यंत ज्या चळवळी आणि क्रांत्या झाल्या आहेत त्या विशिष्ट विचारसरणीने प्रेरित होऊन लोकांनी केल्या आहेत. विचारसरणीतून लोकांना एक प्रकारचे भावनिक आव्हान करण्यात येते. ते भावनिक आव्हान चळवळीच्या स्वरुपात व्यक्त होते. म्हणूनच बरेचदा राजकारणी राजकीय विचारसरणींचा उपयोग एक साधन किंवा शस्त्र म्हणून करतात. त्यांच्या बाजूने किंवा एखाद्याच्या विरोधी वातावरण त्या विचारसरणीच्या माध्यमातून तयार करतात. उदा. फ्रेंच राज्यक्रांती उदारमतवादी विचारप्रणालीने प्रेरीत होऊन लोकांनी केली. राष्ट्रवादी विचाराने प्रभावित होवून भारतीय लोकांनी स्वांतत्र्यलढा उभारला होता. विचारसरणीमुळे मोठ्याप्रमाणात लोकांच्या चळवळी होत्या.

२) **युध्द आणि तणावास कारणीभूत** -

राजकीय विचारसरणीमुळे फक्त देशाच्या अंतर्गतच तणावपूर्ण वातावरण निर्माण होते असे नाही तर देशादेशांमध्ये सुध्दा युध्दपूर्ण वातावरण विचारसरणीमुळे झाल्याची उदाहरणे आहेत. उदा. उदारमतवादी विचारसरणी आणि साम्यवादी विचारसरणी एकमेकांविरोधी तणाव निर्माण करणाऱ्या आहेतच. परंतु या दोन विचारसरणीमध्ये संपूर्ण जगाची विभागणी झाली आहे. स्थानिय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवरील संघर्ष विचारसरणीभूत उदयास आले आहे. विचारसरणींमुळे मोठ्या प्रमाणात लोकांच्या चळवळी आणि क्रांत्या झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. उदा. अमेरिका भांडवलशाही विचारप्रणालीचा देश आहे. चीन साम्यवादी विचारप्रणालीचा देश आहे.

३) **विचारसरणी मानवी जीवनाला अर्थपूर्ण बनविते** -

व्यक्तिच्या भौतिक आर्थिक गरजांची पूर्ती करणे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे ध्येय असते. परंतु याशिवाय विशिष्ट उद्दीष्ट, मिशन व्यक्तीपुढे असावे लागते की ज्यामुळे व्यक्तीजीवन समाधानी बनते. विशिष्ट विचारसरणीच्या माध्यमातून एखाद्या उद्दीष्टाला वाहून घेणे व कार्य करणे यामुळे अर्थात जीवनाला अर्थ प्राप्त होतो. विचारसरणीमुळे लोकांच्या विचारांना आकार प्राप्त होतो. काही विचारप्रणालींचा पगडा लोकांवर एवढा असतो की त्या विचारप्रणालीसाठी लोक प्राणाचे बलिदान करण्यास तयार होतात.

४) **लोकांना संघटीत करण्याचे काम** -

लोकांना संघटीत करण्याचे कार्य एकेकाळी धर्म करीत असे. परंतु आधुनिक काळात विचारसरणीच्या माध्यमातून लोक संघटित होतात, एकमेकांना जोडल्या जातात. इच्छित राजकीय व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी लोकांचे प्रयत्न संघटित करण्याचे काम राजकीय विचारसरणी करतात. उदा. फॅसिझम विचारप्रणालीने इटालीतील लोक एकत्रित आले होते. हिटलरने नाझीझम विचारप्रणाली अंतर्गत जर्मनीतील लोकांना संघटीत केले होते.

५) **सामाजिक जीवनाच्या सर्व बांजूवर विचारसरणींचा प्रभाव असतो** -

सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी साधन म्हणूनही विचारसंरणींनी कार्य केले आहे. उदा. स्वातंत्र्यापूर्वी गांधीवादी विचारसरणीने संपूर्ण भारतीय समाजावर नियंत्रण प्रस्थापित केले होते. गांधीवादी विचार आणि चळवळींनी लेक भारावलेले होते.

६) **एक साधन** -

अनेक विकसनशील देशांमध्ये विचारसरणीचा उपयोग साधन म्हणून करण्यात येतो. उदा. राजकीय व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करून देण्यास, राष्ट्र जोडण्यास किंवा तोडण्यास साधन म्हणून विचारसरणीचा उपयोग अनेक राष्ट्रांनी केला आहे.

७) **एक निश्चित दिशा देण्याचे कार्य** -

नव्याने स्वतंत्र्य झालेल्या देशांमध्ये त्या राज्याला निश्चित दिशा व लक्ष्य देण्याचे कार्य विचारसरणींनी केले आहे. उदा. भारतात समाजवादी विचारप्रणालीनुसार स्वातंत्र्यांनंतर वाटचाल करण्यात आली आहे. चीनने साम्यवादी विचारप्रणालीनुसार प्रगती केली आहे.

**निष्कर्ष** -विचारसरणीने आतापर्यंत महत्त्वाची भूमिका आणि कार्य केले आहे. आज प्रत्येक देश विशिष्ट विचारसरणीशी जोडला गेला आहे. उदा. अमेरिका भांडवलशाही, अर्थव्यवस्थेशी जोडला आहे. चीन साम्यवादी आहे. राजकीय पक्ष, लोकांचे राजकीय वर्तन इत्यादीला आकार देण्याचे, मार्गदर्शन करण्याचे कार्य विचारसरणी करीत असते.

**सारांश :-**

विचारसरणीची भूमिका आणि उद्दीष्ट

↓

१) कृतिशिलता आणली.
२) मानवी जीवन अर्थपूर्ण.
३) लोकांना संघटीत केले.
४) समाजावर नियंत्रण.
५) एक साधन म्हणून
६) एक निश्चित दिशा दिली.

## १२.४ विचारप्रणालीचे वर्गीकरण

जगातील प्रत्येक देशाने विशिष्ट विचारसरणी स्विकारली आहे. त्या विचारप्रणालीच्या तत्वानुसार प्रत्येक देश आपआपली वाटचाल करीत आहे. उदा. अमेरिका भांडवलशाही, चीन साम्यवादी भारताने समाजवाद या प्रमाणे प्रत्येक देश विशिष्ठ विचारप्रणाली नुसार कार्य करीत आहे.

**विचारसरणींचे वर्गीकरण सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे आहे :**

**विचारसरणींचे प्रकार**

१. परंरावादी विचारसरणी
२. क्रांतिवादी विचारसरणी
३. उक्रांतिवादी विचारसरणी
४. लोकसत्तावादी विचारसरणी
५. राज्यसत्तावादी विचारसरणी

१) परंपरावादी विचारसरणी - परंपरागत समाजव्यवस्थेचे आणि मूल्यांचे उदात्तीकरण आणि समर्थन करणाऱ्या विचारसरणीला परंपरावादी (Conservative) किंवा उजवी विचारसरणी (Rightist) म्हणतात.

२) क्रांतिवादी विचारसरणी - प्रचलित व्यवस्था आणि मूल्ये कुचकामी आहेत, ती व्यवस्था उलथवून क्रांतिकारी मार्गाने आमूलाग्र बदल आणू इच्छिणारे म्हणजे क्रांतिवादी विचारसरणी होय. उदा. साम्यवाद, नाझीवाद, फॅसीस्टवाद.

३) उत्क्रांतीवादी विचारसरणी - प्रचलीत व्यवस्थेत हळुहळु, टप्प्याटप्प्याने, उत्क्रांतीच्या मार्गाने बदल आणू इच्छिणारे म्हणजे उत्क्रांतीवादी होय. उदा. समाजवादी विचारसरणी.

४) लोकसत्तावादी विचारसरणी - व्यक्तिला प्राधान्य देणारी आणि राज्याकडे कमीतकमी सत्ता असावी यावर भर देणारी विचारसरणी म्हणजे लोकसत्तावादी विचारसरणी होय. उदा. उदारमतवाद, सर्वोदयवाद.

५) राज्यसत्तावादी विचारसरणी - राज्य आणि राज्यकर्ते यांना प्राधान्य देऊन राज्याकडे जास्तीतजास्त सत्ता असावी याचे समर्थन करणाऱ्या विचारसरणी म्हणजे राज्यसत्तावादी विचारसरणी होय. उदा. साम्यवादी विचारसरणी.

आजच्या जगात विचारसरणींची समर्पकता काय आहे हा महत्वपूर्ण प्रश्न आहे. अनेक लेखकांच्या मते औद्योगिक राज्याच्या उदयानंतर भांडवलशाही आणि समाजवादी दोन्ही प्रकारच्या विचारसरणी अर्थहीन झाल्या आहेत. विचारसरणींना आज कोणतेही महत्त्व नाही. दोन्ही प्रकारच्या समाजवादी आणि भांडवलशाही देशांमध्ये आज सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्या समान आहेत. शास्त्रीय आणि तंत्रज्ञानात्मक प्रगतीमुळे देशांमधील भेदभाव कमी झाले आहेत. एका बाजूला तांत्रिक प्रगती आणि दुसऱ्या बाजूला औद्योगिक शास्त्राची अंमलबजावणी यामुळे परंपरागत भांडवलवादी राज्याचा दर्जा आणि स्वरुप बदलले आहे. भांडवलवादी राज्याच्या कार्यात आणि उद्दिष्टातही मूलभूत बदल समकालीन जगातील आर्थिक आणि राजकीय घटकांनी घडवून आणले आहे. व्यवस्थापनात कामगारांना वाटा या संकल्पनेमुळे वर्ग नष्ट झाले आहे. आज पाश्चात्य देशामध्ये कामगार सामाजिक, आर्थिक, राजकीय हक्क उपभोगत आहे. त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारला आहे. त्यांच्या कामासंबंधीच्या अटींमध्ये खूपच सुधारणा झाली आहे. आज त्यांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा मिळाली आहे. उदार भांडवलशाही राज्यांनी आर्थिक क्रियामध्ये हस्तक्षेप करायला सुरुवात केली. समाजातील सर्व लोकांचे कल्याणावर आता राज्याचा भर आहे.

सोविएत युनियन, चीन या देशांनीही परंपरागत मार्क्सचा सिद्धांत आणि मार्क्सवादी तत्वांपासून पुढे वाटचाल केली आहे. शांततापूर्ण सहअस्तित्व या कल्पनेत उदारमतवाद आणि मार्क्सवाद यांचे सहअस्तित्व म्हणजे दोन्ही विचारसरणींनी एकमेकांच्या मुल्यांचे आदर करुन एकत्र राहणे हा आहे. आजच्या समकालीन जगात उदारमतवाद आणि मार्क्सवाद दोन्ही बदलले आहे. या दोन्ही विचारसरणींची जी मुलतत्त्वे आणि स्थिती होती ती आज नष्ट झाली आहे. या दोन्ही विचारसरणी एकमेकींच्या जवळ आल्या आहेत. आज दोन्ही विचारसरणी असलेले राष्ट्र कल्याणकारी राष्ट्र असल्याचा दावा करतात.

तथापि आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक देशांसाठी विचारसरणी आजही महत्त्वाच्या आहेत. त्या देशाच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी लोकांच्या इच्छा-आकांक्षा पूर्तीसाठी योग्य ठरेल अशी विचारसरणी हे देश स्विकारीत आहे. कारण विचारसरणीच्या अभावी या देशांमध्ये इच्छित उद्दिष्ट साध्य करणे कठिण होईल. देशांमध्ये विकास आणि प्रगतीच्या दृष्टीने योग्य दिशा देण्याचे काम करण्यास विचारसरणी आवश्यक आहे. या देशांसाठी विचारसरणी आजही महत्त्वाच्या आहेत.

**भांडवलवाद** - ज्या व्यवस्थेत आर्थिक घटक मुक्त असतात अशी मुक्त आर्थिक व्यवस्था म्हणजे भांडवलवाद होय. मुक्तता हे उदारमतवादाचे सुद्धा वैशिष्ट्य आहे. सर्व प्रकारच्या आर्थिक संधी, सर्व राजकीय स्वातंत्र्या भांडवलवादात असते.

**उदारमतवाद** - लोकांचे सार्वभौमत्व व राजकीय स्वातंत्र्यापासून आर्थिक स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. आर्थिक आणि नागरी स्वातंत्र्य संपत्तीच्या हक्कासंबंधीत आहे. नकारात्मक उदारमतवाद उत्पादनाची साधने आणि खाजगी संपत्तीची मालकी यावर विश्वास करतो. उदारमतवादाचा मुक्त अर्थव्यवस्थेवर विश्वास आहे. आर्थिक क्षेत्रात राज्याचा हस्तक्षेप असू नये. यावर उदारमतवादाने भर दिला आहे. उदारमतवादात आणखी परिवर्तन झाली. नवीन **सकारात्मक उदारमतवाद** उदयाला आला. हा सकारात्मक उदारमतवाद नकारात्मक उदारमतवादाच्या पुढे जावून राज्याला लोकांचे कल्याण यंत्रणा समजतो. या नवीन उदारमतवादात स्वातंत्र्याबरोबरच समतेलाही महत्त्व देण्यात आले आहे. समता म्हणजे समान संधी या अर्थाने होय. नवीन उदारमतवादाच्या बाजूंमध्येच भांडवलवाढ दिसून येतो. उत्पादनाच्या साधनांची आणि खाजगी संपत्तीची मालकी यावरचा भांडवलशाहीचा विश्वास नष्ट झाला नाही.

**मार्क्सवाद** - मार्क्सवादाच्या दृष्टीकोनातून उदारमतवाद म्हणजे भांडवलदार वर्गाच्या संपूर्ण हक्कांचे समर्थन करणारा सिद्धांत होय. मार्क्सवाद उत्पादनाच्या साधनांवर सामुहिक मालकी या बाजूचाच आहे. सर्व लोकांनी त्या संपत्तीचा उपभोग घ्यावा या बाजूचाही आहे. मार्क्सवाद हा भांडवलशाही व्यवस्थेविरुद्ध फक्त बंडच नाही तर मार्क्सवादच भांडवलशाहीला पर्याय आहे यावर भर देतो.समाजवादी सिद्धांतही भांडवलवादाला विरोध करतात परंतु समाजवादी भांडवलवादाला पर्यायी व्यवस्था सुचवू शकले नाहीत. फक्त मार्क्सवाद असा एक आहे की ज्या विचारसरणीने भांडवलवादाला नष्ट करुन त्याजागी पर्यायी व्यवस्था सुचविली आहे.

**समाजवाद** - साम्यवाद म्हणजे मार्क्सवादाने सुचविलेल्या क्रांतीकारी पद्धतीविरुद्ध बदल घडविण्यासाठी शांततामय आणि हळूवार मार्ग सुचविणारी विचारसरणी म्हणजे समाजवाद. भांडवलवादामुळे समाजात जी भयानक विषमता निर्माण झाली होती ती योग्य मार्गांच्याद्वारे नष्ट करणे आणि समाजात प्रगतीकारक बदल घडविणे यावर समाजवादाने भर दिला आहे. उत्क्रांतीवादी मार्गांच्याद्वारे हळूहळू भांडवलवाद नष्ट करावा असे समाजवाद्यांचे मत होते. स्पर्धा नष्ट करावी त्याऐवजी सहकार्यांच्या आधारावर व्यवस्था आणावी असे समाजवादी म्हणतात. मालक आणि मजूर यांच्यात सहकार्य प्रस्थापित करुन सामाजिक एकता निर्माण करता येते. त्यामुळे समाजही मजबूत होतो असे समाजवाद्यांचे मत होते.

समाजवाद्याने मुख्य उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करावे आणि ते उद्योग राज्याने नियंत्रित करावे यावर भर दिला. उदा. रेल्वे, एअरवेज, शिपींग, संरक्षणाचे साधन निर्मिती, उद्योगधंदे इत्यादींचे राष्ट्रीयीकरण करावे आणि त्यांच्यावर राज्याचे नियंत्रण प्रस्थापित करावे यावर समाजवादाने भर दिला. खाजगी आणि सार्वजनिक उद्योग यांनी एकमेकांशी सहकार्याने कार्य करावे, स्पर्धात्मक व शोषणात्मक बनू नये असे समाजवादाचे मत होते.

**राष्ट्रवाद** - राष्ट्रवादी विचारप्रणाली म्हणजे एकतेच्या भावनेने एकत्रित येणे होय.

**गांधीवाद** - स्वंतत्र, स्वयंपूर्ण स्वावलंबी ग्रामीण व्यवस्था, साधी राहणी, मर्यादीत गरजा, विकेंद्रीकरण, राजकारणाचे नैतीकीकरण, या तत्वांना महत्व देणारी गांधीवादी विचारसरणी होय. फॅसिझम आणि नाझीझम या हुकुमशाहीला प्रेरणा देणाऱ्या विचारसरणी होत्या. एकेकाळी इटाली आणि जर्मनी या विचारसरणीने प्रेरीत होते.

## १२.५ प्रश्न

१. विचारसरणी म्हणजे काय? विचारसरणीचे महत्त्व स्पष्ट करा.
२. विचारसरणीचे प्रकार यावर विश्लेषणात्मक लिहा.
३. आधुनिक काळातील विचारसरणीची उपयोगिता सांगा.

❖❖❖❖

# १३

# साम्यवाद

**घटक रचना :**

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ समाजवादाचा अर्थ
१३.३ भांडवलवादाचा अर्थ
१३.४ साम्यवादाचा अर्थ आणि स्वरुप
१३.५ साम्यवादीची तत्वे
१३.६ साम्यवादाचे मूल्यमापन
१३.७ सारांश तक्ता
१३.८ प्रश्न

## १३.० उद्दिष्ट्ये

जगामध्ये साम्यवादी विचारसरणी अतिशय प्रभावी ठरलेली आहे. चीन या देशाने साम्यवादी व्यवस्था आणून खूप प्रगती केली. त्यादृष्टीने साम्यवादी विचारसरणीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## १३.१ प्रस्तावना

साम्यवाद आणि समाजवाद दोन्ही विचारसरणी औद्योगिक भांडवलशाही व्यवस्थेला प्रतिक्रिया म्हणून निर्माण झाल्या आहेत.त्यामुळेच साम्यावाद, समाजवाद आणि भांडवलवाद या तिनही विचारसरणी एकदमच उच्चारल्या जातात. साम्यवादाचा अभ्यास समाजवाद आणि भांडवलवाद या दोन्ही विचारसरणीचा अभ्यास केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. म्हणूनच साम्यवादाचा अभ्यास करताना समाजवाद आणि भांडवलवादाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

## १३.२ समाजवादाचा अर्थ

संपत्तीचे योग्य विभाजन आणि उत्पादन लोकशाही मार्गाने आणणे यावर भर असणाऱ्या विचारसरणीला समाजवाद म्हणतात. 'समाजाची न्याय आर्थिक रचना करणे' यावर समाजवादाचा भर असतो. भांडवलशाहीला समाजवादाचा विरोध असतो.

## १३.३ भांडवलवादाचा अर्थ

खाजगीकरण, नफा, फायदा, स्पर्धा, मुक्त आर्थिक रचना, आर्थिक क्षेत्रात राज्याचा हस्तक्षेप नसणे या गोष्टींना महत्व देणारी विचारसरणी म्हणजे भांडवलवाद होय.

भांडवलशाही व्यवस्था व्यक्तीला पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य देणारी असते. राज्याच्या हस्तक्षेप आर्थिक क्षेत्रात नसतो. त्याचा परिणाम म्हणजे काही मूठभर श्रीमंत लोकांकडून बहुसंख्यकांचे शोषण आणि दडपशाही होते. भांडवलशाहीत संपत्तीचे अन्यायी विभाजन, खुली स्पर्धा, नफा फायदा याला अति महत्व दिल्यामुळे श्रीमंत आणि गरीब याच्यामध्ये तणावाचे वातावरण निर्माण होते. दारिद्र्य, बेकारी, आर्थिक असमता या समस्या निर्माण होतात. वरीलप्रकारे निर्माण झालेले आर्थिक संकट आणि आर्थिक समस्या कशा सोडवाव्या, त्यावर उपाय काय या विचारातून समाजवाद आणि साम्यवादाचा उदय झाला आहे.म्हणजेच अतिव्यक्तिवाद आणि भांडवलवादाला प्रतिक्रिया म्हणजे समाजवाद व साम्यवाद होय.

## १३.४ साम्यवादाचा अर्थ आणि स्वरुप

साम्यवाद आणि समाजवाद या दोन्ही विचारसरणीमध्ये नेहमी गोंधळ करण्यात येतो. कार्लमाक्स साम्यवादाचा जनक होय. मार्क्सने सुध्दा साम्यवादासाठी 'शास्त्रीय समाजवाद' असा शब्दप्रयोग केला होता. असे म्हणतात की सर्व साम्यवादीसमाजवादी असतात परंतु सर्वच समाजवादी साम्यवादी नसतात. साम्यवादाला समाजवादाचीच एक शाखा समजण्यात येते. परंतु साम्यवाद आक्रमक, क्रांतीकारी आणि हिंसाचारी आहे. साम्यवाद आणि समाजवादाचे उद्दिष्ट व ध्येय्य एकच आहे. ते म्हणजे आर्थिक न्याय प्रस्थापित करणे. परंतु साम्यवाद आणि समाजवादाची साधने वेगवेगळी आहेत. साम्यवादाची साधने क्रांती, चळवळ, शासनाशी संघर्ष करणे ही आहेत. समाजवादाची साधने शासकीय नियंत्रण, कायदे, शासनाशी सहकार्य करणे ही आहेत.

साम्यवाद म्हणजे "क्रांतीच्या मार्गाने वर्गविहीन आणि राज्यविहीन व्यवस्था आणणारी विचारसरणी होय." साम्यवादी व्यवस्थेमध्ये कोणताही वर्गभेद असणार नाही आणि प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या क्षमतेप्रमाणे आणि गरजेप्रमाणे काम आणि मोबदला मिळेल.

सारांश - साम्यवाद म्हणजे काय ?

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| साध्य | साधने | स्वरूप | प्रतिक्रिया | साम्यवादाय्यवस्था म्हणजे |
| आर्थिक समता न्याय आणणे | क्रांती | आक्रमक | भांडवलशाहीविरोधी | वर्गविहीन व राज्याविहीन व्यवस्था |

## १३.५ साम्यवादाची तत्वे

'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' आणि 'दास कॅपिटल' या ग्रंथामध्ये कार्लमार्क्सने साम्यवादी विचारसरणी मांडली होती. ही विचारसरणी रशिया, चीन, पूर्व युरोपामध्ये लोकप्रिय झाली होती. रशियामध्ये १९१७ साली कांती होऊन लेनिनच्या नेतृत्वा खाली तर चीनमध्ये १९४९ साली माओच्या नेतृत्वाखाली साम्यवादी विचारसरणीचा स्विकार केला होता. साम्यवादी विचारसरणची मुख्य तत्वे खालील आहेतः-

<u>**तत्वे**</u> :- १) द्वंद्वात्मक भौतिकवाद
२) ऐतिहासिक भौतिकवाद
३) अतिरिक्त मूल्य सिध्दान्त
४) वर्गसंघर्षाचा सिध्दान्त
५) कामगारांची हुकुमशाही
६) वर्गविहीन आणि राज्यविहीन व्यवस्था.

१) **द्वंद्वात्मक भौतिकवाद** :-

द्वंद्ववाद म्हणजे चर्चा. द्वंद्ववादी सिध्दान्त हेगेल ने मानवी संस्कृतीचा आणि राज्याचा विकास कसा झाला हे स्पष्ट करण्यासाठी मांडला होता. हेगेलच्या मते मानवी संस्कृतीचा विकास हळुहळु उत्क्रांतीने द्वंद्ववादी सिध्दान्तानुसार झाला आहे . उदा. एक विधान त्याला प्रत्युत्तर म्हणून दुसरे विधान होते. जुने विधान कालबाह्य ठरते आणि नविन उदयास येते. प्रत्येक काळात आणि समाजात त्या त्या वेळी ज्या गोष्टीचे वर्चस्व असते तो वाद (Thesis) असतो. त्याला काळाच्या ओघात प्रतिवाद (Anti-thesis) उदयास येतो. वाद आणि प्रतिवाद यांच्या संघर्षातून संवाद (synthesis) उदयास येतो. अशाप्रकारे विकासाची प्रकिया द्वंद्ववादाप्रमाणे होते.

**द्वंद्ववादी सिद्धांत :**

वाद × प्रतिवाद = संवाद

हेगेलचा कार्लमार्क्सवर अतिशय प्रभाव होता. हेगेलचा द्वंद्ववादी सिध्दान्त कार्लमाक्सने साम्यवाद स्पष्ट करण्यास उपयोगात आणला. मार्क्सच्या द्वंद्ववादी भौतिकवादी सिध्दान्ताची वैशिष्टये खालीलप्रमाणे होती.

१) संपूर्ण विश्व एक आहे आणि एकमेकांशी जोडलेले आहे.
२) हे विश्व स्थिर नाही; विश्वात सतत बदल घडत असतात.
३) नकारात्मक आणि सकारात्मक घटकांमध्ये सतत संघर्ष होतो. वाद × प्रतिवाद. या घटकांमध्ये संघर्ष होतो आणि बदल घडतात.
४) द्वंद्ववादाप्रमाणे होणारे बदल जलद असतात.
५) संख्यात्मक बदल (गरीब कामगार वर्गाची संख्या) गुणात्मक बदल साम्यवादी समाज अस्तित्वात आणणार आहेत. हा बदल वाद × प्रतिवाद = संवाद या द्वंद्ववादी सिध्दान्ता प्रमाणे होणार आहे.
६) द्वंद्ववादी सिध्दान्ताला माक्सने भौतिक किंवा आर्थिक अर्थ दिला. मार्क्सच्यामते आर्थिक कारणामुळे जगात बदल होतात म्हणून या तत्वाला द्वद्वांत्मक भौतिकतावाद म्हणतात.

मार्क्सच्या मते औधौगिकरण आणि भांडवलशाही मुळे सर्व संपत्ती आणि उत्पादनाची साधने भांडवलदाराच्या हाती केंद्रीत झाली आहे. संपत्ती नसलेल्या श्रमिक वर्गाची संख्या जास्त आहे. भांडवलदार आणि कामगार दोन्ही वर्गाची उद्दीष्टे, हितसंबंध, दृष्टिकोन, मुल्ये एकमेकांच्या विरूध्द आहेत. परंतु भांडवलशाहीत दोन्ही वर्ग अस्तित्वात आहेत. दोन्ही वर्ग एकमेकांवर आधारलेले आहेत. भांडवलदार वर्ग कामगार वर्गाचे शोषण करतो. कामगारांना त्यांच्या श्रमाचा अतिशय कमी मोबदला देण्यात येतो. त्यामुळे कामगार वर्गाची संख्या वाढली, त्यांच्यात जागृकता आली की कामगार वर्ग संघटीत होऊन भांडवलदारां विरूध्द क्रांती करतील. अशाप्रकारे संख्यात्मक घटक गुणात्मक बदल घडवून आणील.वाद × प्रतिवाद = संवाद हया द्वंद्ववादी सिध्दान्ताला मार्क्सने भौतीक अर्थ दिला. भांडवलदारवर्ग × कामगारवर्ग = साम्यवाद या मार्क्सच्या विश्लेषणाला द्वंद्वात्मक भौतिकवाद म्हणतात.

भांडवलशाहीतील भांडवलदारवर्ग 'वाद' होय.
भांडवलदारवर्गाला विरोध करणारा कामगारवर्ग म्हणजे 'प्रतिवाद' होय.
भांडवलदारवर्ग आणि कामगारवर्ग यांच्यातील संघर्षातून निर्माण झालेला 'संवाद' म्हणजे साम्यवाद होय.

२) **ऐतिहासिक भौतिकवाद** :- मार्क्सने साम्यवाद स्पष्ट करतांना इतिहासाचा भौतिक म्हणजेच आर्थिक दृष्टीकोनातून अर्थ लावला आहे. मार्क्सच्या मते समाजाची आर्थिक रचना समाजाची सामाजिक, आणि राजकीय रचना ठरविते. समाजाच्या आर्थिक रचनेप्रमाणे आणि व्यवस्थेप्रमाणे समाजातील सर्व सामाजिक , राजकीय, बौध्दीक संबंध,कायदेपध्दती उदयास येते. म्हणजेच समाजाची आर्थिक रचना समाजातील सर्व गोष्टींवर प्रभाव पाडणारी असते.एक विशिष्ट वर्ग ज्याचे उत्पादनाच्या साधनांवर नियंत्रण असते। तो वर्ग (भांडवलदार वर्ग) इतरांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करतो. आर्थिक सत्ता आणि बळा बरोबरच ते राजकीय सत्तेवर वर्चस्व प्रस्थापित करुन इतर वर्गाचे शोषण करतात. यातूनच क्रांतीचे वातावरण तयार होते. अशाप्रकारे संपूर्ण मानवी इतिहासच वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. उदा. मालक विरुध्द गुलामस, सरंजामदार विरुध्द शेतकरी, भांडवलदार विरुध्द कामगार. मार्क्सच्या मते समाजाची आर्थिक व्यवस्था समाजाच्या विकासाची दिशा निश्चित करीत असते. इतिहासात ज्या घटना घडल्या त्याच्या मुळांशी आर्थिक कारणे होती. इतिहासाचे पुनरावलोकन केल्यास असे दिसते की वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करीत. त्यातून क्रांती होऊन इतिहस घडला आहे. भांडवलदार आणि कामगार यांच्यातील संघर्ष अटळ आहे. कारण भांडवलदार कामगारांचे शोषण करतात.त्यांच्यावर अन्याय करतात असे मत माक्सने ऐतिहासिक भौतिकवाद तत्वाद्वारे मांडले होते. ऐतिहासिक भौतिकवादाची वैशिट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) समाजात बदल आणि समाजाचा विकास दैवी कायद्याप्रमाणे होत नाही.
२) सामाजिक जीवनातील आर्थिक परिस्थिती समाजात बदल घडवून आणते.
३) उत्पादन संबधामध्ये बदल झाले की संपूर्ण सामाजिक व्यवस्था बदलते आणि त्याचप्रमाणे राजकीय व्यवस्था बदलते. उदा. मालक गुलाम, भांडवलदार कामगार इत्यादी.

३) **अतिरिक्त मूल्याचा सिध्दान्त** -

मार्क्सचा मूल्य सिध्दान्त असा होता की कामगार आणि त्याचे श्रम यामुळे एखाद्या वस्तूला मूल्य प्राप्त होते. उदा. लाकडाच्या तुकड्याला खुर्ची बनविण्याचे काम कामगार करतो.

उदा. लाकडाचा तुकडा ३०० रुपयाचा असतो. त्याची खुर्ची तयार झाल्यानंतर ती खुर्ची बाजारामध्ये २००० रुपये मुल्य किंमतीची होते. म्हणजेच ३०० रुपये किंमतींचा लाकडाचा तुकडा २००० रुपये मुल्य किंमतीचा होतो कारण कामगाराने श्रम करुन ती खुर्ची बनविली असते. कामगाराच्या श्रमामुळे लाकडाच्या तुकड्याला मुल्य प्राप्त झाले.

अतिरिक्त मुल्य म्हणजे वस्तुची किंमत आणि कामगाराला दिला जाणारा पगार यातील तफावत होय. उदा. खुर्चीची किंमत २००० रुपये आणि कामगाराला खुर्ची बनविल्याबद्दल पगार २०० रुपये देण्यात येतो. ३०० रुपये लाकडाची किंमत होय. म्हणजे २००० – ५०० = १५०० रुपये हे अतिरिक्त मुल्य किंवा नफा होय. नफा किंवा अतिरिक्त मुल्य भांडवलदार घेतो.

भांडवलदार कामगारांना अतिशय कमी पगार देतात आणि संपूर्ण नफा स्वतः घेतात म्हणजेच भांडवलदार कामगारांचे शोषण करतात कारण भांडवलदारांकडे भांडवल आणि उत्पादनाची साधने आहेत. कामगारांकडे भांडवल आणि उत्पादनाची साधने नसल्यामुळे कामगारांना आपले श्रम विकण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. त्यामुळे भांडवलदार कामगारांकडून जास्तीत जास्त काम करवून घेतात आणि त्यांना कमी पगार देतात.

अशाप्रकारे कामगारांचे शोषण आणि अन्याय भांडवलशाही व्यवस्थेमध्ये कसे होते ते दाखविण्यासाठी माक्सने साम्यवाद मांडतांना अतिरिक्त मूल्य सिध्दान्त मांडला होता.

मार्क्सच्या मते 'श्रम' हा उत्पादनातील मुख्य घटक असतो. परंतु वस्तूच्या मूल्यातील योग्य व न्याय वाटा कामगाराला मिळत नाही. अशाप्रकारे कामगारांचे शोषण आणि अन्याय झाल्यामुळेच एकदिवस भाडंवलदाराविरूध्द क्रांती करण्यास कामगार प्रेरित होतील.

अतिरिक्त मूल्य सिध्दान्ताद्वारे मार्क्सने कामगारांना त्यांचे शोषण व अन्याय याबाबतीत जागरूक बनविले आणि संघटीत होऊन वर्गसंघर्ष करण्यास त्यांना प्रोत्साहन दिले.

४) **वर्गसंघर्षाचा सिध्दान्त** :- 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ज्यामध्ये मार्क्सने साम्यवाद मांडला आहे, ज्याला कामगार वर्गाचे 'बायबल' म्हणून संबोधले जाते. त्या कम्युनिस्ट मॅनिफेस्टोची सुरवातच पढील वाक्याने होते "संपूर्ण मानवी समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे". एकमेकांविरूध्द असलेल्या वर्गांचा इतिहास होय. एक वर्ग शोषित आणि दुसरा वर्ग शोषक. मानवी समाजाच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर एक विशिष्ट वर्ग ज्यांचे उत्पादनाच्या साधनावर नियंत्रण असलेला श्रीमंत वर्ग समाजातील इतर वर्गाचे शोषण करीत असतात. श्रीमंत वर्गाचे सर्वत्र वर्चस्व असते. एवढेच नाहीतर श्रीमंत वर्ग राज्याचा उपयोग सुध्दा 'साधन' म्हणून करतात. राज्याद्वारे आपली आर्थिक सत्ता सुरक्षित ठेवण्याचा आणि आर्थिक बळ वाढविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेच इतिहासात दोन वर्गात संघर्ष झाले. त्यांच्या संघर्षातून नविन व्यवस्था उदयास आली.

**भांडवलशाहीत वर्गसंघर्षाची कारणे** - भांडवलशाहीत कामगारवर्गाचे शोषण होते. त्यामुळे कामगारांच्या लक्षात येईल त्यांच्या दैन्य आणि दुःखाचे मुख्य कारण भांडवलदार व भांडवलशाही व्यवस्था आहे. भांडवलशाहीमध्ये भांडवलदार नफा आणि फायदा जास्तीतजास्त कसा होईल याकडे लक्ष देतात, तर कामगारवर्ग आपल्या पगारामध्ये वाढ कशी होईल याचा प्रयत्न करतात.

अशा परिस्थितीमुळे वर्गसंघर्ष आणि भांडवलदारांचा नायनाट अटळ आहे. भांडवलशाही मध्येच भांडवलशाहीच्या नाशाची बीजे आहेत. कामगारवर्गामध्ये जागृकता आली की ते संघटित होऊन एकदिवस वर्गसंघर्ष करण्यास उद्युक्त होतील.

या वर्गसंघर्षामध्ये एका बाजूला कामगार वर्ग आणि दुसऱ्या बाजूला भांडवलदार वर्ग जे संख्येने अतिशय कमी असतात. जेव्हा संघर्षाला सुरवात होईल तेव्हा मध्यमवर्ग कामगार वर्गाला नेतृत्व देण्याचे काम करतील. मार्क्सने कामगार वर्गाला आव्हान केले होते की कामगारवर्गांनी संघटीत व्हावे आणि भांडवलवाद नष्ट करावा. या वर्गसंघर्षामध्ये कामगार वर्ग काहीही गमावणार नाही तर त्यांच्या पायातील अन्यायाच्या बेड्या फक्त नष्ट होतील. एकदा राज्यामध्ये 'वर्गविहीन व्यवस्था' स्थापन झाली की वर्गसंघर्ष संपेल.

**वर्गसंघर्षाचे स्वरुप (Forms)** - १) आर्थिक २) राजकीय ३) वैचारिक याप्रमाणे या वर्गसंघषाचे स्वरूप राहील असे मार्क्सचे मत होते.

**आर्थिक संघर्ष** - आर्थिक संघर्षामध्ये कामगारवर्ग भांडवलदारवर्गाकडे काही आर्थिक सवलती मागण्यापासून क्रांतीला सुरवात करतील. उदा. पगारवाढ मिळावी म्हणून, कामाचे तास कमी करण्यास यावे म्हणून, कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुधारावी म्हणून. अशाप्रकारे आर्थिक फायदे आणि सवलती मिळविण्यासाठी सर्वात प्रथम टप्पा म्हणजे कामगार संघटित होऊन कामगार युनियन ची स्थापना करतील. संघर्षाचे साधन संप, हरताळ या स्वरुपाचे राहील. अशाप्रकारच्या आर्थिक संघर्षामुळे कामगारांची आर्थिक परिस्थिती सुधारु शकेल आणि आर्थिक दृष्टीने कामगार जागृक होईल. परंतु आर्थिक संघर्ष करणे हे साम्यवादाचे उद्दीष्ट नाही. आर्थिक शोषण थांबविण्यासाठी त्यांना राजकीय संघर्ष करावा लागणार आहे.

**राजकीय संघर्ष** - कामगारांनी निवडणूकीत सहभागी होऊन सत्तेत असलेल्या भांडवलदारांच्या शासनाला नष्ट करावे आणि कामगार वर्गाची शासनपध्दती सत्तेवर आणावी. एकदा कामगार वर्गाची शासनपध्दती आस्तित्वा आली की सर्व बदल आपोआपच करता येतील. कामगार वर्ग संख्येने जास्त असल्यामुळे निवडणूकीत त्यांना हमखास यश मिळेल. वर्गसंघर्षामध्ये राजकीय संघर्ष अतिशय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**वैचारिक संघर्ष** - कामगारांनी मानसिक तयारी वर्गसंघर्षासाठी व्हावी म्हणून वैचारिक संघर्ष आवश्यक असतो. साम्यवादी विचारसरणीमुळे कामगारांमध्ये वैचारिक क्रांती होऊन क्रांती करण्यास त्यांची मानसिक तयारी होईल असा मार्क्सचा विश्वास होता.

.

एकूणच वर्गसंघर्षाचा मुख्य हेतू भांडवलवाद नष्ट करणे आणि 'वर्गविहिन समाजाची स्थापना करणे हा आहे.

५) **कामगारवर्गाची हुकुमशाही** :-

भांडवलदार आणि कामगार यांच्यातील वर्गसंर्घषामध्ये कामगारवर्गाचाच विजय होईल असा मार्क्सचा विश्वास होता. वर्ग संघर्षानंतर कामगारवर्गाची सत्ता राज्यात येईल. कामगारवर्गाची हुकूमशाही प्रस्थापित झाल्यानंतर लगेच राज्यविहीन व्यवस्था येऊ शकणार नाही त्यामुळे मधला

काळ संक्रमणकाळ असेल. या संक्रमणकाळात कामगारवर्गांची हुकुमशाही प्रस्थापित झाल्यानंतर खालील बदल करण्यात येतील -

१) सर्व उत्पादनाची साधने आणि नैसर्गिक उत्पादन साधने यावर कामगारवर्गाचे म्हणजेच राज्याचे नियंत्रण प्रस्थापित करण्यात येईल.
२) भांडवलशाहीच्या हितसंबधासाठी असणाऱ्या सर्व राजकीय संस्थांचा नायनाट करण्यात येईल आणि नवीन कायेदमंडळ, न्यायमंडळ, कार्यकारीमंडळ, कायदे पोलीस व्यवस्था, शासकीय व्यवस्था स्थापन करण्यात येईल.
३) भांडवलदाराचा संपूर्ण नाश करण्यासाठी केंद्रीय व्यवस्था स्थापन करण्यात येईल.
४) उत्पादन आणि वितरण यावर राज्याचे नियंत्रण प्रस्थापित करण्यात येईल.
५) प्रत्येकाला त्याच्या क्षमतेप्रमाणे, पात्रतेप्रमाणे आणि गरजेप्रमाणे या तत्वावर राज्य कार्य करील

अशाप्रकारे 'कामगारवर्गांची हुकूमशाही' प्रस्थापित झाल्यानंतर वरीलप्रकारचे बदल करण्यात येतील.

**६) राज्यविहीन आणि वर्गविहिन व्यवस्था :-**

कामगारांची हुकुमशाही प्रस्थापीत झाल्यानंतर भांडवलवादाला पूर्ण नष्ट करून सर्व राजकीय संस्थावर कामगार आपले नियंत्रण प्रस्थापित करतील. त्यानंतर त्या राजकीय संस्थाचा उपयोग आर्थिक आणि सामाजिक न्याय देणाऱ्या समाजाची स्थापना करण्यासाठी करतील. वर्गविहीन समाजाची स्थापना झाली की प्रत्येकाला कामाप्रमाणे मोबदला मिळेल. श्रीमंतगरीब, भांडवलदार, कामगार ही वर्ग व्यवस्था नष्ट झाल्यानंतर कुणीही कुणाचे शोषण करणार नाही. हळूहळू राज्य संस्थेची गरजच उरणार नाही. आणि राज्याचा विलय होईल.

मार्क्सच्या मते एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करण्यासाठी निर्माण केलेले साधन म्हणजेच राज्य आहे. भांडवलदारांनी कामगारांचे शोषण करण्यासाठी राज्याचा उपयोग एक शस्त्र म्हणून केला आहे. त्यामुळेच भांडवलदार वर्गच नष्ट झाला म्हणजे राज्याची सुध्दा आवश्यकता राहणार नाही.

**राज्याचा विलय आणि साम्यवादाची स्थापना** :- वर्गविहीन आणि राज्यविहीन व्यवस्था म्हणजेच साम्यवादी समाज होय. साम्यवादी समाज खालील तत्वांच्या आधारावर कार्य करील :-

१) प्रत्येकाला त्याच्या क्षमतेप्रमाणे आणि गरजेप्रमाणे.
२) सर्वप्रकारच्या गुलामगिरीपासून आणि शोषणापासून मुक्तता.
३) सर्वप्रकारचे भेदभाव नष्ट करणे याला प्रथम स्थान देण्यात येईल. संस्कृति, भाषा, वंश, धर्म इत्यादी बाबतीत भेद असले तरी कोणतेही वाईट रुप हे भेद धारण करणार नाहीत. या भेदामुळे सामाजिक विकासाला कोणतीही खीळ बसणार नाही.

## १३.६ साम्यवादाचे मूल्यमापन आणि उपयोगिता

**दोष** :-

**१) आर्थिक घटकाला अति महत्त्व आणि इतर घटकांकडे दूर्लक्ष -**

साम्यवादी सिध्दान्त मांडतांना मार्क्सने आर्थिक घटकांना अति महत्त्व दिले आहे.आर्थिक कारणांमुळेच इतिहास घडला यावर भर दिला. इतिहास घडण्यास कारणीभूत इतर कारणांकडे दूर्लक्ष केले.  आर्थिक घटकांशिवाय इतर घटक उदा. राजकीय, धार्मिक, सामाजिक कारणे ही असतात की ज्यामुळे इतिहास आणि व्यक्तिच्या क्रिया घडतात.

**२) वस्तुला मुल्य फक्त श्रमामुळेच प्राप्त होत नाही -**

मार्क्सच्या मते कामगाराच्या श्रमामुळे वस्तुला मूल्य प्राप्त होते. परंतु एखादी वस्तु  तयार करण्यासाठी कामगाराच्या श्रमाशिवाय भांडवल, जागा, प्रशासकीय व्यवस्था, वीज, यंत्रसामुग्री इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. त्यामुळे कामगारांचे श्रम वस्तुची मूल्य ठरवणारी गोष्ट आहे. यावर आधारलेला अतिरिक्त मूल्य सिध्दान्त अतिशयोक्तीपूर्ण वाटतो..

**३) अतिक्रांतीकारी सिध्दान्त -**

साम्यवादी विचार वर्ग संघर्ष आणि क्रांतीवर आधारलेला आहे. वर्गसंघर्ष आणि क्रांती मानवतेच्या दृष्टीने धोकादायक आहे. संघर्ष आणि क्रांतीला महत्व देणारा विचार द्वेष, हिंसा निर्माण करतो.

**४) राज्याविषयी चुकीची मते -**

मार्क्सच्या मते राज्य शोषण करणारे यंत्र आहे. श्रीमंत वर्ग राज्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. राज्याचा उपयोग इतरांचे शोषण करण्यास करतात. कामगारांच्या हक्क संरक्षणाच्या मार्गातील राज्य धोंड आहे. परंतु प्राचीन ग्रीक विचारवंत ते आधुनिक विचारवंतांच्या मताप्रमाणे राज्य व्यक्तीजीवनासाठी आणि व्यक्तिविकासासाठी आवश्यक संस्था आहे. राज्याशिवाय व्यक्तिजीवनाला अर्थच उरणार नाही. सार्वजनिक सुरक्षा, शांतता यासाठी राज्य आवश्यक आहे.

**५) राज्याचा विलय होईल ही कल्पना काल्पनिक आहे -**

आधुनिक साम्यवादी राज्य उदा. चीन आणि पूर्व युरोपातील राज्यांमध्ये राज्याचा विलय झाला नाही.

**६) धर्मविरोधी विचार -**

साम्यवादी विचार धर्मविरोधी आहे. मार्क्सच्या मते ‘धर्म अफुची गोळी आहे’ धर्मामुळे लोक विचार करीत नाही. धर्माचा उपयोग भांडवलदार आपल्या फायद्यासाठी करतात. धर्मामुळे लोक दुबळे बनतात. मार्क्स भौतिकतावादी असल्यामुळे देव, दैव यावर मार्क्सचा विश्वास नव्हता.

**७) साम्यावाद भौतिकतेला महत्त्व देणारा विचार आहे.**

कोणताही बदल मानवी प्रयत्नामुळेच शक्य आहे. कामगारांच्या शोषणाविरूध्द कामगारांनीच लढा द्यायला पाहिजे. आर्थिक बळ अधिक महत्त्वाचे याविचारावर मार्क्सचा विश्वास होता.

**साम्यवादाची उपयोगिता** -

१) कार्लमार्क्सच्या साम्यवादी विचाराने विसाव्या शतकामध्ये अनेक देशांना प्रभावित केले होते. जगातील अनेक देशांमध्ये साम्यवादी विचाराने क्रांती घडवून आणली. त्यानंतर त्या देशांमध्ये साम्यवादाची स्थापना झाली. उदा. रशिया, चीन, पूर्व युरोप.

२) साम्यवादाने कामगारामध्ये जागृकता आणली आणि त्यांना संघटीत होण्यास प्रेरणा दिली. औद्योगिकरणानतंर भांडवलशाहीमुळे अनेक कामगारांचे जीवन दयनीय झाले होते. या अवस्थेतून बाहेर पडण्यास काय करावे या विचारामध्ये कामगार असतांना मार्क्सच्या साम्यवादाने त्यांना आशा दिली. भांडवलशाहीच्या बेड्या तोडून न्याय व्यवस्था कशी आणावी हा विचार कामगारांना साम्यवादाने दिला.

३) अनेक कारखान्यांमध्ये भांडवलदारांनी कामगार कल्याणाच्या दृष्टीने अनेक नियम केले. कामगार कल्याण्याच्या दृष्टीने शासनाने ही अनेक कायदे केले याचे कारण साम्यवाद होय.

४) आजच्या जागतिकरण, खाजगीकरण, उदारीकरण, मुक्त बाजारपेठ असलेल्या आर्थिक व्यवस्थेमध्ये जगात भांडवलशाही आणि शोषण करणारी धोरणे पुन्हा नव्यारुपाने येत आहे. भांडवलशाही विरोधी चळवळीला पुन्हा मजबुती येत आहे. अशावेळी साम्यवादी विचारसरणीला नव्याने महत्व येत आहे.

५) साम्यवादी विचारसरणी आणि मार्क्सवाद यात आजच्या काळात थोडा भेद केल्यामुळे आधुनिक काळात साम्यवादी विचारसरणी अधिक उपयोगी ठरत आहे. आजच्या या साम्यवादाला नव-साम्यवाद म्हणतात.

मार्क्स, लेनिन स्टॅलिन यांनी साम्यवादाचा जो अर्थ दिला त्यापेक्षा नव-साम्यवाद वेगळा आहे. नवसाम्यवादने आधुनिक जगातील वास्तविकता ओळखून त्याप्रमाणे त्यांची ध्येय आणि त्याकडे जाणारी कृती व धोरणे ठरविली आहेत. नवसाम्यवादाने

१) पहिला गोष्ट लक्षात घेतली की राज्य आवश्यक संस्थां आहे. राज्याशिवाय मानवी समाज अस्तित्वात राहू शकत नाही. राज्याअभावी अंदाधुंदी येईल. त्यामुळे साम्यवादाला जे काही उद्दीष्ट ध्येय गाठायचे ते राज्यातर्गंतच करावे लागणार आहे.

२) दुसरी गोष्ट नवसाम्यवादाने स्वीकारली ती म्हणजे वर्गसंघर्ष आणि क्रांती सामाजिक आणि आर्थिक व्यवसथा आणण्यासाठी एकमेव मार्ग नाही तर इतरही मार्ग आहेत. राजकीय जागृकता, घटनात्मक पध्तती, शिक्षण हे मार्ग साम्यवाद आणण्यासाठी वापरता येतात.

३) तिसरी गोष्ट म्हणजे सत्तेवर असेल्या शासनाला सहकार्य करून उद्दीष्ट गाठणे.

अशाप्रकारे नव-साम्यवादी विचारसरणी आजच्या काळात अतिशय उपयोगी ठरणारी आणि शासनावर प्रभाव पाडणारी विचारसरणी आहे.

## १३.७ सारांश - तक्ता

साम्यवाद

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| साम्यवाद म्हणजे काय ? | साम्यवादाची तत्वे | दोष | उपयोगिता |
| १) साध्य | १)व्दंव्दात्मक भौतिकवाद | १)आर्थिक घटकांना अति महत्व | १) कामगारांचे कल्याण |
| २) साधन | २) ऐतिहासिक भौतिकवाद | २) आक्रमक | २) अनेक देशामध्ये प्रगति |
| ३) स्वरुप | ३) अतिरिक्त मुल्य सिध्दान्त | ३) काल्पनिक | ३) आजच्या जागतिकरणाच्या युगात महत्त्व |
| ४) प्रतिक्रिया | ४) वर्ग संघर्षाचा सिध्दान्त | ४) धर्मविरोधी | ४) नवसाम्यवाद |
| ५) साम्यवादी व्यवस्था | ५) कामगारवर्गाची हुकुमशाही | ५) भौतिकवादी | |
| | ६) वर्गविहीन राज्यविहीन व्यवस्था | | |

नवसाम्यवाद

- राज्यात राहूनच ध्येय पूर्ण करणे
- क्रांतीशिवाय इतर घटनात्मक मार्गाचा स्विकार
- प्रस्थापित शासनाशी सहकार्य करुन

## १३.८ प्रश्न

१) साम्यवादाचा अर्थ स्पष्ट करा.

२) साम्यवादाच्या मुख्य तत्वांची चर्चा करा.

३) साम्यवादाचे टिकात्मक विवेचन करा.

४) नवसाम्यवाद म्हणजे काय ?

❖❖❖❖

# १४

# गांधीवाद (Gandhism)

**घटक रचना :**

१४.० उद्दिष्ट्ये
१४.१ प्रस्तावना
१४.२ गांधीवादाच अर्थ आणि स्वरुप
१४.३ गांधीवादाची वैशिष्ट्ये किंवा मुख्य तत्वे
१४.४ सांराशतक्ता - गांधीवाद
१४.५ प्रश्न

## १४.० उद्दिष्ट्ये

संपूर्ण जगाचे लक्ष आकर्षित करणारी भारतीय विचारसरणी 'गांधीवादी' विचारसरणी आहे. गांधीवादी विचारसरणी समजून घेणे आवश्यक आहे.

## १४.१ प्रस्तावना

महात्मा गांधी आणि गांधीवादी विचारसरणी आंतरराष्ट्रीय दृष्टीने प्रसिद्ध आहे. गांधीवादी विचारसरणी नुसारच जगात सुखशांती प्रस्थापित होईल असा अनेकांचा विश्वास आहे. या विचारसरणीचा अर्थ, स्वरुप, तत्वे खालील प्रमाणे आहे.

## १४.२ गांधीवादाचा अर्थ आणि स्वरूप

महात्मा गांधी यांनी त्यांच्या जीवनात आचरणात आणलेली तत्त्वे आणि विविध समस्यांवर त्यांनी सुचविलेल्या संकल्पना म्हणजेच गांधीवादी विचारसरणी होय. गांधीवाद नावाचा कोणता वाद (ism) महात्मा गांधी यांनी मांडलेला नाही. 'माझे सत्याचे प्रयोग' हे गांधीचे आत्मचरित्र आहे. महात्मा गांधीचे विचार, त्यांनी सुचविलेल्या संकल्पना 'नवजीवन' 'हरिजन' 'बॉम्बेक्रॉनिकल' या त्याकाळी प्रसिध्द होणाऱ्या साप्तहिकांमध्ये बघायला मिळतात. त्या विचारांवरून गांधीवादी विचारसरणीचे स्वरूप आणि वैशिष्टये लक्षात येतात.

**गांधीवादाचे स्वरुप :-**

१) **एकसंघता** गांधावादामध्ये दिसून येते - मानवी जीवनाच्या प्रत्येक बाजूचा आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, आरोग्य, पर्यावरण समतोल इत्यादी व्यक्तीजीवनाच्या प्रत्येक बाजूवर त्यांचे लिखाण आढळून येते. मानवी संवर्धन आणि मानवी हिताच्या दृष्टीने वास्तविकता लक्षात घेऊन त्यांनी विचार मांडले. त्यांचा प्रत्येक विचार दुसऱ्या विचाराशी संबंधित आहे. उदा. विकेंद्रित राज्यव्यवस्थेला, आवश्यक विकेंद्रित अर्थव्यवस्था, व्यवसायावर आधरित शिक्षणव्यवस्था याविषयी त्यांचा विचार आहे. संपूर्ण गांधी विचारात एकसंघता आढळून येते. प्रेम, परस्परविश्वास याव्दारे मानवतेच्या आधारावर समाजाची पुनर्रचना करणे हे विचाराचे उद्दिष्ट आहे.

२) **मध्यवर्ती कल्पना एकच** - गांधीवादातील कोणताही विचार घेताला तरी प्रत्येक विचाराची मध्यवर्ती कल्पना 'मानवतेची स्थापना करणे' हा आहे. उदा. सत्य, अहिंसा, साध्य आणि साधन सुचिता या गांधीविचाराच्या मध्यवर्ती कल्पना आहेत. संपूर्ण गांधीविचार या तीन संकल्पनांवर आधारलेले आहेत.

३) **धार्मिक तत्वांना व्यावहारिक स्वरुप दिले** - गांधीवादामध्ये धार्मिक तत्वानांच व्यवहारिक स्वरुप दिले आहे असे आढळून येते. महात्मा गांधीनी हिंदू, जैन, बौध्द, ख्रिश्चन, इस्लाम इत्यादी अनेक धर्मांचा अभ्यास केला होता. सर्व धर्माची मूळ तत्वे व्यावहारिक प्रश्न सोडवितांना त्यांनी आचरणात आणली. उदा. विश्वस्तता, सत्याग्रह, सर्वोदय या प्रत्येक कल्पनेमागे विविध धर्माचीच मूळ तत्वे असल्याचे दिसून येते. गांधीविचारांना धर्मतत्वांचा आधार आहे. गांधीवादातील धर्म म्हणजे कोणताही विशिष्ट धर्म किंवा पंथ नाही. प्रत्येक धर्मामध्ये असलेल्या नैतिक तत्वांवर गांधीविचार आधारलेले आहेत.

४) आध्यात्मिकता आणि भौतिकता,धर्म आणि विज्ञान याचा मेळ गांधीविचारात दिसून येतो. धार्मिक तत्वांचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून विचार करुन त्या धार्मिक तत्वांना वास्तविक स्वरुप गांधीविचारामध्ये दिल्याचे दिसून येते.

## १४.३ गांधीवादाची वैशिट्ये किंवा मुख्य तत्वे

१) **विकेंद्रीत राज्यव्यवस्था आणि शासकीय व्यवस्था :-**

केंद्रीकरणा विरूध्द गांधीवाद होता. केंद्रकरणामुळे सत्तेच्या दुरुपयोगाला आणि लोकांच्या शोषणाला वाव मिळतो. म्हणूनच राजेशाही, सांसदीय लोकशाही, केंद्राकर्षी शासनव्यवस्था त्यांना मान्य नव्हती. त्यांनाी विकेंद्रीत शासकीय व्यवस्थेचा विचार सुचविला होता. राजकीय विकेंद्रीकरण कसे करावे ते गांधीवादात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

**स्वतंत्र्य, स्वयंपूर्ण, स्वावलंबी ग्रामीण व्यवस्था** - प्रत्येक गांव त्यांच्या गरजा, प्रशायकीय व्यवस्था धोरणे, निर्णय याबाबतीत स्वावलंबी असावे. प्रत्येक गांव आपल्या गावाची व्यवस्था बघण्यास आणि व्यवस्था ठेवण्यास बांधलेले असावे.प्रत्येक गाव, शहर, व्यक्ती आपआपल्या गावाच्या व्यवस्थेसाठी जबाबदार राहील. गावांची रचना त्रिकोणप्रमाणे एकावर दुसरे

अवलंबून याप्रमाणे न राहता; समुद्रातील वलयांप्रमाणे प्रत्येक वलय स्वतंत्र्य परंतु एकमेकांना जोडलेले याप्रमाणे असावी. स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी गावाची संघराज्यपध्दती गांधीवादात सुचविली होती. प्रत्येक गावामध्ये एक जनरल व्हीलेज कौन्सिल गावाची व्यवस्था बघण्यासाठी राहील. या जनरल व्हिलेज कौन्सिलमध्ये प्रत्येक कुंटुबाचा एक प्रतिनिधी असावा. कार्यकारी समिती निवडण्याचे काम कौन्सिल करेल. ही कार्यकारी समिती आपल्या गावाच्या प्रत्येक व्यवस्थेसाठी जबाबदार राहिल. या व्यवस्थेलाच विकेंद्रित शासनव्यवस्था गांधीवादात म्हटले आहे.

२) **विकेंद्रीत अर्थव्यवस्था** :- गावाशी संबंधीत, गावांना स्वयंपूर्ण बनविणारी अर्थव्यवस्था ज्यामध्ये वस्तूचे उत्पादन, वितरण विकेंद्रीत राहील त्याला विकेंद्रीत अर्थव्यवस्था म्हणतात. स्वंतत्र्य ग्रामीण व्यवस्था स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी होण्यासाठी कुटीरद्योगांवर आधारीत उदा. कापडउद्योग, सुतारउद्योग, शेतीउद्योग इत्यादी बाबतीत त्याच गावात उत्पादन आणि वितरण करण्यात यावे. यावर गांधीवादाचा भर होता. अति औद्योगिकरण आणि भांडवलशाही समजाला घातक आहे. जे उद्योग कुटीरउद्योगाद्वारे शक्य नाही त्यासाठी औद्योगिकरण योग्य आहे. परंतु इतर सर्व आवश्यक वस्तू बाबतीत ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योग स्थापन करावे. आर्थिक सत्ता अशाप्रकारे अनेक घटकांमध्ये विभागली गेल्यामुळे अनेकांना उद्योग मिळेल. आपल्या गावातील लोकांच्या गरजां व सोयीसाठी दुसऱ्या गावावर अवलंबून राहावे लागणार नाही.

३) **साधी राहणी आणि मर्यादीत गरजा** :-

गांधीवाद हे मान्य करतो की जोपर्यंत व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाही तोपर्यंत व्यक्तीचा नैतिक विकास शक्य नाही. दुसऱ्या बाजूला गरजा अति वाढविणे, ऐषआराम, भोगवाद, चैन याला गांधीवाद विरोध करतो. दारिद्र्यामुळे गुन्हेगारी वाढते त्याचप्रमाणे अतिसंपत्ती आणि भोगवादामुळे नैतिक विकास होत नाही. म्हणून भोगवादी संस्कृतीला आणि अतिदारिद्र्य दोन्ही टाळावे यासाठी गांधीवाद साधी राहणी आणि मर्यादीत गरजा असाव्यात यावर भर देतो.

४) **विश्वस्तता** :- व्यक्तिला जगण्यास आवश्यक जेवढी संपत्ती गरजेची असते तेवढीच संपत्ती व्यक्तीकडे असावी. श्रीमंतांनी जास्तीची संपत्ती समाजासाठी खर्च करावी. आर्थिक समता आणि न्याय या मूल्यांची समाजात स्थापना करण्यासाठी गांधीवादामध्ये 'विश्वस्तता' कल्पना सुचविली आहे. आर्थिक विषमता या समस्येवर उपाय म्हणजेच गांधी विचारातील विश्वस्तता तत्व होय.

गांधीच्या मते संपत्ती ही खाजगी कधीच नसते. संपत्ती सामाजिक उत्पादन असते. त्या संपत्तीमध्ये अनेकांचा वाटा असतो. भांडवलदार कामगारांच्या शिवाय संपत्ती कमावू शकत नाही किंवा जमीनदार शेतकऱ्यांच्या मदतीशिवाय पीक काढू शकत नाही. त्यामुळे भांडवलदार किंवा जमीनदार यांच्याकडे जी संपत्ती असते त्यात समाजातील कामगार आणि शेतकरी यांचाही वाटा असतो. म्हणून भांडवलदार व जमीनदार आणि इतर अतिश्रीमंत यांनी त्या संपत्तीचे फक्त विश्वस्त असावे. त्या संपत्तीचा उपयोग त्यांनी समाजाच्या हितासाठी करावा. संपत्ती समाजाचे समाजाच्या सहकार्याने केलेले उत्पादन असते. ते समाजासाठीच वापरावे या गांधी विचाराला विश्वस्ततता असे म्हटले आहे. विश्वस्ततता ऐच्छिक आहे. व्यक्तिहित आणि सामाजिक हित प्रत्येक श्रीमंताने साधावे ते कुणाच्या तरी हुकुमावरून किंवा जबरदस्तीने नाही तर स्वइच्छेने करावे.

गांधीवादातील संपत्ती आणि विश्वस्तता विषयक विचारातून विनोबा भावे यांनी भूदान चळवळ सूरु केली होती. भूदान चळवळीच्या यशानंतर, ग्रामदान चळवळ सुरु केली होती. भूदान चळवळी बरोबरच संपत्तीदान चळवळ त्यांनी सुरु केली.

विश्वस्ततता या कल्पनेमुळे भांडवलवाद, संपत्तीचे केंद्रीकरण आर्थिक विषमता इत्यादी गोष्टींना आपोआपच खीळ बसेल. श्रीमंताना विश्वस्ततेच्या माध्यमातून मानवतेप्रति नैतिक कर्तव्ये करण्याची संधी मिळेल हा विचार विश्वततेमागे होता.

५) **राजकारणाचे आध्यात्मिकरण** - मूल्यांवर आधारित राजकराण म्हणजे राजकारणाचे आध्यात्मिकरण होय. राज्य करण्याची कला आणि राजकारण नैतिक मूल्यांपासून वेगळे करणे गांधीना मान्य नव्हते. सर्व राजकीय कृती, उद्दीष्टे, धोरणे यांचे मुख्य ध्येय न्याय आणि नैतीकतेची स्थापना करणे असावे. सर्व राजकसीय संस्था, राजकीय धोरणे, राजकीय निर्णय नैतीक पध्दतीने व्हावेत. राजकीय क्षेत्रात सुध्दा साध्य आणि साधन दोन्ही नैतीक आणि चांगले असावे उदा. समाजातील अर्थाजन करणाऱ्यावर घटनात्मक पध्दतीने शासनाने योग्य कर लादावे परंतु कराच्या स्वरुपात येणारा निधी शासनाने गरजू आणि गरिबांच्या हितासाठी प्रामाणिकपणे वापरावा. अशाप्रकारे राजकारणाचे नैतीकीकरण झाले तर राष्ट्रांची आर्थिक आणि राजकीय प्रगती तर होईलच त्याशिवाय सामजिक आणि आध्यात्मिक प्रगती होईल.

६) **सर्वोदय** - सर्व + उदय असे दोन शब्द सर्वोदयात अंतर्भुत आहेत. सर्वोदय म्हणजेच सर्वांचा उदय किंवा सर्वांची प्रगती होय गांधीवादाप्रमाणे सर्वोदयामध्ये सर्व मानवजातीचा उदय व विकास यावर भर आहे.सर्वोदयात सर्वांचे हित अंतर्भूत आहे. दुसऱ्यासाठी जगा ही वृत्ती यात आहे. प्रत्येक व्यक्तीच्या हितामध्येच सर्वांचे हित अंतर्भुत आहे यावर सर्वोदयाचा विश्वास आहे. सर्वोदय एकप्रकारचा समाजवाद आहे. या समाजवादात संपूर्ण समाज एक आहे त्याद्दष्टीने संपूर्ण समाजाचे हित झाले की आपोआपच व्यक्तीचे हित होईल यावर भर आहे. समाजाला हानी करुन व्यक्तीहिताला प्राधान्य देणे याला सर्वोदयवादाचा विरोध आहे.

सर्वोदयाची संकल्पना वेदातील 'सर्व प्राणीमात्राची एकता' कल्पनेवर आधारलेली आहे. गीता आणि बुध्दधर्मातील 'सर्व भुताहिताय' सर्व प्राणीमात्राचे हित ही संकल्पनाही सर्वोदयाचा आधार आहे. जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदय संकल्पना विकसित केली होती.

सर्वोदय विचारसरणीमध्ये अशा समाजाची स्थापना करण्यावर भर आहे, जो समाज प्रेम, एकमेकांवर विश्वास ,सहकार्य या मूल्यांवर आधारलेला असेल. कुंटुबामध्ये कुंटुबातील सर्व व्यक्ती ज्या मूल्याच्या द्वारे एकमेकांशी बांधलेले असतात. त्याच मुल्याच्या द्वारे समाजातील सर्व व्यक्तीनी एकमेकांशी वागावे असा विचार सर्वोदयात आहे. ही विचारसरणी लोकांनी ऐच्छिकपणे स्विकारावी यावर सर्वोदयाचा भर आहे.

७) **स्वदेशी** - भारतीय अर्थव्यवस्था सुधारावी या उद्देशाने स्वदेशी तत्वाचा गांधीवादात समावेश होता. ब्रिटिशाच्या आर्थिक धोरणामुळे जेव्हा भारतीय अर्थव्यवस्था पूर्णपणे कोसळली होती. तेव्हा ती सावरण्याच्या द्दष्टीने गांधीनी स्वदेशीचा प्रत्येकाने स्विकार करावा असा विचार मांडला होता. ब्रिटिश काळात ब्रिटिशाच्या नीतीप्रमाणे कापूस कच्च्या मालाच्या स्वरुपात इंग्लडामध्ये पाठविण्यात येत होता तेथे कारखान्यामध्ये त्याचे कापड तयार करुन ते भारतात विकण्यात येत

असे. त्यामुळे एकीकडे भारतातील कापडउद्योग बंद पडला होता आणि दुसरीकडे सर्व पैसा ब्रिटिशांच्या तिजोरीत जात होता. ब्रिटिशांच्या या आर्थिक धोरणामुळे भारतातील ब्रिटिश राजवटीला आणखी मजबुती आणि स्थिरता येत होती. राजकीय मजबुतीचा उपयोग आर्थिक व्यवस्था स्थिर करण्यास केला जात होता. ब्रिटिश धोरणामागचे हे कारस्थान ओळखून ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाला स्वदेशी तत्वाव्दारे आळा घालणे हा विचार या तत्वामागे होता.

स्वदेशी तत्वाप्रमाणे लोकांना असे आव्हान करण्यात आले होते की लोकांनी परदेशी वस्तु वापरु नये, विकत घेऊ नये. भारतात तयार होणाऱ्या वस्तू, कापड वापरावे. खादीचा स्विकार करावा. ब्रिटिशांच्या काळात लोकांनी या तत्वाप्रमाणे परदेशी वस्तु आणि कपडयांच्या होळया केल्या. खादीचे कापड वापरायला सुरवात केली. स्वतः गांधीवाद्यांनी स्वदेशीचा फक्त प्रचार केला नाही तर अंगीकार केला होता. स्वदेशीच्या यशामुळे अर्थात ब्रिटिश अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला. म्हणूनच असे म्हणण्यात येऊ लागले की चरख्यामुळे ब्रिटिश साम्राज्य कोसळले.

८) **अंहिसा आणि सत्य** :- ही तत्वे गांधीवादाची मध्यवर्ती तत्वे आहे. सत्य म्हणजे जे खरोखरच अस्तित्वात आहे ते होय. सत्य हे गांधीवादातील 'साध्य' आहे. हे साध्य गाठण्यासाठी 'साधन' म्हणजे अहिंसा होय. अहिसेंच्या विविध बाजू आहेत.

१) वैचारिक अहिंसा - चांगल विचार करणे, चांगला हेतू असणे.
२) भाषेतून अहिंसा - बोलणे, भाषा याद्वारे कुणालाही दुःख होईल, नुकसान होईल अशा शब्दांचा उपयोग न करणे.
३) कृतीतून अहिंसा - कृतीद्वारे कुणालाही दुखापत न करणे.

सर्व धर्मामध्ये अहिंसा तत्व मुख्य तत्व आहे. गांधींनी स्वतः 'सत्याग्रह' 'विश्वस्तता' आणि 'सर्वोदय' या संकल्पनांच्या स्वरुपात अहिंसा आणि सत्य ही तत्वे व्यवहारात आणली. अहिंसा या साधनाद्वारे म्हणजेच 'सत्याग्रह। 'विश्वस्ततता', 'सर्वोदय' या संवल्पनांच्या आचरणाने समाजात क्रांती घडू शकते यावर गांधीवादाचा भर होता. या मार्गाने होणारी क्रांती ही तात्पुरते बंदल घडविणारी नाही तर समाजात कायमचे बदल घडवून आणणारी राहील यावर गांधीवादाचा भर होता. गांधीनी या तत्वांच्या आधारावर आफ्रिकेत आणि भारतात क्रांती घडवून आणली होती.

९) **सत्याग्रह** - भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये हजारो सत्याग्रहींनी भाग घेतला होता. स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिशांच्या अन्यायी धोरणाविरुध्द सत्याग्रहींनी सत्याग्रह केला, तेव्हा ब्रिटिशांनी सत्याग्रहींवर लाठीचार्ज केला, त्यांना तुरुंगात टाकले तरीही सर्व सत्याग्रही शांत होते, अहिंसात्मक पध्दतीने प्रतिक्रिया देत होते आणि सत्य व न्यायासाठी लढा देत होते.

सत्यासाठी आग्रह असा सत्याग्रहाचा शब्दशः अर्थ आहे. सत्याग्रहामध्ये सत्यासाठी, न्यायासाठी आग्रह असतो. जेव्हा एखाद्या व्यक्तिला हे माहित असते की तो सत्याचा आणि न्यायाच्या बाजूने लढा देतो तेव्हा त्या विश्वासातून त्या व्यक्तिमध्ये ध्धैर्य येते, लढण्याची ताकद येते. अन्यायी आणि खोट्या गोष्टीसाठी सत्याग्रह केलाच जाऊ शकत नाही. सत्याग्रह साधन दुर्बलाचे नाही तर, शूर व्यक्तीचे साधन आहे. सत्याग्रहासाठी सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीमध्ये मनाचे बळ, आत्मविश्वास, सत्यावर विश्वास, देवावर विश्वास, सहनशक्ती इत्यादी आवश्यक असते. आत्मशक्तीच्या बळावर सत्याग्रही लढू शकतो.

**सत्याग्रहाचे प्रकार** :- १) सविनय कायदेभंग २) असहकार ३) हरताळ ४) धरणे धरणे ५) बहिष्कार ६) हिजरत ७)उपोषण ८) अर्ज, निदर्शने करणे ९) शांतता समित्या.

१) **सविनय कायदेभंग** - अन्यायी कायद्याला विरोध करणे, तो कायदा न पाळणे म्हणजे सविनय कायदेभंग होय. दुसरे म्हणजे आदरयुक्त आणि चांगल्या मार्गानेच कायदेभंग करण्यात येतो. उदा. १९३० साली गांधींनी दांडी येथे मिठाचा कायदा मोडून सविनय कायदेभंग केला होता.

२) **असहकार** - कोणतेही शासन लोकांच्या सहकार्याशिवाय कार्य करु शकत नाही. शासन दडपशाही करणारे आणि अन्यायी असेल तर अशा शासनाला विरोध करणे लोकांचे कर्तव्य आहे असे गांधीचे मत होते. शासनाशी असहकार म्हणजे शासनाची प्रत्येक ठिकाणी अडवणूक करणे. उदा. कर न देणे, शाळा, कॉलेज, न्यायालय इत्यादी शासकीय सेवा न देणे .१९२० साली गांधीनी ब्रिटिश शासनाच्या अन्यायाविरूध्द देशव्यापी असहकार आंदोलन करुन ब्रिटिशांना जेरीस आणले होते,

३) **हरताळ** - शांततेच्या मार्गाने काम करणे थांबविणे म्हणजे हरताळ होय.

४) **धरणे** - अन्याय करणाऱ्या व्यक्तीच्या घरापुढे, दुकानापुढे, कार्यालयापुढे धरणे धरून निषेध व्यक्त करणे आणि अन्याय करणाऱ्याला त्याच्या कृतीची जाणीव करून देणे. हा उद्देश धरणे धरण्यामागे असतो. धरणे शांततापूर्ण मार्गाने करावीत यावर या विचारसरणीचा भर आहे.

५) **बहिष्कार** - अन्याय करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेच्या कृतीमध्ये किंवा कार्यामध्ये सहभागी न होणे म्हणजे बहिष्कार होय.

६) **उपोषण** - अन्यायाला विरोध करण्याचे हे सर्वात प्रभावी साधान आहे. या साधनाचा अवलंब करण्यासाठी सत्याग्रहीमध्ये प्रचंड आत्मबळ, शिस्त, निर्भतया, निश्चय असणे आवश्यक असते. हे साधन अतिशय कठीण आहे त्याचा वारंवार उपयोग होऊ नये. स्वार्थ आणि प्रसिध्दीसाठी तर या साधनाचा उपयोग होता कामा नये.

७) **निदर्शने** - मिरवणूका काढणे, निषेध, मोर्चा इत्यादी.

८) **शांततासमित्या** - सभा, समित्या, शीखरपरिषदा आयोजित करुन चर्चा विचारविनियम याव्दारे एखाद्या समस्येवर तोडगा काढणे, आजच्या काळात दोन देशातील समस्या याच मार्गाने सोडविण्यात येतात.

**मुल्यमापन** :– वरील गांधीविचार म्हणजे फक्त पुस्तकी तत्वज्ञान नाही. वरील विचारांचा अवलंब दक्षिण आफ्रिकेत (१८९३ ते १९१४) भारतीयांना सामान वागणूक मिळावी आणि वंशिक समता निर्माण करण्यासाठी गांधीनी केला होता. प्रयोग म्हणून सुरवातीला त्यांनी वरील विचारांचा अवलंब केला. त्यानंतर त्या विचारांची यशस्वीता लक्षात आल्यानंतर भारतीय स्वातंत्र्यचळवळींचा (१९२० ते १९४५) लढा त्यांनी वरील तत्वांवर दिला. त्यानंतर विनोबा भावे, मार्टीनल्युथर

किंग, जयप्रकाश नारायण आणि जगामध्ये अनेक ठिकाणी या विचारांचा अवलंब झाला आहे. गांधीविचार फक्त राजकीय तत्वज्ञानच नाही तर एक संदेश आहे. जीवनाचे तत्वज्ञान आहे ज्यामध्ये सुखी, समाधानी जीवनाचा संदेश आहे.

## १४.४ सारांश - तक्ता - गांधीवाद

१ गांधीवादाचा अर्थ

२ स्वरुप

१) एकसंघ
२) मध्यवर्तीकल्पना
 सत्य, अहिंसा
 साध्यसाधनसूचिता
३) धर्मतत्वाना वास्तविक
 व व्यावहीरिक स्वरुप
४) धर्म + विज्ञानाचा
 मेळ

३ वैशिष्टे किंवा तत्वे

१) राजकीय विकेंद्रीकरण
२) आर्थिक विकेंद्रीकरण
३) साधी राहणी
 मर्यादित गरजा
४) विश्वस्तता
५) मू ल्यावर आधरीत राजकारण
६) सर्वोदय
७) स्वदेशी
८) सत्याग्रह

४ मुल्यमापन

## १४.५ प्रश्न

१) गांधीवादाच्या मुख्य तत्वांची चर्चा करा.
२) गांधीवाद म्हणजे काय ? गांधीवादाचे स्वरुप सांगा.
३) गांधीवादाचे मुल्यमापन करा.

❖❖❖❖